# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०२/२००९** **दिनांक ०८.०२.२००९**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी ४.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१५१८-२००९, दि.०३.०२.२००९ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. परंतू काही अपरिहार्य कारणास्तव या सभेच्या वेळेत बदल करण्यात आला असून, सदरहू सभा रविवार दिनांक ०८.०२.२००९ रोजी सकाळी ११.०० वा. ऐवजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-१६४७-२००९, दि.०५.०२.२००९ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक०८.०२ २००९ रोजी दुपारी ४.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष, |
| ०३. | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील | ०४. | मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६. | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव |
| ०७. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे | ०८. | मा.श्रीमती रिम्पल लोहिया |
| ०९. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर | १०. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक |
| ११. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | १२. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते |

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११(२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेचे सुरुवातीस व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग, हे श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक पदी निवडून आल्याबद्दल त्यांचा मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येऊन सभेने त्यांचे हार्दीक अभिनंदन केले. तसेच मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव व मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांनी नवीन प्रसादालय उभारणीकामी आर्किटेक्ट नेमणूकीपासून ते बांधकाम पूर्ण होईपर्यंतची सर्व कामे जातीने लक्ष घालून केलेबद्दल त्यांचाही मा.सौ.सुमित्रा कैलास कोते यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.समि खतिब,मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी फॅक्स पत्राद्वारे कळविले त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**व्यवस्थापन समिती सभा दिनांक ८.०२.२००९**

**विषय नं.०१ दिनांक ०३.०१.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७३** दिनांक ०३.१.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्या करण्यात आल्या.

**०१. निर्णय क्र.०४ (२४) चा शेवटचा परिच्छेद-**

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार शस्त्रक्रिया/उपचारासाठी फक्त एकदाच वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. श्री.राहूल जाधव यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने मानवतावादी दृष्टीकोनातून वेगळा आजार असल्यास संस्थान नियमानुसार त्यांना पुन्हा आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचावे-**

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार शस्त्रक्रिया/उपचारासाठी फक्त एकदाच वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. श्री.राहूल जाधव यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने विशेष बाब म्हणून त्यांना पुन्हा आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२ दिनांक १०.०१.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.७४** दिनांक १०.०१.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) <u>संस्थानला सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी कंत्राटदारांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.</u>**

व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३.०१.२००९ चे सभेत ठरलेनुसार खालील निविदासादरकर्त्यांना उपसमितीचे सभेत समक्ष/वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा, तसेच यापुढे कॉन्ट्रॅक्टचा कालावधी १ वर्षाऐवजी ३ वर्षे करणेत यावा, असे ठरलेले आहे.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, गोरेगांव (पुर्व), मुंबई-४००० ६५. |
| ०२. | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) नाशिक-पुणेरोड, नाशिक- ४२२ १०१. |
| ०३. | सेन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस लि. अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३. |
| ०४. | युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.,कासारवाडी, पुणे- ४११ ०३४ |
| ०५. | बीसेफ,चंदननगर, नगररोड,पुणे-४११ ०१४. |
| ०६. | ईगल हंटर सोल्युशन्स लिमिटेड, अंधेरी (वेस्ट), मुंबई.४००० ५३ |
| ०७. | औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस, जालना रोड, औरंगाबाद. |
| ०८ | मे.ईगल आय एन्टरप्राईज,दमन- वापी रोड,दमन(यु.टी.) गुजरात |
| ०९ | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस एम.जी.रोड, कॅम्प, पुणे-४११ ००१ |
| १० | ईगल सिक्युरिटी ॲन्ड परसोनेल सर्व्हिसेस,अंधेरी (वेस्ट) ,मुंबई-४०० ०५८ |
| ११ | फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हिसेस, कांदिवली (पुर्व), मुंबई-४०० १०१. |
| १२ | मे सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,विलेपार्ले (पश्चिम),मुंबई-४०० ०५६. |
| १३ | गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट (नागपूर)प्रा.लि.,पुणे-सातारा रोड,पुणे-४११०४३. |
| १४ | संतोष केअरवेल सर्व्हिसेस प्रा. लि. नाशिकरोड, नाशिक-४२२ १०१ |
| १५ | एस्कॉर्ट सर्व्हिसेस, पुणे-सातारा रोड,पुणे-४११ ०४३. |
| १६ | ड्रेगॉन सर्व्हिसेस, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३. |
| १७ | युनाईटेड सर्व्हिसेस, धनकवडी, पुणे-४११ ०४३. |
| १८ | ब्लॅक कॅट इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड,न्यु. बी.जे. मार्केट,जळगांव-४२५ ००१. |
| १९ | पायोनिअर सिक्युरिटी सर्व्हीसेस नवी सांगवी, पुणे-४११ ०२७. |
| २० | तोगे एन्टरप्राईजेस, वाळूज, एम.आय.डी.सी.,औरंगाबाद. |

त्यानुसार उपरोक्त निविदासादरकर्त्यांना आजचे सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी चर्चा/वाटाघाटीमध्ये खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | | | | | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | वार्षीक उलाढाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संरक्षण अधिकारी (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा सु.वायझर (माजी सैनिक) रुपये | सशस्त्र सु.रक्षक (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा गार्ड (पुरुष/स्त्री) सिव्हीलियन (कि.वे.दर रु.१३१.९७) | | |
| **(१)** | **(२)** | **(३)** | **(४)** | **(५)** | **(६)** | **(७)** | **(८)** | **(९)** |
| १. | मे.टॉप्स सिक्युरिटी लि,मुंबई- | **१५०.००** | **१४६.००** | **२३०.००** | **१३९.००** | **१३९.००** | **१.००%** | २०० .०० कोटी |
| २. | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यु.नाशिक | **१३९.६६** | **१३५.८२** | **१८४.५५** | **१३१.९७** | **१३१.९७** | **०.७५%** | १८० .०० ोटी |
| ३. | सेन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्यु. लि.मुंबई | **२५०.००** | **१७८.००** | **२२१.००** | **१३२.००** | **११५.००** | **१.००%** | ५७.०० कोटी |
| ४. | युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि., कासारवाडी, पुणे- ४११ ०३४ | **३५५.००** | **२६५.००** | **२३५.००** | **१९९.००** | **१३०.००** | **४.००%** | ५०.०० कोटी |
| ५. | बीसेफ,चंदननगर, नगररोड, पुणे-४११ ०१४.(अनुपस्थित) | **३९०.००** | **३६५.००** | **३६५.००** | **३१५.००** | **३००.००** | **१२.५%** | ४५.०० कोटी |
| ६. | ईगल हंटर सोल्युशन्स लि., अंधेरी (वेस्ट), मुंबई.४००० ५३ | **४००.००** | **२२०.००** | **२२८.००** | **१५०.००** | **११९.००** | **२.२५%** | ४१.०० कोटी |
| ७. | औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस, जालना रोड, औरंगाबाद. | **२१०.००** | **१३९.६५** | **२५०.००** | **१३५.८०** | **१३१.९५** | **३.५%** | ११.५४ कोटी |
| ८. | मे.ईगल आय एन्टरप्राईज,दमन- वापी रोड, दमन(यु.टी.) गुजरात | **३६०.००** | **२६७.९०** | **२२१.३५** | **२००.१०** | **---** | **१०.००%** | १०.५० कोटी |
| ९. | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस, पुणे-४११ ००१. | **२००.००** | **१६८.००** | **१८५.००** | **१५०.००** | **१४५.००** | **०.०५%** | ७.०० कोटी |
| १०. | ईगल सिक्युरिटी ॲन्ड परसोनेल सर्व्हिसेस, मुंबई-४०० ०५८. | **८७३.७६** | **३३५.९३** | **३१४.००** | **२५५.७०** | **१३२.००** | **५.००%** | ६.५५ कोटी |
| ११. | फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हिसेस, मुंबई-४०० १०१. | **११९.७९** | **११२.७९** | **११९.७९** | **१०८.७९** | **१०४.७९** | **०.७९%** | ५.८० कोटी |
| १२. | मे सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई-४०० ०५६. | **१३९.००** | **१३५.८२** | **२२१.३५** | **२००.१०** | **१३१.९७** | **०.०२%** | ४.७० कोटी |

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | | | | | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | वार्षीक उलाढाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संरक्षण अधिकारी (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा सु.वायझर (माजी सैनिक) रुपये | सशस्त्र सु.रक्षक (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा गार्ड (पुरुष/स्त्री) सिव्हीलियन (कि.वे.दर रु.१३१.९७) | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १३. | गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट (नागपूर) प्रा.लि.,पुणे-४११०४३. | ४७३.०० | ४५८.०० | ४५१.०० | ४२८.०० | २९४.०० | ३.००% | ३.८५ कोटी |
| १४. | संतोष केअरवेल सर्व्हिसेस प्रा.लि., नाशिकरोड,नाशिक-४२२ १०१ | १३९.६६ | १३५.८२ | १८४.५५ | १३१.९७ | १३१.९७ | ०.७०% | २.५०.कोटी |
| १५. | एस्कॉर्ट सर्व्हिसेस, पुणे-सातारा रोड, पुणे-४११ ०४३. | १३९.६६ | १३५.८२ | १३९.६६ | १३१.९७ | १३१.९७ | २.५% | २.५० कोटी |
| १६. | ड्रेगॉन सर्व्हिसेस, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५३. | २४३.०० | १६५.०० | २२०.०० | १५०.०० | १४०.०० | ३.००% | २.०० कोटी |
| १७. | युनाईटेड सर्व्हिसेस, धनकवडी, पुणे-४११ ०४३. | १३९.६६ | १३५.८२ | १३९.६६ | १३१.९७ | १३१.९७ | ३.००% | २.०० कोटी |
| १८. | ब्लॅक कॅट इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड,जळगांव-४२५ ००१. | २१०.०० | २०१.०० | २९५.०० | १८२.०० | १८०.६० | २.००% | १.५० कोटी |
| १९. | पायोनिअर सिक्युरिटी सर्व्हीसेस नवी सांगवी, पुणे-४११ ०२७. | १३९.६६ | १३९.६६ | १५०.०० | १३१.९७ | १३०.०० | ८.००% | १.२५ कोटी |
| २०. | तोगे एन्टरप्राईजेस, वाळूज,एम.आय.डी.सी., औरंगाबाद. (अनुपस्थित) | --- | --- | --- | -- | १५५.०० | १०.००% | १.२५ कोटी |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे सुधारित दरांबाबत तक्ता उपसमितीचे सभेपुढे ठेवून अंतिम निर्णय घ्यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**(०२) द्वारावती इमारतीतील स्वच्छता/मदतनीसासंबंधी कामे Out Sources ने करुन घेणेबाबत.**

श्रीसाईभक्तांच्या निवासासाठी लवकरच व्दारावती इमारतीत निवासस्थान देण्याचे नियोजीत आहे. सदर इमारत नवीन असल्याने त्या इमारतीचे रुम मधील स्वच्छतेची ,भक्तांना गादया बेडशिट व चादरी इत्यादी मदतनीसा संबंधी कामे Out Sources ने दिल्यास ते चांगल्या प्रकारे होतील असे मत आहे

दिनांक ०३.०१.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत प्रसादालयातील स्वच्छतेची कामे Out Sources ने करुन घेणेकामी आलेल्या एजन्सी बरोबर इंटिग्रेटेड सर्व्हीसेस सोलुशन कंपनी (ISS )एजन्सी ही चर्चेसाठी आले होते त्यावेळी त्यांना तूर्त व्दारावती व साईबाबा भक्तनिवास (५००) रुम येथील स्वच्छतेची व इतर कामे Out Sources ने करुन देणेबाबत तेथील इमारतीची प्रत्यक्ष पहाणी करुन अहवाल देण्यास सांगितले होते.

यास अनुसरुन त्यांनी खालीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे.यात रुमबॉय,हाऊस किपींग या कामासाठी खालील प्रमाणे कर्मचारी वर्ग व त्या व्यतिरिक्त ते स्वच्छतेसाठी आधुनिक साधने ठेवणार आहे.

**Staff**

| | | Morning | General | Afternoon | Night | Total | Relievers | GT |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| A | Sr.Supervisior | -- | 1 | -- | -- | 1 | 0 | 1 |
| B | Supervisior/Group Leader | 1 | 0 | 1 | 1 | 3 | 1 | 4 |
| C | Help Desk | 1 | 0 | 1 | 1 | 3 | 1 | 4 |
| D | Houseman | 13 | 0 | 13 | 13 | 39 | 7 | 46 |
| | Total | 15 | 1 | 15 | 15 | 46 | 8 | 54 |

| | |
|---|---|
| Sr.Supervisor | 01 |
| Sup | 04 |
| Help Desk | 04 |
| HM | 46 |
| Total | 54 |

Equipments Dedicated for Dwarawati -Shirdi

| Sr No | Particular | |
|---|---|---|
| 01 | Scrubbing Machine | 02 |
| 02 | Ladder | 02 |
| 03 | Telescopic rod | 04 |
| 04 | Wet and Dry Vacuum Cleaner | 03 |
| 05 | Dry Vacuum cleaner | 01 |
| 06 | Chambermaid Trolley | 04 |

| | | |
|---|---|---|
| 07 | Wringer trolley [ 30 l ] | 04 |
| 08 | Wringer trolley [15/20l ] | 08 |
| 09 | Glass cleaning Kit | 03 |
| 10 | Sign boards | 10 |
| 11 | Toilet Caddie | 10 |

**Job Description**

01. Sr.Supervisor :- one point contact for all the site.all Houseman & Supervisor will report to him.

02. Group Leader :- Responsible for the all operation of Housemen & will be continue on rounds checking rooms & maintenance & will help the housemen in cleaning & room allotment to each floor.

03. Help Desk :- Will do the booking of rooms & will inform to the store person for the same .& will have to coordinate with acountants & other staff.also will monitor the record for all inward & outward material like linen,Pillow cover etc.

०४.Houseman :- Will do the entire cleaning job & will be deployed on each floor & will also perform the stores person job by checking the form & issuing the required material to the guest & will report to Help Desk or Group Leader .

या कामासाठी पुरविण्यात येणा-या उपरोक्त कर्मचा-यासाठी प्रती महा रुपये ५,००,०००/-मात्र रक्कम (अक्षरी रुपये पाच लाख सर्व्हीस टॅक्स सह) अपेक्षित आहे, असे संबंधीत एजन्सीने त्यांनी दिलेल्या दरपत्रकात नमूद केले आहे. त्यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी त्यांचे लेखी पत्राद्वारे प्रती माह रक्कम रुपये ४,९५,०००/- (सर्व टॅक्स मिळून) अपेक्षित असलेचे नमूद केले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, इंटिग्रेटेंड सर्व्हीसेस सोलूशन कंपनी (ISS),नाशिक यांचेकडून द्वारावती इमारतीतील स्वच्छता/मदतनीससंबंधी कामे प्रायोगिक तत्वावर एक वर्ष कालावधीसाठी Out Sources पद्धतीने करुन घेण्यात यावीत. याकामी त्यांना रक्कम रुपये ४,९५,०००/- (अक्षरी रुपये चार लाख पंच्यानव हजार मात्र) दरमहा देण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी, निवासस्थाने/अधिक्षक धर्मशाळा)

**(०३) <u>श्रीसाईप्रसादालयातील खिडकी व दरवाजांना लोखंडी पावडर कोटींग/स्टेनलेस स्टील ग्रील बसविणेबाबत.</u>**

नविन श्री साईप्रसादालय इमारतीमध्ये दिनांक ०८-०१-२००९ पासून प्रत्यक्ष प्रसाद भोजन व्यवस्था सुरु होणार आहे. तेथील दैनंदिन कामकाजात व्यत्यय येऊ नये म्हणून तसेच साईभक्तांचे प्रसाद भोजन झाल्यानंतर त्यांना प्रसादालयाच्या अन्य भागात जाण्यास प्रतीबंध करणे तसेच व्ही.आय.पी.भोजन कक्षाकडे जाणारा मार्ग बंदिस्त करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्रामुख्याने तळमाळा, लाडू किचन, मुख्य किचन, भांडार, भोजन हॉलचे ठिकाणी फक्त काचेच्याच खिडक्या आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने हे धोक्याचे असल्याने खालील ठिकाणी खिडक्यांना ग्रील, दरवाजांना स्टेनलेस स्टील ग्रीलच्या झडपा, तसेच जीना व पॅसेजमध्ये गेट बसविणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | जागा | नग | तपशील |
|---|---|---|---|
| ०१ | तळमाळा खिडकी | २३ | बाहेरील बाजूने ग्रील व १/२ x १/२ लोखंडी जाळी. |
| ०२ | पहिला माळा खिडक्या | ८३ | बाहेरील बाजूने ग्रील व १/२ x १/२ लोखंडी जाळी. |
| ०३ | ऑफीस समोरील व्ही.आय.पी. कक्षाकडे जाणारा जीना | ०१ | ग्रीलचा संपूर्ण दरवाजा. |
| ०४ | ऑफीसचे पश्चिमेस देणगी काऊंटरचे बाजूला | ०१ | ग्रीलचा संपूर्ण दरवाजा. |
| ०५ | पहिला माळा भोजन हॉलकडे जाणारा जीना | ०१ | ग्रीलचा संपूर्ण दरवाजा. |
| ०६ | नाष्टापाकीट व मुख्य किचन यामध्ये | ०१ | ग्रीलचा संपूर्ण दरवाजा. |
| ०७ | तळमजला प्रसाद भोजन हॉल पहिला माळा भोजन हॉल, सर्व्हीस पॅसेजचे बाजूचे दरवाजांना बंदिस्त करणे. | ३० | सर्व दरवाज्यांना ५ फूट उंचीचे स्टेनलेस स्टील ग्रील बसविणे. |
| ०८ | सर्व्हिस लिफ्टचे वरील भागाचे समोरील जागेत. | ०४ | ग्रील लावून सोलर ऑपरेटरसाठी खोली (जागा) तयार करणे. |
| ०९ | आर.ओ.प्लॅन्ट यंत्रणेचे सुरक्षेसाठी | ०४ | पत्राशेडला लोखंडी ग्रील लावून देणे. |

याव्यतिरिक्त श्री साई प्रसादालय इमारतीसमोर ग़ार्डन केलेले असून त्यात हिरवळ लावलेली आहे. या हिरवळीवर श्री साई प्रसादालयात भोजनासाठी येणारे भक्त बसतात. हिरवळीवर बसणाऱ्या भक्तांची संख्या प्रमाणापेक्षा फार असल्याने गेल्या दोनच दिवसात ही हिरवळ अत्यंत खराब झाली असून भविष्यात या ठिकाणी हिरवळ नष्ट होऊ शकते. तरी या हिरवळीच्या भोवती स्टेनलेस स्टीलचे सुंदर ग्रील लावणे गरजेचे आहे. हे काम तातडीने करणे गरजेचे असल्याने यापूर्वी संस्थानमध्ये स्टेनलेस स्टील रेलींगचे काम केलेल्या मे. साई इंजिनिअर्स, नासिक यांच्याकडून त्यांनी केलेल्या यापूर्वीच्या मंदिर परीसरातील कामाच्या मंजूर दराने हे काम त्वरीत पूर्ण करून घेण्यात येऊन या कामासाठी लागणाऱ्या

योग्य खर्चास मान्यता देण्यात यावी व याव्यतिरीक्त प्रसादालय विभागाच्या मागणीनुसार वरील तक्त्यातील नऊ कामांसाठी ग्रील्स व दरवाजे बनविणेकामी योग्य खर्चास तसेच हे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी कोटेशन मागविणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**(०४) <u>श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिक्षक,कर्मचारी व विद्यार्थ्यांना गणवेश खरेदीबाबत.</u>**

श्रीसाईबाबा औ.प्र.संस्थेतील शिक्षक कर्मचारी यांना नियमित गणवेष, प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थीनी कार्यशाळा गणवेष संस्थानचे खर्चाने तसेच प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थीनी करिता स्वखर्चाने नियमित गणवेश खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.९.२००८ चे सभेतील निर्णय क्र.६९६ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रचलित पध्दतीने पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. सदरहु दरपत्रके मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात येउन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन आजचे सभेपुढे सादर करण्यात येउन. पुरवठादारांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले.

मे.आर.के.कलेक्शन,नाशिक यांनी दिलेल्या दरपत्रकामध्ये टॅक्स रक्कम समाविष्ट केलेली नसल्यामुळे त्या बाबत वाटाघाटीमध्ये विचारणा केली असता दरपत्रकातील दरांमध्ये सर्व कर समाविष्ट गृहीत धरावे असे त्यांनी सागितले आहे व वाटाघाटीमध्ये यापूर्वी दिलेल्या दरपत्रकामध्ये सरसकट ५ टक्के सुट देऊ केली आहे. मे.के.जी.बांठीया ब्रदर्स,पुणे यांचे प्रतीनीधीने त्यांनी सादर केलेल्या दरपत्रकामध्ये सरसकट ३ टक्के सूट देऊ केलेली आहे.

वाटाघाटीअंती दरपत्रकातील दर व वाटाघाटी नंतरचे दर या बाबतचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Uniform for Staff:- Full Pant & Full Shirt Raymond & Two Tie | <u>For Boys</u>:- Boiler Suit Cloth S.Kumar 999 Three Pocket With Embroidery Logo, Five Thread Machine Stiching. As per Sample. | <u>I)For Boys</u>:- (Hotel Management Group - CFP) a)Chef Coat With Double Breasted Jacket With Embroidery Logo & Three Pocket,-Chef Pant- In Checks, -S.Kumar 999 (c)Chef Tie – White (d)Chef Appron-White – S.Kumar 999 (e)Chef Cap-White, <u>ForCOPA</u> Boys :- Appron With Embroidery Logo- White - S.Kumar 999 | For Girls:- Appron- Cloth S.Kumar 999 Three Pocket With Embroidery Logo, Five Thread Machine Stiching. |
|---|---|---|---|---|
| Qty. | 68 Set | 227 Nos. | 22 Set & 34 Nos. | 22 Nos. |
| Ketty Apparels India Pvt.Ltd. Mumbai.<br>निविदातील दर<br>चर्चाअंती देउ केलेले दर | 897/- Set | 454/-<br>अनुपस्थित | 861/- & 295/-<br>अनुपस्थित | 295/-<br>अनुपस्थित |
| R.K.Collection, Nasik<br>निविदातील दर<br>चर्चाअंती देउ केलेले दर | Pant 735/-, Shirt 390/- & Tie 60/-Total 1185/-Set Supphir Quality Shirt 390/- ,Pant 390/-, & Tie 60/- Total 840/-Set Trovin Quality 1125.75 Supphire 798/- Trovin | 475/-<br>451.25 | 933/- Set<br>886.35 | 230/-<br>218.50 |
| Mahavir Corp.Pune<br>निविदातील दर<br>चर्चाअंती देउ केलेले दर | 660/- Set<br>90/- Tie<br>अनुपस्थित | 416/-<br>अनुपस्थित | 1022/-<br>245/-<br>अनुपस्थित | 245/-<br>अनुपस्थित |
| K.G.Banthia Bros.,Pune<br>निविदातील दर | 535/- | 398/- | 588/-<br>185/- | 185/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चर्चाअंती देउ केलेले दर | 518.95 | 386.06 | 570.36<br>179.45 | 179.45 |

| Sr.No. | Regular Uniform for Boys:-<br>(a) Half Shirt- Cloth-S.Kumar 2.60 x2.60 Check/Plain with Embroidery logo & with Tie<br>(b) Full Pant Cloth-S.Kumar 999,2side,1back & 1 watch pocket | Regular Uniform for Girls:-<br>(I)Salwar:- S.Kumar Spun by Spun<br>(II) Kurta:- Cloth-S.Kumar 2.60 x 2.60 Check/Plain with Embroidery logo.<br>(III) Odhani:- Suitable for Dress. |
|---|---|---|
| Qty | 282 set | 22set |
| Ketty Apparels India Pvt.Ltd.Mumbai.<br>निविदातील दर<br>चर्चाअंती देउ केलेले दर | 500/-<br>अनुपस्थित | 590/-<br>अनुपस्थित |
| R.K.Collection, Nasik<br>निविदातील दर<br>चर्चाअंती देउ केलेले दर | 425/-<br>403.75 | मागणी केलेला एस.कुमार स्पन बाय स्पन दर्जाचा कपडा न वापरता पुरवठादार ठरवतील त्या नमुन्यानुसार.<br>265/-<br>251.75 |
| Mahavir Corp. Pune<br>निविदातील दर<br>चर्चाअंती देउ केलेले दर | 412/-<br>90/-<br>अनुपस्थित | 465/-<br>अनुपस्थित |
| K.G.Banthia Bros.,Pune<br>निविदातील दर<br>चर्चाअंती देउ केलेले दर | 395/-<br>383.15 | 365/-<br>354.05 |
| | | |

वाटाघाटीअंती वर नमूद केलेप्रमाणे न्यूनतम दराने व आपले मागणीप्रमाणे पुरवठा करणा-या मे.के.जी बांठीया ब्रदर्स,पुणे यांना पुरवठा आदेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय.)

**(०५) <u>श्रीसाईभक्तांचे निवासव्यवस्थेकरिता उशीसह कापूस गाद्या,तयार करणे व गादीखोळ (कव्हर) शिवणे यासाठी आलेल्या कोटेशनचा तक्ता</u>**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील, धर्मशाळा व चौकशी व निवासस्थान विभागातील साईभक्तांचे निवासव्यवस्थे करीता उशीसह कापुस गादया, गादीखोळ (कव्हर) तयार करुन देणेकामी मोहोरबंद निविदा मागविणेबाबत दि. २४/०५/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र. ४६० नुसार ठरलेले आहे. त्यानुसार दैनिक सार्वमत या वृत्तपत्रात जाहिरात देवुन निविदा मागविणेत आलेल्या आहेत. सदरच्या को-या निविदा दि.१५/१२/२००८ ते दि.२३/१२/२००८ अखेर शिरडी कार्यालयात विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. तसेच भरलेल्या निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख २४/१२/२००८ अखेर देण्यात आलेली होती. मुदतीत आलेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|
| ०१ | अपना गृह उद्योग, श्री लतिफ यासीन मन्सुरी ,श्रीरामपुर |
| ०२ | श्री लक्ष्मणदास चिमणदास वैष्णव, कमल कुशन वर्क्स,श्रीरामपुर |
| ०३ | सलिम गादी मर्चंट, लासलगांव |
| ०४ | नजिर गंभीर पिंजारी, श्रीरामपुर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव व पत्ता | उशीसह कापूस गादीसाठी कोटेशनातील प्रती नगाचा दर | गादी खोळ (कव्हर) शिवणेसाठी कोटेशनातील प्रती नगाचा दर | चर्चा/ वाटाघाटी नंतरचा उशीसह गादीसाठी प्रती नगाचा दर | चर्चा / वाटाघाटी नंतरचा गादी खोळ (कव्हर) साठी प्रती नगाचा दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अपना गृह उद्योग, श्री.लतिफ यासीन मन्सुरी, (आराम गादीवाले) कचेरी रोड, श्रीरामपूर, ता.-श्रीरामपूर जि.अहमदनगर | ५८.०० | --- | ५०.०० | --- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | श्री लक्ष्मणदास चिमणदास वैष्णव, कमल कुशन वर्क्स, मु.पो. श्रीरामपूर स्टेट बॅंके समोर, ता.श्रीरामपूर जि.अहमदनगर | ५१.०० | ११.०० | ३०.०० | ६.०० |
| ०३ | सलिम गादी मर्चंट, लासलगांव. ता.निफाड. जि.नाशिक | ३५.०० | ६.०० | ३०.०० | ३.५० |
| ०४ | नजिर गंभीर पिंजारी, श्रीरामपूर, काजीबाबा रोड वार्ड नं.२, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर | ६०.०० | ८.०० | ३०.०० | ७.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,उशीसह कापूस गाद्या तयार करणेकामी अ.नं.०२,०३ व ०४ यांचे निम्नतम दर सारखे असल्याने तिघांना उशीसह कापूस गाद्या तयार करण्याचे काम सम प्रमाणात विभागून देण्यात यावे. तसेच गादी खोळ (कव्हर) शिवणेकामी अ.नं.०३ सलिम गादी मर्चन्ट,लासलगाव यांचे दर निम्नतम असल्याने त्यांचेकडून सदरहू काम करुन घेण्यात यावे,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

**(०६) मकर संक्रांत व साईयज्ञ कार्यक्रमासाठी जागा मिळणेबाबत श्री.अरुण शंकरराव गायकवाड, साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट, शिर्डी यांचे पत्राबाबत.**

श्री.अरुण शंकरराव गायकवाड, साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट, शिर्डी यांनी - सालाबादप्रमाणे दि.१४/०१/२००९ रोजी मकरसंक्रांतीनिमित्त साईयज्ञ व साई भजन संध्या कार्यक्रम साई संस्थान गेट नं. ३ समोर आयोजित करावयाचा असून सदर कार्यक्रम सकाळी ७.०० ते रात्रौ ९.०० पर्यंत चालणार आहे. या धार्मिक कार्यक्रमास शिर्डी परिसरातील ग्रामस्थ व संस्थान विश्वस्त मंडळातील सन्माननीय सदस्य उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमासाठी संस्थान मार्फत मंडप व साऊंड सिस्टीमची सुविधा मिळावी, अशी विनंती केलेली आहे.

यापूर्वी सदरचा कार्यक्रम हा मंगल कार्यालयात होत होता, मागीलवर्षी मंगल कार्यालयात इतर कार्यक्रम असलेने त्यांना जुन्या मराठी शाळेच्या मैदानात कार्यक्रम करणेस परवानगी दिली होती. सदरचा कार्यक्रम हा खाजगी स्वरुपाचा असलेने त्यांना फक्त जागा उपलब्ध करुन द्यावी, इतर सर्व मांडणी त्यांनी करावी, असे संबंधीतांना सांगता येईल.

तथापी श्री अरुण गायकवाड व श्रीमती शैलजा गायकवाड यांचे विरुध्द श्री गोविंद भास्करराव शिंदे, शिंदे पा. वाडा, शिर्डी यांनी तक्रार अर्ज केलेला असून त्यात त्यांनी श्री अरुण गायकवाड व श्रीमती शैलजा गायकवाड व ट्रस्टचा श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे पाटील घराण्याशी काहिहि संबंध नसून श्री अरुण गायकवाड व श्रीमती शैलजा गायकवाड नामक व्यक्तींनी लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट निर्माण करुन ते साईभक्तांची दिशाभूल करीत आहेत. तरी श्री.अरुण गायकवाड व श्रीमती शैलजा गायकवाड यांना दि.१४/१/२००९ रोजी किंवा इतर कोणत्याही तारखेस संस्थानच्या हद्दीत कार्यक्रमास परवानगी देऊ नये तसेच संस्थान हद्दीत कोणत्याही आशयाचे बोर्ड लावण्यास परवानगी देऊ नये, असे म्हटले आहे.

तरी उपरोक्त अरुण शंकरराव गायकवाड, साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट, शिर्डी यांना - सालाबादप्रमाणे दि.१४/०१/२००९ रोजी मकरसंक्रांतीनिमित्त साईयज्ञ व साई भजन संध्या कार्यक्रम जुन्या मराठी शाळेचे मैदानात सादर करणेस परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**(०७) श्री. अण्णासाहेब रामभाऊ डांगे, कनकुरी यांची जमिन खरेदी करणेबाबत.**

**(अ)** श्री.अण्णासाहेब रामभाऊ डांगे, राहणार कनकुरी, तालुका राहाता यांची मौजे कनकुरी शिवारातील गट नंबर १२१/अ/३ मधील क्षेत्र ०० हे ७९ आर ही जमीन खरेदी करणेबाबत मा. व्यवस्थापन समितिचे दि.१५ नोव्हेंबर, २००८ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रमांक ८४३ खालीलप्रमाणे :-

"... आजचे सभेपूढे जमीनमालक श्री आण्णासाहेब रामभाऊ डांगे यांचे प्रतिनिधी श्री बाबासाहेब रामभाऊ डांगे हे उपस्थित होते. त्यांचेशी जमीनीच्या किंमतीबाबत चर्चा-तथा वाटाघाटी करण्यात आल्या. संबधित प्रतिनिधीने जमिनीची किंमत प्रति आर रुपये २.२५ लाख मिळाल्यास जमिन खरेदी देण्यास तयार आहे असे सांगितले. संबधित प्रतिनिधीने सांगितलेली किंमत अवाजवी वाटल्याने सदरहू जमिन खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. "

**(ब)** तद्नंतर विषयांकित जमीनमालक श्री. अण्णासाहेब रामभाऊ डांगे यांचे प्रतिनिधी श्री. बाबासाहेब रामभाऊ डांगे, राहणार कनकुरी यांनी आजचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत समक्ष येऊन, उपरोक्त जमिनीच्या किंमतीविषयी चर्चा-तथा-वाटाघाटी करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीने पुन्हा एकवार संधी द्यावी, अशी विनंती केली. मा. व्यवस्थापन समितीने सदरहू विनंती मान्य करुन, त्यांना आजचे सभेपुढे चर्चा-तथा-वाटाघाटी करणेस आमंत्रित केले.

**(क)** श्री. अण्णासाहेब रामभाऊ डांगे, राहणार कनकुरी यांची मौजे कनकुरी शिवारातील गट नंबर १२१/अ/३ मधील क्षेत्र ०० हे ७९ आर ही जमीन खरेदी करणेबाबत जमीनमालकांचे प्रतिनिधी श्री.

बाबासाहेब डांगे यांचेशी चर्चा करण्यात आली. त्यानुसार श्री. डांगे यांनी सदरहू जमीन रक्कम रुपये १,७१,०००/- मात्र प्रति आर या दराने संस्थानला खरेदी देणेस तयारी दर्शविली.

त्यावर साधकबाधक चर्चा होऊन, श्री.अण्णासाहेब रामभाऊ डांगे, राहणार कनकुरी यांची मौजे कनकुरी शिवारातील गट नंबर १२१/अ/३ क्षेत्र ०० हे ७९ आर जमीन प्रति आर रुपये १,७१,०००/- मात्र (अक्षरी रुपये एक लाख एकाहत्तर हजार मात्र) या दराने खरेदी करण्यात यावी. खरेदीखत करण्यापूर्वी सदर जमिनीमध्ये असलेले श्री.बाबासाहेब डांगे व इतर यांचे पाण्याचे सायफन काढून घेणेविषयी संबंधितांना जमीनमालक यांचेमार्फत कळविण्यांत यावे. जमीनमालकांस संस्थानमार्फत करण्यात येणाऱ्या प्राथमिक मोजणीचे वेळेस ताब्यात मिळणाऱ्या जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस आदा करणेत यावी, उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीची रितसर सरकारी मोजणी झालेनंतर ताब्यात मिळणारे एकूण जमिनीच्या प्रमाणांत आदा करण्यांत यावी. तसेच संस्थान वकिलांमार्फत विहीत पध्दतीने सदरहू जमिनीचा सर्च रिपोर्ट घेणेत यावा. तसेच सदरहू जमीन खरेदीसाठी खरेदीखताचा मसुदा तयार करणे, खरेदीखत नोंदविणेकामी आवश्यक असणारे मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, जमीन खरेदी केलेनंतर जमिनीची सरकारी मोजणी करणेकामी मोजणी शुल्क भरणे आदि अनुषंगिक बाबींसाठी तसेच जमीन खरेदीकामी आवश्यक असणाऱ्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०३ दिनांक १७.०१.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या आस्थापना उपसमिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.७५** दिनांक १७.०१.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या आस्थापना उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

०२ <u>कर्मचारी संघटनेच्या मागण्याबाबत.</u>

कर्मचाऱ्यांकडून विविध मागण्या करण्यात आलेल्या होत्या. त्यावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आले-

०१) संस्थानमधील रिक्त असलेल्या पदांवर पूर्वीचे स्टाफिंग पॅटर्ननुसार कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता, पात्रता, काम करण्याची क्षमता याबाबींचा अभ्यास करुन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा.

०२) श्री साईबाबा हॉस्पिटलप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना इन्सेंटीव्ह देणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी,वैद्यकीय संचालक ,वैद्यकीय अधिक्षिका व आस्थापना विभाग यांनी सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

०३) श्री साईनाथ रुग्णालयात काम करत असलेल्या नर्सेसना सिस्टर इनचार्ज या पदावर पदोन्नती देणेकामी कार्यकारी अधिकारी, वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक यांनी मुलाखती घेऊन आपला अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा.

०४)संस्थान सेवेतील सर्वच कायम कर्मचाऱ्यांच्या शासन नियमानुसार दर तीन वर्षानी बदल्या करण्यात याव्यात.

०५) संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती देणेबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्याबाबत. मा.अध्यक्ष महोदय यांनी प्रयत्न करावा तो मान्य झालेनंतर संस्थान कर्मचाऱ्यांचे पाल्याना शिष्यवृत्ती देण्यात यावी.

०६) विभागाअंतर्गत ज्या कर्मचाऱ्यांनी विशेष चांगले काम केले आहे अशा कर्मचाऱ्यांना संस्थानमार्फत सन्मानपत्र देण्यात यावे, त्यासाठी विभागप्रमुख, संबंधित प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी- आस्थापना व कार्यकारी अधिकारी यांचे समितीने निर्णय घ्यावा.

०७) सर्वच विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर २६ जानेवारी अथवा १५ ऑगस्ट रोजी चांदीचे पदक देऊन सन्मानित करण्यात यावे. सदर पदक दिल्यानंतर त्यास पदोन्नती देण्यात येईल असे समजण्यात येऊ नये अशी स्पष्ट कल्पना सदर कर्मचाऱ्यास देण्यात यावी.

०८)शासकीय नियमानुसार संस्थान कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर ते हयात असेपर्यन्त संस्थान कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे फक्त पती/पत्नी यांना श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पूर्णपणे मोफत औषधोपचार देण्यात यावेत.

०९) संस्थान कर्मचाऱ्यांकरीता कर्मचारी कल्याण निधी निर्माण करण्यात यावा व सध्या पोष्टाचे रिकरिंग डिपॉझिटवर दरमहा पगारबीलासंबधी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येत असलेले कमीशन कर्मचारी कल्याण निधी खाती जमा करावे व तेवढीच रक्कम संस्थानने दरमहा टाकावी.

१०) संस्थान कर्मचाऱ्यांकरीता कामगार कल्याण भवन अथवा सांस्कृतीक भवन संस्थानमार्फत उभारण्यात यावे.

११) संस्थान कर्मचाऱ्यांना संस्थानचे रुग्णालयात जी औषधे उपलब्ध न झाल्यास ती बाहेरुन विकत आणावी लागतात याकामी कर्मचाऱ्यांना दरवर्षी वैद्यकीय बीलाचा परतावा रुपये ५,०००/- पर्यन्त देण्यात येतो सध्या औषधाच्या किमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने त्याची मर्यादा वाढवून ती रुपये १०,०००/- करण्यात यावी. याकामी संस्थान कर्मचाऱ्यांना मेडिक्लेम ग्रुप इन्शुरन्स लागू करणेबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव व्यवस्थापन समितीस सादर करावा.

१२) संस्थान कर्मचाऱ्यांना सरकारी नियमाप्रमाणे सरकारी व इतर सुट्टया मिळात नसल्याने त्यांना सरेंडर रजेची सवलत पूर्वीप्रमाणेच चालू ठेवण्यात यावी.

१३) संस्थान कर्मचाऱ्यांना शासनाप्रमाणे पेन्शन स्किम लागू करणेबाबत शासनाकडून माहिती घेऊन मुख्यलेखाधिकारी यांनी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा.

१४) संस्थान कर्मचाऱ्यांकडून संघटनेची कपात करण्यात आलेली वर्गणी संघटनेकडे वर्ग करणेबाबत तसेच संघटनेच्या मान्यतेबाबत संस्थान कायदेसल्लागार ॲड.अशोक पाटील यांचा सल्ला घेण्यात यावा.

१५) शासनाच्या नियमाप्रमाणे अनुकंपा तत्वावरील नेमणूका देणेत याव्यात तसेच नियमानुसार २ वर्षानंतर वेतनश्रेणी लागू करणेत यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

१६) कामगार संघटनेच्या मान्यतेबाबबत ॲड. अशोक पाटिल यांचा सल्ला घेऊन अहवाल सभेपुढे ठेवण्‌त यावा.

वरीलप्रमाणे उपसमितीच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या.

**०१ (अ) <u>संस्थानला सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत.</u>**

**(ब) <u>संस्थानला अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत.</u>**

**(अ) <u>संस्थानला सुरक्षा कर्मचारी तसेच माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत.</u>**

संस्थानला सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी सन-१९९१ पासून व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी सन-२००६ पासून पुरविणेत येत आहे. सध्या सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबंधीत विभागांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन कामासाठी ४४६ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येतात. कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कामास घेण्यात येणाऱ्या कंत्राटी सिव्हीलीयन सुरक्षा गार्ड यांना किमान वेतन कायदयानुसार, शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देण्यात येत आहे. तसेच सुरक्षा अधिकारी, सुरक्षा पर्यवेक्षक, सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर देण्यात येत आहे.

मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरक्षेकामी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांची सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.१७-०८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांची साई मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी सेवानिवृत्त/माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.११-८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.३१-०१-२००९ अखेर संपत आहे.

सध्या मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या व निविदेत नमूद केलेल्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | एजन्सीचे नांव | पुरविणेत येणारी सुरक्षा कंत्राटी कर्मचारी संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा अधिकारी | सुरक्षा पर्यवेक्षक | गणमॅन | व्यायामशाळा प्रशिक्षक | सुरक्षा गार्ड | एकूण |
| १. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. **(मंदिर परिसर)** | ०१ | ०३ | -- | -- | २०३ | २०७ |
| २. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. **(सा.भ.नि. व इतर परिसर)** | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ११६ | १२२ |
| ३. | मे.ईगल आय एन्टरप्राईज, **(महाद्वार सिक्युरिटी)** | ०१ | ०३ | ०७ | -- | ३४ | ४५ |
| ४. | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे **(श्री साईबाबा हॉस्पीटल सिक्युरिटी)** | -- | ०३ | १८ | -- | ५१ | ७२ |
| **एकूण** | | ०३ | १२ | २६ | ०१ | ४०४ | ४४६ |

संस्थानला सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून “सिलबंद निविदा ” मागविणेत आल्या होत्या “ सिलबंद निविदा ” विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच “ सिलबंद निविदा ” स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे कार्यालयास एकूण ३८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहे. सदरच्या ३८ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला. तसेच सदर दिवसी उपस्थित ३५ कंत्राटदारांशी /ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरासंदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी त्यांनी निविदेत देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा

कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरुपात बंद पाकिटात दि.२०-११-२००८ अखेर संस्थानकडे सादर करावी. असे त्यांना सांगण्यात आले. तसेच ज्या ठेकेदारांची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त आहे अशा ठेकेदारांचाच विचार करणेत यावा असे ठरले.

त्याप्रमाणे चर्चा/वाटाघाटीचे वेळी संबंधीत उपस्थित ३५ कंत्राटदरापैकी/ठेकेदारांपैकी ३३ कंत्राटदार/ठेकेदारांनी देऊ केलेले अंतिम सुधारीत दर (बंद पाकिटे) प्राप्त झालेले असून ते उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करून, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, ज्या सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त असेल अशा निविदा सादर कर्त्यांना उपसमितीचे सभेपुढे समक्ष वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा. तसेच कॉन्ट्रक्टची मुदत ०१ वर्षे ऐवजी ०३ वर्षे करणेत यावी अशी चर्चा झालेली आहे. त्यास अनुसरून संबंधीत २० निविदा सादरकर्त्यांना मा.उपसमितीचे दि.१०-०१-२००९ रोजीचे सभेत चर्चा वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. त्याप्रमाणे एकूण २० निविदा सादर कर्त्यांपैकी १८ निविदा सादरकर्ते चर्चा वाटाघाटीचे वेळी उपस्थित राहून, त्यांनी अंतिम सुधारीत दर देवू केले आहे. त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन तो सर्व सदस्यांना पुरविणेत आला होता,तो खालीलप्रमाणे-

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | | | | | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | वार्षीक उलाढाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संरक्षण अधिकारी (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा सु.वायझर (माजी सैनिक) रुपये | सशस्त्र सु.रक्षक (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) रुपये | सुरक्षा गार्ड (पुरुष/स्त्री) सिव्हीलियन (कि.वे.दर रु.१३१.९७) | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| २१. | मे.टॉप्स सिक्युरिटी लि,मुंबई- | १५०.०० | १४६.०० | २३०.०० | १३९.०० | १३९.०० | १.००% | २०० कोटी |
| २२. | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यु.नाशिक | १३९.६६ | १३५.८२ | १८४.५५ | १३१.९७ | १३१.९७ | ०.७५% | १८० ोटी |
| २३. | सेन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन अॅन्ड सिक्यु. लि.मुंबई | २५०.०० | १७८.०० | २२१.०० | १३२.०० | ११५.०० | १.००% | ५७ कोटी |
| २४. | युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.,कासारवाडी, पुणे | ३५५.०० | २६५.०० | २३५.०० | १९९.०० | १३०.०० | ४.००% | ५० कोटी |
| २५. | बीसेफ,चंदननगर, नगररोड, पुणे-४११ ०१४.(अनुपस्थित) | ३९०.०० | ३६५.०० | ३६५.०० | ३१५.०० | ३००.०० | १२.५% | ४५ कोटी |
| २६. | ईगल हंटर सोल्युशन्स लि., अंधेरी (वेस्ट), मुंबई.४००० ५३ | ४००.०० | २२०.०० | २२८.०० | १५०.०० | ११९.०० | २.२५% | ४१ कोटी |
| २७. | औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस, जालना रोड, औरंगाबाद. | २१०.०० | १३९.६५ | २५०.०० | १३५.८० | १३१.९५ | ३.५% | ११.५४ कोटी |
| २८. | मे.ईगल आय एन्टरप्राईज,दमन-वापी रोड, दमन(यु.टी.) गुजरात | ३६०.०० | २६७.९० | २२१.३५ | २००.१० | --- | १०.००% | १०.५० कोटी |
| २९. | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हिसेस, पुणं | २००.०० | १६८.०० | १८५.०० | १५०.०० | १४५.०० | ०.०५% | ७ कोटी |
| ३०. | ईगल सिक्युरिटी अॅन्ड परसोनेल सर्व्हिसेस, मुंबई-४०० ०५८. | ८७३.७६ | ३३५.९३ | ३१४.०० | २५५.७० | १३२.०० | ५.००% | ६.५५ कोटी |
| ३१. | फ्लॅश सिक्युरिटी अॅन्ड इंटेलिजन्ससर्व्हिसेस, मुंबई- | ११९.७९ | ११२.७९ | ११९.७९ | १०८.७९ | १०४.७९ | ०.७९% | ५.८० कोटी |
| ३२. | मे सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई | १३९.०० | १३५.८२ | २२१.३५ | २००.१० | १३१.९७ | ०.०२% | ४.७० कोटी |
| ३३. | गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट (नागपूर) प्रा.लि.,पुणे- | ४७३.०० | ४५८.०० | ४५१.०० | ४२८.०० | २९४.०० | ३.००% | ३.८५ कोटी |
| ३४. | संतोष केअरवेल सर्व्हिसेस प्रा.लि.,नाशिकरोड,नाशिक | १३९.६६ | १३५.८२ | १८४.५५ | १३१.९७ | १३१.९७ | ०.७०% | २.५०.कोटी |
| ३५. | एस्कॉर्ट सर्व्हिसेस, पुणे-सातारा रोड,पुणे | १३९.६६ | १३५.८२ | १३९.६६ | १३१.९७ | १३१.९७ | २.५% | २.५० कोटी |
| ३६. | ड्रेगॉन सर्व्हिसेस, अंधेरी (पश्चिम), मुंबई- | २४३.०० | १६५.०० | २२०.०० | १५०.०० | १४०.०० | ३.००% | २ कोटी |
| ३७. | युनाईटेड सर्व्हिसेस, धनकवडी, पुणे- | १३९.६६ | १३५.८२ | १३९.६६ | १३१.९७ | १३१.९७ | ३.००% | २ कोटी |
| ३८. | ब्लॅक कॅट इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड,जळगांव-४२५ ००१. | २१०.०० | २०१.०० | २९५.०० | १८२.०० | १८०.६० | २.००% | १.५० कोटी |
| ३९. | पायोनिअर सिक्युरिटी सर्व्हीसेस नवी सांगवी, पुणे-४११ ०२७. | १३९.६६ | १३९.६६ | १५०.०० | १३१.९७ | १३०.०० | ८.००% | १.२५ कोटी |
| ४०. | तोगे एन्टरप्राईजेस, वाळूज, एम.आय. डी.सी., औरंगाबाद. (अनुपस्थित) | --- | --- | --- | -- | १५५.०० | १०.००% | १.२५ कोटी |

यावर सविस्तर चर्चा होऊन,सुरक्षा कंत्राटदाराची नेमणूक करताना संस्थानची त्यांचेकडून काय अपेक्षा आहे, तसेच सध्या कार्यरत असलेल्या सुरक्षाव्यवस्थेच्या काय त्रुटी आहेत,याबाबत मा.कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व संस्थान संरक्षण अधिकारी यांनी अभ्यास करुन आपला अहवाल

व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा व उपरोक्त तक्त्यातील खालील कंत्राटदारांना पुढील सभेपुढे समक्ष आमंत्रित करण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.टॉप्स सिक्युरिटी लि,मुंबई |
| ०२ | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यु.नाशिक |
| ०३ | सेन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्यु.लि.मुंबई |
| ०४ | युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.,कासारवाडी, पुणे- ४११ ०३४ |
| ०५ | ईगल हंटर सोल्युशन्स लि.,अंधेरी (वेस्ट), मुंबई.४००० ५३ |
| ०६ | औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस, जालना रोड, औरंगाबाद. |
| ०७ | मे.ईगल आय एन्टरप्राईज,दमन- वापी रोड, दमन(यु.टी.) गुजरात |
| ०८ | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस, पुणे-४११ ००१. |
| ०९ | ईगल सिक्युरिटी ॲन्ड परसोनेल सर्व्हिसेस, मुंबई-४०० ०५८. |
| १० | फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हिसेस, मुंबई-४०० १०१. |

**(ब) संस्थानला अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेबाबत.**

संस्थानला लेबर कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने अकुशल कामगार १९९४ पासून, कुशल कामगार सन-१९९९ पासून पुरविणेत येत आहे. सध्या लेबर कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबंधीत विभागांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन कामासाठी ८१४ कंत्राटी कामगार पुरविणेत येतात. कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कामास घेण्यात येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना किमान वेतन कायदयानुसार, शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देण्यात येत आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर लेबर कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.३१-०१-२००९ अखेर संपत आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या व निविदेत नमूद केलेल्या अकुशल, कुशल कंत्राटी कामगार संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | एजन्सीचे नांव | पुरविणेत येणारी कंत्राटी कर्मचारी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकूण |
| १. | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे (मंदिर परिसर) | २६४ | ४४ | ३०८ |
| २. | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., नाशिक (सा.भ.नि. व इतर परिसर) | ४०३ | १०३ | ५०६ |
| | एकूण (१+२) | ६६७ | १४७ | ८१४ |

संस्थानला अकुशल, कुशल कामगार पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून "सिलबंद निविदा " मागविणेत आल्या होत्या " सिलबंद निविदा " विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच "सिलबंद निविदा" स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे कार्यालयास एकूण ३० सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदरच्या ३० सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला होता. तसेच सदर दिवसी उपस्थित २७ कंत्राटदारांशी /ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरासंदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी त्यांनी निविदेत देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरुपात बंद पाकिटात दि.२०-११-२००८ अखेर संस्थानकडे सादर करावी असे त्यांना सांगण्यात आले. तसेच ज्या ठेकेदारांची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त आहे. अशा ठेकेदारांचाच विचार करणेत यावा असे ठरले.

त्याप्रमाणे चर्चा/वाटाघाटीचे वेळी संबंधीत उपस्थित २७ कंत्राटदरापैकी/ठेकेदारांपैकी २५ कंत्राटदार/ ठेकेदरांनी देऊ केलेले अंतिम सुधारीत दर (बंद पाकिटे) प्राप्त झालेले असून ते उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करून, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त असलेल्या ठेकेदारांचा स्वतंत्र तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून तो उपसमितीचे सभेमध्ये सादर

करणेत यावा, तसेच कॉन्ट्रॅक्टची मुदत ०१ वर्षे ऐवजी ०३ वर्षे करणेत यावी अशी चर्चा झालेली आहे. त्यास अनुसरून वार्षीक उलाढाल रूपये एक कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या ठेकदारांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन तो आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता तो खालीलप्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | सर्व्हिस टॅक्स (टक्केवारी) (१२.३६%) | अ) किमान पुर्वानुभव-३ वर्षे आवश्यक ब) कर्मचारी पुरविण्याची किमान क्षमता-१००० आवश्यक क) वार्षीक उलाढाल-रुपये १ कोटी आवश्यक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कुशल कामगार (कि.वे.दर रु. १३९.६६) रुपये | अकुशल कामगार (कि.वे.दर रु. १३१.९७) रुपये | | | |
| ०१ | **मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि.,** २ नेहरु नगर समोर, नाशिक-पुणेरोड, नाशिक-४२२ १०१. | **१३९.६६** | **१३१.९७** | **०.७५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- ३२ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- ४२०००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.१८०.०० कोटी |
| ०२ | **मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,** चिंचवड, पुणे-४११ ०१९. | **१३९.६६** | **१३१.९७** | **०.०१%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- १० वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १३०००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.१०७.४६ कोटी |
| ०३ | **युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी,**कासारवाडी, पुणे- ४११ ०३४ | **२८५.००** | **१५६.००** | **५.००%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- २० वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १२०००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.५०.०० कोटी |
| ०४ | **बीसेफ,**चंदननगर, नगररोड,पुणे-४११ ०१४ | **३००.००** | **२८०.००** | **१२.५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- १५ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १३०००<br>क) वार्षीक उलाढाल-रु.४५.०० कोटी |
| ०५ | **मे. तिरुमला सर्व्हिसेस,** हडपसर,पुणे-४११ ०२८. | --- | **२१३.५३** | --- | --- | अ) पुर्वानुभव- १० वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- २९५०<br>क) वार्षीक उलाढाल- रु.२०.०० कोटी |
| ०६ | **औरंगाबाद मल्टी सर्व्हिसेस,**जालना रोड, औरंगाबाद. | **१३९.६५** | **१३१.९५** | **४.५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- ११ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- ४५००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.११.५४ कोटी |
| ०७ | **मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.,**एम.जी.रोड, पुणे-४११ ००१. **अपात्र** | **१४६.६५** | **१३८.५८** | **०.०५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- ०४वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १२५<br>क) वार्षीक उलाढाल- रु.०७.०० कोटी |
| ०८ | **ईगल सिक्युरिटी ॲन्ड परसोनेल सर्व्हिसेस,** अंधेरी (वेस्ट) ,मुंबई-५८. | **१४८.००** | **१३२.००** | **५.००%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- २५ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- --<br>क) वार्षीक उलाढाल- रु.६.५५ कोटी |
| ०९ | **श्री.महेंद्र मोहनीराज गंधे,** सावेडी रोड,अहमदनगर. | **१३९.६६** | **१३१.९७** | **०.५०%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- १७ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १२००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.५.०० कोटी |
| १० | **ट्रेन्ड मॅनेजमेंट कन्सल्टंन्सीॲन्ड सर्व्हिसेस,** हडपसर, पुणे-४११ ०२८. | --- | **२१२.०२** | --- | --- | अ) पुर्वानुभव- ५ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- ११५०<br>क) वार्षीक उलाढाल- रु.५.०० कोटी |
| ११ | **गार्डीयन फॅसिलिटीज मॅनेजमेंट(नागपूर)प्रा.लि.,** धनकवडी,पुणे-सातारा रोड, पुणे-४११०४३. | **२४९.००** | **२१०.००** | **३.००%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- २५ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १५००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.३.८५ कोटी |
| १२ | **मे.रिलायंन्स एन्टरप्रायजेस,** ईस्ट स्ट्रीट, कॅम्प,पुणे-४११ ००१. | **१३७.००** | **१३२.००** | **२.५०%** | **१२.३७%** | अ) पुर्वानुभव- १० वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या-४५०<br>क) वार्षीक उलाढाल- रु.३.५० कोटी |
| १३ | **सुपर फॅसिलीटी मॅनेजमेंट एक्सपर्ट्स,**विलेपार्ले (पश्चिम),मुंबई- ५६. | --- | **१३१.९७** | **०.०२%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- ०६ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १०००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.२.८१ कोटी |
| १४ | **संतोष केअरवेल सर्व्हिसेस, प्रा.लि.** नाशिकरोड, नाशिक | **१३९.६६** | **१३१.९७** | **०.७५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- १२ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- ३०००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.२.५० कोटी |
| १५ | **एस्कॉर्ट सर्व्हिसेस,** पुणे-सातारा रोड,पुणे | **१३९.६६** | **१३१.९७** | **२.५%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- १० वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १०००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.२.५० कोटी |
| १६ | **युनाईटेड सर्व्हिसेस,** धनकवडी, पुणे- | **१३९.६६** | **१३१.९७** | **३.००%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- १५ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या-२०००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.२.०० कोटी |
| १७ | **मे.आर.आर.काजळे, लेबर कॉन्ट्रॅक्टर** सातपुर-अंबड लिंक रोड, नाशिक. | **१३५.८२** | **१३२.३१** | **५.००%** | **१२.३६%** | अ) पुर्वानुभव- १५ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या-२१००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.१.७५ कोटी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | **ब्लॅक कॅट इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड,** जळगांव-४२५ ००१. | १८६.०० | १७५.५० | २.००% | १२.३६% | अ) पुर्वानुभव- ०५ वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- १२००<br>क) वार्षीक उलाढाल- रु.१.५ कोटी |
| १९ | **पायोनिअर सिक्युरिटी सर्व्हीसेस,नवी सांगवी, पुणे-४११ ०२७.** | २०१.४७ | १३१.९७ | ८.००% | १२.३६% | अ) पुर्वानुभव- १० वर्षे<br>ब) कर्मचारी संख्या- ४८०<br>क) वार्षीक उलाढाल- रु.१.२५ कोटी |
| २० | **तोगे एन्टरप्राईजेस,** वाळूज, एम.आय.डी.सी., औरंगाबाद. | १३५.०० | १२०.०० | १०.००% | १२.३६% | अ) पुर्वानुभव- ---<br>ब) कर्मचारी संख्या- --<br>क) वार्षीक उलाढाल- रु.१.२५ कोटी |

सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

०२ **कर्मचारी संघटनेच्या मागण्याबाबत.**

कर्मचाऱ्यांकडून विविध मागण्या करण्यात आलेल्या होत्या. त्यावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आले-

०१) संस्थानमधील रिक्त असलेल्या पदांवर पूर्वीचे स्टाफिंग पॅटर्ननुसार कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता, पात्रता, काम करण्याची क्षमता याबाबींचा अभ्यास करुन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा.

०२) श्री साईबाबा हॉस्पिटलप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना इन्सेंटीव्ह देणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी,वैद्यकीय संचालक ,वैद्यकीय अधिक्षिका व आस्थापना विभाग यांनी सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

०३) श्री साईनाथ रुग्णालयात काम करत असलेल्या नर्सेसना सिस्टर इनचार्ज या पदावर पदोन्नती देणेकामी कार्यकारी अधिकारी, वैद्यकीय संचालक, उपवैद्यकीय संचालक यांनी मुलाखती घेऊन आपला अहवाल व्यवस्थापन समितीस सादर करावा.

०५) संस्थान सेवेतील सर्वच कायम कर्मचाऱ्यांच्या शासन नियमानुसार दर तीन वर्षानी बदल्या करण्यात याव्यात.

०५) संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती देणेबाबत शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्याबाबत. मा.अध्यक्ष महोदय यांनी प्रयत्न करावा तो मान्य झालेनंतर संस्थान कर्मचाऱ्यांचे पाल्याना शिष्यवृत्ती देण्यात यावी.

०६) विभागाअंतर्गत ज्या कर्मचाऱ्यांनी विशेष चांगले काम केले आहे अशा कर्मचाऱ्यांना संस्थानमार्फत सन्मानपत्र देण्यात यावे, त्यासाठी विभागप्रमुख, संबंधित प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी- आस्थापना व कार्यकारी अधिकारी यांचे समितीने निर्णय घ्यावा.

०७) सर्वच विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर २६ जानेवारी अथवा १५ ऑगस्ट रोजी चांदीचे पदक देऊन सन्मानित करण्यात यावे. सदर पदक दिल्यानंतर त्यास पदोन्नती देण्यात येईल असे समजण्यात येऊ नये अशी स्पष्ट कल्पना सदर कर्मचाऱ्यास देण्यात यावी.

०८) शासकीय नियमानुसार संस्थान कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर ते हयात असेपर्यन्त संस्थान कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे फक्त पती/पत्नी यांना श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पूर्णपणे मोफत औषधोपचार देण्यात यावेत.

०९) संस्थान कर्मचाऱ्यांकरीता कर्मचारी कल्याण निधी निर्माण करण्यात यावा व सध्या पोष्टाचे रिकरिंग डिपॉझिटवर दरमहा पगारबीलासंबधी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येत असलेले कमीशन कर्मचारी कल्याण निधी खाती जमा करावे व तेवढीच रक्कम संस्थानने दरमहा टाकावी.

१०) संस्थान कर्मचाऱ्यांकरीता कामगार कल्याण भवन अथवा सांस्कृतीक भवन संस्थानमार्फत उभारण्यात यावे.

११) संस्थान कर्मचाऱ्यांना संस्थानचे रुग्णालयात जी औषधे उपलब्ध न झाल्यास ती बाहेरुन विकत आणावी लागतात याकामी कर्मचाऱ्यांना दरवर्षी वैद्यकीय बीलाचा परतावा रुपये ५,०००/- पर्यन्त देण्यात येतो सध्या औषधाच्या किमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने त्याची मर्यादा वाढवून ती रुपये १०,०००/- करण्यात यावी. याकामी संस्थान कर्मचाऱ्यांना मेडिक्लेम ग्रुप इन्शुरन्स लागू करणेबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव व्यवस्थापन समितीस सादर करावा.

१२) संस्थान कर्मचाऱ्यांना सरकारी नियमाप्रमाणे सरकारी व इतर सुट्टया मिळात नसल्याने त्यांना सरेंडर रजेची सवलत पूर्वीप्रमाणेच चालू ठेवण्यात यावी.

१३) संस्थान कर्मचाऱ्यांना शासनाप्रमाणे पेन्शन स्किम लागू करणेबाबत शासनाकडून माहिती घेऊन मुख्यलेखाधिकारी यांनी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा.

१४) संस्थान कर्मचाऱ्यांकडून संघटनेची कपात करण्यात आलेली वर्गणी संघटनेकडे वर्ग करणेबाबत तसेच संघटनेच्या मान्यतेबाबत संस्थान कायदेसल्लागार ॲड.अशोक पाटील यांचा सल्ला घेण्यात यावा.

१५) शासनाच्या नियमाप्रमाणे अनुकंपा तत्वावरील नेमणूका देणेत याव्यात तसेच नियमानुसार २ वर्षानंतर वेतनश्रेणी लागू करणेत यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

१६) कामगार संघटनेच्या मान्यतेबाबत ॲड. अशोक पाटिल यांचा सल्ला घेऊन अहवाल सभेपुढे ठेवण्त यावा.

वरीलप्रमाणे उपसमितीच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

०३ **पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने अश्वासित प्रगती योजनेनुसार पदोन्नतीच्या अटीत शिथीलता देणे**

गट 'क' व 'ड' या संवर्गातील काही ठिकाणी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत.तर काही ठिकाणी अशा संधी उपलब्ध असल्यातरी पदोन्नती मिळण्यास प्रदिर्घ कालावधी लागतो. त्यामुळे एकाच पदावर १२ वर्षे सलगसेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीच्या साखळीतील कालबध्द वरची वेतनश्रेणी देण्याबाबतची योजना शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन-एसआई-१०९५-प्र.क्र.१/९५ बारा/दि.०८ जून १९९५ अन्वये जाहीर करण्यात आलेली होती व योजनेची अंमलबाजावणी ०१ आक्टोंबर १९९४ पासून करण्यात आली होती.संस्थान कर्मचाऱ्यांचे हित विचारात घेवून ही योजना संस्थानने या योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण ४२५ इतक्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ दिलेला आहे.

त्यानंतर, शासन निर्णय क्र.वेतन-१९९९-प्र.क्र.२/९९/सेवा-३ मंत्रालय मुंबई -३२ दि.२०/०७/२००१ अन्वये दि.०८ जून १९९५ चे शासन निर्णयानुसार अंमलात आलेली कालबध्द पदोन्नती योजना बंद करुन, त्याऐवजी 'सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, दि.०१ ऑगष्ट २००१ पासून लागू केलेली आहे.त्यानुसार संस्थान आस्थापनेवरील एकाच पदावर १२ वर्षे सेवा पुर्ण केलेल्या रु. ८०००-१३५०० पर्यंत वेतनश्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यांनाही लागू करण्यात येऊन त्याचाही फायदा संस्थान कर्मचा-यांना देण्यात आलेला आहे.

या योजनेच्या मार्गदर्शक नुसार जे कर्मचारी वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यास पात्र होतात किंवा कसे? याची छाननी प्रामुख्याने खालील निकषावर करण्यात येत आहे.

शासकिय कर्मचा-यांना १२ वर्षे वरची वेतनश्रेणी मंजूर करतांना त्या कर्मचाऱ्यांचे लगतच्या ५ वर्षे कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येऊन व गोपनीय अहवाल लिहीतांना कर्मचाऱ्यांचे बाबतचे मुल्यमापन खालील प्रमाणे करण्याची पध्दती आहे.

(०१) अ + = अत्युत्कृष्ट. (०२) अ = उत्कृष्ट. (०३) ब + = निश्चित चांगला
(०४) ब = चांगला . (०५) ब- = साधारण (०६) क = साधारणपेक्षा कमी

शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीसाठी गोपनीय अभिलेखाच्या प्रतवारीचे निकष ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वांचा विचार करण्यात येतो.

**०१.** ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.५०९९/- पर्यंत आहे.त्यासाठी किमान निकष म्हणून ५ वर्षांच्या गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी ' ब + ' अशी राहील.

**०२.** ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.५१००/- किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्यासाठी किमान निकष म्हणून गोपनीय अभिलेखाची सरासरी ' अ ' अशी राहील

संस्थान कर्मचाऱ्यांना कालबध्द वरची वेतनश्रेणी मंजूर करतांना तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१८-१९/०८/२००१ चे सभेतील निणर्य क्र.३९३ नुसार संस्थानमध्ये गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत सन-१९९८-९९ पासून सुरु झाल्याने उपरोक्त मार्गदर्शतत्वामध्ये खालीलप्रमाणे शिथिलता दिलेली होती.
ज्या ठिकाणी गोपनीय अहवालाची (शासकिय सेवेत) सरासरी ' ब+ ' आवश्यक आहे तेथे ' ब ' आणि ज्या ठिकाणी ' अ ' अशी आवश्यक आहे त्या ठिकाणी ' ब+ ' धरण्यात आली व त्यानुसार संस्थान कर्मचा-यांना १२ वर्षे वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली.

त्यानंतर तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१२-१३जुलै २००३ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२९४" पुढील काळात कर्मचाऱ्यांना कालबध्द वरची वेतनश्रेणी देतांना शासकीय अधिसुचनेनुसार गोपनीय अहवालाची सरासरी विचारात घेण्यात यावी."असा झाला व त्यानुसार येथून पुढील कालावधीमध्ये ज्या कर्मचा-यांना एकाच पदावर १२ पूर्ण झालेली आहेत. अशा कर्मचा-यांना शासन निर्णय व मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णयानुसार उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेली शिथिलता बंद करण्यात आली त्यामुळे

**अ)** सन २००३-२००४ या सालामध्ये ज्या कर्मचा-यांना १२ वर्षे पूर्ण झालेली आहे. अशा एकूण ३८ कर्मचा-यांचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळापुढे सादर करण्यात आला. त्यावेळी फक्त ३० कर्मचा-यांना वरच्या वेतनश्रेणीचा लाभ होऊन ८ कर्मचारी अपात्र ठरलेले आहेत.

**ब)** सन २००४-२००५ या सालामध्ये वरची वेतनश्रेणी मिळणेसाठी १४१ कर्मचा-यांचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करण्यात आला होता. पैकी ३७ कर्मचा-यांना वरची वेतनश्रेणी मिळणेस पात्र झाले आहेत. उर्वरीत १०४ कर्मचारी अपात्र ठरलेले आहेत.

या नियमांची अंमलबजावणी केल्यामुळे संस्थान आस्थापनेवर एकाच पदावर १२ वर्षे पुर्ण केलेले बरेचसे कर्मचारी वरची वेतनश्रेणी मिळणेवाचून उपरोक्त (अ) व (ब) प्रमाणे वंचीत राहीलेले आहेत. त्याचा फायदा त्यांना झालेला नसल्याने ज्या कर्मचा-यांना सदर योजनेचा लाभ झालेला नाही असे कर्मचारी वारंवार कार्यालयात येऊन तसेच मा.विश्वस्त समितीचे सदस्य यांनाही विचारणा करीत आहेत.

तरी संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत पुन्हा एकदा विषेश बाब म्हणून १२ वर्षे वरची वेतनश्रेणी मंजूर करतांना पूर्वीप्रमाणेच देण्यात आलेली शिथिलता (ज्या ठिकाणी गोपनीय अहवालाची (शासकिय सेवेत) सरासरी ' ब+' आवश्यक आहे तेथे ' ब ' आणि ज्या ठिकाणी ' अ ' अशी आवश्यक आहे त्या ठिकाणी ' ब+' धरण्यात आली व त्यानुसार संस्थान कर्मचा-यांना १२ वर्षे वरची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली.)

आताही जे कर्मचारी वंचीत राहीलेले आहेत अशा कर्मचा-यांना देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत यावी,अशी या शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०४ **मयत कर्मचाऱ्यांचे वारसांना शासन नियमानुसार अनुकंपा तत्वावर नेमणूकी देणेबाबत.**

**अ)** कै.सिताराम जानकु धुरंधरे हे संस्थानचे खरेदी विभागात मदतनीस या पदावर सेवेत होते ते सेवेत असतांना दि.१६/०१/२००६ ते दि.०२/०५/२००७ अखेरपर्यंत ते एकूण ४७२ दिवस विनापरवाना गैरहजर होते.सदर कालावधीतील रजा विनावेतन करण्यात आलेल्याअसून ते गैरहजर असतांना त्यांचे दि.०२/०५/२००७ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१.दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :-कै.सिताराम जानकु धुरंधरे,मदतनीस खरेदी विभाग
०२.मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनीस खरेदी विभाग
०३.संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०३/१९८९ ते दि.०२/०५/२००७
एकूण सेवा १७ वर्षे ०९ महिने
०४.मृत्यु दिनांक :- ०२/०५/२००७

कै.सिताराम जानकु धुरंधरे यांचे दि.०२/०५/२००७ रोजी निधन झाल्याने त्यांचा वारसदार मोठा मुलगा नामे श्री बाळु सिताराम धुरंधरे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री बाळू सिताराम धुरंधरे
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.०१/०७/१९८० (वय वर्षे २७)
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०४ थी ड्रायव्हींग लायसेन्स हेवी

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्री बाळू सिताराम धुरंधरे (मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

सदर बाबत श्री बाळू धुरंधरे यांचा लहान भाऊ नामे श्री रविंद्र सि.धुरंधरे यांनी दिवंगत धुरंधरे यांचे जागेवर त्यांचा मोठा भाऊ नामे श्री बाळू धुरंधरे यांना नोकरी देणेची संमती असलेचे दि.०२/०६/२००७ रोजी करुन दिलेले पत्र यासोबत सादर केलेले आहे.

दिवंगत कै.धुरंधरे यांचा लहान मुलगा नामे श्री रविंद्र सि.धुरंधरे यांनी सादर केलेल्या पत्रास अनुसरुन दिवंगत कै.सिताराम धुरंधरे यांचा मोठा मुलगा नामे श्री बाळू सि.धुरंधरे यांना,शासन निर्णयातील तरतुदीनुसार ते पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,कै.धुरंधरे खरेदी विभागात मदतनीस या पदावर सेवेत असताना दि.१६.०१.२००६ ते दि.२.०५.२००७ अखेर ४७२ दिवस विनापरवाना गैरहजर असताना याबाबत प्रशासनाने कोणती कारवाई केली याबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेतपुढे निर्णयार्थ सादर करावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

याचवेळेस संस्थानमधील सर्वच कर्मचाऱ्यांची दरवर्षी वैद्यकीय तपासणी रुग्णालयामार्फत करण्यात येऊन, त्याबाबतचा अहवाल वेळचेवेळी व्यवस्थापन समितीस सादर करीत जावा,असे ठरले.

**ब)** कै.कैलास शंकर गायकवाड हे संस्थानचे कॅन्टीन विभागाकडे मदतनिस या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.०९/०७/२००८ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :-कै.कैलास शंकर गायकवाड
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनिस,कॅन्टीन विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.१०/०६/१९९३ ते दि.०८/०७/२००८
एकूण सेवा १४ वर्षे ११ महिने
०४.मृत्यु दिनांक :- ०९/०७/२००८

कै.कैलास शंकर गायकवाड यांचे दि.०९/०७/२००८ रोजी निधन झाल्याने त्यांचा वारसदार मोठा मुलगा नामे श्री दिपक कैलास गायकवाड यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री दिपक कैलास गायकवाड
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा

०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.०६/०९/१९८९ (वय १८ वर्षे ११महिने)

०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ११ वी पास एम.एस.सी.आय.टी.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्री दिपक कैलास गायकवाड (मुलगा ) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

तसेच दिवंगत कै.कैलास गायकवाड यांच्या पत्नी श्रीमती कुसुम कैलास गायकवाड व त्यांचा दुसरा मुलगा नामे श्री अनिल कैलास गायकवाड यांनी वडील दिवंगत कै. कैलास गायकवाड यांचे जागी मोठा मुलगा/मोठा भाऊ श्री दिपक कैलास गायकवाड यांना सेवेत घेणेबाबत त्यांची काहीही हरकत नसलेबाबत मा.दंडाधिकारी,राहाता यांचेसमोरील प्रतिज्ञापत्र सोबत सादर केलेले आहे.

तरी दिवंगत कै.कैलास गायकवाड यांच्या पत्नी नामे कुसुम कैलास गायकवाड तसेच त्यांचा दुसरा मुलगा नामे अनिल कैलास गायकवाड यांचे उपरोक्त प्रतिज्ञापत्रास अनुसरुन श्री दिपक कैलास गायकवाड (दिवंगत कै.कैलास गायकवाड यांचा मोठा मुलगा) हा शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस, मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**क)** कै.सिताराम तुकाराम कापसे हे संस्थानचे प्रसादालय विभागाकडे मदतनीस या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.१९/०१/२००८ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- कै.सिताराम तुकाराम कापसे

०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनीस,प्रसादालय विभाग

०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०३/१९८९ ते दि.१९/०१/२००८
एकूण सेवा १९ वर्षे ०८ महिने १२ दिवस

०४.मृत्यु दिनांक :- १९/०१/२००८

कै. सिताराम तुकाराम कापसे यांचे दि.१९/०१/२००८ रोजी निधन झाल्याने त्यांचे वारसदार मोठा मुलगा नामे श्री भारत तुकाराम कापसे यांनी संस्थानमध्ये वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री भारत सिताराम कापसे

०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- वडील

०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.१९/०६/१९८४ (वय २४वर्षे ०२ महिने)

०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- अशिक्षीत

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्री भारत सिताराम कापसे (मोठा मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे. तसेच मोठया भावास अनुकंपा तत्वावर नोकरीवर घेणे कामी लहान भाऊ ०१) श्री पिराजी सिताराम कापसे वय २२ वर्षे व ०२) श्री लखन सिताराम कापसे वय १९ वर्षे यांनी मा.तहसिलदार राहाता यांचे कडील प्रतिज्ञापत्रही दिलेले आहे.

दिवंगत कै.सिताराम तुकाराम कापसे यांचा मुलगा नामे श्री भारत सिताराम कापसे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**ड)** कै.सोपान निवृत्ती हिवाळे हे संस्थानचे स्वच्छता विभागाकडे सफाई कामगार या पदावर सेवेत असतांना त्यांचे दि.१८/०३/२००८ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- कै.सोपान निवृत्ती हिवाळे

०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- सफाई कामगार, स्वच्छता विभाग

०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/०३/१९८९ ते दि.१७/०३/२००८
एकूण सेवा १९ वर्षे ११ दिवस

०४.मृत्यु दिनांक :- १८/०३/२००८

कै.सोपान निवृत्ती हिवाळे यांचे दि.१८/०३/२००८ रोजी निधन झाल्याने त्यांची वारसदार पत्नी नामे श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे यांनी संस्थानमध्ये पतीचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- पत्नी
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.०२/०७/१९६९ (वय ३८वर्षे ०८ महिने)
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०२ री

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे (पत्नी) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत कै. सोपान निवृत्ती हिवाळे यांची पत्नी नामे श्रीमती जिजाबाई सोपान हिवाळे हया शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या शिफारस मान्य करण्यात आली.

**इ)** कै.कौतिक भटू सोनवणे, हे संस्थानचे भक्तनिवासस्थान विभागाकडे वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून सेवेत असतांना त्यांचे दि.१९/१०/२००८ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- कै. कौतिक भटू सोनवणे
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- मदतनीस,श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान,
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.०६/१०/१९८३ ते दि.१८/१०/२००८
एकूण सेवा २५ वर्षे
०४.मृत्यु दिनांक :- १९/१०/२००८

कै.कौतिक भटू सोनवणे यांचे दि.१९/१०/२००८ रोजी निधन झाल्याने त्यांची वारसदार मुलगा नामे श्री.योगेश कौतिक सोनवणे, यांनी संस्थानमध्ये वडिलांचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्री.योगेश कौतिक सोनवणे
०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- मुलगा
०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- दि.२८/०८/१९९० (वय १८वर्षे ०४ महिने)
०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- इयत्ता १० वी पास

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री.योगेश कौतिक सोनवणे (मुलगा) यांनी अर्ज सादर केलेला आहे. तसेच दिवंगत कै.सोनवणे यांची पत्नी श्रीमती सविता कौतिक सोनवणे, यांनी रुपये ५०/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र दिले असून,त्यात श्री.योगेश कौतिक सोनवणे (दिवंगत कौतिक सोनवणे यांचा मुलगा) यास संस्थान सेवेत घेणेबाबत संमती दिलेली आहे.

दिवंगत कै.कौतिक भटू सोनवणे यांचा मुलगा नामे श्री.योगेश कौतिक सोनवणे हे शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**ई)** कै.शौकत बशिर शेख, हे संस्थानचे संरक्षण विभागाकडे वर्ग ०४ चे कर्मचारी म्हणून सेवेत असतांना त्यांचे दि.१२/११/२००८ रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- कै.शौकत बशिर शेख,
०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- वर्ग ०४ चे कर्मचारी, संरक्षण विभाग
०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि.२४/१२/२००३ ते दि.११/१/२००८

एकूण सेवा ०४ वर्षे ११ महिने ११ दिवस

०४.मृत्यु दिनांक :- १२/११/२००८

कै.शौकत बशिर शेख, यांचे दि.१८२/११/२००८ रोजी निधन झाल्याने त्यांची वारसदार पत्नी नामे श्रीमती शमा शौकत शेख यांनी संस्थानमध्ये पतीचे जागी अनुकंपा तत्वावर सेवेत घेणेबाबत अर्ज केला असून त्यांचे बाबत माहिती खालील प्रमाणे

०१. अर्जदाराचे नांव :- श्रीमती शमा शौकत शेख

०२. मयत कर्मचाऱ्याशी नाते :- पत्नी

०३. वारसदार अर्जदाराची जन्मतारीख व वय :- अंदाजे वय ३१ वर्ष

०४. शैक्षणिक व शारीरीक पात्रता :- ०३ री

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपाकारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे.त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.त्यानुसार श्रीमती शमा शौकत शेख (पत्नी) यांनी अर्ज सादर केलेला आहे.

दिवंगत कै.शौकत बशिर शेख, यांची पत्नी नामे श्रीमती शमा शौकत शेख हया शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र ठरत असल्याने त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा तत्वावर वर्ग-४ चे पदावर नेमणूक देणेसमान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात यावी,अशी या शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०५ **अनुकंपा तत्वावर नेमणूक दिलेल्या कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देणे बाबत.**

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी चे आस्थापनेवर कायम सेवेत असतांना निधन झालेल्या कर्मचा-यांच्या जागी त्यांच्या जवळच्या एका पात्र नातेवाईकास महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४, आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) चे अधिन राहून अनुकंपा तत्वावर त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वर्ग-०४ चे कर्मचारी म्हणून सेवेत घेण्यात आलेले आहे.

सदर उमेदवारांना नेमणूक देताना दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी देऊन त्यांना प्रथम वर्षी दरमहा एकत्रित वेतन रु. २०००/- इतके देण्यात आलेले आहे. व एक वर्ष परिवीक्षाधीन कालावधी योग्य रितीने पूर्ण केल्यास त्यास दुस-या वर्षी रु. ५००/- वाढ देऊन एकूण रु. २५००/- इतके दरमहा एकत्रित वेतन देण्यात येत आहे. त्यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | कर्मचा-यांचे नांव पदनाम | विभाग | नेमणूक तारीख | दोन वर्षे परिवीक्षाधीन कालावधी संम्पुष्ठात आल्याची तारीख | संस्थान सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देय होत असल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. किरण आण्णा धिवर वर्ग-०४ कर्मचारी | प्रसादालय | ०१/०६/२००५ | ३१/०५/२००७ | ०१/०६/२००७ |
| ०२. | श्रीमती अनिता म. दाभाडे वर्ग-०४ कर्मचारी | प्रसादालय | १८/०९/२००५ | १७/०९/२००५ | १८/०९/२००७ |
| ०३. | श्रीमती सुनिता रा. कर्पे वर्ग-०४ कर्मचारी | प्रसादालय | १८/०९/२००५ | १७/०९/२००५ | १८/०९/२००७ |
| ०४. | श्रीमती यशोदा भ ठाकरे वर्ग-०४ कर्मचारी | प्रसादालय | ०१/०१/२००६ | ३१/१२/२००८ | ०१/०१/२००८ |
| ०५. | श्री. विकास रा. दिवटे वर्ग-०४ कर्मचारी | प्रसादालय | १४/०३/२००६ | १३/०३/२००८ | १४/०३/२००८ |
| ०६. | श्री. घनश्याम रा. शर्मा वर्ग-०४ कर्मचारी | प्रसादालय | १२/०४/२००६ | ११/०४/२००८ | १२/०४/२००८ |
| ०७. | श्री. विवेक सु. शिदोडकर वर्ग-०४ कर्मचारी | प्रशासन शाखा | १२/०४/२००६ | ११/०४/२००८ | १२/०४/२००८ |
| ०८. | श्रीमती विमल वि.धुळसैंदर वर्ग-०४ कर्मचारी | प्रसादालय | ०२/०६/२००६ | ०१/०६/२००८ | ०२/०६/२००८ |

उपरोक्त अ.नं. ०१ ते ०८ वरील याचे परिवीक्षाधीन कालावधी मध्ये काम समाधानकारक असून त्याचे बाबत कोणतेही प्रकरण चालू नाही. त्यांना सेवेत कायम करुन वेतनश्रेणी देण्यास हरकत नाही, असे अभिप्राय संबंधीत अधिक्षक यांनी दिले आहेत.

तरी उपरोक्त ०१ ते ०८ यांचे बाबत संबंधीत अधिक्षक यांचे अभिप्राय विचारात घेऊन त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपासून (कॉलम ०६) रु.२५५०-५५-२६६०-६०-३२०० ही वेतनश्रेणी देऊन, संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

०६ **सलग १२ वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेनुसार वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत.**

गट 'क' व 'ड' या संवर्गातील काही ठिकाणी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत.तर काही ठिकाणी अशा संधी उपलब्ध असल्यातरी पदोन्नती मिळण्यास प्रदिर्घ कालावधी लागतो.त्यामुळे एकाच पदावर १२ वर्षे सलगसेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीच्या साखळीतील कालबध्द वरची वेतनश्रेणी देण्याबाबतची योजना शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन-एसआई-१०९५-प्र.क्र.१/९५ बारा/दि.०८ जून १९९५ अन्वये जाहीर करण्यात आलेली होती व योजनेची अंमलबाजावणी ०१ आक्टोंबर १९९४ पासून करण्यात आली होती.संस्थान कर्मचाऱ्यांचे हित विचारात घेवून ही योजना संस्थाननेही अंमलबजावणीत आणली असून,या योजनेअंतर्गत आतापासून एकूण ४२५ इतक्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

त्यानंतर,शासन निर्णय क्र.वेतन-१९९९-प्र.क्र.२/९९/सेवा-३ मंत्रालय मुंबई -३२ दि.२०/०७/२००१ अन्वये दि.०८ जून १९९५ चे शासन निर्णयानुसार अंमलात आलेली कालबध्द पदोन्नती योजना बंद करुन, त्याऐवजी 'सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना,दि.०१ ऑगष्ट २००१ पासून लागू करण्यात आलेली आहे. त्याची नियमावली खालील प्रमाणे :-

१. ही योजना रु.८०००-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागू होईल.
२. या योजनेचा लाभ संबधीत पदावरील १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतरच अनुज्ञेय होईल.
३. सेवेत दोन किंवा त्याहून अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.
४. या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय होईल.येथे पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही तेथे तसेच एकाकी (Isolated) पदावरील कर्मचाऱ्यांना या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट एक मधील वेतनश्रेणी देय होईल.
५. या योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, पात्रता, जेष्ठता, अर्हता परिक्षा, विभागीय परिक्षा या सर्व बाबींची पूर्तता करणे तसेच पदोन्नतीची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील.जेथे या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील वेतनश्रेणी मंजूर करण्यात येईल तेथे गोपनीय अहवालाच्या आधारे पात्रता तपासण्यात यावी.
६. या योजनेचा लाभ संपूर्ण सेवेत फक्त एकवेळ अनुज्ञेय राहील.ज्या कर्मचाऱ्यांना दि.०८ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये यापुर्वीच वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला असेल त्यांना या योजनेअंतर्गत पुन्हा वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.
७. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यावर वेतननिश्चिती नियमीत पदोन्नतीप्रमाणेच होईल.मात्र त्याच वेतनश्रेणीत नियमीत /कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ देय होणार नाही.
८. नियमित पदोन्नती नाकारलेल्या तसेच नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही.या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यानंतर नियमित पदोन्नती नाकारलेल्या वा नियमीत पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही.
९. ज्या पात्र कर्मचाऱ्यांना यापूर्वी दि.०८ जून १९९५ च्या शासन निर्णयाचे परिशिष्ट २ (ड) मधील तरतूदीनुसार २ पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना यथास्थिती पदोन्नतीच्या पदाची किंवा शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील वेतनश्रेणी अनुज्ञेय करुन देण्यात आली असेल त्यांना दिलेला लाभ दि.२० जून २००१ च्या शासन निर्णयानुसार सेवाअंतर्गत आश्वासीत योजनेअंतर्गत तसाच पुढे चालू राहील.
१०. सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने नुसार संस्थान सेवेत रु.८०००-१३५०० व त्याहून कमी असलेल्या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांला संबंधीत पदावरील १२ वर्षांच्या नियमीत सेवेनंतर सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.तथापि सेवेत दोन किंवा त्याहून अधिकवेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना मात्र या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

उपरोक्तशिवाय या योजने संदर्भात अन्य मार्गदर्शक तत्वे ०८ जून व ०१ नोव्हेंबर १९९५ आणि २० मार्च १९९७ च्या शासन निर्णयानुसार लागु आहेत.

सदर योजनेअंतर्गत संस्थान कर्मचाऱ्यांना कालबध्द / वरची वेतनश्रेणी मंजूर करतांना,आतापर्यंत वर अ.नं.०५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विभागीय परिक्षा न घेता,केवळ पात्र तारखेचे लगतचे पाच वर्षांचे

गोपनीय अहवाल विचारात घेऊन एकूण- ८३ कर्मचाऱ्यांना या योजनेनुसार वरची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.

संस्थान कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नांवापुढे दर्शविलेल्या पदावर सलग १२ वर्षे सेवा पूर्ण केलेली आहे. या योजनेअंतर्गत सदर कर्मचाऱ्यांचा वरची कालबध वेतनश्रेणी देण्यासाठी विचार करावा लागेल. संबंधीत कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल विचारात घेऊन,त्यांना वरची वेतनश्रेणी द्यावयाची तारीख निश्चित केलेली असून,ती त्यांच्या नांवापुढे नमूद केलेली आहे.

या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा विचार करता सोबतचे परिशिष्टातील नामनिर्देशित कर्मचारी वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यास पात्र होतात किंवा कसे ? याची छाननी प्रामुख्याने खालील निकषावर करण्यात आलेली आहे.

ज्या कर्मचाऱ्यांचे लगतच्या ५ वर्षांचे म्हणजे सर्वसाधारणपणे सन.२००२-२००३ ते २००६-२००७ या कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात आलेले आहेत.गोपनीय अहवाल लिहीतांना कर्मचाऱ्यांचे बाबतचे मुल्यमापन खालील प्रमाणे करण्याची पध्दती आहे.

(०१) अ + = अत्युत्कृष्ट. (०२) अ = उत्कृष्ट. (०३) ब + = निश्चित चांगला

(०४) ब = चांगला . (०५) ब- = साधारण (०६) क = साधारणपेक्षा कमी

शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीसाठी गोपनीय अभिलेखाच्या प्रतवारीचे निकष ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वांचा विचार करण्यात येतो.

०१. ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.५०९९/- पर्यंत आहे.त्यासाठी किमान निकष म्हणून ५ वर्षांच्या गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी **' ब + '** अशी राहील.

०२. ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.५१००/- किंवा त्यापेक्षा अधिक आहे त्यासाठी किमान निकष म्हणून गोपनीय अभिलेखाची सरासरी **' अ '** अशी राहील.

याआधी संस्थान कर्मचाऱ्यांना कालबध्द वरची वेतनश्रेणी मंजूर करतांना मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१२-१३ जुलै २००३ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२९४ " पुढील काळात कर्मचाऱ्यांना कालबध्द वरची वेतनश्रेणी देतांना शासकीय अधिसुचनेनुसार गोपनीय अहवालाची सरासरी विचारात घेण्यात यावी."असा झालेला आहे.सदर निर्णयानुसार दि.०१ व ०३ जुलै २००४ रोजीच्या सभेमध्ये निर्णय क्र.३५७ तसेच मा.व्यवस्थापन उपसमितीचे दि.१८/१०/२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार आतापर्यंत एकूण ६७ कर्मचाऱ्यांना सदर योजनेचा लाभ झालेला आहे.

आता,सदर योजनेनुसार खालील अ.नं.०१ ते १६ कर्मचाऱ्यांना १२ वर्षे पुर्ण झालेले आहे.

| SR. NO. | NAME AND DESIGNATION OF EMPLOYEE |
|---|---|
| PAYSCALE RS.6500-200-10500<br>REV.PAYSCALE RS. 7450-225-11500 | |
| 1. | Shri Kale Ashok Murlidhar<br>Accounts Officer, Accounts Department |
| PAYSCALE RS.5500-175-9000<br>REV.PAYSCALE RS. 6500-200-10500 | |
| 02 | Shri Wani Bajirao Kanlal<br>Asstt.Teacher,Kanya Vidya Mandir |
| 03 | Shri Varghude Gangadhar Vishvanath<br>Asstt.Teacher,Kanya Vidya Mandir |
| 04 | Shri Pawar Ajay Shivajirao<br>Instructor Mach Refri & A/C<br>Shri Saiababa Industrial Training Institute |
| 05 | Shri Pardeshi Prashant Rameshsingh<br>Instructor Mach Grinder<br>Shri Saiababa Industrial Training Institute |
| 06 | Shri Satrasala Sreenivasulu Ramappa<br>Instructor Mach Radio & T.V<br>Shri Saiababa Industrial Training Institute |
| 07 | Shri Patil Vilas Bhaskar<br>Instructor Mach Radio & T.V<br>Shri Saiababa Industrial Training Institute |
| 08 | Shri Shivsharan Prakash Vitthal<br>Instructor Tractor Machanic<br>Shri Saiababa Industrial Training Institute |
| PAYSCALE RS.5000-150-8000<br>REV.PAYSCALE RS. 5500-175-9000 | |
| 09 | Smt.Savita Jyotilal Jadhav<br>Staff Nurse<br>Shri Sainath Hospital, Shirdi |
| 10 | Smt.Najama Nurmohmad Sayyad<br>Staff Nurse<br>Shri Sainath Hospital, Shirdi |
| 11 | Shri Aher Shivaji Marutrao |

| | |
|---|---|
| | X-Ray Technicion<br>Shri Sainath Hospital,Shirdi |
| PAYSCALE RS.4500-125-7000<br>REV.PAYSCALE RS. 5000-150-8000 | |
| 12 | Shri Dsouza Bezil Anthony<br>Asstt.Teacher, English Medium School,Shirdi |
| PAYSCALE RS.3050-75-3950-4590<br>REV.PAYSCALE RS. 4000-100-6000 | |
| 13 | Shri Patil Arun Shantaram<br>Data Entry Operator,Account Department |
| PAYSCALE RS.2550-55-2660-60-3200<br>REV.PAYSCALE RS. 2610-60-291-65-3300-70-4000 | |
| 14 | Smt.Mirabai Bajirao Deore<br>Attendent,Sanitation Department |
| 15 | Smt.Shobhana Bhausaheb Bankar<br>Attendent,Dharmashala Department |
| 16 | Shri Udavant Shashikala Ramchandra<br>Attendent, Prasadalaya Department |

आता, सदर योजनेनुसार उपरोक्त अ.नं.०१ ते १६ कर्मचाऱ्यांना १२ वर्षे पुर्ण झालेले असून अ.नं.०१ ते १६ पैकी अ.नं. ०१,०४,०५,०६,०७,०८,०९,१०,११,१२ व १३ असे एकूण ११ कर्मचारी हे वरची वेतनश्रेणी देण्यास पात्र ठरतात व उर्वरीत ०५ कर्मचारी सदर योजनेचा लाभ देण्यास अपात्र ठरत आहेत.

तरी उपरोक्त मा.व्यवस्थापन मंडळाचा निर्णय व सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेनुसार पात्र ठरणाऱ्या उपरोक्त कर्मचाऱ्यांना वरची वेतनश्रेणी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

०७ (अ) **<u>अपंगांना शासन निर्णयाप्रमाणे सेवेत भरती/पदोन्नती देणेबाबत.</u>**

उपरोक्त विषयांकीत कामी मा.दिगंबर भ.घाडगे मा.अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य अपंग संघटना,मुंबई यांनी दि.१४/०७/२००८ रोजी पत्र देवून त्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमधील कायम व सर्व अपंग कर्मचारी यांचे समस्येंबाबत चर्चा करुन त्यात शासन नियमानुसार अपंग कर्मचाऱ्यांचा अनुषेश त्वरीत भरण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

त्यास अनुसरुन मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे कक्षात दि.२५/११/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता अपंग कर्मचारी समस्येबाबत महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेच्या मान्यवरांसोबत सभा आयोजीत करण्यात आलेली होती.त्यात सदर विषांबाबत चर्चा करुन,"संस्थान कर्मचारी आकृतीबंध शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला असून आकृतीबंध मान्यतेनंतर पदनिहाय कर्मचारी संख्या कळून येईल व कोणत्या पदाच्या किती जागा रिक्त आहेत व कोणत्या अपंगाला कोणत्या पदावर पदोन्नती देता येईल याबाबत माहिती तयार करता येईल व मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कार्यवाही करता येईल." अशी चर्चा झालेली आहे.

शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९८/सीआर-३५/९८-१६अ,दिनांक २८ सप्टेंबर १९९८ अन्वये,अपंग व्यक्तींना शासन सेवेत आरक्षण ठेवणेबाबत "अपंग व्यक्तींना शासकीय सेवेतील वर्ग-२ वर्ग-४ (गट 'क' आणि 'ड') आरक्षण ठेवण्याबाबतची योजना सन.१९७८ पासून राज्यात लागू करण्यात आलेली आहे. या संदर्भात शासनाने वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच अपंगासाठी विहित केलेल्या आरक्षणानुसार पदे भरणेबाबतची कार्यवाही करण्याविषयी देखील वेळोवेळी शासनाने सूचित केले आहे.

आता केंद्र शासनाचा अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम,१९९५ लागू झलेला असून सदर अधिनियमातील कलम ३३ नूसार अपंगांना शासन सेवेत ०३ टक्के आरक्षण ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.या संदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती शासन परिपत्रक क्रमांक एस. आर.व्ही.१०९७/प्र. क्र. १२/९७/१६-अ,दिनांक ०२ मे १९९८ अन्वये विहित करण्यात आलेले असून सरळसेवा भरतीमध्ये ०१ अंध / अल्पदृष्टी (दृष्टीक्षीनता) १९७, ०२. कर्णबधीर ०१ टक्का आणि ०३. अस्थिव्यंग किंवा मंदमती ०१ टक्का असे एकूण ०३ टक्के आरक्षण ठेवण्याची कार्यपध्दती सदर आदेशाने विहीत केलेली आहे.

हे आदेश शासकीय / निमशासकीय सेवा, सर्व शासकीय मंडळे,महामंडळे,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका,नगरपालिका आणि शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे, अनुदानित संस्था, यांना लागु होतील असे नमूद केलेले आहे.

तसेच, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ मंत्रालय मुंबई-४०० ०३२ दि.०६/०५/२००४ अन्वये अपंग व्यक्तीसाठी ठेवावयाच्या आरक्षणाबाबत पुढील प्रमाणे एकत्रित मार्गदर्शनात्मक स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

०१. अपंग व्यक्तींसाठी गट-अ, गट-ब, गट-क व गट-ड या संवर्गातील पदांसाठी आरक्षण ठेवावयाचे आहे.

०२. अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाचे आरक्षण सरळसेवेने करण्यात यावयाच्या नियुक्त्यांसाठी लागू आहे. (तथापि,सा.प्र.वि.शासन परिपत्रक दि.०५/०३/२००२ अन्वये फक्त गट-ड मधून गट-ड मधील, गट-ड मधून गट-क मधील व गट क मधून गट-क मधील पदांवरील पदोन्नतीसाठी हे आरक्षण लागू करण्यात आले आहे.)

०३. सा.प्र.वि.परिपत्रक दि.१६/०३/१९९९ अन्वये स्पष्ट करण्यात आल्यानुसार अपंग व्यक्तींसाठी ठेवावयाचे आरक्षण समांतर आरक्षण (Harizontal Reservation) असून ते ५२ टक्के सामाजिक आरक्षण (व खुल्या प्रवर्गासाठी असलेले ४८ टक्के प्रमाण ) यामध्ये कप्पीकृत /अंतर्भूत ( Interlocking ) आहे.

०४. सा.प्र.विभाग शासन परिपत्रक दि.०४/०३/२००२ अन्वये अपंग व्यक्तीसाठी असलेल्या आरक्षणानुसार ठेवावयाची १०० रिक्त पदांची नोंदवही व नियुक्त्यांसाठी असलेली बिंदुनामावली या स्वतंत्र बाबी आहेत.तथापि अपंगासाठी ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांच्या नोंदवहीतील संबंधित क्रमांकानुसार अपंग उमेदवारांची मागणी करतांना बिंदु नामावलीतील रिक्त बिंदुच्या प्रवर्गाच्या (मागासवर्गीय किंवा खुला) उमेदवाराची मागणी करावयाची आहे.तसेच केवळ अपंग व्यक्तींची मागणी करावयाची नसून अपंगांच्या कोणत्या प्रवर्गासाठी (अंध/अल्पदृष्टी,कर्णबधीर,अस्थिव्यंग किंवा मेंदुचा पक्षघात) मागणी आहे हे ही स्पष्ट करावयाचे आहे.

०५. अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी अपंगत्वाचे किमान प्रमाण ४० टक्के असणे आवश्यक आहे.केंद्र शासनाच्या अपंग व्यक्ती अधिनियमात अपंग व्यक्तीची व्याख्या पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

**"blindness "** referes to a condition where a person suffers from any of the following conditions namely :-
01.total absence of sight; or
02.visual acuity not exceeding 6/60 or 20/200 (snellen) in the better eye with correcting lenses or
03.limitation of the field of vision subtending an angle of 20 degree or worse;
"Person with low vision "means a person with impairment of visual functioning even after treatment or standard refranctive correction but who uses or is potentially capable of using vision for the planning or execution of a task with appropriate assistive device;

**" hearing impairment** "means loss of sixty decibles or more in the betterer in the conversational range of frequericies:

**"locomotor disability** "means disability of the bones,joints or muscle leading to substantial restricion of the movement of the limbs or any form of cerebral palsy;

**"cerebral palsy** "means a group of non-progressive conditions of a person characterised by abnormal motor control posture resulting from brain insult or injuries occurring in the pre-natal,peri-natal or infant period of development ; 22

केंद्र शासनाच्या अधिनियमातील वर उल्लेख केलेली व्याख्या व संबंधित पदावर अपंगांसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाच्या आदेशात नमूद करण्यात आलेले अपंगात्वाचे प्रमाण / प्रकार विचारात घ्यावेत असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचा सुधारित आकृतीबंधास अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नसल्याने तूर्त पात्र अपंग व्यक्तींना आवश्यकतेनुसार कंत्राटदारामार्फत घेण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**(ब) श्री बाळासाहेब आढाव यांचे दिनांक २६ जानेवारी २००९ चे आत्मदहनाबाबत.**

श्री.बाळासाहेब आढाव यांनी त्यांचे दि.०९/१०/२००८ रोजीचे पत्रान्वये अपंगाचे भरती व विविध मागण्या मान्य करणेबाबत कळविलेले असून मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास दि.०३/१२/२००८ या जागतीक अपंगदिनी आत्मदहनाचा मार्ग अवलंबनार असे नमूद केले होते. त्यातील मागण्या खालीलप्रमाणे

१) अपंगाच्या नोकरीसाठी ३ टक्के अनुशेष ग्राह्य धरण्यात यावा.

२) अपंगाना वैद्यकीय सेवा मोफत द्यावी.

३) शिर्डी येथे अपंग कल्याण केंद्र सुरु करण्यात यावे.

४) १० वर्षाच्या आतील बालकास मोफत वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन द्यावी त्याचप्रमाणे अपातकालीन प्रसंगी दवाखान्यामध्ये येणा-या पेशंटकडून आगावू डिपॉझिट घेवु नये.

त्यास अनुसरुन श्री.आढाव यांना त्यांचे विविध मागण्यांबाबतचे पत्रास उत्तर देण्यात आलेले आहे. त्यात मंदिर व मंदिर परिसर ही आत्मदहन करण्याची जागा नाही, आपण मंदिर व संस्थानचे परिसरात आत्मदहनाचा मार्ग अवलंबू नये, तसा मार्ग अवलंबील्यास होणा-या कोणत्याही नुकसानीस तुम्ही स्वतः जबाबदार रहाल, संस्थान जबाबदार राहणार नाही. तसेच या प्रकरणामुळे संस्थान प्रशासनास काही अडचण निर्माण झाल्यास, भक्तांच्या दर्शन व सुरक्षिततेस काही बाधा आल्यास व कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल, असे कळविण्यात आलेले आहे.

आता, श्री.आढाव यांनी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे नावे दि.२६/११/२००८ रोजीचे पत्र देवून त्याची प्रत इकडील कार्यालयास पाठविलेली आहे. त्यात त्यांनी दि.०९/१०/२००८ चे पत्रात नमूद केलेप्रमाणे श्री शिर्डी साईबाबा संस्थानमध्ये ३ टक्के अपंगांचा अनुशेष न भरल्याप्रकरणी व अन्य मागण्यांबाबत दि.०३/१२/२००८ रोजी नियोजीत केलेला आत्मदहन कार्यक्रम स्थगित करुन तो दि.२६ जानेवारी २००९ रोजी करणार असलेचे कळविले आहे.

उपरोक्त पत्रास अनुसरुन गुरुवार दि.१८/१२/२००८ रोजी श्री.बाळासाहेब आढाव यांचेशी कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात समक्ष चर्चा करण्यात आलेली आहे. यामध्ये श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून त्यास शासनाची मान्यता आलेनंतर पदनिहाय संख्या कळून येईल व अपंगासंबंधीचे शासन निर्णयानुसार व मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने व रिक्त पदावर त्या पदासाठीची शैक्षणिक पात्रता व अनुभव ज्यांच्याकडे आहे अशा अपंगांना संस्थान सेवा नियमानुसार संस्थानमध्ये सेवेत घेणेबाबत विचार केला जाईल व इतर मागण्याबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे विचारार्थ सादर करण्यात येईल, अशी चर्चा झालेली आहे.

तथापी दि.२९/१२/२००८ रोजीचे संस्थान कार्यालयास दि.०१/०१/२००९ रोजी प्राप्त झालेल्या पत्रात अपंगाच्या मागण्यांबाबत श्री आढाव यांनी आपल्या संस्थान मध्ये अपंगाच्या ३ टक्के नोकरीतील अनुशेष भरण्यांत यावा या संदर्भात आपण कळविल्याप्रमाणे कर्मचारी आकृतीबंध मंजूरीसाठी मा.शासनाकडे पाठविला आहे सदर मंजूरीनंतर हा अनुशेष भरण्यात येणार आहे या विधानावर आमच्या संघटनेचा आक्षेप असून मा. न्यायालयाने अपंग अनुशेष भरतीची कार्यवाही करतांना कर्मचारी आकृतीबंध तयार करावा व मग भरती करा असा कुठेही उल्लेख केलेला नाही. उलट न्यायालयाने आधी अपंग अनुशेष भरा तो पर्यंत बाकीची कुठलीच कर्मचारी भरती करता येणार नाही असा आदेश दिलेला आहे . तेव्हा आपण न्यायालयीन आदेशाची अंमलबलावणी करण्यांस सरळसरळ टाळाटाळ करीत आहे. कर्मचारी आकृतीबंधाचे कारण दाखवून आमच्या संघटनेची दिशाभूल करीत आहात त्याचप्रमाणे संघटना सदर विषयावर गेल्या दोन वर्षा पासून संस्थान ,प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करीत आहे. तत्कालीन कार्यकारी अधिकारी श्री भाऊसाहेब वाकचौरे यांनी आपल्या पत्रात आकृतीबंधाचा कुठेही उल्लेख केलेला नाही. तरी आपण सदर कारण न दाखविता नियमाप्रमाणे अनुशेष भरतीची कार्यवाही करावी .श्री साईबाबा संस्थानने दवाखान्यात कर्मचारी भरतीची जाहिरात दि.२५/०६/२००८ रोजी दिली असून त्यामध्ये कुठेही अपंगांच्या जागा दाखलिल्या नाहीत. तरी सुध्दा असंख्य अपंगांनी जनरल जागेमधून आपणंकडे नोकरीसाठी अर्ज केले होते. यामधून तरी अपंगांचा अनुशेष भरावयास पाहिजे होता. तेव्हा आपण संस्थान मध्ये नियमांप्रमाणे ३ टक्के अपंग अनुशेष भरती केलीच पाहिजे त्यासाठी पात्र सुशिक्षीत बेरोजगार आणि ४० टक्के पेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तींनाच प्राधान्य द्यावे. त्याचप्रमाणे कंत्राटी कर्मचाऱ्यांमधीलच अपंगांचा अनुशेष न भरता ५० टक्के कंत्राटी कामगारांमधुन तर उर्वरीत ५० टक्के जागा इतर अपंग भरती मधुन भरण्यांत याव्या. व उर्वरीत मागण्या उपरोक्त मागण्यांपैकी आहेत, तसेच आमची संघटना ही अपंगांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देत आहे. आपण आमच्या मागण्यांवर सकारात्मक प्रतिक्रिया न दिल्याने आमचे समाधान झालेले नाही त्यामुळे संघटना आपले नियोजित २६ जानेवारी २००९ चे आंदोलन मोठया संख्येने अपंगांच्या उपस्थितीत करणार आहे त्या संदर्भात निर्माण होणाऱ्या परिस्थितीला संस्थान व आपणच जबाबदार रहाल याची कृपया नोंद घ्यावी हि विनंती. असे नमूद केले असल्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याबाबत उपरोक्त "अ"मध्ये चर्चा होऊन निर्णय झालेला आहे. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०८ **<u>शैक्षणिक फी परताव्याबाबत.</u>**

कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना गत व्यवस्थापन मंडळाचे दि.२१/०४/९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ (१) नुसार, शैक्षणिक फी चा परतावा शासनाने /विद्यापिठांनी केवळ गुणवत्तेच्या निकषावर भरण्यात येणाऱ्या (सुमारे ५०%) पर्यंतच्या जागांवर प्रवेश दिल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी (निम्नदराने ) निर्धारीत केलेल्या फी दर रक्कमेपर्यंतच मर्यादीत देण्यात येतो.

मा. व्यवस्थापन समितीने कारभार सुरु केल्यानंतर कर्मचाऱ्यांकडुन वारंवार होणाऱ्या मागणीस अनुसरुन व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ चे सभेतील निर्णय क्र.६२०," शिक्षण शुल्क समितीने निश्चित केल्याप्रमाणे रक्कमेचा परतावा शासनाच्या मान्यतेने देण्यात यावा, असे ठरल्याने त्यास शासनाची मान्यता मिळणे करीता इकडील जा.नं.एसएसएस,वशी-६/३६६९/२००७, दि.०८/०३/२००७ चे पत्रान्वये

विनंती करण्यात आलेली होती, त्यावर शासनाने त्यांचे जुन २००७ चे पत्रान्वये, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने विविध बाबींचा विचार करुन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याने व शैक्षणिक वर्ष सुरु होत असल्याने, या विषयाबाबत शासनाकडुन कोणतेही स्पष्ट आदेश प्राप्त होईपर्यंत प्रचलित असलेली कार्यपध्दती पुर्वीप्रमाणेच चालु ठेवण्यात यावी, असे निर्देश दिलेले होते.

सन २००४-२००५, २००५-२००६, २००६-२००७ सालासाठी गत व्यवस्थापन मंडळाचे निर्णयाप्रमाणे फी परतावा देण्यात आलेला होता. तथापी कर्मचारी व संघटनेकडून वारंवार होणाऱ्या मागणीनुसार दि.२२/०९/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३९ नुसार शिक्षण शुल्क समितीच्या दराने सन २००४-२००५ ते सन २००७-२००८ पर्यंतचा फी परतावा कर्मचाऱ्यांना अदा करणेत आलेला आहे.

इकडील कार्यालयाचे दि.०८/०३/२००७ चे पत्रास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दि.२५/०३/२००८ चे पत्रान्वये, कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना, शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या फीचा परतावा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे, असे कळविले तसेच पुर्वीप्रमाणे परतावा चालु ठेवणेबाबत कोणतेही निर्देश दिलेले नाहीत. त्यामुळे शैक्षणिक फी परतावा देण्याचे स्थगित केलेले आहे.

कर्मचाऱ्यांकडुन व संघटनांकडुन फी परतावा देणेबाबत सतत मागणी होत आहे. त्याबाबत इकडील जा.नं.वशी-६/१५५५८/२००८, दि.२२/१०/२००८ नुसार शासनास पुर्वीचे पध्दतीप्रमाणे फी परतावा चालु ठेवणेबाबत मान्यतेसाठी पत्र दिलेले आहे. त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

संस्थानच्या व्यवस्थेसाठी महाराष्ट्र शासनाने सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ केलेला आहे. उपरोक्त विषयाच्या संदर्भाने त्यातील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती-

कलम १५ (२) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी हे विनियमांद्वारे ठरविण्यात येतील अशा सेवेच्या अटींवर व शर्तीवर नेमण्यात येतील.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे-

कलम क्र.१६ - नियत दिवसाच्या लगतपूर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमुन देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल. आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रीतीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही. किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढुन टाकण्यात येणार नाही.

सन १९७१ पासुन संस्थान कर्मचाऱ्यांना शिष्यवृत्ती / शैक्षणिक फी परतावा दिला जातो.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता खालील बाबी निदर्शनास येत आहेत.

१) संस्थान कर्मचाऱ्यांना शिष्यवृत्ती / शैक्षणिक फी परतावा देणे ही बाब व्यवस्थापन समितीचे अखत्यारीतील आहे.

२) या संदर्भातील पूर्वीपासून प्रचलित असलेले वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीच्या झालेल्या निर्णयातील नियम तसेच सद्याची बदललेली परिस्थिती विचारात घेता कलम क्र. १५ (२) चे तरतुदीनुसार विनियम करुन शासनाची मान्यता घ्यावी लागेल. सदर विनियमाचा मसूदा तयार करुन मा. व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेत मान्यतेसाठी सादर करता येईल. मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर सदर विनियम शासनाकडे मान्यतेसाठी सादर करता येतील .

अधिनियमातील उपरोक्त तरतुदी तसेच कर्मचारी संघटनेची मागणी विचारात घेता सद्या प्रचलित असलेल्या नियमानुसार फी परतावा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचाऱ्यांना शिष्यवृत्ती / शैक्षणिक फी परतावा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. याबाबत मा.अध्यक्ष महोदय विधी व न्याय विभागाकडे प्रयत्न करणार आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-६)

०९ **<u>लघूलेखक पदाबाबत.</u>**

**अ)** श्री साईबाबांचे दर्शनासाठी भक्तांची वाढती संख्या व त्यांना पुरविण्यात येणा-या सेवा-सुविधा याकामी मा.व्यवस्थापन मंडळाच्या मासिक व उपसमिती यांच्या सभा होतात. सभेमध्ये विविध विषयावर चर्चा होऊन निर्णय घेतले जातात त्यावेळी झालेल्या चर्चेचे, निर्णयाचे शॉर्ट नोट घेऊन त्याचे मराठी व इंग्रजी इतिवृत्त तयार करुन मान्यतेनंतर त्याची प्रत संबंधीत विभागांना पुढील कार्यवाहीसाठी देण्यात येते.

**ब)** तसेच संस्थानचे २७ विभाग कार्यरत असून दैनंदीन कामात सुसूत्रता येण्यासाठी दरमहा मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात खातेप्रमुखांची सभाही घेण्यात येते. सभेत होणा-या चर्चेचे, निर्णयाचे शॉर्टनोट घेऊन त्याचे इतिवृत्त तयार करुन संबंधीत विभागांना पाठविण्यात येतात.

उपरोक्त बाबींचा विचार करता संस्थानचे प्रशासकीय कामाचा ताबडतोब निपटारा व्हावा व कामात सुसुत्रता, तत्परता येण्यासाठी लघुलेखक हे पद भरणे अत्यंत गरजेचे आहे. शासनाकडे मान्यतेसाठी पाठविलेल्या आकृतीबंधात एक लघुलेखकाचे पद दर्शविलेले आहे. आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळणेचे अटीस अधीन राहून व कामाची निकट लक्षात घेता लघुलेखक ह्या पदाची वर्तमान पत्रात जाहीरात देऊन हे पद समक्ष मुलाखतीद्वारे (Walk in Interview) भरणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान सेवेत कायम व एकत्रित वेतनावर/रोजंदारीवर काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांमधून ज्या कर्मचाऱ्याकडे लघुलेखक या पदाची पात्रता आहे अशा कर्मचाऱ्यांकरीता संस्थानचे नोटीसबोर्डवर माहितीपत्रक लावण्यात येऊन त्यांचेकडून या पदासाठी अर्ज मागविण्यात येऊन त्या कर्मचाऱ्याची लेखी/तोंडी परिक्षा घेऊन त्यांची लघुलेखक पदावर निवड करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१० **श्री साईनाथ रुग्णालयात उप वैद्यकीय अधिक्षक पद निर्माण करुन नेमणूक करणे बाबत.**

उपरोक्त संदर्भान्वये वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.२३/१२/२००८ रोजी टिपणी सादर करुन त्यात "श्री साईनाथ रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक हे पद मंजूर असून सदर पदावर डॉ.ए.एस.पेंडसे हया कार्यरत आहेत. रुग्णालयामध्ये दिवसें दिवस शिरडी व शिरडी परिसरातून येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढती आहे. रुग्णांची गर्दी वाढल्यामुळे वैद्यकीय अधिक्षकांवर ताण पडत आहे. वैद्यकीय अधिक्षीका यांना रजा घेतेवेळी कामाची व्यवस्था करुन रजा घ्यावी लागते, वैद्यकीय अधिक्षीका यांच्या रजेच्या काळात रुग्णालयातील डॉ.एस.बी.गोंदकर. वरिष्ठ वै.अ. यांना काम पहावे लागते. रुग्णालयात गरीब रुग्णांची संख्या जास्त असल्यामुळे सदर रुग्णांना बिलात सवलत देण्याचे काम वैद्यकीय अधिक्षक मार्फत केले जाते. सर्व संस्थान कर्मचाऱ्यांच्या आजारी रजा येथूनच प्रमाणित होतात तसेच सर्व संस्थान कामगारांचे मेडीकल करणे , Periodic Check up ही वैद्यकीय अधिक्षिका यांच्या मार्फत होतो. धर्मशाळा इमारत नं.१ ही सुध्दा साईनाथ रुग्णालयाच्या ताब्यात दिली आहे तेथे ३२ खाटा वाढलेल्या आहेत व साईबाबा हॉस्पीटलमधील त्वचारोग, गायनिक, दंत व नेत्र विभागही साईनाथ रुग्णालयात कार्यान्वीत करण्यात आले असून संस्थान नियमानुसार First Aid Centre चालविले जाते. तसेच फिरते वैद्यकीय पथकही श्री साईनाथ रुग्णालयातून पाठविले जाते. तसेच विविध शिबीरेही घेतले जातात. हया सर्वांवर नियंत्रण ठेवून स्टाफकडून अतिरीक्त कामे करणे कामी उप वैद्यकीय अधिक्षक यांची गरज भासत आहे. तसेच क्वॉलटी वर्क करण्यास हया पदाचा उपयोग होईल. तसेच एच.आय.व्ही. बाधित कर्मचारी रुग्णांकरीता विशेष उपचार हे ही वैद्यकीय अधिक्षक स्वत: च करत असतात तसेच त्यांचे कुटूंबियांचे योग्य मार्गदर्शन करावे लागते. उप वैद्यकीय अधिक्षक हे पद निर्माण केल्यास वैद्यकीय अधिक्षीका यांच्यावर होणारा कामाचा ताण कमी होण्यास मदत होईल. तरी रुग्णांची गैरसोय व प्रशासन कामात अडचण निर्माण होऊ नये म्हणून श्री साईनाथ रुग्णालयात उप वैद्यकीय अधिक्षक पद निर्माण होणेस व सदर पदावर योग्य व्यक्तीची नेमणूक होणेस विनंती आहे." असे नमूद केलेले आहे.

मा.सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे श्री साईबाबा संस्थान सेवक आकृतीबंध मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे.

सदरच्या आकृतीबंधामध्ये श्री साईनाथ रुग्णालयाकरीता "वैद्यकीय उपअधिक्षक"या पदाचा समावेश करण्यात आलेला नाही. तरी श्री साईनाथ रुग्णालयाच्या कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने वैद्यकीय उपअधिक्षक हे पद निर्माण करुन त्या पदास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन सदरचे पद आकृतीबंधात समाविष्ट करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास तत्वत: मान्यता देणेत आली, सदर पदाची शैक्षणिक पात्रता, अनुभव, वेतनश्रेणी इ. निश्चित करुन नेमणूक करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

११ **मानद वैद्यकिय अधिकारी म्हणून सेवा देणेबाबत.**

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल नव्याने सुरु करतांना सदर हॉस्पीटल मध्ये वैद्यकिय अधिकारी तसेच पॅरामेडीकल कर्मचारी नेमणूका करणेकामी जाहीरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. त्यावेळी डॉ. मिलींद नवलाखे, परेल मुंबई यांनी ऑनररी ई एन टी सर्जन या पदावर काम करणेकामी अर्ज केला होता. संबंधीत वैद्यकिय अधिकारी यांच्या मुलाखती घेऊन त्यांना संस्थान चे श्री साईबाबा हॉस्पीटल कडे ऑनररी ई.एन.टी. सर्जन या पदावर नेमणूक केली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०१/१९१०/२००६ दि. ११/०२/२००६ अन्वये कळविण्यात आले होते. आदेशातील अटी-शर्ती नुसार डॉ.

नवलाखे यांनी दि.२०/०७/२००६ रोजी पत्र देऊन त्यात- I am honored to accept the post of Honororay Consultant in E.N.T. at the S.S. Sansthans Hospital at Shirdi. I am committed to give my services to hospital and more specially for the advanced endospoic sinus surgeries and advanced micro ear surgeory. असे नमूद केले होते. त्याच वेळी अधिक्षक आस्थापना यांनी डॉ.नवलाखे यांचेशी मोबाईल फोनवर संपर्क साधला असता "मी शिरडी येथे येऊन डॉ. कुलकर्णी, यांचेशी चर्चा केली व तसा दि.२६/०७/२००६ रोजी अर्ज दिला आहे. मी लवकरच त्या ऑर्डरनुसार संस्थानसेवेत येणार आहे. डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले अद्याप इन्सट्रुमेन्ट आलेले नाही. " असे कळविले होते. त्यानंतर त्यांनी इकडेस संपर्क केलेला नाही.

आता डॉ. मिलींद नवलाखे, इ.एन.टी. सर्जन यांनी दि.०८/०८/२००८ रोजी शिरडी येथे समक्ष येऊन पत्र दिले आहे. त्यात - I wish to thank you for giving me an Opportunity to do service at shri Sainath Hospital on 20 & 21 June 2008.

As per discussion with Dr. Bobde M./D. Dr. Asha Pendse . M.S. Sainath Hospital & Dr. Kulkarni I am willing to attend ENT Cases at Sainath Hospital every two months. The dates for the Surgery can be fixed at convenient days. The difficult cases of skull base Surgery & stapes can be carried out during these days.

I am willing to accept an honorarium of Rs. 1000/- per case or as may be decided by the Honorable Trust. असे नमूद केले आहे.

वैद्यकिय अधिक्षिका व तसेच वैद्याकिय संचालक व तसेच डॉ. कुलकर्णी यांनी दि.२०/०८/२००८ रोजी टिपणी देऊन - डॉ. मिलींद एम.नवलाखे, यांना श्री साईनाथ रुग्णालयात दोन महिन्यातून एक व्हिजीट देणेस व तसेच त्यादिवशी ते ऑपरेशन करतील त्या प्रत्येक केससाठी रु.१०००/- मानधन द्यावे लागेल असे अभिप्राय दिले आहेत.

वैद्यकिय अधिक्षिका, वैद्यकिय संचालक तसेच डॉ. कुलकर्णी ई.एन.टी. सर्जन यांचे अभिप्रायानुसार डॉ. मिलींद एम नवलाखे, ई.एन.टी. सर्जन यांना मानद सर्जन (ई.एन.टी. ) यांना दोन महिन्यातून एक वेळ व्हिजीट व त्यावेळी ते ऑपरेशन करतील त्या प्रत्येक केस साठी रु.१०००/- मानधन त्यांना देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

१२ **<u>पाणी पुरवठा विभाग- अधिक्षक पदावर ज्यु.इंजिनीयर नेमणूकीबाबत.</u>**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवर पाणी पुरवठा विभाग प्रमुख हे पद असून सदर पदावर श्री.प्रल्हाद गंगाधर शेळके हे सदर पदावर काम पहात आहेत. संस्थानचे ध्येयधोरणानुसार विहीत वयोमान (वयाची ६० वर्ष) पुर्ण केल्यानंतर संबंधीत संस्थान सेवकांना सेवानिवृत्त करण्यात येते.

श्री.प्रल्हाद गंगाधर शेळके, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे दि.०९/०३/२००९ रोजी वयाची ६० वर्ष पूर्ण होत असल्यामुळे ते दि.३१/०३/२००९ रोजी माध्यान्होत्तर सेवानिवृत्त होत आहेत. तसा सेवानिवृत्त आदेश जा.नं.एसएसएस/वशी-०१/३९१०/२००८ दि.११/१२/२००८ अन्वये पारीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरचे पाणी पुरवठा विभाग प्रमुख हे पद रिक्त होणार आहे.

सन १९९८ पर्यन्त सदर पाणी पुरवठयाचे काम विद्युत विभाग प्रमुख (D.E.E.) यांचे नियंत्रणाखाली चालत असे. पाणी पुवठयाचे कामाचा वाढता व्याप विचारात घेता सन १९९८ मध्ये सदर विभाग स्वतंत्र करण्यात येऊन संस्थान मधील या कामाचा अनुभव असलेल्या कर्मचाऱ्यास पाणीपुरवठा विभाग प्रमुख म्हणून नेमण्यात आले आहे.

दिवसें दिवस भक्तांची वाढती संख्या, भक्तांना लागणारी पाणी पुरवठयाची मूलभूत सोय विचारात घेता संस्थानची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना सन १९८९ मध्ये कार्यान्वीत करण्यात आली आहे. त्यानंतर सन १९९५ मध्ये सदर योजनेचा विस्तार करण्यात आला आहे. सदर पद तांत्रिक स्वरुपाचे असल्याने संस्थान व्यवस्थापनाच्या हिताच्या दृष्टीने विहीत तांत्रिक पदाची पात्रता असणाऱ्या उमेदवाराची नेमणूक करणे आवश्यक आहे.

याबाबत अहमदनगर महापालीका, अहमदनगर यांचे पाणीपुरवठा विभागाकडून माहिती घेता त्यांनी या पदाची पात्रता BE Mechanic / D.M.E. अशी असते असे तोंडी सांगितले आहे. तथापी याबाबत अधीकृत शासन निर्णय/कागदपत्रे मिळविणे आहे. याबाबत खालील पर्यायावर विचार करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

१) सदर जागा भरणेकामी रितसर जाहीरात देऊन मुलाखत घेऊन जागा भरता येईल. संस्थान मधील सदर पात्रता धारकास अर्ज करता येईल.

२) शासनाकडून प्रतिनियुक्तीवर उमेदवार घेणेस विचार करता येईल.

३) तूर्तास कामाची गैरसोय होऊ नये म्हणून सदर विभागाचे कामकाज, या कामाचा पुर्वाअनुभव व सेवाजेष्ठ असलेले कर्मचाऱ्यांकडे देता येईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या सेवानिवृत्त होत असलेले कर्मचारी श्री.प्रल्हाद गंगाधर शेळके, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांना मुदतवाढ मिळावी, असा विनंती अर्ज केलेला आहे. सध्या पाणीपुरवठा विभागाकडे साठवण तलावावर फिल्टर प्लॅन्ट, नवीन पाईप लाईन इ. महत्वाची कामे प्रस्तावित असून श्री. शेळके यांना त्याची संपूर्ण माहिती असल्याने त्यांना तुर्त सहा महिने कालावधीसाठी रु.१०,०००/-या एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१३ **श्री.मारुती रखमा उंबरकर यांचे ज्यु.टेक्निशियन,टी.एफ.सी.या पदावर नेमणूकीस मान्यता देणेबाबत.**

श्री.मारुती रखमा उंबरकर, यांनी दि.२५/०६/२००८ रोजीचे जाहीरातीस अनुसरुन दि.०४/०७/२००८ रोजी ज्यु. टेक्निशियन पी.एफ.टी या पदासाठी नेमणूक होणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. श्री. उंबरकर यांनी त्यांचे अर्जात यांचे शिक्षण बारावी सासन्स व एक्स-रे टेक्नॉलॉजी झालेले असून त्यांना ११ वर्षे अनुभव असलेबाबत त्यांनी नमूद केले आहे. संस्थान जाहीरातीनुसार ज्. टेक्निशियन पी.एफ.टी. या पदासाठी Bsc with Diploma in related subject from Govt. approved institute. अशी शैक्षणिक पात्रता नमूद करण्यात आलेली होती. श्री. उंबरकर यांचेकडे जाहीरातीमध्ये नमूद केलेली पात्रता नसल्यामुळे त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले नव्हते.

वैद्यकिय संचालक, श्रीसाईबाबा हॉस्पीटल यांनी श्री. मारुती उंबरकर यांनी H.S.C.(Science) व X-Ray Tech. कोर्स केलेला असून त्यांना ११ वर्षाचा सदर कामाचा अनुभव आहे त्यांची वैद्यकिय संचालक, डॉ.कृष्णा गिरी फिजीशियन व डॉ. हरिष बजाज कार्डीओलॉजीस्ट श्री साईबाबा हॉस्पीटल, यांनी मुलाखत घेतलेली असून त्यांचे नियुक्तीबाबत शिफारस केलेली आहे.

उपरोक्त वैद्यकिय संचालक श्रीसाईबाबा हॉस्पीटल यांचेकडील उपरोक्त अभिप्राय व दि.१२/१२/२००८ रोजीच्या टिपणी नुसार श्री.मारुती रखमा ऊंबरकर, यांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ज्यु.टेक्निशियन पीएफटी या पदावर जा.नं.एसएसएस/वशी-०१/३३५/२००९ दि.०६/०१/२००९ अन्वये रु.६५००/- एकत्रित वेतनावर ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१४ **श्री.गबाजी सखाराम वराळ,कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) यांचा मुदतवाढ व एकत्रित मानधन वाढीबाबतचा अर्ज.**

श्री. गबाजी सखराम वराळ, यांनी दि.०२/०१/२००९ रोजी अर्ज करुन, मी सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्त, व्यवस्था शिरडी च्या बांधकाम विभागात कंत्राटी पध्दतीने मोजणीदार(सर्व्हेअर) म्हणून दि.१४/०२/२००६ पासून रु.७०००/- एकत्रित मानधनावर काम करत आहे. मला जा.नं.एसएसएस/वशी-०१/८७०/२००८ दि.२८/०३/२००८ अन्वये दि.१४/०२/२००८ पासून मुदतवाढ देण्यात आलेली असून सदरची मुदतवाढ दि.१३/०२/२००९ रोजी संपत आहे. तरी मला दि.१४/०२/२००९ पासून पुढे एक वर्ष मुदतवाढ मिळणेस विनंती आहे तसेच माझे काम तांत्रित स्वरुपाचे आणि बौध्दीक व शारिरिक कष्टाचे असून मासिक मानधन रु.७०००/- ऐवजी रु.९०००/- मिळावे अशी विनंती केली आहे.

सदर अर्जावर वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम यांनी "मुदतवाढ देणेस हरकत नाही, यथायोग्य कार्यवाहीसाठी सादर " असे अभिप्राय दिले आहेत.

श्री. गबाजी सखाराम वराळ, यांची प्रथम उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये संस्थानचे बांधकाम विभागाकडे मोजणी म्हणून मासिक रु.७०००/- एकत्रित मानधनावर एक वर्ष (दि.१४/०२/२००६ ते १३/०२/२००७ अखेर ) कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती. सदरची मुदतवाढ संपुष्ठात आल्यानंतर त्यांची वेळोवेळी मुदतवाढ करण्यात आलेली असून सदरची मुदतवाढ दि.१३/०२/२००९ अखेर संपुष्ठात येत आहे.

तरी वरिष्ठ उपमुख्य अभियंता यांची शिफारस विचारात घेता पूर्वीच्याच अटी-शर्तीवर दि.१४/०२/२००९ ते १३/०२/२०१० अखेर एक वर्ष मुदतवाढ देणेबाबत आदेश होणेस विनंती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०२/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०३ तसेच दि.०४/०३/२००६ रोजीचे सुधारित निर्णयानुसार श्री. सखाराम गबाजी वराळ यांना त्यांचे दि.१४/०२/२००६ रोजीचे नेमणूकीपासून गेले तीन वर्ष दर महा रु.७०००/- एकत्रित मानधन देण्यात येत आहे. ते सरकारी सेवानिवृत्त कर्मचारी आहेत.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्री सखाराम गबाजी वराळ कंत्राटी पध्दतीने मोजणीदार (सर्व्हेअर) यांची पूर्वीचे अटी-शर्तीवर चार महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१५ **<u>पे-रोल वर नाव घेऊन एकत्रित वेतन मिळणेबाबत श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे,ग्रंथालय सहाय्यक, औ.प्र.संस्था, यांचे अर्जाबाबत.</u>**

श्रीमती प्रतिभा सर्जेराव बढे, ग्रंथालय सहाय्यक यांनी दि.१८/१२/२००८ चे अर्जान्वये माझी नेमणूक एक वर्षाचे कालावधीसाठी करण्यात आलेली असून आता मी ग्रंथालय सहाय्यक पदाकरिता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेली आहे, तरी मला संस्थानच्या Pay-Roll वर एकत्रित वेतनावर नेमणूक मिळावी विनंती केलेली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५७१८/२००७ दि.०३/१०/२००७ अन्वये श्रीमती बढे यांची 'ग्रंथालय सहाय्यक' या पदावर एक वर्षाचे कालावधीकरिता रु.३०००/- या एकत्रित मानधनावर शैक्षणिक संकूलाकडे नेमणूक करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन दि.०३/१०/२००७ रोजी त्या कामावर हजर झालेल्या आहेत.

सदरची मुदत दि.०२/१०/२००८ रोजी संपुष्ठात आल्यानंतर त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी- १/३१८५/२००८ दि.२५/१०/२००८ अन्वये दि. ३/१०/२००८ पासून पुढे एक वर्ष कालावधी करिता मुदतवाढ व रु.३०००/- ऐवजी रु.४०००/- मासिक एकत्रित वेतनात वाढ करण्यात आलेली आहे. सदर नेमणूक आदेशात "सदरचा कालावधी संपताच त्यांची उपरोक्त नेमणूक रद्द होईल" असे नमूद करण्यात आलेले आहे.

श्रीमती बढे यांचे प्रमाणेच एक वर्ष कालावधी करीता कंत्राटी पध्दतीने ज्यु.इंजिनियर, मदतनीस या पदावर एकत्रित वेतनावर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. त्यांना अद्याप पावेतो पे-रोलवर घेतलेले नाही.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्रीमती बढे यांची एक वर्षे कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली असून त्यांचे Pay-Roll वर नेमणूक होणेबाबतची विनंती अमान्य करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१६ **<u>श्री.शशिकान्त अंबादास कुलकर्णी यांचा विभागप्रमुख पद व वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणेबाबत अर्ज.</u>**

श्री शशीकांत अंबादास कुलकर्णी, ध्वनीक्षेपण-सी.सी.टी.व्ही.इलेक्ट्रीक सुपरवायझर, त्यांनी त्यांचे दि.२२ मार्च २००७ रोजीचे विनंती अर्जाते "मी संस्थानचे सेवेत सन १७७२ पासून सुमारे ३५ वर्ष नोकरीत आहे. सन १९९९ ते आजपावेतो मी ध्वनीक्षेपण, कारंजा व सन २००५ पासून सी.सी.टी.व्ही.विभागाचे प्रमुख म्हणुन काम पाहत आहे. वशी-०१ ला माझे पदनाम इलेक्ट्रीकल सुपरवायझर असे आहे,ते बदलून प्रमुख करावे.तसेच प्रमुखाचे वेतन मिळणेबाबत अनेक वेळेस अर्ज, विनंती मी केलेली आहे.

श्री प्रल्हाद गं.शेळके , पाणी पुरवठा विभाग प्रमुख हे माझ्यापेक्षा दोन वर्षांनंतर संस्थानमध्ये रुजू झाले असतांना त्यांना सन १९९८ मध्ये पाणी पुरवठा विभाग प्रमुख करणार असे कळले, तेव्हा दिनांक १२ जून १९९८ रोजी अर्ज देऊन मी जेष्ठ असल्याकारणाने व दोघांचे पदनाम इले.सुपरवायझर असल्याने व मला कामाचा अनुभव असल्याने मी पाणी पुरवठा विभाग सांभाळू शकतो. त्यामुळे असा अर्ज केलेला आहे.परंतू माझ्या अर्जाचा विचार न करता वशी-०१/१०७५५/९८ दिनांक ०२/११/१९९८ अन्वये पाणी पुरवठा विभाग हा श्री प्रल्हाद शेळके यांच्याकडे देण्यात येऊन त्यांचे पदनाम प्रथम प्रभारी पाणी पुरवठा विभाग प्रमुख होते नंतर ते बदलून पगार बील यादीला पाणी पुरवठा विभाग प्रमुख असे करण्यात आलेले आहे.

त्यानंतर वशी-०१/२४७७/९९ दि. ९ सप्टेंबर १९९९ च्या आदेशान्वये ध्वनीक्षेपण विभाग व कारंजा मेन्टेनन्स माझ्याकडे देण्यात आले.व सन २००५ पासून सी.सी.टी.व्ही. विभाग हा माझ्याकडे देऊन ध्वनीक्षेपण +कारंजा व सी.सी.टी.व्ही.चे काम या विभागाकडे मी एकत्र पाहत आहे.त्या वेळोवेळी अनेक सुधारणा मी केल्या आहेत. या विभागातील काम अत्यंत क्लीष्ट व बौध्दीक स्वरुपाचे आहे. तसेच अनेक लहान लहान व अत्यंत किंमती मशिनरी या विभागाकडे असुन सुमारे एक कोटी रुपये पर्यंतचा डेडस्टॉक आहे. तथापी सन १९९९ नंतर मी अर्ज देऊन माझी बदली पाणी पुरवठा विभाग प्रमुख व श्री प्रल्हाद शेळके यांची बदली ध्वनीक्षेपन विभाग प्रमुख म्हणून करावी, असा अर्ज केलेला आहे.परंतू त्याचाही विचार झालेला नाही.त्यावेळेस माझी बदली केली असती, तर आज मी श्री प्रल्हाद शेळके यांच्या जागेवर पाणी पुरवठा विभाग प्रमुख असतो.

दि. १४/११/२००२ रोजी व त्यानंतरही अर्ज देऊन माझे विद्युत पर्यवेक्षकाचे पदनाम बदलून प्रमुख पदनाम करणे, तसेच सेवाजेष्ठता यादीप्रमाणे प्रल्हाद शेळके यांचे अगोदर विद्युत पर्यवेक्षक या पदावर मी जेष्ठ असल्याकारणाने श्री प्रल्हाद शेळके यांना कुठल्याही प्रकारची पगारवाढ, जादा इन्क्रीमेंट किंवा कामाचा मोबदला दिल्यास मलाही त्यांच्या इतका पगार मिळणेस मी पात्र राहील,असे कळविलेले आहे.

त्यानंतरही मी दि. ०३ ऑगष्ट-२००६ व दि. ११ डिसेंबर २००६ रोजी पदोन्नती व वेतनश्रेणी मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. अशा प्रकारे अनेक वेळेस अर्ज करुन सुध्दा माझ्या अर्जाचा कधीही विचार अथवा खुलासा झालेला नाही. आता मी ऐकले आहे की, श्री प्रल्हाद शेळके यांना त्यांच्या मागणीप्रमाणे उच्च वेतनश्रेणी देणेबाबतचा त्यांचा अर्ज विचाराधीन आहे. याबाबत मे. साहेंबाना या अर्जाव्दारे विनंती करतो की, मी जेष्ठ असल्याने तसेच अत्यंत जबाबदारीच्या विभागाचे कामकाज मी (इले.सुपरवायझर) प्रमुख म्हणून पाहत असल्याकारणाने श्री प्रल्हाद शेळके यांना जी वेतनश्रेणी देण्यात

येईल, त्या वेतनश्रेणीस मी पात्र राहील.तरी कृपया माझे पदनाम बदलावे.तसेच श्री प्रल्हाद शेळके यांना देण्यात येणाऱ्या वेतनश्रेणीप्रमाणे मलाही वेतनश्रेणी देण्यात यावी,अशी विनंती केली आहे.

**श्री शशीकांत अंबादास कुलकर्णी , यांची माहिती खालील प्रमाणे :-**

०१) जन्मतारीख :- ३०/०७/१९५१. वय - ५७ वर्ष .
०२) शैक्षणिक अर्हता :- अ) एस.एस.सी.पास, ब) वायरमन परिक्षा पास.
क) विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र १९८२.
०३) नेमणुक तारीख :- ०१) दि.०१/०३/१९७२ ------- मदतनिस.
०२) दि.०१/०८/१९७७ ------- तारतंत्री,
०३) दि.२६/०३/१९८६ ------- इलेक्ट्रीक सुपरवायझर.
०४) वेतनश्रेणी :- रु.-५५००-१७५-९०००(कालबध्द वेतनश्रेणी दि.२६/०६/९८ पासुन)
सध्याचे बेसीक :- रुपये- ७,६००/-

उपरोक्त अर्जात सन १९९९ नंतर मी अर्ज देऊन माझी बदली पाणीपुरवठा विभाग प्रमुख व श्री प्रल्हाद शेळके यांनी बदली ध्वनिक्षेपन विभाग प्रमुख म्हणून करावी, असा अर्ज केलेला आहे. परंतु त्याचा विचार केला नाही. त्या वेळेस माझी बदली केली असती तर मी पाणीपुरवठा विभाग प्रमुख असतो.

श्री कुलकर्णी यांनी दि. ३१/१०/२००८ रोजी अर्ज करुन,त्यात श्री प्रल्हाद गंगाधर शेळके, पाणी पुरवठा प्रमुख यांना दि.१८/१०/२००८ रोजीचे सभेत रु.-५५००-१७५-९००० या वेतनश्रेणी ऐवजी वरिष्ठ वेतनश्रेणी रु.-६५००-२००-१०५०० दिलेली आहे.

मी श्री प्रल्हाद गंगाधर शेळके यांचे पेक्षा सिनिअर असूनही मला विभाग प्रमुख हे पदनाम व रुपये-६५००-२००-१०५०० दिलेले नसुन मला वंचित ठेवण्यात आलेले आहे, असे नमुद केले आहे.

तसेच सदर अर्जावर मा.श्री अशोक खांबेकर, विश्वस्त, यांनी " दि.१८/१०/२००८ रोजीचे मिटींग प्रमाणे प्रोसिडींगमध्ये दुरुस्ती करण्यात यावी व श्री कुलकर्णी यांना श्री शेळके, श्री लंके यांचे प्रमाणे वेतनश्रेणी व पदोन्नती देण्यात यावी ", अशी शिफारस केली आहे.

तरी उपरोक्त श्री कुलकर्णी यांची विनंती व मा.विश्वस्त श्री.अशोक खांबेकर यांची शिफारस विचारात घेऊन श्री कुलकर्णी यांनाही श्री शेळके यांचे प्रमाणेच रुपये- ६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी देऊन विभाग प्रमुख असे पदनाम देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.कुलकर्णी हे श्री.पी.जी. शेळके यांना सेवाजेष्ठ आहेत. दोघांची शैक्षणिक पात्रता सारखीच असून श्री.कुलकर्णी ध्वनीक्षेपन या तांत्रिक विभागात प्रमुखाचे काम करीत असल्याने त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मांन्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१७ **श्री.प्रमोद वसंतराव कुलकर्णी यांचा अधिक्षक पद व त्या पदाची वेतनश्रेणी मिळणे बाबत अर्ज.**

श्री प्रमोद वसंतराव कुलकर्णी यांनी अधिक्षक पदाची पदोन्नती मिळणेबाबत अर्ज सादर करुन त्यात "मी विनंती पुर्वक अर्ज करतो की, संस्थान कर्मचारी सेवाजेष्ठता यादीत रुपये ५०००-८००० या वेतनश्रेणीत नं.०२ ला माझे नांव व ०३ ला श्री रामराव शेळके यांचे नांव होते. तथापी अधिक्षक पदासाठी पदोन्नती देते वेळी मात्र श्री रामराव शेळके यांचाच विचार करण्यात आला व मला अधिक्षक पदाचे पदोन्नती पासुन वंचित ठेवण्यात आले. मी फेब्रुवारी २००३ पासून सप्टेबर २००८ पर्यंत प्रकाशने विभागात विभाग प्रमुख व ऑक्टोबर २००८ पासून भांडार विभागात विभाग प्रमुख म्हणून काम करीत आहे. माझी संस्थान सेवेतील माहिती खालील प्रमाणे आहे.

नेमणूक तारीख :- ०१.०९.१९७७
जन्म तारीख :- ०१.०३.१९५४
शिक्षण :- बी.ए. इंग्लिश
सध्याची वेतनश्रेणी ५०००-१५०-८०००
सध्याचे बेसीक :- ६६५०/- एकूण वेतन रु. १५३६२/-
संस्थान मधील एकूण सेवा :- ३१ वर्ष

उपरोक्त सेवेच्या कालावधीत मी चौकशी व निवासस्थान विभाग, लेखाशाखा, प्रशासन शाखा, भक्तनिवासस्थान, प्रसादालय, जनसंपर्क कार्यालय येथे पर्यवेक्षक पदावर कामे केलेली असून गेल्या ०५ वर्षा पासून विभाग प्रमुख म्हणून प्रकाशने विभागात व सध्या भांडार विभागात काम करीत आहे. प्रकाशने विभागात माझे जागी अधिक्षक पद धारकाची नेमणूक होवून सध्या दि. ०१.१०.२००८ पासून मी भांडार विभागातील अधिक्षक पद धारकाचे जागी विभाग प्रमुख म्हणून काम पहात आहे. तथापी अधिक्षक पद्दोन्नतीचे आदेश पारीत करतेवेळी माझी रु.५५००-९००० या वेतनश्रेणीत अधिक्षक पदासाठी पदोन्नती देण्यात आलेली नाही. त्यामुळे माझ्यावर जेष्ठता, पद, वेतनाबाबत खुपच अन्याय झालेला आहे. श्री साईबाबांच्या श्रध्दा व सबुरी या शिकवणीस अनुसरुन मी आजपावेतो इमाने इतबारे सेवा केलेली आहे.

तरी कृपया माझे सेवाजेष्ठतेचा सहानुभूतीपुर्वक विचार होऊन मी सध्या पहात असलेले विभाग प्रमुख म्हणून अप्रत्यक्षपणे अधिक्षक पदाचा कार्यभार सांभाळत असल्याने मला रु. ५५००-९००० या वेतनश्रेणीत अधिक्षक पद थेट पदोन्नतीने देवून माझेवर झालेला अन्याय दुर करावा हि विनंती." असे नमुद केलेले आहे.

श्री रामराव शेळके व श्री कुलकर्णी यांचा विषय मा.आस्थापना उपसमितीचे दि.११.०८.२००७ रोजीचे सभेत विषय सादर करण्यात आलेला होता, याबाबत दि.१८.१०.२००८ रोजीचे आस्थापना उपसमितीच्या सभेत ठरले प्रमाणे श्री रामराव रंभाजी शेळके यांना अधिक्षक व त्या पदाची वेतनश्रेणी दिलेचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे श्री प्रमोद कुलकर्णी यांनाही त्यांचे वरिष्ठ पदावरील दिर्घकाळ सेवेचा विचार करुन अधिक्षक पद व त्या पदाची रु. ५५००-९००० वेतनश्रेणी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. श्री.कुलकर्णी यांचेकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असून त्यांनी सन- २००३ पासून प्रकाशने विभागप्रमुखाचे काम करीत आहे. श्री रामराव शेळके यांचेप्रमाणे शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असल्याने त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस आहे.याचवेळी श्री प्रकाश रामचंद्र रत्नपारखी, धर्मशाळा विभागप्रमुख हेही श्री रामराव शेळके, श्री पी.व्ही.कुलकर्णी यांचेप्रमाणे अर्हताप्राप्त असून रुपये ५०००-८००० या वेतनश्रेणीत काम करीत असल्याने त्यांनाही अधिक्षक पदावर पदोन्नती देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१८ **श्री राजेंद्र बाबुराव कोहकडे,सहाय्यक शिक्षक क्रिडा यांना उल्लेखनीय कामगिरीबाबत पाच वेतनवाढी देणेबाबत.**

श्री. राजेंद्र बाबुराव कोहोकडे, सहाय्यक शिक्षक (क्रिडा) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, यांनी दि.३१/१२/२००८ रोजी अर्ज सादर करुन त्यात "मी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिरडी या विभागाकडे सहाय्यक शिक्षक (क्रिडा) या पदावर काम करीत असून उल्लेखनीय व नेत्रदिपक कामगिरी बजावलेली असून शाळलेला अनेक पुरस्कार प्राप्त करुन दिलेले आहेत. तसेच शाळेचे नांव राज्य स्तरिय, राष्ट्रीय (अखिल भारतीय ) पातळीवर गाजविलेले आहे. राज्य/ राष्ट्रीय पातळीवर मुलांची निवड करण्यात आलेली आहे. त्यामुळे शाळेतील खेळाडूंना क्रिडा नैपुण्य मिळविल्यामुळे महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे यांनी इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या मुलांना ४.५ % गुण दिलेले असून त्या मुलांना वैद्यकिय व अभियांत्रिकी विभागाकडे प्रवेश मिळालेले असून सध्या ते शिक्षण घेत आहेत. सदरच्या केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल पाच वेतनवाढी मिळाव्यात "अशी विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर "श्री. कोहोकडे यांनी वर नमूद केलेले कार्य हे शाळा व संस्थानच्या दृष्टीने गौरवास्पद आहे. त्यांच्या अर्जावर सहानुभूतीपूर्वक विचार होऊन वेतनवाढ देण्यात यावी " असे अभिप्राय दिले आहेत. सदर "अर्ज सभेपुढे ठेवणे "असे मा.अध्यक्ष साो यांचे आदेश वजा अभिप्राय आहेत.
तसेच मा.उपाध्यक्ष साो तसेच मा.विश्वस्त श्री अशोक खांबेकर साो यांनी शिफारस पत्र दिलेली असून त्यात " श्री. कोहोकडे यांनी क्रिडा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थान विश्वस्त मंडळाने त्यांचा वेळोवळी सत्कार केलेला आहे. त्यांनी केलेल्या केलेल्या पाच वेतनवाढीच्या अर्जाचा सहानुभूती पूर्वक विचार करुन मा.विश्वस्त मंडळाच्या सभेपुढे सदर विषय ठेवून त्यावर पाच वेतनवाढी देणेबाबत कार्यवाही करावी "असे नमूद केले आहे.

शासकिय अधिकारी /कर्मचारी यांना आगाऊ वेतनवाढ मंजूर करणेबाबत शासन परिपत्रक क्रः आवेवा-००६/प्र.क्र.२०८/०६/आठ मंत्रालय,मुंबई दि.१४/१२/२००६.

०२ (अ) आगाऊ वेतनवाढ /वेतनवाढी मंजूर करतांना शासकिय कर्मचा-यांची आगाऊ वेतनवाढीच्या दिनांकास संबधीत पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा झालेली असणे आवश्यक आहे.

ब) (०१) दोन आगाऊ वार्षीक वेतनवाढी ज्या वर्षात देण्याचा प्रस्ताव आहे त्या वर्षाच्या अलिकडचे पाचही वर्षाचे गोपनीय अहवाल "अत्युत्कृष्ठ " (अ+) असावेत किंवा पाच पैकी किमान चार वर्षाचे "अत्युत्कृष्ठ " (अ+) व उर्वरित एक वर्षाचा "निश्चित चांगला " (ब+) पेक्षा कमी दर्जाचा नसावा.

(०२) एक आगाऊ वेतनवाढ ज्या वर्षाचा देण्याचा प्रस्ताव आहे त्या वर्षाच्या अलिकडच्या पाच वर्षाच्या गोपनीय अहवालापैकी किमान तीन वर्षाचे "अत्युत्कृष्ठ " (अ+) आणि दोन वर्षाचे "निश्चित चांगला " (ब+)पेक्षा कमी दर्जाचे नसावेत. असा आहे.

श्री. कोहोकडे यांचे गोपनीय अहवालाबाबत वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

| सन-२००३-२००४ | सन-२००४-२००५ | सन-२००५-२००६ | सन-२००६-२००७ | सन-२००७-२००८ |
|---|---|---|---|---|
| उत्कृष्ट (अ) | उत्कृष्ट (अ) | उत्कृष्ट (अ) | "अत्युत्कृष्ठ" अ+) | उत्कृष्ट (अ) |

उपरोक्त शासन निर्णयातील ब (०१) प्रमाणे विचार केल्यास फक्त एक वर्षाचे गोपनीय अहवाल "अत्युत्कृष्ठ" (अ+) असा आहे. व उर्वरित ०४ वर्षांचे गोपनीय अहवाल "उत्कृष्ट" (अ) असे आहेत.

उपरोक्त शासन निर्णयातील निकषाप्रमाणे विचार केल्यास श्री कोहोकडे हे सदर आगाऊ वेतनवाढी देण्यास पात्र ठरत नाहीत. तथापी प्राचार्या इंग्लिश मिडीयम स्कूल यांनी केलेली शिफारस व

कायद्यातील उपरोक्त तरतूद विचारात घेता विशेष बाब म्हणून एक आगाऊ वेतनवाढ अगर दोन आगाऊ वेतनवाढी देणेबाबत विचार होणेस विनंती.

यापूर्वी श्री. रामनाथ ज्ञानदेव चौधरी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे त्यांचेकडे प्राचार्य या पदाचा अतिरिक्त कार्यभार असतांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल त्यांना रु.६५००-२००-१०५०० या वेतनश्रेणी मधील रु.२००/- च्या एकूण ०५ वार्षीक पगार वाढी त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार देण्यात आल्या आहेत.

तरी श्री. कोहोकडे, सहाय्यक शिक्षक (क्रिडा) यांना दोन वेतनवाढी देण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

१९ **<u>सहाय्यक शिक्षक (माध्यमिक) पदाची वेतनश्रेणी मिळणे बाबत श्रीमती आशा साहेबराव राशिनकर यांचे अर्जाबाबत.</u>**

श्रीमती आशा साहेबराव राशिनकर, वर्ग-०४ ( कंत्राटी कर्मचारी ) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिरडी यांनी दि.२७/१२/२००८ रोजी अर्ज करुन त्यात "मी संस्थान चे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिरडी कडे, माहे डिसेंबर-१९९९ पासून कंत्राटी अध्यापक म्हणून काम करत होते. मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सन-९९ सालापासून कंत्राटी पध्दतीने अंखड सेवेत असलेल्या वर्ग-०४ च्या कंत्राटी कर्मचा-यांना दि.०३ डिसेंबर-२००७ पासून रु.२०००/- या एकत्रित मानधनावर सेवेत घेण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे मी सन- डिसेंबर-२००७ पासून श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम विभागाकडे इयत्ता ०६ वी ते इयत्ता १० वी या वर्गाच्या विद्यार्थ्यांना मराठी या विषयाचे अध्यापन करीत आहे. सदर श्री साईबाबा इग्लिश मिडीयम स्कूल कडे मराठी हा विषय शिकविला जात असून त्या विषयाच्या अध्यापनासाठी शिक्षकाची नेमणूक केलेली नसून अद्याप सदर पद रिक्त आहे. तरी सदर पदावर माझी नेमणूक करुन मला त्या पदाची वेतनश्रेणी मिळावी "अशी विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर मा. अध्यक्ष साो यांनी श्रीमती राशिनकर यांचा अर्ज "मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या पुढे ठेवणे" असे अभिप्राय दिलेले आहेत.

सदर श्रीमती राशिनकर, यांचेबाबत प्राचार्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले असता "श्रीमती राशिनकर हया सन २००१ पासून तर आतापर्यंत मराठी विषयाचे अध्यापन करीत असून त्यांचे सन-२००१ ते सन-२००७ अखेर निकाल १०० % लागले आहेत. त्यांनी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेतही दैदिप्यमान यश संपादन केलेले आहे. त्यांचा अनुभव, शैक्षणिक पात्रता काम पहाता मराठी सहाय्यक शिक्षिका (मराठी ) माध्यमिक या रिक्त हे पद रिक्त असून सदर पदावर त्यांची नेमणूक करावी" असे अभिप्राय दिले आहेत.

सन-१९९९ साली श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल कडे सहाय्यक शिक्षक पदांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. त्याच वेळी मुलाखती घेण्यात येऊन त्यावेळी श्रीमती अक्षता अंनत गुणे, यांची सहाय्यक शिक्षक या पदावर रु.५५००-९००० या वेतनश्रेणी मध्ये रु. ५५००/- मूळ वेतनावर नेमणूक करण्यात आलेली असून सध्या त्यांचे सध्या मूळवेतन रु. ६९००/- इतके आहे.

श्रीमती राशिनकर यांची सन-१९९९ साली सहाय्यक शिक्षक ( माध्यमिक ) मराठी या विषयासाठी नेमणूक केली असती तर त्यांनाही रु.५५००-९००० द्यावी लागली असती. व सध्या त्यांचे मूळवेतन रु. ६९००/- इतके राहीले असते.

तरी श्रीमती राशिनकर, यांचे अर्जातील विनंती, प्राचार्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल यांचे श्रीमती राशिनकर यांचे बाबतचे चांगले अभिप्राय व मा.अध्यक्ष महोदय यांचे अभिप्राय विचारात घेऊन श्रीमती राशिनकर यांना श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल माध्यमिक विभागाकडे असलेल्या सहाय्यक शिक्षक ( मराठी ) या पदावर माहे जुलै १९९९ पासून रु.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणी मध्ये रु.५५००/- या मूळ वेतनावर नेमणूक देण्यात येऊन दर वर्षीची वार्षीक पगार वाढ रु.१७५ अशा एकूण ०८ वार्षीक पगार वाढी मंजूर करुन त्यांना रु.६९००/- इतके मूळ वेतन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती आशा साहेबराव राशिनकर, यांना सहाय्यक शिक्षक या पदावर रु.५५००-१७५-९००० वेतनश्रेणीत नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

२० **<u>श्री.किशोर गवळी, ज्यु.मॅनेजर, इ.डी.पी. श्री साईबाबा हॉस्पिटल यांना मॅनेजर, इ.डी.पी. या पदावर नियुक्तीबाबत.</u>**

श्री. किशोर साहेबराव गवळी यांची संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ज्यु.ई.डी.पी. मॅनेजर या पदावर प्रथम एक वर्ष कालावधीसाठी दरमहा रु. ७०००/- (रु. सात हजार ) मात्र एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.०६/१२/२००७ रोजी नेमणूकीच्या पदावर हजर झालेले आहेत.

त्यांनी दि.१५/०६/२००७ रोजी अर्ज करुन त्यात " मी. किशोर साहेबराव गवळी, ज्यु.ई.डी.पी. मॅनेजर म्हणून श्री साईबाबा हॉस्पीटल शिरडी येथे कार्यरत आहे. मी संस्थानच्या दि.२०/०३/२००७ रोजीच्या

जाहीरातीनुसार जाहीरातीतील क्र. ३३ मधील अ. नं. ०३ नुसार ई.डी.पी. मॅनेजर या पदासाठी मुलाखत दिलेली होती. व या पदासाठी शैक्षणिक पात्रता बी.ई.(इलेक्ट्रॉनिक्स) होती. परंतु मला दि. ०५/१२/२००६ नुसार ज्यु.ई.डी.पी. मॅनेजर पदावर नियुक्ती दिलेली आहे.

वास्तविक माझी नियुक्ती सिनियर ई.डी.पी. मॅनेजर या पदावर व्हावी अशी अपेक्षा होती. मी सध्या संपुर्ण श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील ई.डी.पी. मॅनेजमेंन्ट करण्याचे तांत्रिक करीत असून थोडक्यात हे काम सिनियर ई.डी.पी. मॅनेजर, इन्चार्ज तथा सिस्टीम ॲडमिनीस्ट्रेटर, इन्चार्ज तथा डाटा बेस ॲडमिनीस्ट्रेटर नेटवर्क ॲडमिनीस्ट्रेटर या चारही पदाच्या जबाबदा-या पार पाडत आहे. हे काम पुर्ण करण्याची तांत्रिक जबाबदारी मी उचलली असून ती पूर्ण करण्याचा प्रयत्न मी रात्री अपरात्री थाबून वेळेचे बंधन न पाळता चांगल्या प्रकारे करीत आहे.

सध्या हॉस्पीटलचे सर्व डिपार्टमेंन्टला सॉफ्टवेरची Hospital Management Software ( Systems which includes both the Hospital with complete MIS ) ऑपरेटींग प्रशिक्षण देत आहे. तरी आजवर केलेल्या कामाचा अनुभव व माझी शैक्षणिक पात्रता लक्षात घेता माझी सिनिय ई.डी.पी. मॅनेजर या पदावर पदोन्नती मिळावी "असे नमूद केले आहे.

उपरोक्त श्री.गवळी यांचे विनंती अर्जाबाबत वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल,शिरडी यांचेकडून अभिप्राय मागविले असता त्यात -" शासनाकडून मान्यताप्राप्त झालेल्या आकृतीबंधात सिनियर ई.डी.पी. मॅनेजर या पदासाठी शैक्षणिक अर्हता बी.ई (इलेक्ट्रॉनिक्स/कॉम्प्युटर ) अशी दर्शविलेली असून त्याकरीता वेतनश्रेणी रु. ६५००-२००-१०५०० इतकी दर्शविलेली आहे. सदर पदाचे अखत्यारित सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, व्यवस्थापन व देखरेख, नेटवर्कीग व देखरेख, सर्व्हर व्यवस्थापन व देखरेख, इंटरनेट, आर एफ कनेक्टीव्हीटी व ऑप्टीकल फायबर केबलचे व्यवस्थापन व देखरेख, हार्डवेअर व्यवस्थापन व देखरेख, हॉस्पीटल अंतर्गत दूरध्वनी प्रणालीचे व्यवस्थापन व देखरेख, याबाबत नियोजन करणे कनिष्ठाकडून करुन घेणे सुपरव्हिंजन करणे तसेच संगणकिय प्रणालीशी संबंधीत येणारी सर्व प्रकारची कामे व संगणकिय क्षेत्राशी निगडीत कामे करणे या कामाचा समावेश होतो.

श्री साईबाबा हॉस्पीटल विभागाकडील संगणकीय कामकाजाबाबतची सद्यस्थिती नुसार कळविले असून त्यात - "श्री साईबाबा हॉस्पीटल कडे संबंधीत सॉफ्टवेअर विकत घेतले आहे. हॉस्पीटलमधील नेटवर्कींग लॅनद्वारे पूर्ण करणेत आलेले आहे. तर श्री साईनाथ रुग्णालयाचे करणे बाकी आहे.

सर्व्हर मॅनेजमेंन्ट सध्या प्राथमिक स्वरुपात आहे ते पूर्णपणे कार्यान्वीत झालेले नाही. डाटा फिडींग ग्रुप पॉलीसी कोंडींग इ.कामे सुरु आहेत. सध्या इन्टरनेट फक्त एकाच संगणकावर मोबाईलद्वारे कार्यान्वीत करण्यात आले असून पूर्ण हॉस्पीटलमध्ये सर्व कार्यान्वीत करण्यात आलेले नाही. परंतु थोडयाच दिवसात सॉफ्टवेअर ऑनलाईन झाल्यानंतर इंटरनेट सर्व संबंधीतांना उपलब्ध करुन देता येईल. सध्या हार्डवेअर मेंन्टेनन्सची कामे आयबीएम कंपनीकडून नियुक्त करणेत आलेले कर्मचारी पहात आहेत. संगणकीकरणाचे काम सध्या पुर्णत्वास आलेले आहे" असे नमूद केले आहे.

श्री. गवळी यांना ग्लोबल कॉम्प्युटर नाशिक येथे प्रोग्रामिंग लेक्चरर या कामाचा दोन वर्षाचा अनुभव असून श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये ज्यु.ई.डी.पी. मॅनेजर या पदावर ०९ महिन्यांपासून कार्यरत असून रुग्णालयीन कामकाजाचा अनुभव ते घेत आहेत. त्यांची मॅनेजर ई.डी.पी. (सिनियर) या पदासाठी मुलाखत

झालेली आहे. परंतु त्यांची ज्यु.ई.डी.पी. मॅनेजर या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. ते पदोन्नतीस पात्र आहेत. असे अभिप्राय वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिलेले असून त्यावर प्रशासकिय अधिकारी श्री साईबाबा हॉस्पीटल यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी आहे.

सदर श्री. गवळी यांचे बाबत मा.आ.शंकररावजी कोल्हे सो. उपाध्यक्ष सो यांनी दि.३०/११/२००७ रोजी शिफारस पत्र देऊन त्यात -" श्री. किशोर गवळी हे सध्या आपले संस्थानच्या श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये ज्यु.ई.डी.पी. मॅनेजर म्हणुन दि.०५ डिसेंबर २००६ पासून कार्यरत आहेत. त्यांनी आपले संस्थानच्या जाहीरातीनुसार सिनियर मॅनेजर ई.डी.पी. या पदासाठी मुलाखत दिलेली आहे. परन्तु संस्थानने त्यांना सिनियर मॅनेजर ई.डी.पी. या पदावर नियुक्ती देण्याऐवजी त्यांची नेमणूक ज्यु.मॅनेजर ई.डी.पी. या पदावर नियुक्ती केलेली आहे.

श्री. गवळी यांची शैक्षणिक पात्रता पाहून व त्यांची झालेली मुलाखत या संदर्भात आपण सहानूभूतीने विचार करुन त्यांना सिनियर मॅनेजर ई.डी.पी. या पदाची नेमणूक ऑर्डर देण्यासाठी आपण त्यांचा विषय पुढे होणा-या व्यवस्थापन समितीच्या मिटींगपुढे ठेऊन त्यास मंजूरी घेऊन श्री. गवळी यांना तातडीने सिनियर मॅनेजर ई.डी.पी. पदाची नेमणूक ऑर्डर देण्याची कार्यवाही राबवावी. या संदर्भात मा. वैद्यकिय संचालक यांनी श्री. गवळी याच्या दि.१३/१०/२००७ रोजीच्या अर्जावर योग्य तो अभिप्राय दिलेला आहे. " असे नमूद केले आहे.

तरी श्री. किशोर गवळी यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव व सिनियर ई.डी.पी. मॅनेजर पदासाठी झालेली मुलाखत त्यांच्या अर्जातील विनंती व त्यांचे बाबत वैद्यकिय संचालक व संबंधीत प्रशासकिय

अधिकारी यांनी दिलेले अभिप्राय व मा.उपाध्यक्ष महोदय यांनी उपरोक्त संदर्भीत पत्रान्वये केलेली शिफारस या सर्व बाबी विचारात घेऊन श्री. किशोर गवळी यांची सिनियर ई.डी.पी.मॅनेजर या पदावर रु.६५००-२००-१०५०० या वेतनश्रेणीत नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो तूर्त स्थगित करण्यात आला. याबाबत सविस्तर माहिती सादर करावी असे,ठरले.

तसेच संस्थान व हॉस्पिटल या दोन्ही संगणक विभागाचे एकत्रित कार्यवाहीसाठी सविस्तर प्रस्ताव सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

२१ **श्री.रघुनाथ अनंत पवार, मुंबई यांची संस्थानमध्ये संरक्षण विभागात कंत्राटी सल्लागार म्हणून नेमणूकीबाबत.**

श्री रघुनाथ अनंत पवार, दादर पोलीस वसाहत बि.न.५/१९ भवानी शंकर रोड,दादर(पश्चिम)मुंबई यांनी दिनांक २४.०९.२००८ चे विनंती अर्जामध्ये मी "साईभक्त " असुन आपल्या अधिकाराखाली शिरडी साई संस्थान मध्ये "मुख्य सुरक्षा अधिकारी " या पदाची रिक्त जागा असल्याचे समजते.मी त्या पदासाठी विनंती अर्ज करु इच्छित आहे.

माझी महाराष्ट्र पोलीस दलात एकुण ३७ वर्षे सेवा झाली असुन पोलीस सेवेतुन मी दिनांक ३१.०५.२००८ रोजी सेवानिवृत्त झालो आहे,मी शारीरीक दृष्टया सशक्त आहे.

मी बृहन्मुंबई येथे विविध पोलीस स्टेशन, क्राईम ब्रँच ,सी.आय.डी.तसेच स्पेशल ब्रँच-१ इत्यादी ठिकाणी अतिशय सचोटीने व कार्यक्षमतेने निष्कलंक सेवा केली आहे.माझ्या पोलीस दलातील सेवेत मला एकुण शासकिय व नागरिकसेवा कडून एकुण १८३ बक्षीसे , प्रशस्तीपत्रके मिळाली आहेत.

शिरडी साईबाबा मंदिर हे अतिरेक्याच्या हिटलिस्टवर असुन महाराष्ट्रातील इतर मंदिरे व मर्मस्थळे सुध्दा अतिरेक्याच्या हिटलिस्टवर आहेत.साईबाबा मंदिराची सुरक्षा राखणेकामी माझी जर नियुक्ती मुख्य सुरक्षा अधिकारी म्हणुन केली तर माझ्या पोलीस दलातील सेवेच्या अनुभवाचा निश्चितच फायदा होईल.मी मुंबई मधील दादर पोलीस ठाणे येथे नेमणुकीस असतांना तेथील सिध्दीविनायक मंदिर हे अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर असलेले देवस्थान असल्याने येथे उत्कृष्ठ रितीने सुरक्षा व्यवस्था आराखडा तयार करुन योजना यशस्वीपणे राबविली होती.तसेच मुंबादेवी ,महालक्ष्मी लक्ष्मीनारायण मंदिर ,दादर येथील सुरक्षा व्यवस्थेचा मला चांगला अनुभव आहे.

तरी माझी मुख्य सुरक्षा अधिकारी म्हणुन निवड झाली तर माझे वर नमुद अनुभवाचा शिरडी साईबाबा मंदिर सुरक्षिततेच्या दृष्टीने निश्चितच उपयोग होईल व ते काम मी अतिशय कार्यक्षमतेने पार पाडीन अशी खात्री देतो.तरी माझी मुख्य सुरक्षा अधिकारी म्हणुन नेमणुक होणेस विनंती केलेली आहे.

दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईतील हॉटेल ताज,ओबेरॉय,सि.एस.टी.इ. विविध ठिकाणी आतंकवाद्यानी हमले केले होते त्यात शेकडो निरापराध लोकांचे बळी गेलेले आहेत. आपल्याकडे श्री साईंच्या दर्शनाकरीता येणाऱ्या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने त्यांच्या सुरक्षतेच्या दृष्टीकोनातुन आपल्या कडील सुरक्षा कर्मचारी वर्ग हा पुर्णपणे प्रशिक्षीत असने आवश्यक आहे. श्री पवार यांच्या शिक्षणाचा व पोलीस खात्यातील अनुभावाचा विचार करता ते आपलेकडील सुरक्षा कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देवू शकतील

संरक्षण विभागाचे आकृतीबंधात ४ (चार) सहसंरक्षण अधिकारी पदे असून ती रिक्त आहेत. उपरोक्त नमुद कारणासाठी व संरक्षण विभागातील कर्मचा-यांना आधुनिक प्रशिक्षण देण्यासाठी श्री पवार यांच्या अनुभवाचा उपयोग होणार आहे. तरी त्यांना प्रतीमहा रुपये ७,०००-०० (अक्षरी रुपये सात हजार मात्र)मानधनावर कॉन्ट्रक्ट बेसीसवर तात्पुरती नेमणूक देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा विभागातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणे देणेकामी श्री रघुनाथ अनंत पवार, मुंबई यांची तीन महिने कालावधीकरीता रुपये १०,०००/- एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

२२ **कु.मयुरी बाळासाहेब मेहेत्रे यांना आपले संस्थानचे हॉस्पिटलमध्ये होमिओपॅथी डॉक्टर म्हणून इंटर्नशिप ट्रेनिंग करीता संमती पत्र देणे बाबत.**

मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी आपले नावाने कु.मयुरी बाळासाहेब मेहेत्रे यांना शिफारसपत्र दिलेले असुन त्याची एक प्रत माहितीसाठी मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी, श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल यांना पाठविलेली आहे. सदरचे पत्रात असे नमुद केले आहे की, कु.मयुरी बाळासाहेब मेहेत्रे ह्या काकासाहेब म्हस्के होमियोपेथीक मेडीकल कॉलेज, नागापूर, अहमदनगर या कॉलेजमधून बीएचएमएस परिक्षा पास झाल्या आहेत व सध्या सदर कॉलेजमार्फतच एक वर्षाची इंटरशिप पूर्ण करीत आहेत, परंतु त्यांना कौटुंबिक अडचणीमुळे सध्याच्या ठिकाणी प्रॅक्टीस करणे अडचणीचे व गैरसोईचे होत आहे. तेव्हा त्यांना काही काळ (ऑगष्ट २००९ पर्यंत)

आपले साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये इंटरशिप ट्रेनिंग पूर्ण करण्यासाठी अवश्य घेण्याचे करावे, तसे संमतीपत्र देणेसाठी शिफारस केली आहे.

वैद्यकीय संचालक यांनी होमिओपॅथिक वैद्यकीय अधिकारी यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये इंटरशिप/ऑबझर्वरचे काम करण्यास परवानगी देण्याचा अधिकार नाही असे कळविलेले आहे. तसेच वैद्यकीय अधिक्षीका, श्री साईनाथ रुग्णालय यांनी सदरच्या पत्रावर पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

We get 8 intern from Virar Homoeopathy Medical College, with the sanction from Board. We may not be able to accommodate this intern without sanction.

उपरोक्त बाबींचा विचार करता कु.मेहेत्रे यांना इंटरशिप ट्रेनिंगसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

२३ **<u>अधिक्षक, वरीष्ठ लिपीक, मुकादम पदोन्नतीबाबत.</u>**

सन-२००४ चा महाराष्ट अधिनियम १४ नुसार श्री साईबाबा संस्थानचे व्यवस्थापन दि.२३/०८/२००४ पासून महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणानुसार चालते.

दि.२३/०८/२००४ रोजी अधिनियमानुसार मा.व्यवस्थापन समितीने कारभार सुरु केला तत्पुर्वीच्या स्टाफींग पॅटर्न मधील काही पदे पदोन्नती, सेवानिवृत्ती, निधन वगैरे कारणाने रिक्त झालेल्या आहेत. त्या पदांचा तपशील खालील प्रमाणे

| अ.नं. | पदनाम | वेतनश्रेणी | सध्याची रिक्त पद संख्या | प्रस्तावित पदोन्नतीमुळे रिक्त होणारी पदसंख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अधीक्षक | ५५००-१७५-९००० | ०२ | -------- | ०२ |
| ०२ | पर्यवेक्षक | ५०००-१५०-८००० | ०८ | ०२ | १० |
| ०३ | वरिष्ठ-लिपीक | ४०००-१००-६००० | ०५ | १० | १५ |
| ०४ | लिपीक-टंकलेखक | ३०५०-४५९० | १० | १५ | २५ |
| ०४ | मुकादम | २६१०-४००० | ०७ | --------- | ०७ |

सुधारित स्टाफींग पॅटर्नला मान्यता मिळणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे. तूर्त त्यापूर्वीच्या स्टाफींग पॅटर्ननुसार उपरोक्त प्रमाणे रिक्त असणा-या/ होणा-या जागा, पात्रता, सेवाजेष्ठता, आरक्षण या बाबी विचारात घेऊन पदोन्नतीने भरणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सुधारित स्टाफींग पॅटर्नला मान्यता मिळणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला असून त्याची मान्यता येईपर्यन्त तूर्त पूर्वीच्याच स्टाफींग पॅटर्ननुसार उपरोक्त प्रमाणे रिक्त असणा-या/होणा-या पदांवर सेवाजेष्ठता, काम करण्याची क्षमता, शैक्षणिक अर्हता व पात्रता कार्यकारी अधिकारी यांनी तपासून यापूर्वी ठरल्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लेखी परिक्षा घेऊन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

२४ **<u>श्री.विक्रम दामोधर पाटील, फार्माशिस्ट, श्री साईनाथ रुग्णालय यांचे सेवेबाबत.</u>**

जा.नं.एसएसएस/वशी-०१/७२०१/२००६ दि.०१-०६-२००६ अन्वये श्री.विक्रम दामोधर पाटील हे दि.०८-०६-२००६ पासून श्री साईनाथ रुग्णालयात फार्मासिस्ट म्हणून कार्यरत आहे. त्यांनी दि.१७-०४-२००८ रोजीचे अर्जान्वये दि.०१-०६-२००८ ते दि.३१-१२-२००८ या कालावधीसाठी अध्ययनासाठी विनावेतन रजा मागणी केली होती. इकडील जा.नं.एसएसएस/वशी-१/१४२९/२००८ दि.२३-०५-२००८ अन्वये सदरची रजा नियमबाहय असल्याने नामंजूर करणेत आलेबाबत त्यांना कळविणेत आलेले होते. ते त्यानंतर दि.०२-०६-२००८ पासून सतत सलग पुर्व परवानगीशिवाय गैरहजर आहेत. दरम्यानचे काळात त्यांनी पोष्टाद्वारे आजारी असल्याचे कळवून, वेळोवेळी वैद्यकिय रजेची मागणी केलेली आहे. परंतू रजेबाबत आवश्यक ती पुर्तता न केल्यामुळे त्यांची दि.१३-०८-२००८ ते दि.०६-०९-२००८ या कालावधीची रजा नामंजूर करणेत आलेली आहे. त्यांनी दि.०३-०९-२००८ रोजी दि.०८-०९-२००८ ते दि.०१-११-२००८ या कालावधीसाठी पोष्टामार्फत रजेची मागणी केलेली आहे. अशाप्रकारे ते आवश्यक ती रजेबाबत पुर्तता न करता, पोष्टामार्फत रजा मागणी करत असतात.

तुम्ही आजारी असलेस त्याबाबत माननिय जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र सदरचे पत्र मिळताच सात दिवसांचे आंत इकडील कार्यालयात सादर करावे अन्यथा तुमचे विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणेत येईल असे त्यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५९३९/२००८ दि.२९-१०-२००८ अन्वये कळविणेत आले होते. परंतु त्यांनी आवश्यक ती पुर्तता न करता पुन्हा दि.२७-१०-२००८ रोजीचे अर्जान्वये दि.०२-११-२००८ ते दि.०३-०१-२००९ या कालावधीसाठी रजा मागणी केलेली आहे.

इकडील जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१७४५९/२००८ दि.२५-११-२००८ अन्वये त्यांना कळविणेत आले की, सदरचे पत्र मिळताच सात दिवसांचे आंत त्यांनी रजा मागणीसाठी आवश्यक ती पुर्तता न केल्यास किंवा कामावर हजर न झाल्यास त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून त्यांचे नांव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करणेत येईल. त्यानंतर त्यांनी रजेबाबत आवश्यक ती पुर्तता केली नाही व ते कामावर देखील हजर झालेले नाही.उलटपक्षी त्यांनी दि.०२-०१-२००९ रोजीच्या पोस्टाव्दारे पाठविलेल्या अर्जान्वये दि.०४-०१-२००९ ते २८-०२-२००९ या कालावधीची रजा मागणी केलेली आहे.सदरच्या अर्जासोबत श्री.पाटील यांनी खाजगी मेडीकल प्रॅक्टीशनर डॉ.एम.एच.पवार,नाशिक यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडलेले आहे.

अशा प्रकारे श्री.विक्रम दामोधर पाटील हे दि.०२-०६-२००८ पासून सतत, सलग पुर्व परवानगीशिवाय कामावरून गैरहजर आहेत. ते त्यांना पाठविलेल्या पत्रांना जुमानत नाही, रजा मंजूरीसाठी आवश्यक ती पुर्तता करीत नाहीत व कामावर देखील हजर होत नाही. अशा परिस्थितीत त्यांचे नेमणूक आदेशातील अट क्र.०९ अन्वये दि.२५-११-२००८ रोजी त्यांना पाठविलेले पत्र हि एक महिन्याची नोटीस समजून त्यांचे नांव संस्थान सेवेतुन कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

२५ **<u>क्लिनिकल असि.(रेडिओलॉजी) डॉ.मंगला सोन्याबापू मुंढे, यांना इन्सेन्टीव्ह देणेबाबत.</u>**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रेडीओलॉजी विभागात नियोजित कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे एक सिनीअर रेडीओलॉजिस्ट व दोन ज्यु.रेडीओलॉजिस्ट अशी नियोजित पदे आहे. त्यांना मासिक वेतनाव्यतिरिक्त तपासण्यांच्या ५% इन्सेन्टीव्ह देण्यात येत आहे. सध्या या विभागात एक सिनीअर रेडीओलॉजिस्ट व एक क्लिनीकल असिस्टंट (रेडीओलॉजी) काम करत आहे. सिनीअर रेडीओलॉजिस्ट रजेवर गेल्यामुळे टेलीरेडीओलॉजी पध्दती सुरु करण्यात आली आहे. सिनीअर रेडीओलॉजिस्ट व काही प्रख्यात डॉक्टरांची नावे या पॅनलवर घेण्यात येऊन यांना मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार प्रती रिपोर्ट रु.२००/- इन्सेन्टीव्ह देण्यात येत आहे.

डॉ.मंगला मुंढे, क्लिनीकल असिस्टंट (रेडीओलॉजी) यांना रु.२५,०००/- प्रती महा वेतनावर दि.०८.०९.२००८ पासुन नियुक्ती आदेश देण्यात आलेला आहे. दि.२५.१०.२००८ रोजी त्यांनी वेतना व्यतिरिक्त डॉक्टर शेअर मिळणेबाबत अर्ज केला आहे. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे अनुभव असल्याचे नमुद केले आहे.

शिक्षण- DMER (Diploma in Radiology & Electrology) C.P.S.
अनुभव- Resident Radiology - 6 Months.
Tutor in Radiology- 4 Months.

सिनीअर रेडीओलॉजिस्ट या रजेवर गेल्यापासुन रेडीओलॉजी विभागातील तपासण्या टेलीरेडीओलॉजीस्ट यांना इ-मेल वर पाठवुन रिपोर्ट मिळविणे, काही सि.टी.स्कॅनचे रिपोर्ट करणे अशा प्रकारे रेडीओलॉजी विभागात डॉ. मंगला मुंढे काम करत आहे. पुर्वीच्या रेडीओलॉजिस्ट डॉ. वंदना अग्रवाल या एम.डी. रेडीओलॉजिस्ट होत्या त्यांना सुरुवातीला रु.१५,०००/- फिक्स इन्सेन्टीव्ह देण्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळाली होती. त्या अनुशंगाने डॉ. मंगला मुंढे यांना मासिक वेतनाव्यतिरीक्त रु.१०,०००/- प्रती महा देण्यास हरकत नाही, असे मत आहे.

तरी डॉ. मंगला मुंढे क्लिनीकल असिस्टंट (रेडीओलॉजी) यांना ऑक्टोबर- २००८ पासुन मासिक रु.२५,०००/- वेतनाव्यतिरीक्त प्रतीमहा रु.१०,०००/- फिक्स इन्सेन्टीव्ह देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२६ **<u>डॉ.तुपे रश्मी पराग (फिजिशियन) यांना इन्सेन्टीव्ह देणेबाबत.</u>**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नियोजित कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे चार फिजीशियन डॉक्टरांचे नियोजन करण्यात आले आहे. सध्या हॉस्पिटलमध्ये डॉ.गिरी कृष्णा हे (फिजीशियन) काम करत आहे व डॉ.तुपे रश्मी पराग यांना फिजीशियन म्हणुन रु.३०,०००/- मासिक वेतनावर १३.०९.२००८ पासुन नियुक्ती आदेश देण्यात आलेला आहे.

त्यांना पुरेसा अनुभव नसल्याने सुरुवातीला स्वतंत्र ओ.पी.डी. देण्यात आली नव्हती परंतु त्यांचे काम पाहुन दि.१३ सप्टेंबर २००८ पासुन त्यांना स्वतंत्र ओ.पी.डी. देण्यात आलेली आहे व इतर फिजीशियनप्रमाणे त्या स्वतंत्र ओ.पी.डी. व आय.पी.डी. रुग्णांची तपासणी करत आहे. दि.१५.१२.२००८ रोजी डॉ.तुपे रश्मी यांनी वेतनाव्यतिरीक्त डॉक्टर शेअर मिळणेबाबत अर्ज केला आहे. इतर फिजीशियन डॉक्टरांना ओ.पी.डी., फॉलोअप, इमरजन्सी तपासणी दराच्या ६०% व वॉर्ड प्रोसिजर तपासणी रकमेच्या ३०%, इन्सेटीव्ह म्हणून मासिक वेतनाव्यतीरीक्त देण्यात येत आहे. हॉस्पिटलमध्ये असलेलया दोन

फिजीशियन डॉक्टरांचा इन्सेन्टिव्ह मासिक वेतनाव्यतिरीक्त प्रत्येकी प्रती महा साधारणतः रु.३० ते ४५ हजारापर्यंत होत आहे.

तरी डॉ. तुपे रश्मी पराग (फिजीशियन) यांना इतर फिजीशियन डॉक्टरप्रमाणे दि.१३ ऑक्टोंबर २००८ पासुन हॉस्पिटलच्या मंजुर दरपत्रकाप्रमाणे मासिक रु.३०,०००/- वेतनाव्यतिरीक्त इन्सेटिव्ह देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२७ **श्रीसाईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात उपप्राचार्य पदावर नेमणूक करणेबाबत.**

कनिष्ठ महाविद्यालयात शासन नियमानुसार ८ वर्ग तुकडयांसाठी उपप्राचार्यांचे एक पद मंजूर होते. सन २००७-२००८ मध्ये श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात १० वर्ग तुकडया व सन २००८-०९ मध्ये १२ वर्ग तुकडया असून शासननियमानुसार उपप्राचार्याचे एक पद मंजूर होत आहे. या नुसार विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.१९.०७.२००७ रोजी सदरच्या पदावर नेमणूकी संदर्भात विनंती अर्ज केलेला आहे.

सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या आस्थापना उपसमितीच्या दि.११.०८.२००७ व दि.१८.१०.२००८ च्या सभेपुढे विचारार्थ सादर करण्यात आला. या सभेत यावर चर्चा होऊन सदरच्या पदाची मंजूरी, आवश्यकता, पदावरील नेमणूक, जाहिरात या बाबतीत मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडून पडताळणी करण्याचे ठरले.

य संदर्भात मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांनी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी एक उपप्राचार्याचे पद मंजूर केले. या पदावरील नियुक्तीसाठी दि.०५ ऑगष्ट १९९७ चा शासन निर्णय क्र. एचएससी/ १३९६/ (१२००/९६)/ उमाशि-१, मंत्रालय विस्तारभवन, मुंबई- ३२ दि.०५ ऑगस्ट १९९७ नुसार "सदरचे पद पदोन्नतीचे नाही. या पदासाठी स्वतंत्र वेतनश्रेणी नाही. या पदासाठी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचीच (रु.७२२५-२२५-११०५०)वेतनश्रेणी आहे. या पदासाठी दरमहा फक्त रु.२००/- विशेष वेतन (भत्ता) मान्य आहे. या पदावरील शिक्षकास कार्यभारातून १० घडयाळी तास सुट मान्य आहे. या पदाकरीता कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकाची, कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील नियुक्तीच्या दिनांकापासून त्या त्या कनिष्ठ महाविद्यालयातील सेवाजेष्ठता आणि गुणवत्ता विचारात घेऊन जेष्ठतम शिक्षकाची उपप्राचार्यपदी नियुक्ती करण्यात येते. "

विकास महादेव शिवगजे (M.Sc (Physics, First Class) M.Ed), सहाय्यक शिक्षक, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी हे दि.०१.०९.१९९३ पासून संस्थानच्या सेवेत आहे. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या रु.७२२५-२२५-११०५० या वेतनश्रेणीतील सेवाजेष्ठता यादीत श्री.शिवगजे हे क्र.१ वर (जेष्ठतम, Senior Most) असून त्यांचेकडे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता व गुणवत्ता आहे. दि.१६ जून २००८ पासून कनिष्ठ महाविद्यालयाचे जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीत स्थलांतर झाले आहे. या ठिकाणचे कनिष्ठ महाविद्यालयाचे दैनंदिन प्रशासन व नियंत्रणाचे काम श्री.शिवगजे यांचेकडे जा.नं.एसएसएस- वशी-०१/ १८९२/ २००८ दि.०४.०७.२००८ अन्वये देण्यात आलेले असून त्यांना या अतिरिक्त कार्यभारासाठी शासन नियमाप्रमाणे दरमहा रु.२००/- विशेष वेतन देण्यात येत आहे.

मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडील पद मंजूरी पत्र आणि दि.०५.०८.१९९७ च्या शासन निर्णयानुसार, श्री. शिवगजे यांचे दरमहा रु.२००/- विशेष वेतन पुढे चालू ठेवून त्यांची श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदावर नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात यावा, अशी या शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

२८ **श्री.निवृत्ती माधव कांगुणे, यांना मुदतवाढ देणेबाबत.**

श्री निवृत्ती माधव कांगोणे, यांची जा.नं.एसएसएस वशी ०१/४६८/२००७ दि.०९/०१/२००७ अन्वये मदतनिस (वर्ग ४)या पदावर प्रथम सहा महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.३०००/- एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.११/०१/२००७ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

उपरोक्त सहा महिन्याचा कंत्राटी पध्दतीने नेमणूकीचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने वेळोवेळी त्यांना मुदतवाढ व मानधनात वाढ देण्यात आलेली असून त्यांना जा.नं. एसएसएस वशी ०१/१८०६/२००८ दि.२३/०६/२००८ अन्वये दि.११/०१/२००८ पासून पुढे एक वर्ष देण्यात आलेल्या मुदतवाढीचा कालावधी दि.१०/०१/२००९ अखेर संपुष्ठात आलेला आहे.

श्री कांगोणे यांनी यांनी दि.१५/०१/२००९ रोजी अर्ज सादर करुन त्यात "मी आपल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मध्ये प्रकाशने विभागात मदतनीस (वर्ग-४) प्रत्यक्ष काम मा.अध्यक्ष साहेब यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम करीत आहे. माझी मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली असून त्याची मुदत दि. १० जानेवारी २००९ रोजी संपलेली आहे. तरी आपणास विनंती कि माझी पुन्हा मुदतवाढ करण्यात यावी . " अशी विनंती केलेली आहे.

श्री निवृत्ती कांगोणे , मदतनीस (वर्ग ४) प्रत्यक्ष काम मा.अध्यक्ष सो यांचे स्वीय सहाय्यक यांची मुदतवाढ दि.१०/०१/२००९ रोजी संपत असल्याने त्यांना दिनांक १०.०१.२००९ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

२९ **कार्यक्रमासाठी साईनगर मैदान मिळणेबाबत.**

अध्यक्ष, साईसंगम प्रतिष्ठाण, शिर्डी यांनी सालाबादप्रमाणे शनिवार दि.३१/०१/२००९ रोजी सायंकाळी ४.०० ते रात्रौ ११.०० पर्यंत श्री मनहरजी उधास(साई भजन गायक) यांचा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून सदर कार्यक्रमासाठी साईनगरचे मैदान मिळावे, अशी विनंती केलेली आहे.

यापुर्वी मागीलवर्षी शिलधी प्रतिष्ठान, शिर्डी यांना नविन वर्षाचे प्रारंभ दिनी नाटक सादर करणेस साईनगर मैदान दिलेले होते. तद्नंतर दि.२४/०५/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४७९ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी गांवातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परिसरात आकार घेऊन मोकळे मैदान द्यावे व विजपूरवठा करणेत यावा असे ठरलेले आहे. त्यानुसार संस्थानमार्फत शिबीर, नाटक इ. सादर करणेस साईनगरचे मैदान देत आलेलो आहे. साईनगरचे मैदानाजवळ कर्मचा-यांची वस्ती, रुग्णालय, शाळा इ. असलेने अशाप्रकारच्या कार्यक्रमामुळे ध्वनीप्रदुषण होऊन तेथील कर्मचा-यांना, पेशंटना, विद्यार्थ्यांना त्रास होणेची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच दि.१८/१०/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं.४८ व निर्णय क्र.८०५ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन येथून पूढे साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देण्यात येऊ नये, असे ठरलेले असल्याने अध्यक्ष, साईसंगम प्रतिष्ठाण, शिर्डी यांना शनिवार दि.३१/०१/२००९ रोजी सायंकाळी ४.०० ते रात्रौ ११.०० पर्यंत श्री मनहरजी उधास (साई भजन गायक) यांचा भजनाचा कार्यक्रम सादर करणेसाठी साईनगर मैदान देण्यात येऊ नये तसेच येथूनपुढे संबंधितांना त्वरीत नकार कळविणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

३० **चावडी शताब्दी कलाकार कार्यक्रमाबाबत.**

मा.श्री.जयंतराव ससाणे, अध्यक्ष, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली दि.३०/१२/२००८ रोजी लेंडीबाग येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेत मा.श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सर्वश्री पी.पी.देशपांडे, आर.एस.साबळे, बी.डी.साबळे-सर्व प्रशासकीय अधिकारी, मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी, सुधांशु लोकेगांवकर, संगीत व कला मार्गदर्शक तसेच प्रमोद मेढी, पुजारी मंदीर विभाग हे उपस्थित होते.

दि.१०/१२/२००८ रोजी चावडी भजन पूजन अर्चन शताब्दी महोत्सवास सुरुवात झाली असून सन २००९ या सालात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत संपूर्ण भारतातील विविध शहरांमध्ये बाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार करण्याच्यादृष्टीने बाबांच्या चांदीच्या पादुकां दर्शन सोहळा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले आहे. त्यात कार्यक्रमाचे ठिकाणी खालीलप्रमाणे दैनंदिन कार्यक्रम करणेचा आहे.

०१) सकाळी ०७.०० वा. - बाबांच्या चांदीच्या पादुकांवर सामुदायिक अभिषेक पुजा व आरती.
०२) सकाळी ०८.०० वा. - स्तवनमंजिरी व श्री साईचरित्राचे ३७ व्या अध्यायाचे सामुदायिक वाचन तद्नंतर प्रसाद वाटप.
०३) दुपारी १२.०० वा. - माध्यान्ह आरती व नैवेद्य.
०४) सायं. ०५.०० ते ८.०० - साई भजन संध्या.

साई भजन संध्येसाठी प्रसिध्द पार्श्वगायक श्री मनहर उधास, मुंबई , पार्श्वगायिका श्रीमती अनुपमा देशपांडे, मुंबई यांना निमंत्रित करण्यात यावे, त्यांचे मानधन, साथीदार इ.बाबत श्री सुधांशु यांनी त्यांचेशी संपर्क साधुन ठरवावे व तसा अहवाल सादर करावा. तसेच संस्थानमार्फत भजन संध्येसाठी श्री प्रमोद मेढी, पुजारी, श्री सुधांशु लोकेगांवकर, संगीतकार, श्री धनंजय मराठे व श्री भरत विसपुते हे साथीदार म्हणून सहभागी होतील, असे ठरले होते.

त्यानुसार श्री सुधांशु हे दि.०३/०१/२००९ रोजी मुंबई येथे गेले होते व त्यांनी संबंधीतांशी चर्चा केली. श्री मनहर उधास यांचे ७/८ कलाकारांसह मानधन रु. २,००,०००/- तर अनुपमा देशपांडे यांचे रु. ५०,०००/- तसेच श्री सुधीर दळवी यांचे रु.५०,०००/- + प्रवासखर्च व निवास इ.प्रमाणे घेतात तथापि संबधीतांशी केलेल्या चर्चेअंती संस्थानसाठी म्हणून श्री मनहर उधास यांचे स्वतःचे मानधन रु. ५०,०००/- व वादक साथीदार यांना रु. ७५,०००/- व श्रीमती अनुपमा देशपांडे यांना रु. २५,०००/- व श्री सुधीर दळवी, यांना निवेदक म्हणून रु. २५,०००/- इतके मानधन घेणेस संमती दिली आहे. कलाकारांचे मानधन रु. १,७५,०००/- मात्र अधिक कलाकारांचे प्रवासभाडे(३-Business Class Return Ticket & ९-Economy Class Return Ticket व संस्थान कर्मचारी कार, रेल्वे किंवा बस) , निवास इ. अंदाजे रु. २,२५,०००/- मात्र तसेच मा. विश्वस्त, यांचे प्रवासखर्च, भोजन, निवास इ. संस्थानची प्रकाशने उदा.साईचरित्र, सी.डी. इ. व प्रसाद म्हणून लाडू इ. साठी प्रवास, वहातुक खर्च रु. २,००,०००/- असे एका कार्यक्रमासाठी अंदाजे एकूण रु. ६,००,०००/- खर्च अपेक्षीत आहे. प्रवासाचे अंतर जास्त असलेस प्रवासभाड्याचा खर्च वाढण्याची शक्यता आहे.

सदर कार्यक्रमासाठी संस्थान स्टाफ पुढीलप्रमाणे-०१) मंदिर विभाग-१ पुजारी, २ चोपदार/मदतनीस, ०२) प्रकाशने विभागः- १ लिपीक, १ शिपाई,(पुस्तक विक्री) ०३) कँटीन विभागः- (लाडु विक्री) २ मदतनीस, ०४) लेखाशाखा- १ लिपीक, १ शिपाई , (देणगी) तसेच कार्यक्रमाचे व्यवस्थापन-सर्वश्री ०१) बलभीम जोशी ०२) संजय कुंभार, ०३) दिलीप बकरे, ०४) एन.के.कुलकर्णी. यापैकी २ असे उपरोक्त दर्शविलेप्रमाणे अंदाजे १५ पर्यंत कर्मचारी प्रत्येक ठिकाणी नेणे आवश्यक आहे.

उपरोक्त गायकांचे कार्यक्रम भारतामध्ये अनेक ठिकाणी सादर करावयाचे असून प्रत्येक ठिकाणी उपरोक्तप्रमाणे संच न्यावयाचा आहे. तत्पुर्वी प्रत्येक ठिकाणी जाऊन तेथील स्थानिक भक्तांची भेट घेऊन तारीख, ठिकाण इ.बाबत निश्चिती करणेकामी काही मा.विश्वस्त व कर्मचारी यांनी जाणे आवश्यक आहे. प्रत्येक ठिकाणची तारीख, ठिकाण इ.निश्चित झालेनंतर उपरोक्त दर्शविलेल्या कलाकारांशी संपर्क साधून ते त्यावेळी उपलब्ध आहेत का याबाबत खात्री करावी लागेल. तद्नंतर संबंधीत ठिकाणी कार्यक्रमाबाबतची प्रसिध्दी स्थानिक वर्तमानपत्रातून व तेथील केबलधारकांकडून करावी लागेल.

तरी उपरोक्तप्रमाणे कलाकारांचा संच भारतातील महत्वाचे ठिकाणी तारखा निश्चिती करुन घेऊन जाणेस, त्या त्या ठिकाणी योग्य ती व्यवस्था करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजीत रक्कम रु. १,००,००,०००/- (रु. एक कोटी मात्र) चे खर्चास तत्वतः मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

याच वेळी सदरहू कार्यक्रमास ज्या कर्मचाऱ्यांना न्यावयाचे आहे त्या कर्मचाऱ्यांची नांवे मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी निश्चित करावी, अशी शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी५/अधिक्षक,मंदिर विभाग)

**३१. <u>चावडी शताब्दी कलाकार कार्यक्रमाबाबत.</u>**

दि.१०/१२/२००८ रोजी चावडी भजन पूजन अर्चन शताब्दी महोत्सवास सुरुवात झाली असून सन २००९ या सालात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत संपूर्ण भारतातील विविध शहरांमध्ये बाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार करण्याच्यादृष्टीने बाबांच्या चांदीच्या पादुकां दर्शन सोहळा तसेच प्रसिध्द गायक/गायिका व संस्थान कलाकार यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरले आहे.

त्यानुसार विविध शहरांमध्ये त्याठिकाणच्या इच्छुक साईभक्तांसमोर सदरची संकल्पना मांडण्यात आली होती. त्या अनुषंगाने सध्या चार ठिकाणचे साईभक्तांनी सदर बाबतीत संपर्क व पत्रव्यवहार केलेला असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | भक्ताचे नांव व पत्ता | कार्यक्रमाची तारीख |
|---|---|---|
| ०१. | डॉ.नविन गुप्ता, साईकृपा क्लिनीक, मेन रोड, रायपूर मो.नं.०९३०१०१६३१०/०९४२५२०९०१० | दि. ०२/०२/२००९ |
| ०२. | श्री. आनंद बिहारी यादव, एम.डी, अथर्व डिस्टीलरीस प्रा.लि. १८, चांद गंज, चंद्रशेखर पार्क जवळ, अलीगनी, लखनौ-२२६०२४, | दि. ०१/०३/२००९ |
| ०३. | श्री अशोक जयस्वाल, एम.डी. एमपीए फायनान्सीयल सर्व्हीसेस् लि. ३७, शेक्सपेअर सारानी, सुट-३, पहिला माळा, कोलकत्ता-७०० ०१७ | दि. ०८/०३/२००९ |
| ०४. | श्री पार्सेकर, व रवी नायडू, गोवा | दि.२२/०२/२००९ |

उपरोक्त साईभक्तांनी प्रत्यक्ष तसेच पत्राद्वारे आपली इच्छा व्यक्त केलेली असून ते सदर कार्यक्रमासाठी येणारा कलाकार खर्चासह सर्व खर्च करणेस तयार आहेत, ते संस्थानच्या पत्राची वाट पहात आहेत.

तरी उपरोक्त दर्शविलेल्या तारखांनुसार त्या त्या ठिकाणी बाबांच्या चांदीच्या पादुकां दर्शन सोहळा तसेच प्रसिध्द गायक/गायिका व संस्थान कलाकार यांचा साईभजन संध्या कार्यक्रम करणेबाबत व संबंधीतांना त्यानुसार कळविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- प्रशासन शाखा- वशी०५/ अधिक्षक, मंदिर विभाग)

**३२ <u>हनुमान मंदिर व शिर्डी गांवचे वेशीचे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.</u>**

**अ)** शिर्डी येथिल हनुमान मंदिर हे पुरातन (श्री साईबाबांचे हयातीपासून) असून या मंदिराचे बांधकाम हे लाकडी खांब,लाकडी पट्या, व विट माती यापासून बांधण्यात आलेले आहे. यास अनेक वर्ष झालेले असल्यामुळे इमारत मोडकळीस आलेले आहे. करीता सदर मंदिराचे नूतनिकरणांसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४/०५/२००८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन स्थानिक आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन मागविण्यात यावे असे ठरले होते. त्यानूसार आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांचेकडून हनुमान मंदिराचे बांधकामासाठी अंदाजे रु. २१,५०,०००/- मात्रचे एस्टीमेट, निवीदा तयार करुन घेतलेल्या आहेत. याकरीता दि. २९.१२.२००८ ते दि. ०५.०१.२००९ अखेर कोऱ्या निवीदा विक्री कालावधी देऊन सदर सिलबंद निवीदा दि. ०९.०१.२००९ अखेर सादर करणेबाबत वर्तमान पत्रात व सस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर जाहीरात प्रसिद्ध करणेत आली होती.

त्यानूसार विहीत मुदतीत एकुण ०३ निवीदाधारकांनी कोऱ्या निवीदा विकत घेतलेल्या असून त्यापैकी विहीत मुदतीत म्हणजेच दि. ०९.०१.२००९ अखेर सिलबंद निवीदा सादर केलेल्या आहेत.

०१. पी. बी. जाधव, संगमनेर

०२. भरकरे कन्स्ट्रक्शन, कोथरुड, पुणे

०३. निर्मीती कन्स्ट्रक्शन, नाशिक

**ब)** शिर्डी गांव हे जगाचे नकाशावर असुन या गांवचे पुरातन वेशी बाबत साईचरित्रात उल्लेख असुन ती साईबाबा ह्यांचे काळातील आहे, त्याचा उजाळा व्हावा, त्या वेशीचे नुतनिकरण व्हावे, तिचे सुशोभिकरण करुन जुनी वेस व वास्तूच्या स्वरुपात पिढ्यानपिढ्या तशीच राहावी या उद्शाने सदर वेशीचे नुतनिकरण करण्याचे मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५२७ अन्वये ठरले आहे. त्यानूसार आर्किटेक्ट पॅनल वरील आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांचेकडून वेशीचे प्लॅन मागविण्यात आले होते. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २४.०५.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४३६ अन्वये रु. ४,५०,०००/- मात्रचे खर्चास व विहीत पद्धतीने कोटेशन मागवून काम पूर्ण करुन घेणेस मान्यता देणेत आलेली आहे. आर्किटेक्ट अरंविद्य वैद्य, संगमनेर यांनी याकामाचे सविस्तर रु. ६,४१,२००/- मात्रचे एस्टीमेट सादर केले होते. त्यानूसार निवीदा तयार करुन घेतलेल्या आहेत. याकामी दि. २९.१२.२००८ ते दि. ०५.०१.२००९ अखेर कोरे निवीदा विक्री कालावधी देऊन सदर सिलबंद निवीदा दि. ०९.०१.२००९ अखेर सादर करणेबाबत वर्तमान पत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर जाहीरात प्रसिद्ध करणेत आली होती.

त्यानूसार विहीत मुदतीत खालील निवीदाधारकांनी कोऱ्या निवीदा विकत घेतलेल्या आहेत.

०१. पी. बी. जाधव, संगमनेर

०२. श्री. रोहन एन. निकम, नांदगांव

०३. श्री. दिपक बाळासाहेब कोटमे, कोपरगांव

०४. निर्मीती कन्स्ट्रक्शन, नाशिक

वरिल निवीदाधारकांनी विहीत मुदतीत कोऱ्या निवीदा घेतलेल्या असून अ.नं. ०२ चे निवीदाधारक वगळता इतर ०३ निवीदाधारकांनी विहीत मुदतीत (०९.०१.२००९) सिलबंद निवीदा सादर केल्या आहेत.

तरी उपरोक्त **अ** व **ब** प्रमाणे हनुमान मंदिराचे व शिर्डी गांवचे वेशीचे बांधकामासाठी प्राप्त झालेल्या सिलबंद निवीदा आजचे सभेत उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

**अ) हनुमान मंदिर बांधकाम-**

| अ. नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| १ | पी. बी. जाधव, संगमनेर | २९,४१,३४८.०० | २९,३५,४५४.०० |
| २ | निर्मीती कन्स्ट्रक्शन, नाशिक | २४,०२,१११.०० | २३,५४,०६९.०० |
| ३ | भरकरे कन्स्ट्रक्शन, कोथरुड, पुणे | ३२,२०,६६४.०० | अनुपस्थित |

**ब) शिर्डी गावाचे वेशीचे बांधकाम-**

| अ. नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| १ | श्री.दिपक बाळासाहेब कोटमे, कोपरगांव | ७,४७,९००.०० | ७,४७,९००.०० |
| २ | पी. बी. जाधव, संगमनेर | ९,०३,०६३.०० | ८,३९,८४८.०० |
| ३ | निर्मीती कन्स्ट्रक्शन, नाशिक | ७,११,९१७.०० | ६,९७,६७९.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, हनुमान मंदिर बांधकाम करणे व शिर्डी गावाचे वेशीचे बांधकाम करणेकामी निम्नतम दराचे ठेकेदार मे. निर्मीती कन्स्ट्रक्शन, नाशिक यांचे दर स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**३३. <u>संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो छपाई कामाचे दरपत्रक उघडणे व निर्णय घेणेबाबत.</u>**

दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन पुस्तके व फोटो छपाई कामी ३१ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/ १८६९४ दि.२२.१२.२००८ अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.१०.०१.२००९ अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते त्यानुसार पुस्तके/फोटो छपाई कामी ३१ निवडक प्रेसधारकांपैकी मुदतीत खालील १२ प्रेसधारकांची सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मे.नीट प्रिंटर्स अहमदनगर | ७ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग प्रा.लि.सोलापूर |
| २ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे | ८ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे |
| ३ | मे.न्यु राधारमण प्रिटींग प्रेस, मुंबई | ९ | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |
| ४ | मे.ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे | १० | मे.उचिता ग्राफिक्स प्रिंटर्स् प्रा.लि., मुंबई |
| ५ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ११ | मे.प्रिमिअर प्रेस, सिंकदराबाद |
| ६ | मे.मॅग्ना ग्राफिक्स (इं) लि., मुंबई | १२ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |

वरीलप्रमाणे पुस्तके/फोटो छपाईकामी प्राप्त झालेले प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके आजचे सभेत उघडणेत आली असता पात्र प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

**अ) पुस्तके-**

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | श्री साई सत्चरित्र हिंदी | श्री साई सत्चरित्र इंग्रजी | श्री साई सत्चरित्र कन्नड | श्री साई सत्चरित्र तामिळ | मुलांचे साईबाबा मराठी | मुलांचे साईबाबा तामिळ | श्रीसदगुरु साईनाथ सगुणोपासना इग्रजी (झरीन) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या (प्रती) | २ लाख | १.५० लाख | ५० हजार | ५० हजार | २० हजार | १० हजार | १० हजार |
| १ | मे.नीट प्रिंटर्स अहमदनगर | २९.२७ | २४.५० | २५.६० | ३५.८० | --- | --- | --- |
| २ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे | २९.२५ | ३०.५८ | ३१.०६ | ४१.६० | ५.१० | ५.२० | २१.३० |
| ३ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ५१.५२ | ४२.५० | ४३.५७ | ६०.०० | ६.७५ | ७.८५ | १९.४० |
| ४ | मे.ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे | ३२.५५ | २५.५० | २६.३० | ३६.०० | ११.६५ | १२.०० | १६.३५ |
| ५ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | ३७.३० | ३०.४० | ३०.८० | ४१.७५ | ३.८५ | **३.८५** | **१०.६५** |
| ६ | मे.मॅग्ना ग्राफिक्स (इं) लि., मुंबई | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ७ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग प्रा.लि.सोलापूर | **२९.२०** | **२४.४२** | **२५.३५** | **३५.६०** | **३.७५** | ३.९२ | --- |
| ८ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे | ३७.५० | २८.९९ | २८.९९ | ४६.९९ | ४.८९ | ४.८९ | १०.९० |
| ९ | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ३९.९५ | ३१.९० | ३२.१० | ४४.७६ | ४.६८ | ५.६४ | १२.०९ |
| १० | मे.उचिता ग्राफिक्स प्रिंटर्स् प्रा.लि., मुंबई | ४५.९६ | ३७.१० | ३७.५७ | ५२.२३ | ५.०० | ५.६२ | २०.९७ |
| ११ | मे.प्रिमिअर प्रेस, सिंकदराबाद | ३०.७८ | २५.४७ | २६.५५ | ३६.९० | १८.०० | १८.०० | ३६.०० |
| १२ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ३८.८४ | ३१.२० | --- | --- | ४.९८ | ५.७२ | --- |

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | दैनंदिनी साईबोध मराठी | श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिंदी अनुवाद | श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना तामिळ | चिल्ड्रेन्स साईबाबा हिंदी (विकास मेहता) | चिल्ड्रेन्स साईबाबा इंग्रजी (विकास मेहता) | श्री साई समर्थ चरित्र इंग्रजी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या (प्रती) | १० हजार | १.५० लाख | १० हजार | १० हजार | १० हजार | १० हजार |
| १ | मे.नीट प्रिंटर्स अहमदनगर | --- | ७.२७ | --- | ६५.०० | ६८.०० | १२८.०० |
| २ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे | ६६.७० | ८.०३ | ११.३३ | **५५.२९** | **५५.८९** | १७१.३७ |
| ३ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ९९.०० | १२.०० | १८.०० | ९०.७० | ९२.०० | १५८.२० |
| ४ | मे.ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे | ५८.०० | ६.८५ | **९.०५** | १०५.१५ | १०३.७५ | **९५.२०** |
| ५ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | --- | ७.५० | ९.९० | --- | --- | --- |
| ६ | मे.मॅग्ना ग्राफिक्स (इं) लि., मुंबई | --- | --- | -- | --- | --- | --- |
| ७ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग प्रा.लि.सोलापूर | **५७.४०** | **६.७८** | --- | ५७.४० | ५९.१० | ९५.७० |
| ८ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे | ५९.९९ | ७.३० | १०.४९ | ५९.९९ | ५९.९९ | १४९.५० |
| ९ | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | --- | १२.३४ | ९.५० | ५९.९२ | --- | --- |
| १० | मे.उचिता ग्राफिक्स प्रिंटर्स् प्रा.लि., मुंबई | ८०.१५ | १०.२० | १५.५७ | ५५.४० | ५६.०० | १५४.१५ |
| ११ | मे.प्रिमिअर प्रेस, सिंकदराबाद | १०८.०० | ९.०० | २०.०० | --- | --- | --- |
| १२ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | --- | १२.०४ | १६.०३ | ६४.४८ | ६५.९३ | --- |

**ब) फोटो-**

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४-रंगात १४"x २०" | दगडावर बसलेले बाबा ४-रंगात २०" x २८" | द्वारकामाई ४-रंगात २०"x २८" | द्वारकामाई बाबा फोटो (ओल्ड) ४-रंगात २०" x २८" | पालखी फोटो ४-रंगात २०" x २८" | साईबाबा मुर्ती फोटो ४-रंगात २०" x २८" |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या (प्रती) | १ लाख | ५० हजार | ५० हजार | ५० हजार | ५० हजार | ५० हजार |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.नीट प्रिंटर्स अहमदनगर | ३.२५ | ५.८१ | ५.८१ | ५.८१ | ५.८१ | ५.८१ |
| २ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे | ३.४० | ६.३० | ६.३० | ६.३० | ६.३० | ६.३० |
| ३ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | ४.४० | ८.४९ | ८.४९ | ८.४९ | ८.४९ | ८.४९ |
| ४ | मे.ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे | ३.०५ | ५.९५ | ५.९५ | ५.९५ | ५.९५ | ५.९५ |
| ५ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ६ | मे.मॅग्ना ग्राफिक्स (इं) लि., मुंबई | ३.२४ | ६.३७ | ६.३७ | ६.३७ | ६.३७ | ६.३७ |
| ७ | मे.चेरी ऑफसेट प्रिंटींग प्रा.लि.सोलापूर | २.९३ | ५.७० | ५.७० | ५.७० | ५.७० | ५.७० |
| ८ | मे.कल्याणी कार्पोरेशन, पुणे | **२.८९** | **५.६५** | **५.६५** | **५.६५** | **५.६५** | **५.६५** |
| ९ | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | ३.५० | ६.९९ | ६.९९ | ६.९९ | ६.९९ | ६.९९ |
| १० | मे.उचिता ग्राफिक्स प्रिंटर्स् प्रा.लि., मुंबई | ३.७५ | ६.९० | ६.९० | ६.९० | ६.९० | ६.९० |
| ११ | मे.प्रिमिअर प्रेस, सिंकदराबाद | ३.२४ | ६.३९ | ६.३९ | ६.३९ | ६.३९ | ६.३९ |
| १२ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ३.५५ | ७.१० | ७.१० | ७.१० | ७.१० | ७.१० |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत न्युनतम दर मान्य करण्यात येऊन संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

तसेच आजचे सभेत साई सिक्यूरिटी प्रिन्टर्स,बंगलोर हे श्रीसाई समर्थ चरित्र इंग्रजी हे पुस्तक रुपये ९२/-प्रती नगाप्रमाणे छपाई करुन देण्यास तयार असलेबाबत पत्राने उशीराने कळविले असल्याचे मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेस सांगितले. यावर चर्चा होऊन,श्रीसाई समर्थ चरित्र इंग्रजी हे पुस्तक साई सिक्यूरिटी प्रिन्टर्स,बंगलोर यांचे दर निम्नतम असल्याने त्यांचेकडून छपाई करुन घेण्यात यावी,असे ठरले.

(कार्यवाही- प्रकाशने विभाग प्रमुख)

**३४) श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३, राहणार शिर्डी यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ५४/३२ क्षेत्र ०० हे १२ आर पैकी जमीन ७ ते ८ आर जमीन खरेदीबाबत.**

श्री. रामदास रुंजा काटकर, श्री. देविदास रुंजा काटकर, श्री. ज्ञानेश्वर रुंजा काटकर व श्रीमती शेवंताबाई रुंजा काटकर यांनी मौजे शिर्डी येथील त्यांचे मालकीची जमीन सर्व्हे नंबर ५४/१२ क्षेत्र ०० हे १२ आर पैकी ७ ते ८ आर जमीन रुपये ७ लाख मात्र प्रती आर हया भावाने खरेदी करावी, म्हणून दिनांक १६ जानेवारी, २००९ रोजी विनंती वजा प्रस्ताव दिलेला आहे.

सदरहू अर्जासोबत, जोडलेल्या ७/१२ च्या उताऱ्याचे अवलोकन केले असतां, कब्जेदार सदरी अर्जदार यांची नांवे असून, पिक पहाणीस खुद्द अशी नोंद आहे. इतर हक्कात शिर्डी विविध कार्यकारी सोसायटी यांचा बोजा आहे. इतर बाबींबाबत ७/१२ उताऱ्यात नमूद केलेले फेरफार उतारे कामगार तलाठी, शिर्डी यांचेकडून उपलब्ध करवून घेण्यात येत आहेत.

अर्जदार यांनी अर्जासोबत दिलेल्या कच्च्या नकाशाचे अवलोकन केले असता, संस्थानने पूर्वी खरेदी केलेले क्षेत्र हे अर्जदाराच्या जमिनीच्या दक्षिण बांधास आहे. यापुर्वी संस्थानने खाली नमुद केलेल्या खातेदारांच्या सर्व्हे नंबर ५४ मधील जमिनी खरेदी केलेल्या आहेत:

| अ.नं. | पूर्वीच्या जमीनमालकाचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| ०१ | सौ.कमल गोपीनाथ म्हस्के | ५४/३४ | ०० हे २३आर ०० चौमी |
| ०२ | सौ.कमल गोपीनाथ म्हस्के | ५४/५६ | ०० हे ०६ आर ०० चौमी |
| ०३ | श्री. भाऊसाहेब म्हाळू काटकर | ५४/३५ | ०० हे ०४ आर ५० चौमी |

अर्जदारांच्या नांवावर ०० हे १२ आर जमीन आहे, त्यापैकी ते फक्त ०७ ते ०८ आर जमीन खरेदी द्यावयास तयार आहेत. अशा रितीने होणारे खरेदीखत हे तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याविरुध्द होत असल्याने, मा. दुय्यम निबंधक, राहता हे खरेदीखताची नोंद करणार नाहीत, तथापि याबाबत संस्थान वकीलांचा अभिप्राय घेणे उचित राहील.

तसेच अर्जदारांची जमिनीची किंमत रक्कम रुपये ०७ लाख मात्र प्रति आर ही अवास्तव आहे. सन २००८ चे रेडीरेकनरचे दर सन २००९ मध्ये ही अंमलात आहेत. त्याप्रमाणे सर्व्हे नंबर ५४ चा प्रति चौरस मीटर दर हा रुपये ४५००/- मात्र इतका आहे, म्हणजेच प्रति आर रक्कम रुपये ४,५०,०००/- मात्र इतका दर येत आहे. त्यामुळे सदरहू जमिनीची किंमत वाटाघाटीने निश्चित होणे आवश्यक आहे.

सदर जमीन खरेदी करण्याचा निर्णय झाल्यास, संस्थान वकिलांचा अभिप्राय घेऊन कायदेशीर बाबींची पूर्तता करणेकामी कार्यवाही करता येईल.

या प्रस्तावास अनुसरुन श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ५४/३२ मधील ०० हे १२ आर जमीन खरेदी करणेकामी जमिनीचा प्रती आर दर ठरविणे, जमीन खरेदीकामी सर्च रिपोर्ट घेणे, खरेदीखतासाठी आवश्यक मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करणेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणे आदि बाबींबाबत निर्णय होणेकामी मा. कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता.

सदरहू प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची सर्व्हे नंबर ५४/३२ मधील १२ आर जमीन आरक्षणात येते किंवा कसे, आरक्षणात येत असल्यास, त्याचे क्षेत्र किती व ते कशासाठी आरक्षित आहे याबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून माहिती घेणेत येऊन, सदरहू जमीन खरेदीबाबत त्यांचे ना हरकत पत्र घेणेत यावे. जमीनमालक त्यांचे अर्जात नमुद केलेप्रमाणे फक्त ०८ आर जमीन देणार असतील तर त्याप्रमाणे खरेदीखत करता येईल किंवा कसे याबाबत तसेच सदरहू जमीन खरेदीसंबंधित उपरोक्त इतर बाबींबाबत संस्थान वकिलाचा अभिप्राय घेऊन, त्यांचेकडून सदरहू जमिनीचा सर्च रिपोर्ट, खरेदीखताचा मसुदा इत्यादी तयार करुन घेणेत यावे. श्री. रामदास रुंजा काटकर व इतर ३ यांची जमीन मौजे शिर्डी शिवारातील सर्व्हे नंबर ५४/३२ क्षेत्र ०० हे १२ आर जमीन प्रति आर रुपये ४,५०,०००/- मात्र (अक्षरी रुपये चार लाख पन्नास हजार मात्र) या दराने खरेदी करण्यात यावी. जमीनमालकांना संस्थानमार्फत करण्यात येणाऱ्या प्राथमिक मोजणीचे वेळेस ताब्यात मिळणाऱ्या जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस आदा करणेत यावी, उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीची रितसर सरकारी मोजणी झालेनंतर ताब्यात मिळणारे एकूण जमिनीच्या प्रमाणांत आदा करण्यांत यावी. तसेच सदरहू जमीन खरेदीसाठी खरेदीखताचा मसुदा तयार करणे, खरेदीखत नोंदविणेकामी आवश्यक असणारे मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, जमीन खरेदी केलेनंतर जमिनीची सरकारी मोजणी करणेकामी मोजणी शुल्क भरणे आदि अनुषंगिक बाबींसाठी तसेच जमीन खरेदीकामी आवश्यक असणाऱ्या सर्व कायदेशीर व इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,बांधकाम विभागप्रमुख)

**३५) सौर उर्जा यंत्रणेचे अनुदान व पेरु बर्फी माहिती घेणेकामी व्यवस्थापन समितीचे सदस्य व संस्थान अधिकारी व कर्मचारी यांनी प्रवास करणेबाबत**

मा.व्यवस्थापन समिती दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४१८ चे मान्यतेने नविन श्री साई प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन पदार्थ तयार करणेकामी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा बसविणेचे काम चालू आहे. सदर यंत्रणा उभारणीचे काम गढीया सोलर एर्जी सिस्टीम प्रा.लि., वलसाड यांना देण्यात आलेले असून सदर प्रोजेक्टची किंमत रु.१,३३,००,०००/- आहे.

सोलर स्टिम कुकींग यंत्रणेची उभारणी तांत्रिक दृष्टया योग्य पध्दतीने होणेसाठी महाराष्ट्र उर्जा अभिकरण, पुणे (मेडा) यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून विशेष तज्ञ म्हणून मा. श्री.एस.जी. ताकवले, माजी कुलगुरु,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर हे काम पहात आहे.

सदर यंत्रणेच्या एकूण किंमतीचे अंदाजे ५०% रक्कम अपारंपारिक उर्जा मंत्रालय भारत सरकार यांचेकडून अनुदान मिळत असते त्याकामी सर्व आवश्यक कागदपत्राची पूर्तता केलेली असून सदर कागदपत्र मेडा,पुणे यांचेकडे देत आहोत तसेच कागदपत्राचा एक संच अपारंपारिक उर्जा मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांचेकडे सादर करावा लागणार आहे.

त्याचप्रमाणे साईभक्तांना प्रसाद म्हणून पेरु बर्फी विक्रीसाठी तयार करणेची नियोजित असून त्याकामी हलदीराम फूड, नागपूर यांचेकडे माहिती घेणेसाठी जाणे असून सदर दोन्ही कामासाठी व्यवस्थापन समितीचे सदस्य यांना विमानाने व संस्थानचे अधिकारी व कर्मचारी यांना रेल्वेने जाणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**३६) शिर्डी शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम राबविणेकामी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

मा. सौ. सुमित्राताई कैलास कोते, विश्वस्त तथा नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी आजचे सभेत असे सुचित केले की, केंद्र शासनाच्या शहरी विकास व शहरी रोजगार दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाने, जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरी विभागातील झोपडपट्टीवासियांचे जीवनमान उंचाविण्याचा एक भाग म्हणून झोपडपट्टी रहिवशांकरीता एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टीवासियांसाठी घरे बांधुन देणेबाबतचा प्रस्ताव म्हाडामार्फत शासनास सादर करणेबाबत कळविलेले आहे.

याबाबत मा.सौ.कोते यांनी विनंती केली की, सदरहू झोपडपट्टी निर्मुलन कार्यक्रमांतर्गत शिर्डी शहरातील झोपडपट्टीचे निर्मूलन व पुनःर्वसन करणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस नगरपंचायत हद्दीत जागा उपलब्ध नाही. त्यामुळे संस्थानने त्यांच्या मालकीच्या मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील

जागा उपलब्ध करुन दिल्यास झोपडपट्टी निर्मुलनाविषयीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणे शक्य होईल. तसेच याकामी नगरपंचायतीमार्फत प्रस्ताव तयार करणेकामी प्रकल्प सल्लागार संस्था नेमणे शक्य होईल.

यावर सभेत सविस्तर चर्चा होऊन,स्वच्छ व सुंदर शिर्डी शहरासाठी शिर्डीतील झोपडपट्टीवासियांचे निर्मुलन व पुनःर्वसन करणे योग्य व उचित आहे. याकामी नगरपंचायतीने प्राथमिक सर्व्हेक्षण करुन, नगरपंचायत हद्दीत किती झोपडपट्टीवासीय आहेत याचा प्राथमिक अहवाल संस्थानकडे सादर करावा. याकामी मा. सौ. सुमित्राताई कोते, नगराध्यक्षा केलेल्या विनंतीनुसार, संस्थान मालकीच्या मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नंबर २५० पैकी मधील आवश्यक अशी जागा / जमीन उपलब्ध करुन देणेस अधिनियमातील तरतुदीस व शासनाच्या मान्यतेस अधिन राहून तत्वतः मान्यता देणेत येत आहे. शिर्डी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत शिर्डी नगरपंचायतीने स्वःखर्चाने प्रकल्प सल्लागार संस्था नेमून आवश्यक असा प्रकल्प अहवाल शासनाकडे सादर करावा. असा प्रकल्प अहवाल सादर केल्यानंतर त्याची एक प्रत संस्थानकडे पाठवावी, जेणेकरुन अधिनियमातील तरतुदीनुसार जागा उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०४ ०१ (अ) जमा खर्च तक्ता डिसेंबर,२००८.**

**(ब) माहे डिसेंबर ,२००८ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे डिसेंबर ,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे डिसेंबर, २००८ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.७६** (A) माहे डिसेंबर,२००८ मधील जमा रु २०,१५,५४,७५३.३६ आणि खर्च रुपये १४,०६,३५,४७५.०७ चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील डिसेंबर,२००८ रुपये १,९९,९०८.०० चा तक्ता, दिनांक २.२.२००९ अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ३,२२,०३,६३,६१६.०० चा तक्ता, माहे डिसेंबर,२००८ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ७,९८,४९,४०८.०० देणगीचा तक्ता, माहे डिसेंबर,२००८ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये १,६५,६५९.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. श्री साईबाबा रुग्णालयात माहे डिसेंबर -२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ७६** (B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे डिसेंबर-२००८ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये १०,२९,७८१.०० देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०३. साईनाथ रुग्णालयात माहे डिसेंबर,२००८ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ७६** (C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे डिसेंबर,२००८ मध्ये रुपये ६७,२३,३६४.०० देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०४. श्रीसाईनाथ रुग्णालय माहे डिसेंबर,२००८ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ७६** (D) साईनाथ रुग्णालयात माहे डिसेंबर, २००८ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ३,७६,२८८.०० बाह्य रुग्ण रुपये ५६,८३५.००.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५२,९००.०० वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०५. माहे डिसेंबर, २००८ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ७६** (E) माहे डिसेंबर,२००८ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ३९,९९६ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. ७६** (F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" यांच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेणेत येऊन, तक्ता "अ" मधील संस्थान इमारतींना आतील बाजूने रंगकाम करणे कामासाठी ठेकेदार ओम साई एन्टरप्रायजेस,पुणे यांना दिनांक १५.३.२००९ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली. तसेच सदरहू ठेकेदार यांचेमार्फत सुरु असलेल्या संस्थान इमारतीचे आतिल पृष्ठभागावर वॉलपट्टी लावणे कामासाठी दिनांक २८.०२.२००९ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधिल अंतर्गत सजावट व फर्निचर टप्पा-३ कामासाठी ठेकेदार मगर जायभावे असोसिएटस्,नाशिक यांना दिनांक १५.२.२००९ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता देणेत आली.

तसेच तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे अंतिम बिले आदा करणेस मान्यता देणेत आली.

०१. संस्थानचे आय.टी.आय.,शैक्षणिक संकुल व अधिकारी निवासस्थान इमारतींचे आति भागास रंगकाम करणे (ठेकेदार-एस डेकोरेटर्स,पुणे) अंतिम बील रक्कम रुपये ११,३३,३७१/-

०२ शैक्षणिक संकुल परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणे (ठेकेदार-इंजि योगेश पाटील,कोपरगाव) अंतिम बील रक्कम रुपये ३,६७,००६/-

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.७६**(G) माहे डिसेंबर,२००८ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५ साईभक्तांची वाढणारे गर्दीचे नियोजन करणेबाबत**
**(अ) जुने प्रसादालय परिसर विकसीत करणे**
**(ब) मंदीर परिसरात बदल करणेबाबत**
**(क) मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी दिलेल्या Crowd Management च्या अहवालावर निर्णय घेणे.**
**(ड) श्रीमती सोनिया कापरे, Architect यांचे याबाबतचे प्रेझेंन्टेशन**

**निर्णय क्र.७७ (अ) जुन्या प्रसादालय परिसरात साईभक्तांसाठी दर्शनरांग व इतर अनुषंगिक सुविध निर्माण करणे बाबत**

**पूर्वपीठीका:** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढतच आहे. सध्या दररोज ४० ते ५० हजार साईभक्त श्री साईंच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येतात. हीच संख्या दर गुरुवार, शनिवार व रविवार या दिवशी ८० हजार ते १ लाखांपर्यन्त जाते. गुरुवार व रविवार या दिवसांना जोडून सलग सरकारी सुट्टया आल्यास, तसेच उत्सवाचे वेळी व उन्हाळी, दिवाळी व नाताळ या सलग सुट्टयांच्या कालावधीत हीच गर्दी दररोज साधारणतः २ ते २.५० लाखांपर्यन्त जाते. सध्या साईभक्तांच्या दर्शन रांगेकरीता शांतीनिवास व भक्तनिवास इमारतींच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर रेलिंगची असलेल्या ०४ हॉल्सची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या दर्शन रांगेत प्रवेशासाठी सुधारीत व्यवस्थेप्रमाणे जुन्या पिंपळवाडी रस्त्याचे पदपथावरुन दोन प्रवेशव्दारांची सोय करण्यात आलेली आहे. या दर्शनरांगेत प्रवेश करण्यासाठी जुन्या पिंपळवाडी रस्त्याच्या पश्चिम बाजूस व पूर्व बाजूस अशी दोन प्रवेशव्दारांची सुविधा आहे. जास्त गर्दीच्या वेळेस गर्दीच्या वेळेस भक्तांची दर्शन रांग जुन्या पिंपळवाडी रस्त्याचे पूर्व बाजूचे पदपथावरुन, बाहेर गावात (पिंपळवाडी बाजूकडे) साधारणतः एक किलोमीटर लांब जाते.

साधारण गर्दीच्या वेळेस दर्शनरांगेचे ०४ ही हॉल्स भरलेले असल्यास साईभक्तांस समाधी मंदिरात दर्शनासाठी जाण्यास २.३० ते ३ तासाचा कालावधी लागतो तर जादा गर्दीच्या कालावधीत मंदिर परिसराच्या बाहेर असलेल्या दर्शन रांगेत असलेल्या भक्तांस दर्शनासाठी ४ ते ५ तासाचा कालावधी लागतो. या दर्शन रांगेत तरुण, वयस्कर, बालक, अपंग, आजारी अशा सर्वच प्रकारच्या स्त्री-पुरुष भक्तांचा समावेश असतो.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे दर्शन रांगेत उभ्या असलेल्या व कापडी शामियाना मंडपात निवारा घेतलेल्या सर्व साईभक्तांना पाणी, चहा-दूध, स्नॅक्स, स्वतंत्ररित्या प्रसाधनगृहाची सोय उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थान व्यवस्थापनावर येऊन पडते.

थोडक्यात, समाधी मंदिरातील दैनंदिनी पाहता एकूण १८ तासापैकी अंदाजे ०३ तास सर्वसाधारणपणे श्री साईंचे दर्शन बंद राहून, १५ तासच दर्शनासाठी उपलब्ध होतात. अशा वेळेस दर्शन रांगेत व दर्शन रांगांच्या हॉलमध्ये उपस्थित असलेल्या भाविकांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेचे दृष्टीने पुनर्नियोजन करणे गरजेचे आहे.

**(ब) जागेची उपलब्धता :**

**०१.** सध्या मंदिर व मंदिर परिसरात दर्शन रांगेचे हॉल सोडता जागेची उपलब्धता नाही. समाधी मंदिराबाहेर जी काही मोकळी जागा आहे ती भाविकांच्या मुक्त हालचालींसाठी ठेवणे आवश्यक आहे. कारण समाधी मंदिरातील दैनंदिन कार्यक्रमाव्यतिरिक्त भाविकांसाठी अभिषेक पूजा, सत्यनारायण पूजा आदि संस्थानने अल्प मोबदल्यात उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच श्रीं च्या जीवनावरील संस्थान प्रकाशित पुस्तके व फोटो विक्री केंद्र, देणगी कार्यालये आदि सुविधा ही संस्थानचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने त्यांना समाधी मंदिर परिसरात जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक व गरजेचे ठरते. त्यामुळे मंदिर परिसरात अतिरिक्त दर्शन रांगेची सुविधा उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही. समाधी मंदिर परिसराच्या जागेचे एकूण क्षेत्रफळ २१२७४.०० चौ.मी. (सुमारे २ हे. १३ आर ) इतके आहे.

**०२.** मंदिर परिसरालाच लागून, पिंपळवाडी रस्त्यालगत प्रसादालय परिसर आहे. या परिसरात साईप्रसाद नंबर १ व साईप्रसाद नंबर २ या भक्तनिवासस्थान इमारती, साईनिवास अतिथीगृह, लाडू प्रसाद विक्री केंद्र, चौकशी व निवासस्थान कार्यालय, कॅन्टीन, गॅस टँक यार्ड आहे. यापैकी साईप्रसाद नंबर १ या इमारतीत तळमजल्यावर प्रसादालय होते. सदरहू प्रसादालय दिनांक ०८ जानेवारी, २००९ रोजी नवीन साईप्रसादालय इमारतीत स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे फक्त प्रसादालयासाठी वापरात असलेली जागा व रेलिंग सध्या रिक्त आहे.

सध्या साईप्रसाद नं. १ व साईप्रसाद नं.२ मध्ये तळमजला वगळतां ३ मजल्यावर भक्तांच्या निवासाची सोय करण्यात आलेली आहे. तसेच साईप्रसाद नं. २ चे उत्तर बाजूस पुर्वी वाहनतळाची सोय होती, तेथे गर्दीच्या काळात तात्पुरत्या स्वरुपात कापडी शामियाने उभारुन भाविकांसाठी निवाऱ्याची व्यवस्था करण्यात येत आहे. ही जागा ही उपलब्ध होऊ शकते.

**उपलब्ध होणाऱ्या जागेचे क्षेत्रफळ :**

सध्याचे जुन्या प्रसादालय परिसराच्या भुखंडाचे क्षेत्रफळ खालिलप्रमाणे आहे.

| Survey No. | Area |
|---|---|
| 2/4 (2/2B) | 01 H. 20 R |
| 3/1 | 01 H. 28 R |
| 3 (3A/1B) | 00 H. 07 R |
| Total: | 02 H. 55R |
| | **(25550.00 Sq.Mtr.)** |

तसेच सध्या उपरोक्त परिसरात असलेल्या इमारतींची माहिती खालीलप्रमाणे-

| S.No | Name of the Building | Year of Construction | Cost as on 31 March 2008 |
|---|---|---|---|
| 1) | Prasadalaya No.1 building & Revocations | 1980 | 63,02,997.62 |
| 2) | Prasadalaya No.2 | 1991-1992 | 1,50,37,013.91 |
| 3) | Kitchen Shed and Toilet Block | 1990-1991 | 3,04,072.00 |
| 4) | Annadan Shed | 1984 | 32,238.96 |
| 5) | Railing Shed | 1990 | 3,92,918.61 |
| 6) | Kitchen bet win Prasadalaya 1 & 2 | 1995-1996 | 2,00,397.00 |
| 7) | Sulabh Souchalaya | 1999-2000 | 1,28,15,912.26 |
| 8) | Central Godown | 2000-2001 | 46,44,733.00 |
| 9) | VIP Suits above Central Godown | 2002-2003 | 1,90,49,506.00 |
| 10) | Generator Room | 2000-2001 | 2,48,685.00 |
| 11) | Electrical Office | 1999-2000 | 1,87,473.00 |
| 12) | Workshop Shed | 1997-1998 | 37,253.00 |
| 13) | Dish Washing Shed | 1996-1997 | 54,697.00 |
| 15) | Toilet Block on Pimpalwadi Road | 1984 | 1,21,165.95 |
| 16 | Compound wall to dinning hall | 1984 | 14,782.40 |
| 17 | Thali washing shed | 1984 | 9,197.03 |
| 18 | New kitchen near Bhojanalya | 1987 | 2,62,445.14 |
| 19 | Drainage work from beggar shed | 1986 | 7,213.75 |
| 20 | G.I. Railing shed | 1987 | 1,86,424.00 |
| 21 | Self service shed | 1988-1989 | 1,91,127.64 |
| 22 | Beggar shed Concreting | 1984 | 45,475.84 |
| 23 | LPG yard concerting | 1993-1994 | 70,590.00 |
| 24 | Public latrines & bathroom renovation | 1995-1996 | 4,84,220.40 |
| 25 | Biogas plant | 1999-2000 | 10,73,653.00 |
| 26 | Sai Prasad parking Asphalting | 1996-1997 | 16,80,398.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | Prasadalaya Shed | 1996-1997 | 88,952.00 |
| 28 | LPG Yard compound wall | 1996-1997 | 46,752.00 |
| 29 | Beggar shed concreting | 1996-1997 | 37,212.00 |
| 30 | Sulabh Souchalaya compound wall | 1999-2000 | 1,82,206.00 |
| 31 | Central Godwon compound wall | 2001-2002 | 1,91,471.00 |
| 32 | LPG yard concreting (near main gate) | 2002-2003 | 5,35,211.00 |
| | | **Total** | **6,45,36,394.00** |

**क) जागेच्या वापराबाबतचे नियोजनः**

दि.१८/१०/२००८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे आर्किटेक्ट सोनिया काप्रे यांनी सध्याचे प्रसादालय नविन जागेत स्थलांतरीत झाल्यानंतर साईभक्तांच्या वाढीव सोयीसुविधा निर्माण करण्यासाठी करावयाचे बदलाबाबत सादरीकरण करुन तपशिलवार माहीती सभेस दिली. साईभक्तांना सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्या म्हणुन सुधारीत दर्शनरांग, प्रतिक्षागृह, चप्पल स्टँड, मोबाईल लॉकर्स, साईभक्तांचे लगेजसाठी लॉकर्स, बुक स्टॉल, कापडकोठी, लाडुप्रसाद काउंटर्स, चहा, कॉफी, दुध व स्नॅक्स उपलब्ध होणेसाठी उपहारगृह, उदीवाटप केंद्र, नारळ फोडण्याची व्यवस्था, लाडुप्रसाद व्यवस्था, देणगी काउंटर्स, बँक काउंटर्स, अभिषेक व पारायण कक्ष, व्यवस्थापन समिती व प्रशासकीय कामकाजासाठी व्यवस्था, संरक्षण व्यवस्था, माहीती व सुविधा केंद्र, डिस्प्ले बोर्ड सिस्टीम, ऑडीयो-व्हीडीओ सीसीटीव्ही व्यवस्था, आवश्यक भांडार, उदी पॅकींग व्यवस्था, उत्सव कार्यक्रम व्यवस्था, पालखी दर्शन व्यवस्था, तसेच इतर सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करुन आवश्यक तेथे सल्लागारांचा, आर्किटेक्टस् यांचा सल्ला घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे यथावकाश सादर करावा , असा प्रस्ताव तयार करणेकामी येणाऱ्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास सदरहु सभेतील निर्णय क्र.७५१ अन्वये मान्यता देणेत आली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने आर्किटेक्ट सोनिया काप्रे, यांचेशी विचारविनीमय करणेत आला. आर्किटेक्ट यांनी संस्थानच्या गरजा विचारात घेऊन साईभक्तांची सुयोग्य दर्शन व्यवस्था होणेकामी सविस्तर अभ्यास करुन जुन्या प्रसादालय परिसरात करावयाच्या दर्शन रांग सुविधेचा सुधारीत आराखडा तयार केला असून त्याचे सादरीकरण करणेसाठी त्यांना आजचे सभेपुढे बोलवणेत आले आहे. सदरहू आराखड्यातील ठळक बाबी व वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**०१.** दर्शन रांग व्यवस्था ही बेसमेंट व तळमजला अशा दोन पातळ्यांवर ठेवणेत आली आहे.

**०२.** दर्शन रांगेची एकूण क्षमता ही ५००० ते ७५०० व्यक्ती इतकी आहे.

**०३.** दर्शन रांगेमध्ये चप्पल स्टँड, मोबाईल लॉकर्स, सी सी टी.व्ही., सुरक्षा तपासणी व्यवस्था, दक्षिणा पेट्या, स्नॅक्स, टॉयलेटस या सुविधा दर्शविण्यात आलेल्या आहेत.

**०४.** नियोजीत इमारतीतील दर्शन रांगेव्यवतिरिक्त असलेल्या इतर भागात येणारे साईभक्तांसाठी डोनेशन काऊंटर, प्रसाद लाडू काऊंटर, नारळ, उदी काऊंटर्स, बुक स्टॉल, कापडकोठी या सुविधा दर्शविण्यात आल्या आहेत.

**०५.** नियोजीत इमारत ही लिफ्टस्, एस्कलेटर्स, फायर अलार्म इ. सुविधांयुक्त असणार आहे.

**०६.** नियोजीत इमारतीचा बिल्ट-अप एरिया खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| तळघर | - | ७०००.०० चौ.मी. |
| तळमजला | - | ५४००.०० चौ.मी. |
| मंदिर परिसरात प्रवेशासाठी सबवे | - | १२००.०० चौ.मी. |
| **एकूण** | **-** | **१३६००.०० चौ.मी.** |

**०७** नियोजीत इमारतीसाठी येणाऱ्या अंदाजित खर्चाचे एस्टीमेट **रु.४७.३५ कोटी** मात्र इतके आहे. तसेच वातानुकुलन यंत्रणेसाठी अंदाजे **रु.३.०० कोटी** मात्र इतका अतिरिक्त खर्च येईल. अशाप्रकारे वातानुकलनासह एकूण अंदाजे **रु.५०.३५ कोटी** मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तथापी सदर नियोजीत इमारतीसाठी वातानुकुलन यंत्रणेची आवश्यकता नाही असे आर्किटेक्ट यांचे मत आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व मंदिर परिसरतील गर्दीचे नियोजन करणेचे दृष्टीने प्रसादालय परिसरासह मंदिर परिसरात योग्य ते बदल करणेस तत्वतः मान्यता देणेत आली. याकामी मंदिर व मंदिर परिसराचे पूर्वीचे आर्किटेक्ट मे.माथुर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांचेसह आणखी दोन-तीन नामांकित आर्किटेक्ट यांचेकडून संकल्पना चित्रे, कच्चे बांधकाम आराखडे व अंदाजित बांधकाम खर्च याबाबत प्रस्ताव (Concept Proposals) घेणेत यावेत. याकामी आर्किटेक्ट यांना योग्य तो

मोबदला देणे, जुन्या नकाशांच्या प्रती उपलब्ध करुन देणे आणि कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०६** **हॉस्पिटल व शैक्षणिक संकुल यासाठी नविन जागेचे नियोजन करणेबाबत.**

**निर्णय क्र.७८** रुग्णालय व शैक्षणिक संकुल याबाबत जागेचे नियोजन करणेकामी चर्चा करणेत आली. रुग्णालयासाठी मोठ्या व सलग जागेची आवश्यकता आहे. मौजे नांदुर्खी बुद्रुक येथील अंदाजे ४२ एकर जागा विनामुल्य प्राप्त करुन घेणेबाबत कार्यवाही सुरु आहे. सदरहू जागा उपलब्ध झाल्यास या जागेत सर्व सोयींनी युक्त असे रुग्णालय उभारणे योग्य राहील.

शिर्डी विकास योजनेतील आरक्षण ३४ रुग्णालय विस्तारीकरणासाठी आरक्षित आहे. सदरहू आरक्षणाची विकसन संस्था संस्थान असून, या आरक्षणातील श्री.लोढा बंधू यांची स.नं. १२५ पैकी मधील ०३ हेक्टर ५७ आर जमीन संस्थानने खरेदी घेतलेली असून अंदाजे ५६ आर जमिनीचा भू-संपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सुरु आहे. सदरहू आरक्षण क्र.३४ मधील रुग्णालय विस्तारीकरणासाठी असलेली जागा शैक्षणिक संकुलासाठी योग्य आहे. सदरहू आरक्षणाच्या उद्देशात बदल करणेसाठी प्रस्ताव सादर करता येईल. अथवा शिर्डी गावचे जवळपास सलग ८ ते १० एकर जागा उपलब्ध होत असल्यास ती जागा उपलब्ध करुन घेणेबाबत प्रयत्न करता येईल, अशी चर्चा झाली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०७** **लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र.७९** **अ)** संस्थानला सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी सन-१९९१ पासून व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी सन-२००६ पासून पुरविणेत येत आहे. सध्या सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबंधीत विभागांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन कामासाठी ४४६ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येतात. कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कामास घेण्यात येणाऱ्या कंत्राटी सिव्हीलीयन सुरक्षा गार्ड यांना किमान वेतन कायदयानुसार, शॉप अ‍ॅन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देण्यात येत आहे. तसेच सुरक्षा अधिकारी, सुरक्षा पर्यवेक्षक, सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर देण्यात येत आहे.

मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरक्षेकामी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अ‍ॅन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांची सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.१७-०८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांची साई मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी सेवानिवृत्त/माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.११-८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.२८-०२-२००९ अखेर संपत आहे.

सध्या मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अ‍ॅन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या व निविदेत नमूद केलेल्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | एजन्सीचे नांव | पुरविणेत येणारी सुरक्षा कंत्राटी कर्मचारी संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा अधिकारी | सुरक्षा पर्यवेक्षक | गणमॅन | व्यायामशाळा प्रशिक्षक | सुरक्षा गार्ड | एकूण |
| ५. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. **(मंदिर परिसर)** | ०१ | ०३ | -- | -- | २०३ | २०७ |
| ६. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. **(सा.भ.नि. व इतर परिसर)** | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ११६ | १२२ |
| ७. | मे.ईगल आय एन्टरप्राईज, **(महाद्वार सिक्युरिटी)** | ०१ | ०३ | ०७ | -- | ३४ | ४५ |
| ८. | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी अ‍ॅन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे **(श्री साईबाबा हॉस्पीटल सिक्युरिटी)** | -- | ०३ | १८ | -- | ५१ | ७२ |
| | **एकूण** | ०३ | १२ | २६ | ०१ | ४०४ | ४४६ |

संस्थानला सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून “सिलबंद निविदा” मागविणेत आल्या होत्या “सिलबंद निविदा” विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच “सिलबंद निविदा” स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे कार्यालयास एकूण ३८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहे. सदरच्या ३८ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला. तसेच सदर दिवसी उपस्थित ३५ कंत्राटदारांशी / ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरासंदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी त्यांनी निविदेत देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरुपात बंद पाकिटात दि.२०-११-२००८ अखेर संस्थानकडे सादर करावी. असे त्यांना सांगण्यात आले. तसेच ज्या ठेकेदारांची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त आहे अशा ठेकेदारांचाच विचार करणेत यावा असे ठरले.

त्याप्रमाणे चर्चा/वाटाघाटीचे वेळी संबंधीत उपस्थित ३५ कंत्राटदरापैकी/ठेकेदारांपैकी ३३ कंत्राटदार/ ठेकेदरांनी देऊ केलेले अंतिम सुधारीत दर (बंद पाकिटे) प्राप्त झालेले असून ते उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करून, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, ज्या सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त असेल अशा निविदा सादर कर्त्यांना उपसमितीचे सभेपुढे समक्ष वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा. तसेच कॉन्ट्रक्टची मुदत ०१ वर्षे ऐवजी ०३ वर्षे करणेत यावी अशी चर्चा झालेली आहे. त्यास अनुसरून संबंधीत २० निविदा सादरकर्त्यांना मा.उपसमितीचे दि.१०-०१-२००९ रोजीचे सभेत चर्चा वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. त्याप्रमाणे एकूण २० निविदा सादर कर्त्यांपैकी १८ निविदा सादरकर्ते चर्चा वाटाघाटीचे वेळी उपस्थित राहून, त्यांनी अंतिम सुधारीत दर देवू केले आहे. त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून, तो निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. त्यावर चर्चा होवून, उपस्थित सुरवातीचे दहा ठेकेदारांना मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत यावे असे ठरले. सदर दहा ठेकदारांचा तक्ता आजचे सभेत सादर करणेत आला होता.

सबब, संस्थानला सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूक व त्याचा कालावधी यावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने पुरविणाऱ्या खालील ०५ ठेकेदारांना उपसमितीचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा, असें ठरलें.

| **अ.नं.** | **निविदासादरकर्त्याचे नांव** |
|---|---|
| ०१ | मे.टॉप्स सिक्युरिटी लि,मुंबई |
| ०२ | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यु.नाशिक |
| ०३ | सेन्ट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲन्ड सिक्यु.लि.मुंबई |
| ०४ | युनिक डेल्टा फोर्स सिक्युरिटी प्रा.लि.,कासारवाडी, पुणे- ४११ ०३४ |
| ०५ | ईगल हंटर सोल्युशन्स लि.,अंधेरी (वेस्ट), मुंबई.४००० ५३ |

**ब)** संस्थानला लेबर कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने अकुशल कामगार १९९४ पासून, कुशल कामगार सन-१९९९ पासून पुरविणेत येत आहे. सध्या लेबर कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबंधीत विभागांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन कामासाठी ८१४ कंत्राटी कामगार पुरविणेत येतात. कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कामास घेण्यात येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना किमान वेतन कायदयानुसार, शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देण्यात येत आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर लेबर कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.२८-०२-२००९ अखेर संपत आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या व निविदेत नमूद केलेल्या अकुशल, कुशल कंत्राटी कामगार संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **एजन्सीचे नांव** | **पुरविणेत येणारी कंत्राटी कर्मचारी संख्या** | | |
|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकूण |
| **१** | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे (मंदिर परिसर) | २६४ | ४४ | ३०८ |
| **२** | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., | ४०३ | १०३ | ५०६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नाशिक (सा.भ.नि. व इतर परिसर) | | | |
| | **एकूण (१+२)** | ६६७ | १४७ | ८१४ |

संस्थानला अकुशल, कुशल कामगार पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून “सिलबंद निविदा” मागविणेत आल्या होत्या “सिलबंद निविदा” विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच “सिलबंद निविदा” स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे कार्यालयास एकूण ३० सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदरच्या ३० सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला होता. तसेच सदर दिवसी उपस्थित २७ कंत्राटदारांशी /ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरासंदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी त्यांनी निविदेत देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरुपात बंद पाकिटात दि.२०-११-२००८ अखेर संस्थानकडे सादर करावी असे त्यांना सांगण्यात आले. तसेच ज्या ठेकेदारांची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त आहे. अशा ठेकेदारांचाच विचार करणेत यावा असे ठरले.

त्याप्रमाणे चर्चा/वाटाघाटीचे वेळी संबंधीत उपस्थित २७ कंत्राटदरापैकी/ठेकेदारांपैकी २५ कंत्राटदार/ ठेकेदरांनी देऊ केलेले अंतिम सुधारीत दर (बंद पाकिटे) प्राप्त झालेले असून ते उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करून, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त असलेल्या ठेकेदारांचा स्वतंत्र तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून तो उपसमितीचे सभेमध्ये सादर करणेत यावा, तसेच कॉन्ट्रॅक्टची मुदत ०१ वर्षे ऐवजी ०३ वर्षे करणेत यावी अशी चर्चा झालेली आहे. त्यास अनुसरून वार्षीक उलाढाल रूपये एक कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या ठेकदारांचा स्वतंत्र तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. तथापि सदर विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली होती. वार्षीक उलाढाल रूपये १ कोटीपेक्षा उलाढाल असलेल्या ठेकेदारांचा स्वतंत्र तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला असून, सदर तक्ता आजचे सभेत सादर करण्यात आला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरील “अ” मध्ये ठरलेप्रमाणे स्थानिक उपसमिती सभेत पहिल्या ५ निविदासादरकर्त्यांना आमंत्रित करुन निर्णय घ्यावा,असें ठरलें. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.०८** **श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे वापरासाठी सन २००९-१० या वर्षाकरीता औषधे खरेदीबाबत**

**निर्णय क्र.८०** श्री साईनाथ व साईबाबा रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २००९-२०१० या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमीकल्स, क्ष-किरण फिल्म्स, डेंटल मटेरीयल, त्वचा रोग विभाग, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब ओ.टी., कार्डीयाक ओ.टी., सि.टी.स्कॅन इत्यादी खरेदीकामी श्री साईबाबा रुग्णालयातील प्रत्येक विभागाचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची सभा दि.०३/१२/२००८ रोजी तर श्री साईनाथ रुग्णालयातील प्रत्येक विभागाचे वैद्यकिय अधिकाऱ्यांची सभा दि.०६/१२/२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. तसेच दि.०५/११/२००८ चे परीपत्रकान्वये वॉर्ड / विभाग प्रमुख यांना एक वर्षासाठी लागणारी मागणी देणेबाबत कळविले होते.

सदर विभागांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव / शिल्लक असलेला औषध साठा यांचा विचार करता मागणी केलेली नाही. तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे अशा प्रकारे सर्व औषधांची मागणी कमी करुन व नविन औषधांचा यादीत समावेश करुन अंतिम तक्ता तयार करण्यात आला आहे त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | सन २००९-२०१० करीता मागणीप्रमाणे अंदाजे खर्च रु. |
|---|---|---|
| १ | गोळया | ४६,५१,६८५.८५ |
| २ | इंजेक्शन व आय. व्ही. फ्ल्युडस् | १,४३,१८,६३०.६५ |
| ३ | लिक्विड ओरल्स् | १२,४४,७२१.०० |
| ४ | मलम (श्री साईनाथ व साईबाबा रुग्णालय) | ७,५५,०२१.२७ |
| ५ | आय, एअर, व नोझल ड्राप्स | ६,०६,८१४.७५ |

| | | |
|---|---|---|
| ६ | डेंटल मटेरीयल (श्री साईनाथ व साईबाबा रुग्णालय) | २,५१,४९९.७५ |
| ७ | क्ष-किरण फिल्म्स् (श्री साईनाथ रुग्णालय) | १३,९५,९४२.०० |
| ८ | सि.टी. स्कॅन व एम.आर.आय.विभागासाठी लागणारे फिल्म्स व इतर साहित्य | १,६१,१८,४९४.०० |
| ९ | श्री साईनाथ रुग्णालय लॅब केमीकल्स | २६,९५,३६२.४१ |
| १० | श्री साईबाबा रुग्णालय लॅब केमीकल्स | ६०,६१,६२०.७८ |
| ११ | मायक्रोबायोलॉजी केमीकल्स व साहित्य | १,२६,६३६.९१ |
| १२ | ब्लड बँक केमीकल्स | ३७,३२,५१६.३५ |
| १३ | Miscellaneous (इतर किरकोळ साहित्य) | १५,७१,३६७.१० |
| १४ | ओ.टी. आणि इतर मटेरीयल | १,०४,३८,५६२.९० |
| १५ | कॅटगट ॲन्ड सुचर्स (साईबाबा रुग्णालय जनरल (न्युरो) ऑप्थॅलमिक, आर्थोपेडीक ओ.टी.) | ९१,४९,३५०.०० |
| १६ | कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य | ४,०५,७१,२३६.३५ |
| १७ | On Consignment Basis Items (Stent / Valve / Balloon / Pacemaker etc) | ५,००,००,०००.०० |
| १८ | कॅटगट ॲन्ड सुचर्स (कार्डीयाक ओ.टी.) | ५६,२१,९१४.१५ |
| १९ | कॅटगट ॲन्ड सुचर्स (साईनाथ रुग्णालय ओ.टी.) | ३२,६९,४६८.०० |
| २० | आयुर्वेदीक औषधे | ७,२२,७३१.४८ |
| | **एकुण रक्कम रु. -** | **१७,३३,०३,५७५.७०** |
| | **पुर्णांकित एकुण रक्कम रु. -** | **१७,३३,०३,५७६.००** |

सदरची मागणी तयार करताना -

०१) सदरची मागणी तयार करताना सन २००८ या वर्षातील खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा, त्याचा होणार खप तसेच २००८-२००९ मधील Pending order इत्यादी बाबी विचारात धरुन मागणी तयार केलेली आहे. साईबाबा रुग्णालय सुरु होऊन तीन वर्ष झालेले आहे. येथे रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढतच आहे. याचा देखील विचार करुन मागणी तयार केलेली आहे.

०२) श्री साईनाथ रुग्णालयातील अंतररुग्ण व बाहयरुग्णांची संख्या खालीलप्रमाणे आहे-

| अ.नं. | तपशिल | सन २००५-२००६ (०१.०४.०५ ते ३१.०३.०६) | सन २००६-२००७ (०१.०४.०६ ते ३१.०३.०७) | सन २००७-२००८ (०१.०४.०७ ते ३१.०३.०८) | सन २००८ (९ महिने) (०१.०४.०८ ते ३१.१२.०८) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अंतररुग्ण संख्या | ५७७४६ | ५६३९८ | ६४७७१ | ५०३६८ |
| ०२ | बाहयरुग्ण संख्या | २४०७०० | २४२७९८ | २५३११० | १८१४६७ |

०३) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, गोळ्या, मलम, सर्जिकल साहित्य इत्यादीची एकत्रीत मागणी केलेली आहे.

०४) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमीकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप व श्री साईबाबा रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचवलेली आहे.

०५) श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक, जनरल (न्युरो) ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर, ऑप्थॅलमिक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी.स्कॅन, एम. आर. आय., २-डि इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ तीन वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियांचा / तपासण्याचा तपशिल खालीलप्रमाणे**:-**

| अ. नं. | तपशिल | सन २००६-२००७ (०१.०४.०६ ते ३१.०३.०७) | सन २००७-२००८ (०१.०४.०७ ते ३१.०३.०८) | सन २००८ (९ महिने) (०१.०४.०८ ते ३१.१२.०८) |
|---|---|---|---|---|
| १ | कॅथलॅब प्रोसुज्यर (ॲन्जीओग्राफी / ॲन्जीओप्लास्टी) | १२४८ | २७३६ | ३५१२ |
| २ | ह्दयशस्त्रक्रिया | ३०५ | ५८८ | ५६९ |
| ३ | ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया | ३६३ | ३२१ | ३६६ |
| ४ | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | ४५६ | ३९३ | ५०५ |
| ५ | सि.टी.स्कॅन | ३३२८ | ६३५१ | ६२५७ |
| ६ | एम. आर. आय. | - | ३३८३ | ६३२४ |
| ७ | २ - डि इको | ८२५ | २६६४ | ३१९७ |
| ८ | डायलेसीस | ५१७ | १३७३ | १३१६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | अंतरुग्ण संख्या | ३९८८ | ९८६४ | ८३५५ |
| १० | बाहयरुग्ण संख्या | ३०९५४ | ६२३०४ | ५१५३१ |

उपरोक्त माहितीवरुन श्री साईबाबा रुग्णालयात रुग्णांची संख्या हि दिवसेंदिवस वाढतीच आहे. श्री साईबाबा रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येत असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणत वाढ झालेली आहे. ॲन्जीओग्राफी, ॲन्जीओप्लास्टी, हृदयशस्त्रक्रियांचे रुग्णांना लागणारे सर्जीकल साहित्य, औषधे इत्यादी संस्थानतर्फे ठरलेल्या पॅकेजमध्येच पुरवण्यात येतात त्यामध्ये प्रामुख्याने महागडी स्टेन्ट, बलून, डायग्नोस्टीक कॅथेटर, व्हाल्व, सुचर्स मटेरीयल, इंजेक्शन इत्यादींचा समावेश आहे.

०६) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबीरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, रोडवरील अपघात इ. मुळे वाढणारी गर्दी (उदा. उत्सव, अध्यात्मीक शिबीरे, पालखी सोहळा)

०७) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून सहा ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जीकल साहित्य इत्यादींचा विचार करण्यात आलेला आहे.

०८) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, डायग्नोस्टीक कॅथेटर्स, बलून, पेसमेकर, कॅनुले इत्यादी महागडी साहित्य हि On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावीत केलेले आहे. ती आपण वापरल्यानंतर बील अदा करत असतो.

या तक्त्यात औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजुर दराने संस्थानने औषधे खरेदी केलेले आहे ते दर केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदामध्ये प्राप्त होणारे दर ह्या पेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. दि.०१/०४/२००८ ते ३१/१२/२००८ या कालावधी मध्ये औषधे खरेदीवर एकुण रु. १०,०५,२४,६२३/- इतका खर्च झालेला आहे.

औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने दर वर्षीप्रमाणे खालीलप्रमाणे पध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे.

१) औषधे खरेदीकामी दरवर्षीप्रमाणे वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर टाकून निविदा मागविण्यात याव्यात.

२) औषधे खरेदी करताना विक्रेत्याऐवजी थेट उत्पादक कंपन्यांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेकडून औषधे घेण्यात यावीत. तसेच नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

३) दरपत्रक मागवितांना उत्पादक कंपन्यांची अट तशीच ठेऊन सर्व उत्पादक कंपन्याचे अधिकृत वितरक यांचेकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात येऊन त्यांना जाहिरातीबाबत अवगत करणेत येऊन निविदा भरणेबाबत कळविण्यात यावेत.

४) प्रत्येक औषधांसाठी निवडण्यात आलेल्या कंपन्यापैकीच दर तुलनात्मक दरांसाठी विचारात घेण्यात यावेत, व त्यातील नामांकित कंपन्याचे दर स्विकारण्यात यावेत.

५) ज्या औषधांसाठी / साहित्यासाठी उत्पादक कंपन्यांचे दर येणार नाहीत, त्यासाठी अधिकृत विक्रेत्यांकडून प्राप्त झालेल्या दरांमध्ये नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

६) सर्व प्राप्त निविदा हया मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे उघडून घेण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन त्यातील ज्या कंपन्याचे औषधे खरेदीसाठी निवडण्यात आली आहे. त्यांनाच मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात यावे.

७) मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरीक्त मागणी करण्याची आवश्यकता भासल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी.

तक्त्यातील (कॉलम नं ५) Requirement for ०९-१० या कॉलममध्ये केलेल्या मागणी नुसार औषधे, केमीकल्स, साहित्य, कार्डीयाक ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य व परफ्युजीनीस्ट यांचे साहित्य इत्यादी तसेच Stent / Valve / Balloon / Pacemaker इत्यादी On Consignment basis वर खरेदी करण्यास अंदाजे एकुण रु. १७,३३,०३,५७६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे औषधे खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु. १७,३३,०३,५७६/- चे खर्चास व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते ७ चे प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.०९** **गुंतवणूकीबाबत.**

**निर्णय क्र.८१** **अ)** माहे फेब्रुवारी,२००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ७/०२/२००९ | ६,५६,४९,१६४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ७/०२/२००९ | ६,५६,४९,१८०.०० |
| ०३ | बँक ऑफ महाराष्ट्र, दादर-मुंबई | ११/०२/२००९ | २,१८,८३,०५५.०० |
| ०४ | स्टेट बॅक ऑफ इंडीया, श्रीरामपूर | २२/०२/२००९ | १,८४,७१,५९०.०० |
| ०५ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २६/०२/२००९ | ४,९४,६७१.०० |
| ०६ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे फेब्रुवारी २००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | **एकुण :-** | **२२,२१,४७,६६०.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. २२ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे

०१. युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०२. सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०३. आंध्र बँक, शिर्डी
०४. स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०५. बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
०६. बँक ऑफ बरोडा, नासिक
०७. बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
०८. विजया बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ८ या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.२२ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करता येईल.

ब ) वरील अ. नं. ५ नुसार सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांचेकडे गुंतविण्यात आलेली रक्कम ही कर्मचारी कल्यान निधीची असुन, या रकमेची मुदत ही दि.२६/२/२००९ रोजी पूर्ण होणार आहे. सदरची रक्कम ही त्यांचेकडेच गुंतवावी लागणार असल्याने, सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांचेकडील प्रचलीत व्याजदरानुसार सदरची रक्कम ही त्यांचेकडे गुंतविता येईल.

तरी वरील "**अ** " व "**ब**"मध्ये नमूद केल्या प्रमाणे गुंतवणूक करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१०** **सुधारित अंदाजपत्रक सन २००८-२००९**

**निर्णय क्र.८२** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्य व अधिकार मधील पोटकलम-(०२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील.

सन २००८-०९ या चालू आर्थिक वर्षासाठी (माहे एप्रिल,२००८ ते मार्च,२००९ या कालावधीसाठी) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६ मार्च, २००८ चे सभेतील निर्णय क्रमांक २२६ नुसार मंजुर करण्यात येऊन मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुबंई व मा.धर्मादाय आयुक्त, मुबंई यांना सादर करण्यात आलेले आहे.

माहे डिसेंबर, २००८ अखेर प्रत्यक्ष जमा-खर्चाचे अवलोकन केले असता काही बाबींवरील जमा व खर्च मुळ तरतुदींपेक्षा अधिक होतील अशी शक्यता असल्याचे / झाल्याचे दिसुन येते. यामुळे याबाबींसाठीची मुळ तरतुद माहे मार्च, २००९ अखेर अपुरी पडणार आहे. अंदाजपत्रकातील काही वाढीव खर्चाच्या बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**१. फर्निचर खर्च :-** श्री साईभक्तांचे सुविधेसाठी नवीन प्रसादलयात अदयावत फर्निचर खरेदी करण्यात येत आहे तसेच व्दारावती भक्तनिवासस्थान इमारत अल्पावधित सुरु होत असल्याने
त्यासाठीही अदयावत फर्निचर खरेदी करण्यात येत असल्याने, फर्निचर खरेदी साठी ०३.३८ कोटी रुपयांची तरतुद पुरशी नसल्याने ५.५० कोटी रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

**२.भक्तनिवासस्थान कार्यालय खर्च :-** श्री साईभक्तांचे दिवसेंदिवस होंत असेलेली वाढ तसेच भक्तांना जास्तीत जास्त सुख-सुविधा पुरविण्यात येत अहे. निवासी खोल्याच्या व्यतिरीक्त मंडप टाकुन भक्तांना

निवासव्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येत असल्याने तसेच नवीन गादया तयार करण्यात येत असल्याने भक्तनिवास खर्चात ४०.०० लक्ष रुपयांची तरतुद अपुरी असल्याने त्या विभागाचे मागणीनूसार ६५.०० लक्ष रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

**३. श्री साईनाथ रुग्णालय :-** श्री साईनाथ रुग्णांलयात मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वाढीव सुविधा तसेच अदयावतीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णांलयासाठी ०६.६३ कोटी रुपयांची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ०७.०० कोटी रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

**४.श्री साईबाबा रुग्णालय :-** श्री साईबाबा रुग्णांलयात मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वाढीव सुविधा तसेच अदयावत उपकरणे खरेदी करण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णांलयासाठी ०९.७६ कोटी रुपयांची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ११.५० कोटी रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

**५. डिजिटल प्रकाशने :-** प्रकाशने विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने भक्तांसाठी डिजिटल प्रकाशने उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत त्यास भक्तांचा प्रतिसाद पाहता ५० लक्ष रुपयांची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ०१.०० कोटी रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

**६.समाधि मंदिर खर्च :-** श्री चे दर्शनार्थ येणां-या भक्तांचे संख्येत झालेली लक्षणिय वाढ तसेच धार्मिक कार्यक्रमात झालेली वाढ पाहता १४ लक्ष रुपयांचे केलेली तरतुद पुरेशी नसल्याने २९.२० लक्ष रुपयांची सुधारीत तरतुद करण्यात आली आहे.

**७. चावडी महोत्सव खर्च :-** मा.व्यवस्थापन समितीने यंदाचे वर्ष चावडी महोत्सव म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतलेला असून त्याअनुषंगाने विविध धार्मिक कार्यक्रमे, भक्तसंम्मेलने आदी कार्यक्रमाचे प्रयोजनकामी येणा-या खर्चासाठी रुपये २५ लक्ष नविन तरतुद करण्यात येत आहे

उर्वरित मध्ये सी.सी.टी.व्ही खर्च रुपये ०५ लक्ष, चौकशी कार्यालय १.२९ लक्ष, सांऊड सिस्टिम खर्च ०४ लक्ष, टेलिफोन विस्तारीकरण खर्च ०५ लक्ष, संगणक प्रशिक्षण खर्च ०१.८० लक्ष, किरकोळ खर्च ०३.४१ लक्ष, औषधे व इतर खरेदी खर्च ०१.४७ कोटी, पुस्तक छपाई खर्च ०१.१० कोटी, नगरपंचायती कामे ०२.०८ कोटी, प्रसादालय खर्च रुपये ०४ कोटी, रुपयांनी खर्चात वाढ करण्यात आलेली आहे. इतर जमा वा खर्चाच्या बाबींवरील मुळ तरतुदींमध्ये काही बदल अपेक्षित नसल्याने त्या तरतुदींचा पुनर्उल्लेख करण्यात आलेला नाही. सन २००८-२००९ चे जमेचे व खर्चाचे मुळ निव्वळ अंदाजपत्रक अनुक्रमे रुपये २४७,४८,८५,०००/- व २४५,८२,५३,०००/- मात्रचे आहे. (Opening व Closing-Cash Balances मुळे त्यांचा ताळमेळ झाला आहे) मुळ तरतुदींमध्ये अनुक्रमे रुपये ३२,७७,००,०००/- व १४,३५,३१,०००/- मात्रची वाढ करण्यात आली असुन,खर्चापेक्षा जादा शिल्लक राहीलेली रक्कम रुपये १९,३१,५१,०००/- मात्र मुदतठेवीत गुंतवणुक म्हणून दर्शविण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने जमेचे व खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रक पुढील असून,त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**सुधारित निव्वळ जमा - रुपये २८०,२५,८५,०००/-**

**सुधारित निव्वळ खर्च - रुपये २६०,१७,८४,०००/-**

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रमाणे सन २००७-०८चे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.११** **मुळ अंदाजपत्रक सन २००९-१० बाबत**

**निर्णय क्र.८३** **अ)** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील.

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबतच्या सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकामधील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेतः

**जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००८-०९ | अंदाजपत्रक २००९-१० | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | टक्के |
| ०१ | प्रारंभीची शिल्लक | ३,२८,५०,००० | ४,०५,००,००० | १ % | ७६,५०,००० | % |
| ०२ | अपेक्षित अनावर्ती जमा | १८९,२४,००,००० | १९३,१०,५५,००० | ६६ % | ३,८६,५५,००० | २ % |
| ०३ | अपेक्षित आवर्ती जमा | ९१,०१,८५,००० | ९४,६४,७५,००० | ३३ % | ३,६२,९०,००० | ४ % |
| | **एकुण अपेक्षित जमा :-** | २८३,५४,३५,००० | २९१,८०,३०,००० | १००% | ८,२५,९५,००० | ३ % |

**खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयात)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००८-०९ | अंदाजपत्रक २००९-१० | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | टक्के |
| ०१ | अपेक्षित अनावर्ती खर्च | ८७,९२,०४,००० | ८३,१०,३८,००० | २९ % | - ४,८१,६६,००० | -१६ % |
| ०२ | अपेक्षित आवर्ती खर्च | २९,१७,५९,००० | २८,६५,७४,००० | १० % | - ५१,८५,००० | - २ % |
| ०३ | अपेक्षित किरकोळ खर्च | ४१,१९,००० | ४५,८४,००० | - | ४,६५,००० | ११ % |
| ०४ | न्यासाच्या उदीष्टांवरील अपेक्षित खर्च | १२३,०८,९४,००० | १४९,९५,०६,१२० | ५१ % | १४,८७,१९,८१२ | २२ % |
| ०५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | १९,५८,०८,००० | २३,८४,०९,००० | ९ % | ४,२६,०१,००० | २२ % |
| ०६ | अपेक्षित गुंतवणूक | १९,३१,५१,००० | २,२४,६८,८८० | | - १७,०६,८२,१२० | % |
| ०७ | अंतिम शिल्लक | ४,०५,००,००० | ३,५४,५०,००० | १ % | - ५,०५,०,००० | % |
| | **एकुण अपेक्षित खर्च :-** | २८३,५४,३५,००० | २९१,८०,३०,००० | १०० % | ८,२५,९५,००० | ३ % |

**ब)** अधिनियम २००४ चे कलम २२ (२) मधील तरतुदींनुसार, च व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल.

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २००९-१० या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधीतून होणारा संभाव्य खर्च भागविण्यासाठी अधिनियमातील १० टक्के तरतुद कमी पडणार आहे.

सन २००४-०५ ते २००७-०८ या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेले आहे. सन २००८-०९ या वर्षातही व्यवस्थापन निधीतील खर्च वाढीव होणार आहे. वरील प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहेत. सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतुन होणांरा अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासनाकडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

क)संस्थानच्या विविध विभागांनी अनुदान शिर्षकाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शिर्षकाखली तरतुद दर्शविण्यात आली आहे.

ड)सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करताना मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार खालील नमुद बाबींवरही विचार करण्यात आला आहे.

(१) नियोजित नॉलेज सिटी (२) नियोजित प्राधिकरण (३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (४) नियोजित शिर्डी विमानतळ

तथापी या बाबींसाठी कोणत्याही विभागाने निश्चित तरतुद दर्शविलेली नाही. त्यामुळे उपरोक्त बाबींसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद करता येईल, असे नम्र मत आहे.

इ) मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३)(सी) ५ मधिल तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील पाच वर्षातील अखर्चित उत्पन्न साधारणतः रुपये १२१.४७ कोटी मात्र एवढे आहे. या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठयाप्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये भरीव वाढ झालेली दिसत आहे. अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट " अ " व " ब " म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व मा. व्यवस्थापन समितीच्या मंजुरीने राज्य शासन व मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे माहीतीसाठी पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उत्सव बाबींवर दर्शविण्यात आलेला खर्च कमी असल्यामूळे त्यात रुपये १.२५ कोटीची वाढ करुन अंदाजपत्रक करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१२** **सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता पूर्व लेखा परिक्षण (Pre Audit) व अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit) कामकाजासाठी सक्षम संस्थेची नेमणूक करणे बाबत.**

**निर्णय क्र.८४** **(अ)** संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच त्या अनुशंगाने आर्थिक व्यवहारातही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या व्यवहारांवर योग्य नियंत्रण रहावे यासाठी लेखाशाखे कडून अदा करण्यात येणारे प्रत्येक देयक आदा करणे पूर्वी पूर्व लेखा परिक्षक (Pre Auditor) यांचे मार्फत परिक्षण झाल्यास नजर चुकीने होणा-या चुका व काही संभाव्य त्रुटी टाळणे सहज शक्य होतील. तसेच वैधानिक लेखापरिक्षणाच्या कालावधीमध्ये पूर्व लेखा परिक्षक स्वत: हजर राहणार असल्यामुळे, वैधानिक लेखा परिक्षणातही त्यांची मदत होवून, वैधानिक लेखा परिक्षंकाच्या आक्षेपांचे प्रमाणही बरेच कमी होण्यास मदत होईल. संस्थानचे व्यवहार हे अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार होतात की नाही हे पाहण्याचे सर्वस्वी जबाबदारी पूर्व लेखा परिक्षकांवर राहणार आहे.

सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरीता श्री.लोगांणी ए.जी.चार्टर्ड अकौटंट,कोपरगाव यांची पूर्व लेखा परिक्षक म्हणून वार्षिक रू.१,७५,०००/- (अक्षरी एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) एवढया एकत्रीत मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. सन २००८-०९ या वर्षातील त्यांचे काम समाधानकारक आहे.

**(ब)** संस्थान मधिल सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण, डेडस्टॉक, कंझुमेबल स्टॉक, अचानक रोख रक्कम तपासणी अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासना अंतर्गत पुरेशा तज्ञ व कुशल मनुष्यबळा अभावी सन २००५-०६ पासून सक्षम संस्थेची नेमणूक करण्यात येते. सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरीता मे.शास्त्री पुरोहित ॲण्ड असो.चार्टर्ड अकौटंट, पुणे यांची एकून मानधन वार्षिक रू.१,७५,०००/-(अक्षरी एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) या एकत्रीत मानधानावर नेमणूक करण्यात आली असून त्यांचे काम समाधानकारक आहे. तसेच वैधानिक लेखा परिक्षण दोष-दुरुस्ती अहवाल तयार करणे कामी त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे.

**(क)** संस्थानच्या मुंबई कार्यालयामध्ये चालणा-या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणेकामी उपरोक्त दोन्हीही संस्थेकडून लेखा परिक्षणाचे कामकाज केले जाते. पंरतू वाढत्या कामकाजाचा व्याप लक्षात घेवून सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरीता मुंबई कार्यालयासाठी तसेच संस्थानचे परकिय चलनाचे व्यवहार, टॅक्स संबंधी सल्लागार या कामी गेल्या नऊ वर्षापासून परकिय चलनाच्या लेखापरिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेले श्री.एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन प्रत्यक्ष खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या अटीवर नेमणुक करण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरून त्यांनी दि.१० जानेवारी, २००९ रोजीच्या पत्राने सन २००९-१० या आर्थिक वर्षासाठी मुंबई कार्यालयाचे लेखा परिक्षण, परकिय चलनाचे लेखा परिक्षण व टॅक्स संबंधी सल्लागार म्हणून लेखा परिक्षण करणेकामी संमती दर्शविली आहे. त्यांना संस्थान कामकाजाचा मोठा अनुभव असून या कामासाठी त्यांना कुठल्याही प्रकारचे मानधन द्यावे लागणार नाही. फक्त प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती त्यांनी मागितली असून, मागिल वर्षा प्रमाणेच प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती साठी अंदाजे रू.१५,०००/- (अक्षरी रूपये पंधरा हजार ) पर्यत खर्च अपेक्षित आहे.

आता सन २००८-०९ हे आर्थिक वर्ष संपत आले असून नविन आर्थिक वर्ष सन २००९-१० लवकरच सुरू होत आहे. तरी सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरिता पूर्व लेखापरिक्षण (Pre-Audit) अंतर्गत लेखापरिक्षण (Internal Audit) शिर्डी आणी मुबई येथील कामकाजासाठी मागिल आर्थिक वर्षाप्रमाणे अथवा योग्य त्या वार्षिक लेखापरिक्षण फीसह बाहेरील सक्षम संस्थेची नियुक्ती होणेसाठी, तसेच मुंबई कार्यालयासाठी लेखा परिक्षक, टॅक्स सल्लागार व परकिय चलनाच्या लेखा परिक्षणासाठी श्री. एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची नियुक्ती होणेसाठी व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर चर्चा होऊन, २००८-२००९ या आर्थिक वर्षासाठी नेमणूक करण्यात आलेल्या उपरोक्त संस्थांची मागील वर्षाच्याच शर्ती/अटी व मानधनावर नेमणूक करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१३** **सन २००८-०९ या अर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकाच्या नेमणूकीबाबत**

**निर्णय क्र.८५** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल कलम १७(०२)(ग) मधिल तरतूदीनुसार, विश्वस्त व्यवस्थेच्या हिशोबाची, राज्य शासन निर्देश देईल अशा व्यक्तीकडून पुढील लगत वर्षातील अशा तारखेपर्यत वार्षिक लेखापरिक्षण करण्याची व्यवस्था करील. कलम २९(०१) मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे. च समिती त्या विश्वस्त व्यवस्थेची आर्थिक स्थिती व जमा खर्चाचा तपशिल दर्शविणारा दि.३१ मार्च, रोजी संपणा-या प्रत्येक वित्तीयवर्षाचा लेखापरिक्षकांचा अहवाल, तसेच ज्यांना या विश्वस्त व्यवस्थेकडून आर्थिक सहाय्य देण्यात आले अशा देणगी स्विकारणा-या संस्थेची (संपूर्ण पत्यासह) तपशिलवार यादी व असे आर्थिक सहाय्य मागण्यामागील उद्देश व सहाय्याची रक्कम याबाबतची माहिती

सोबत जोडलेल्या छाननी समितीचा अहवाल, यांसह वार्षिक अहवाल तयार करवून घेईल आणि त्या अहवालाची एक प्रत शासनाला व एक प्रत धर्मादाय आयुक्ताला त्या वर्षाच्या ३० जूनच्या आत सादर करील.

संस्थानचे आर्थिक वर्ष माहे एप्रिल ते माहे मार्च असे आहे. सन २००८-०९ या चालू आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल माहे जून-२००९ पूर्वी पूर्ण होणे गरजेचे आहे. त्यासाठी संस्थानचे लेखे लेखापरिक्षणासाठी तयार करणे, वैधानिक लेखा परिक्षकांनी लेखा परिक्षण करून त्यांचा अहवाल सादर करणे, सदरचा लेखा परिक्षण अहवाल मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपूढे ठेवून त्याची नोंद घेणे, त्यानंतर तो राज्य शासनास व मा.धर्मादाय आयुक्तास सादर करणे, या सर्व प्रक्रियेसाठी उपरोक्त नमूद तीन महिन्यांचा कालावधी हा अत्यंत कमी असल्याने उपरोक्त कालमर्यादा ३० सप्टेंबर करणे कामी व त्याप्रमाणे तरतुदीत सुधारणा करणेकामी शासनाकडे प्रस्तावीत करण्यात आलेले आहे.आता सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणुक करणे आवश्यक आहे.

सन २००५-०६ पासून ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखा परिक्षक म्हणून मे.शरद एस.गायकवाड ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंट, मुंबई यांचे नियुक्तीस राज्य शासनाने मान्यता दिलेली होती. त्यास अनुसरून त्यांनी सलग तीन वर्षे वैधानिक लेखा परिक्षणाचे कामकाज पूर्ण केलेले आहे. सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षणाचे कामकाज त्यांनी पूर्ण केले असून, दि.२९ सप्टेंबर, २००८ रोजी लेखापरिक्षण अहवाल सादर केला आहे. संस्थानमध्ये चालणा-या कार्यालयीन कामकाजा विषयी त्यांना पूर्ण माहिती झालेली आहे.

मे.शरद एस.गायकवाड ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांनी त्यांचे दि.०१ डिसेंबर,२००८ चे पत्रान्वये सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या लेखा परिक्षणासाठी त्यांना जे मानधन देण्यात आले होते (जास्तीत जास्त रक्कम रू.२४,०००/-) त्याच मानधनावर सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखा परिक्षण करणेकामी पूनर्नेमणूकीस, त्यांनी संमती दर्शवलेली आहे.

तरी सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्यासाठी मे.शरद एस.गायकवाड ॲण्ड कं.,चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांना संस्थान कामकाजाचा अनुभव व माहिती असल्याने, उपरोक्त मानधनाच्या अटीवर त्यांची सन २००८-०९ या अर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेसाठी पाठवणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१४** **सोने चांदी वितळविणेकामी आलेल्या घटीस मान्यता मिळणेबाबत**

**निर्णय क्र.८६** मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णया नूसार इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडून श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची (२० ग्रॅम), सोन्याची (प्रत्येकी २.५, ५, १० ग्रॅमची ) नाणी साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता.

दिनांक १० जानेवारी, २००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी च्या मालकीचे शुध्द सोने ९४१४.०० ग्रॅम तसेच संस्थानला देणगीदाखल प्राप्त झालेली सोने व वस्तु अलंकार (जाहीर लिलावा व्यतिरीक्त वितळविण्या योग्य) इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडे हस्तांतरण करुन वितळवुन उपरोक्त वजनाची नाणी व पेंन्डट तयार करणेकामी निर्णय झालेला आहे. वरील निर्णयानूसार शुध्द सोने तसेच वितळविण्या योग्य सोने चांदी वस्तु अलंकार (माहे मार्च, २००४ अखेरचे) मा.विश्वस्तांचे उपस्थितीत दिनांक २३ सप्टेंबर,२००८ रोजी इंडिया गव्हर्नमेंट मिंट, मुंबई यांचेकडे हस्तांतरीत करुन समक्ष वितळविण्यात आलेले आहे.

इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडून सदरहु सोने व चांदी वितळविणे, बार तयार करुन संस्थान मागणी नूसार व नमुन्याप्रमाणे विविध वजनाची नाणी व पेंन्डटस् चा पुरवठा होत आहे. या कार्यवाही दरम्यान वजनात आलेली घट ( Melting Loss, Refining Loss) इत्यादीचा तपशील खालीलप्रमाणे - वितळविणे व शुध्द करणे बाबतचा तपशील खालीलप्रमाणे :-

**(अ) सोने वस्तू :-**

| अ.नं | तपशील | सर्व आकडेवारी ग्रॅममध्ये |
|---|---|---|
| ०१ | सोने रजिस्टरप्रमाणे असलेले वजन | १९,२९०.९१० |
| ०२ | वितळविणेकामी नेण्यात आलेल्या सोने वस्तुमध्ये निघालेले खडे व फुटलेले,इतर प्लॅस्टिकचे खडे | ६६.१०० |
| ०३ | वितळविणेकामी नेण्यात आलेल्या निव्वळ सोन्याचे वजन | १९,२२४.८१० |
| ०४ | इंडिया गर्व्हमेंट मिंट यांचे वजन काटयावर केलेले प्रत्यक्ष वजन | १९,२७५.४०० |
| ०५ | इंडिया गर्व्हमेंट मिंट रिफायनरी व संस्थानकडील वजनात पडलेला फरक (+) | ५०.५९० |
| ०६ | मेल्टींग व रिफायनींग नंतर समक्ष घेतलेले वजन | १७,७२७.५५३ |
| ०७ | वितळविणे व रिफायनींगनंतरआलेली घट ( Melting & Refining Loss) | १,५४७.८४७ |

**(ब) चांदी वस्तू :-**

| अ.नं | तपशील | सर्व आकडेवारी ग्रॅममध्ये |
|---|---|---|
| ०१ | चांदी रजिस्टरप्रमाणे असलेले वजन | २,६९,५७७.०३० |
| ०२ | वितळविणेकामी नेण्यात आलेल्या चांदी वस्तुमध्ये निघालेले प्लॅस्टिक खडे | १५०.००० |
| ०३ | वितळविणेकामी नेण्यात आलेल्या चांदी वस्तुमध्ये निघालेली पावडर,चौ-या आदी | १,१०२.००० |
| ०४ | चांदी रजिष्टर प्रमाणे वितळविणेकामी नेण्यात आलेल्या चांदीचे निव्वळ वजन | २६८,३२५.०३० |
| ०५ | इंडिया गर्व्हमेंट मिंट रिफायनरी यांचे वजन काटयावर केलेले प्रत्यक्ष वजन | २,६८,५६९.००० |
| ०६ | इंडिया गर्व्हमेंट मिंट रिफायनरी व संस्थानकडील वजनात पडलेला फरक (+) | २४३.९७० |
| ०७ | मेल्टींग व रिफायनींगनंतर समक्ष घेतलेले वजन | २,०३,४९७.००० |
| ०८ | वितळविणे व रिफायनींगनंतरआलेली घट ( Melting & Refining Loss) | ६५,०७२.००० |

इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई येथे केलेले सोने व चांदीचे वजन व संस्थान वजन काटयावर केलेल्या सोने व चांदीचे वजनात अनुक्रमे ५०.५९० ग्रॅम, २४३.९७० ग्रॅम चा फरक असुन तेवढे वजन वाढलेले आहे. संस्थानकडे आलेल्या सोने चांदी वस्तू मोजणेकामी इलेक्ट्रॉनिक वजन काटयाचा वापर केला जातो. तसेच संस्थानकडे येणारे सोने चांदी हे वेळोवेळी आलेले आहे. परंतु इंडिया गर्व्हमेंट मिंट येथे वजन करतांना सर्व वस्तूंचे एकत्रित वजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे वरील फरक दिसून येत आहे. सदरचे शुध्द सोने व चांदी इंडिया गर्व्हमेंट मिंट यांचेकडेच असून त्याचा वापर नाणी व पेंन्डटस तयार करुन घेणेकामी करण्यात येत आहे.

तरी संस्थानने इंडिया गर्व्हमेंट मिंट, मुंबई यांचेकडे हस्तांतरीत केलेल्या सोने चांदी वस्तु अलंकार वितळविणे व रिफायनींग करणेकामी सोन्यामध्ये आलेली घट १५४७.८४७ ग्रॅम्स व चांदीमध्ये आलेली घट ६५०७२.००० ग्रॅम्स यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१५ सन २००७-२००८ या वर्षाच्या दोष दुरुस्ती अहवालास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८७** सन २००७-०८या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी मे.शरद एस. गायकवाड, चार्टर्ड, अकौंटट, मुंबई यांची नियुक्ती शासनपत्र क्र.सा.सं.वि.२००८/९८/८१६१ का.सोळा, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुबंई दि.३१ मे, २००८ अन्वये करण्यात आली होती. त्यास अनुसरून त्यांनी सदर कामकाज पूर्ण केले असून, त्या संदर्भातील लेखापरिक्षणाचा अहवाल संस्थानकडे दि.२९ सप्टेंबर,२००८ रोजी सादर केला आहे. अधिनियम २००४ मधिल तरतुदी अन्वये सदर अहवालाची एक प्रत मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई व एक प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई. यांना सादर करण्यात आलेली आहे. तसेच सदरचा वार्षिक अहवाल माहे डिसेंबर-२००८ मध्ये झालेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर सादर झालेला आहे.

सदर लेखापरिक्षण अहवालातील मुद्या संदर्भातील दोष दुरूस्ती बाबतचा अहवाल सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात येणा-या वैधानिक लेखापरिक्षक यांना उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. त्या अनुशंगाने उपरोक्त लेखापरिक्षण अहवालातील मुद्दांचा दोष दुरूस्ती अहवाल तयार करणे कामी, सदर अहवालाच्या प्रती संस्थानचे सन २००८-०९ या आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात आलेले अंतर्गत लेखापरिक्षक शास्त्री पुरोहित ॲण्ड असो.पुणे व पूर्व लेखापरिक्षक श्री.अे.जी. लोंगाणी, चार्टर्ड अकौंटटस्, कोपरगाव यांना पाठविण्यात आल्या होत्या.

त्यास अनुसरून सदर अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल,उपरोक्त दोन्हीं सस्थांच्या मार्गदर्शनानुसार तयार करण्यात आलेला असून, अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे. तरी सदर दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेवून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१६ दिनांक ०१ जानेवारी २००९ रोजी झालेल्या प्रमाणित मौल्यवान हिरे व जवाहरांच्या लिलावातील उर्वरित वस्तुंबाबत.**

**निर्णय क्र.८८** श्री साईभक्तांकडून संस्थानला देणगी स्वरुपात मौल्यवान हिरे व जवाहर, अलंकार वस्तुं प्राप्त होत असतात. या मौल्यवान हिरे व जवाहरांची भक्तांना प्रसादरुपी विक्री करणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सासंवि-२००५/४०७/(६४)-का.सोळा, मंत्रालय, मुंबई. दि.३१/०५/२००७ नुसार शासनाची मान्यता मिळाली आहे. तसेच व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.११.२००८ चे सभेतील निर्णय ८३८ अन्वये लिलावाव्दारे विक्री करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त मान्यतेनुसार नववर्षारंभाच्या मुहुर्तावर गुरुवार दिनांक ०१ जानेवारी, २००९ रोजी सकाळी १०.०० वाजलेपासून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेस प्राप्त झालेले रूपये १०,०००/- व त्यापेक्षा जास्त किंमतीच्या मौल्यवान हिरे व जवाहरांचा जाहीर लिलाव करण्यात आला. या लिलावात ठेवण्यात येणाऱ्या वस्तुंची किंमत, संस्थाननियुक्त शासनमान्य मुल्यांकनकारांकडून ठरवून घेण्यात आली तसेच वजन, कॅरेट व इतर तांत्रिक बाबी त्यांचेकडून निश्चित करुन घेण्यात आल्या होत्या.

लिलावात ठेवण्यात आलेल्या वस्तुंची जाहीर बोलीव्दारे तिनवार करुन लिलाव अंतिम करण्यात आला होता. लिलावामध्ये एकुण ६४ वस्तू ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी सदर लिलावात २२ वस्तूंची विक्री झालेली आहे. त्यापासून संस्थानला रक्कम रू.९,३५,६११/- (अक्षरी रक्कम रूपये नऊ लाख पस्तीस हजार सहाशे अकरा) मात्र प्राप्त झालेली आहे. उर्वरीत ४४ वस्तू संस्थानचे स्ट्रॉंग रूम मध्ये ठेवण्यात आलेल्या आहेत.

सदरच्या उर्वरीत ४४ वस्तूंची किंमत रू.२७,११,१५१/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तावीस लाख अकरा हजार एकशे एक्कावन्न) मात्र एवढी आहे. तरी सदरचे उर्वरीत मौल्यवान हिरे/जवाहर, पुन्हा लिलावाचे आयोजन करून विक्री करणे किंवा यापुर्वी संस्थानचे कापडकोठी विभागामार्फत विक्री होत असलेल्या रू.१०,०००/- पेक्षा कमी किंमतीच्या खडयांप्रमाणे, या ४४ वस्तूंपैकी सर्व अथवा निवडक वस्तू टप्प्या-टप्प्याने कापडकोठीमार्फत विक्रीकरणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,उर्वरित मौल्यवान हिरे/जवाहर यांची यापूर्वी संस्थानचे कापडकोठी विभागामार्फत विक्री होत असलेल्या रुपये १० हजारापेक्षा कमी किंमतीच्या खड्याप्रमाणे या ४४ वस्तूंची किंमत ठरवून, ठरविलेल्या किंमतीपेक्षा रु.१/- जादा आकारुन टप्प्या-टप्प्याने कापडकोठी विभागामार्फत विक्री करण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१७** **सोने नाण्यांच्या विक्री किमतीच्या बदलाबाबत.**

**निर्णय क्र.८९** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रींची प्रतिमा असलेली सोन्याची ५ ग्रॅम,१० ग्रॅम वजनाची व चांदीची २० ग्रॅम वजनाची नाणी तसेच २.५ ग्रॅम सोन्याचे पेंडन्टस साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै,२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ -नुसार धोरणात्मक निर्णय घेण्यात आला की, येथुनपुढे सोने-चांदीच्या बाजाराभावात वेळोवेळी जसजशी वाढ अथवा घट होईल त्याप्रमाणात सोने-चांदीच्या नाण्यांच्या विक्री मुल्यात वाढ अथवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये, दिनांक १९ सप्टेंबर,२००८ ते २९ जानेवारी ,२००९ अखेर या कालावधीत सोने व चांदीचे बाजारभावात वाढ तथा घट ( संदर्भ :- *दैनिक सकाळ व इक्वॉनामिक टाईम्स* ) झाल्याने मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात वेळोवेळी, सोने चांदी नाणी व पेडेंन्टसच्या विक्री मुल्यात बदल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रमाणे विक्री मुल्यात केलेल्या बदलाचे विवरण खालील प्रमाणे-

| अ.क्र. | दरात बदल केल्याचा दिनांक | सोने २.५ ग्रॅम | सोने ५ ग्रॅम | सोने १० ग्रॅम | चांदी २० ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | १९/०९/२००८ | ३६००/- | ७०००/- | १३,८००/- | ६००/- |
| ०२. | ०२/१०/२००८ | ३७००/- | ७२००/- | १४,१५०/- | ६००/- |
| ०३. | ११/१०/२००८ | ३८५०/- | ७४५०/- | १४,७००/- | ६००/- |
| ०४. | २२/१०/२००८ | ३५००/- | ६८५०/- | १३,४५०/- | ५५०/- |
| ०५. | ०१/०१/२००९ | ३७५०/- | ७२५०/- | १४३००/- | ५५०/- |
| ०६. | २९/०१/२००९ | ३८५०/- | ७४५०/- | १४७००/- | ५५०/- |

तरी मा.व्यवस्थापन समितीचे आजचे सभेसमोर सोने- चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेडेंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १९ सप्टेंबर, २००८ ते दिनांक २९ जानेवारी, २००९ या कालावधीत विक्री मुल्यात वेळोवेळी केलेल्या वाढ तथा घटीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१८** **वर्मा वुड लाकडांचे आकर्षक व कोरीव काम केलेले दरवाजे देणगी दाखल स्वीकारणे बाबत**

**निर्णय क्र.९०** **अ)** श्री चे समाधी मंदिरातील मुर्तीचे बाजूस असलेले मोठे लाकडी दरवाजे (बाहेर पडण्याचे मार्गावरील) झिजलेले असल्याने व सदर दरवाज्यांचे चौकटी हालत असल्यामुळे सध्या तात्पुरती दुरुस्ती करणेत आलेली आहे. दोन्ही दरवाजे बदलणे व सदरचे सागवणी दरवाजे देणगी दाखल स्विकारणे बाबत अधिक्षक मंदिर विभाग यांनी त्यांचेकडील दि. २३.०७.२००८ चे मंजूर टिपणी अन्वये कळविले आहे.

यापुर्वी श्री. एम. आर. सोमण व कुटूंबीय, कोईमतूर, सध्या मुक्काम अबुधाबी यांनी समाधी मंदिर उत्तर बाजू व समाधि मंदिर दक्षिण बाजूकडील (रथ गेट) दरवाजा व समाधी मंदिर नारळी गेट कडील दरवाजा असे एकुण ०३ नग दरवाजे रु. १४.०० लक्ष मात्र रकमेचे तयार करुन जागेवर बसवून दिले आहेत.

त्याच पध्दतीचे दरवाजे श्री.सोमण कुटूंबीय, कोईमतूर, सध्या मुक्काम अबुधाबी यांनी पूर्वी देणगी दाखल दिलेल्या दरवाजाप्रमाणेच, आकर्षक कोरीव नक्षीकाम केलेले सागवान बर्मा टिकवूडचे ०२ नग दरवाजे समाधी मंदिरातून बाहेर पडण्याच्या मार्गावर देणगी दाखल बसवमन देण्याची दि.२७.१०.२००८ चे पत्राने इच्छा व्यक्त केली आहे.

**ब)** तसेच अधिक्षक, मंदिर विभाग यांनी पुढे कळविले आहे की, सुवर्ण सिंहासन बसविण्यात आलेनंतर त्याचे मुळ सोन्याचे खांब (प्रभावळ ज्याच्यावर उभी आहे) मार्बल कठड्यांमुळे झाकले जात आहेत. करीता सदर मार्बल कठड्याची लांबी कमी करावी.

तरी उपरोक्त परिच्छेद **"अ"** मध्ये नमुद केल्याप्रमाणे समाधी मंदिरातील श्रींचे मुर्तीचे बाजूकडील दोन दरवाजे श्री.एम.आर.सोमण व कुटूंबीय,कोईमत्तूर,सध्या मुक्काम अबुधाबी यांनी सागवानी दरवाजे देणगी म्हणून स्विकारणेबाबत व परिछेद **" ब "**नुसार श्रींचे समाधि मार्बल कठड्यांची लांबी कमी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१९** **शिर्डी येथील सर्व्हे नं.११४/९ क्षेत्र ०० हे २० आर व सर्व्हे नं.१२५/३ क्षेत्र ०० हे १२ आर (सिटी सर्व्हे नं. १००१ ते १०१०) पाटबंधारे खात्याचे जागेबाबत.**

**निर्णय क्र.९१** **(अ)** मौजे शिर्डी येथे पाटबंधारे खात्याची खाली नमूद केलेली जागा / जमीन अहमदनगर-मनमाड रस्त्यालगत, मेसर्स जाधव यांचे पेटोलपंपाच्या लगत दक्षिणेस आहे.

| अ.नं. | सर्व्हे नंबर | क्षेत्र |
|---|---|---|
| ०१ | ११४/९ | ०० हे २० आर |
| ०२ | १२५/३ | ०० हे १२ आर |
| | एकूण | ०० हे ३२ आर |

उपरोक्त जमिनीचे जागेचे सिटी सर्व्हे नंबर १००१ ते १०१० झालेले आहेत.

विषयांकित जागा संस्थानला मिळाल्यास, या ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी मध्यवर्ती खोली आरक्षण व माहिती केंद्राकरीता तीन मजली इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे.

मा.अध्यक्षसो. यांनी सदरची जागा संस्थानला मिळावी म्हणून मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. राज्यमंत्री, जलसंपदा विभाग यांचेकडेस अनुक्रमे दिनांक ३१ मे, २००८ व १५ सप्टेंबर, २००८ रोजीचे पत्रान्वये केलेली आहे.

**(ब)** विषयांकित जागेत सध्या शाखा अभियंता, सिंचन विभाग, शिर्डी यांचे कार्यालय व कर्मचारी वसाहत आहे. सध्या याठिकाणी ०१ मंदिर, शाखा अभियंता यांचे कार्यालय १, शाखा अभियंता यांचे निवासस्थान १, वर्ग ३ चे निवासस्थाने ३, वर्ग ४ चे निवासस्थान १ असे अंदाजे एकूण बांधीव क्षेत्र ६४७५ चौरस फुट आहे.

विषयांकित जागा संस्थानला मिळाल्यास संस्थान सदरहू जागेत पाटबंधारे खात्यास खाली प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यालयबरोबरच अतिथीगृह व कर्मचारी निवासस्थाने बांधून देणेस तयार आहे. उर्वरित जागेत संस्थान साईभक्तांसाठी मध्यवर्ती खोली आरक्षणासह माहिती केंद्र व लॉकर्स तसेच साईभक्तांकरीता इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देता येईल.

| अ.नं. | तपशील | सध्याचे बांधकाम अंदाजे | प्रस्तावित बांधकाम अंदाजे | प्रस्तावित बांधकामाचा अंदाजे दर | प्रस्तावित बांधकामाची अंदाजे किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री दत्त मंदिर | ४०० चौ.फुट | ०४०० चौ.फुट | १०००/- | ०४,००,०००/- |
| ०२ | शाखा अभियंता यांचे कार्यालय | ८७० चौ.फुट | १००० चौ.फुट | १५००/- | १५,००,०००/- |
| ०३ | अतिथीगृह (०२ सदनिका) | -- | १००० चौ.फुट | २०००/- | २०,००,०००/- |
| ०४ | शाखा अभियंता यांचे निवासस्थान (१ सदनिका) | ८०० चौ.फुट | १००० चौ.फुट | १०००/- | १०,००,०००/- |
| ०५ | वर्ग ३ चे कर्मचारी (३ सदनिका) | ४०३२ चौ.फुट | २४०० चौ.फुट | १०००/- | २४,००,०००/- |
| ०६ | वर्ग ४ चे कर्मचारी (१ सदनिका) | १२०० चौ.फुट | ०७०० चौ.फुट | १०००/- | ०७,००,०००/- |
| | एकूण - | ७३०२ चौ.फुट | ६५०० चौ.फुट | | ८०,००,०००/- |
| | | | | +/- ५% | ८४,००,०००/- |

सदरहू प्रस्तावित बांधकाम सर्वसोयींनीयुक्त असे असून, त्यामध्ये स्वतंत्र पाण्याची टाकी, कार्यालयासाठी स्वच्छतागृह, वाहनतळासाठी पुरेशी जागा, जागेचे सुशोभिकरण आदींचा समावेश आहे.

तसेच याठिकाणी साईभक्तांसाठी मध्यवर्ती खोली आरक्षण व माहिती केंद्रासह लॉकर्स सुविधा निर्माण करुन देणेकामी संस्थानसाठी स्वतंत्ररित्या इमारत तसेच भविष्यात संस्थानच्या गरजेनुसार आवश्यकतेनुसार बांधकाम करणेत येईल.

**(क)** विषयांकित जमिनीचे सर्व्हे नंबर ११४/९ व सर्व्हे नंबर १२५/३ चे सिटी सर्व्हे नंबर १००१ ते १०१० झालेले आहेत. शासकीय मुल्यांकन तक्त्यात त्याच्या किंमती खालीलप्रमाणे आहेत :

| अ.नं. | विभाग क्रमांक | तपशील | दर प्रति चौरस मीटर |
|---|---|---|---|
| ०१ | १/२० | उर्वरित सर्व मिळकती सर्व्हे नंबर १२५ | रुपये १८००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सि.स.नं. ९४४, १०१, १०२, १००३, १००४, १००५, १००६ | |
| ०२ | १/२३ | मनमाड हायवे लगत सर्व्हे नंबर ११२ / सि.स.नं. १००७, १००८, १००९, १०१० | रुपये ४५००/- |

उपरोक्त तक्त्यातील, अ.नं. ०१ व ०२ मधील दोन विभाग वेगवेगळे दाखविले असलेतरी, दोन्ही जागा या अहमदनगर-मनमाड रस्त्यालगत आहेत. त्याप्रमाणे त्याचा दर रुपये ४५००/- प्रति चौरस मीटर धरणे उचित राहिल. त्याची अंदाजे किंमत रक्कम रुपये १.४४ कोटी इतकी होत आहे. सदरहू रक्कमेमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या बांधकामाची किंमत गृहीत धरलेली नाही.

**(ड)** विषयांकित जमिनीचे मागणी संदर्भात मा. ना. डॉ. सुनिल देशमुख, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २००८ रोजी शिर्डी येथील संस्थानच्या कार्यालयात बैठक बोलाविली होती, सदरहू बैठकीस मा. अध्यक्षसो. व संस्थानचे इतर अधिकारी उपस्थित होते. सदरहू बैठकीचा वृत्तांत मा. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २००८ रोजीचे पत्रासोबत इकडील कार्यालयास पाठविला आहे, त्यात असे नमूद केले आहे की :

. .. शिर्डी येथील स.नं. ११४/९ मधील २० आर व स.नं. १२५/३ मधील १२ आर अशी एकूण ३२ आर जमीन जलसंपदा विभागाच्या ताब्यात असुन तेथे शाखा कार्यालय व निवासस्थाने आहे. सदर जागा हस्तांतरण करणेचे दृष्टीने दोन पर्याय निश्चित झाले.

पर्याय एक प्रमाणे सदर जागेत जलसंपदा व संस्थान यांच्या मागणीकृत प्रस्तावित इमारतीचा ले-आऊट वास्तुविशारदाकडून संस्थानने तयार करावा व जलसंपदा विभागाकडे दाखल करावा.

पर्याय दोन मध्ये सदरचे जागेत जलसंपदा विभागाची निवासस्थाने वगळून उर्वरित बांधकामे व संस्थानची प्रस्तावित बांधकामे यांचा ले-आऊट संस्थानने वास्तुविशारदाकडून तयार करुन जलसंपदा विभागाकडे द्यावा. तसेच जलसंपदाचे निवासस्थानासाठी भुखंड निश्चित करुन त्याचा लेआऊट संस्थानाने वास्तुविशारदाकडून तयार करुन जलसंपदा विभागाकडे दाखल करावा.

संस्थानला दिलेल्या जागेसाठी भाडेपट्टा आकारणी करु नये या मागणीबाबत मा.ना.जलसंपदा मंत्रीमहोदयाकडे बैठक घेऊन खास बाब म्हणून निर्णयासाठी प्रस्ताव सादर करावा.

तरी उपरोक्त परिच्छेद "अ", " ब" व " क" मध्ये नमूद केलेप्रमाणे मौजे शिर्डी येथील पाटबंधारे खात्याची ३२ आर जागा संस्थान प्राप्त करुन घेऊन, त्याठिकाणी साईभक्तांसाठी मध्यवर्ती खोली वाटप व माहिती केंद्रासाठी इमारतीचे बांधकाम तसेच भविष्यात संस्थानच्या गरजेनुसार/आवश्यकतेनुसार बांधकाम करता येईल. तथापि याकामी परिच्छेद " ड " मध्ये पाटबंधारे खात्याने सुचविलेल्या दोन पर्यायानुसार वास्तुविशारदांकडून प्राथमिक स्वरुपाचे ले-आऊट व बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन पाटबंधारे खात्याकडे पाठविणेसाठी वास्तुविशारदाची नेमणुक होणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास तसेच श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार सदरहू प्रस्ताव मान्यतेस्तव मा. विधी व न्याय विभागाकडे पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२०** **श्री साईबाबा संस्थान मार्फत शिर्डी-शनिशिंगणापूर रस्त्याची सुधारणा करणेकरिता वाढीव निधी उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.९२** शिर्डी शनि- शिंगणापूर रस्त्याची सुधारणा करण्याकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या निधीतून ५.४३ कोटी इतका निधी उपलबध करुन देणेस शासन निर्णय क्र. सासंवि-२००५/६०६/(११८)-का सोळा, दिनांक २८ जून,२००६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ५.४३ कोटी इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत कार्यकारी अभियंता, जा. बँ. प्रकल्प, (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांचेकडे वर्ग करणेत आलेला आहे.

कार्यकारी अभियंता, जा. बँ. प्रकल्प, (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांनी सादर केलेले सुधारीत एकूण रु. १०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव दि. ०६ नोव्हेंबर, २००८ अन्वये मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे सादर करणेत आला होता. त्यास अनुसरुन शासनाने दिनांक १० डिसेंबर २००८ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

" सदर प्रस्तावित रस्ते सुधारणेच्या कामांकरीता केंद्र शासन, राज्य शासन तसेच शनि- शिंगणापूर देवस्थानकडून आवश्यक निधी, कार्यकारी अभियंता, जा. बँ. प्रकल्प, (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांना उपलब्ध करुन दिल्यानंतर व कामाच्या प्रगतीनुसार शिर्डी संस्थानकडून उर्वरीत निधीसाठी प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा असा निर्णय घेण्यात आला आहे. "

वरिल प्रमाणे मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी कळविलेले पत्राची छायांकीत प्रत कार्यकारी अभियंता, जा. बँ. प्रकल्प, (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांना कळविणेत आलेले आहे.

कार्यकारी अभियंता, जा. बँ. प्रकल्प, (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांनी दि. ११.१२.२००८ चे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

" शिर्डी ते शनिशिंगणापूर ते रामा ६० रस्ता भाग पिंपळवाडी ते मालूंजे या भागातील रस्त्याची सुधारणा करण्याचे काम चालू आहे. गणेशनगर सहकारी साखर कारखाण्यासमोरील रस्ता व कॅनाल यांचे मधील अतिक्रमणे पाटबंधारे खात्याने काढलेली आहेत, या भागात गणेशनगर सहकारी साखर कारखान्याकडे जाणाऱ्या ऊसाच्या बैलगाड्या ट्रक्टर, ट्रक ची वाहतूक फार मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे ९०० मी. लांबीचे सदर रस्त्याचे ११ मी. रुंदीस डांबरीकरणाचे काम करणेसाठी मा. आ. श्री. विखे पाटील यांनी सुचविले आहे. त्याप्रमाणे मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जास्त रुदीकरणासाठी (७.०० ते ११.०० मी.) जादा खर्च येणार आहे. त्यामुळे जादा करावयाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन मान्यतेसाठी व आवश्यक जास्तीचा निधी रु. ४३.०० लक्ष उपलब्ध करुन देणेसाठी मान्यता द्यावी व जास्तीचा निधी वर्ग करावा हि विनंती."

तरी वरिल प्रमाणे कार्यकारी अभियंता, जा. बँ. प्रकल्प, (सा. बा.) विभाग, अहमदनगर यांनी सदर रस्त्याचे वाढीव कामासाठी कळविलेले जास्त रक्कम रु. ४३.०० लक्ष मात्र निधी वर्ग करणेकामी शासनाची विहीत पध्दतीने मान्यता घ्यावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२१** **राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचे कायदेशिर अधिकार दान करण्यात येणाऱ्या जमिनींबाबत.**

**निर्णय क्र.९३** **(अ)** मा. कार्यकारी विश्वस्त, राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांचे दिनांक २० ऑक्टोबर, २००८ रोजी तसेच दिनांक ०८ ऑक्टोबर, २००८ रोजीच्या पत्रामध्ये खालील नमुद केलेल्या जमिनीबाबत त्यांचे असलेले कायदेशीर अधिकार त्यांनी संस्थानला देऊ केलेले आहेत :

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | कब्जेदार सदरी असलेली नांवे |
|---|---|---|---|
| ०१ | २९४ | ०५-९०-०० | राजेंद्र चांदमल भनसाळी / सुभाष चांदमल भनसाळी |
| ०२ | २७३ | ०१-९२-०० | भिमबाई बाबुराव कहांडळ |
| ०३ | २७४ | ००-७४-०० | एकनाथ सहादु पठारे / शिवनाथ सहादु पठारे / रेल्वे कडे |
| ०४ | २८८ अ | ०३-०६-०० | लखीचंद कचरदास भंडारी |
| ०५ | २८८ ब | ००-५४-०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| ०६ | २८८ क | ००-९७-०० | पुष्पाताई लखीचंद भंडारी |
| | एकूण | १३-१३-०० | |

याबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे :

. .. उपरोक्त जमिनींबाबत दर्यानानी ट्रस्टकडे काय अधिकार आहेत तसेच सदरहू जमिनींबाबत कोण-कोणत्या न्यायालयामध्ये दावे चालू आहेत, सदरहू दाव्यांची सद्य:स्थिती काय आहे याबाबतची सविस्तर माहिती दर्यानानी ट्रस्ट यांचेकडून घेण्यात यावी. दर्यानानी ट्रस्टकडून प्राप्त होणारी माहिती व त्या अनुषंगिक कागदपत्रे संस्थान वकिलांकडे सादर करुन, संस्थान वकिलांचा त्यावर सुस्पष्ट व सविस्तर अभिप्राय घेण्यात यावा. संस्थान वकिलांचे कायदेशीर मार्गदर्शनाने व सल्ल्याने यापुर्वीच्या ठरावानुसार खरेदीची कार्यवाही करण्यात यावी. सदरहू जमिनींबाबत कायदेशीर अभिप्राय घेणे, त्यासाठी विविध कार्यालयातून कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे, खरेदी खतासाठी आवश्यक सर्च रिपोर्ट घेणे, खरेदीखतासाठी आवश्यक मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, वकील फी व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावशेक खर्चास मान्यता देण्यांत आली.

**(ब)** त्यानंतर दिनांक ०३ जानेवारी, २००९ रोजीच्या अर्जाव्दारे / पत्राव्दारे श्री. संग्राम माधवराव देशमुख यांनी असे कळविले आहे की, सदरच्या जमिनी खरेदी करणेबाबत संबंधित जमीनमालकाशी विसारपावती करुन दिलेली आहे तथापि सदर जमीनमालक खरेदी करुन द्यावयास तयार नाहीत म्हणून कोपरगांव येथील मा. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर येथे स्पे.मु.नं. ४९/२००८ दाखल केला आहे. तसेच सदरहू अर्जात श्री. देशमुख यांनी नमूद केलेल्या बाबींबाबत कार्यालयाची टिपणी खालील विषद केली आहे.

<table>
<tr><th>अ.नं.</th><th>अर्जदार श्री. देशमुख यांचे म्हणणे</th><th>कार्यालयीन टिपणी</th></tr>
<tr><td>०१</td><td>मुळ जमीन मालक श्री.राजेंद्र चंदनमल भनसाळी, श्री. सुभाष चंदनमल भनसाळी, सौ. पुष्पाबाई लखीचंद भंडारी, श्री. लखीचंद भंडारी यांचेबरोबर त्यांनी एकूण १० हे ४७ आर एवढया क्षेत्राचा करार केलेला आहे. वर वर्णन केलेली मिळकत कायम खरेदी करुन मिळावी म्हणून त्यांनी कोपरगांव येथील सिव्हील जज्ज, सिनीयर डिव्हीजन यांचे</td><td>अर्जासोबत अर्जदार यांनी स्पे.मु.नं. ४९/२००८ च्या दाव्याची छायांकित प्रत जोडली आहे. त्यात वर्णन केलेल्या जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे :<br><table><tr><th>गट नंबर</th><th>क्षेत्र हे-आर</th><th>जमीनमालकाचे नांव</th></tr><tr><td>२८८/ब</td><td>००.५४</td><td>सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी</td></tr><tr><td>२८८/क</td><td>००.९७</td><td>सौ.पुष्पाताई लखीचंद भंडारी</td></tr><tr><td>२८८/अ</td><td>०३.०६</td><td>लखीचंद कचरदास भंडारी</td></tr><tr><td>२९४ पै</td><td>०२.९५५</td><td>राजेंद्र चंदनमल भनसाळी</td></tr></table></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | कोर्टात स्पे.मु.नं. ४९/२००८ दावा केलेला आहे. | २९४ पै / ०२.९४५ / राजेंद्र चंदनमल भनसाळी<br>उपरोक्त जमिनीचे ७/१२ उतारे पाहिले असतां, गट नंबर २९४ खालीलप्रमाणे क्षेत्र आहे :<br>२९४ पै २.९५१/२ राजेंद्र चंदनमल भनसाळी<br>२९४ पै २.९४१/२ सुभाष चंदनमल भनसाळी<br>राधा कलियनदास ट्रस्टने अधिकार देऊ केलेल्या एकंदर सहा जमिनीमध्ये वर नमुद केलेल्या जमिनी आहेत.<br>अर्जदाराने कराराची नक्कल दिली नसली तरी दाव्यांमध्ये त्याचा उल्लेख आहे. तसेच सदर जमिनीच्या इतर हक्कामध्ये फेरफार क्रमांक ४०८७ ने खालीलप्रमाणे नोंद झालेली आहे :<br>संग्राम माधवराव देशमुख लीज पेंडन्सी करुन घेणार<br>परंतु अद्यापपावेतो सदर नोंद मा.मंडलाधिकारी यांनी मंजूर केलेली नाही.<br>दाव्याची छायांकित प्रत पाहतां व फेरफार क्रमांक ४०८७ ची नोंद पाहतां अर्जदाराने संबंधीत जमिन मालकांशी करार केला हे सकृतदर्शनी दिसून येत आहे. |
| ०२ | सदर दाव्यात मा. न्यायालयाने स्थगिती दिलेली असून दावा मे. न्यायालयात प्रलंबित आहे. संबंधीत दर्यानानी ट्रस्ट या दाव्यात सामील आहे.<br>संबंधीत दाव्यात दर्यानानी यांना कोणताही कायदेशीर अधिकार नाही.<br>दर्यानानी यांचेत व मुळ मालकात हक्क नष्ट करणेसाठी त्यांनी तथाकथित तडजोड केली आहे. | दाव्याच्या अर्जावर मा. न्यायालयाने जैसे थे परिस्थिती प्रतिवादीचे म्हणणे येईपर्यन्त ठेवणेचा आदेश दिलेला आहे.<br><br>ही बाब न्यायालयात निश्चित होईल.<br><br>तडजोडी केलेबाबत कोणतेही कागदपत्र अर्जदार यांनी हजर केलेले नाहीत. |
| ०३ | संबंधित जमीन संस्थानने विकत घेणे म्हणजे वाद विकत घेण्यासारखे होईल. | वर नमुद केलेल्या जमिनीबाबत न्यायालयातील वाद मिटल्यावर जमीन विकत घेता येईल. |
| ०४ | श्री साईबाबा संस्थान यांनी कोणताही ठराव करणे म्हणजे मा.न्यायालयाचा अवमान होईल. साई संस्थान, शिर्डी यांना अडचणीत आणण्यासाठी संबंधित जमिनीचे हक्क दान देणेचे संदर्भात कोणताही ठराव होऊ नये, ही न्रम विनंती. | याबाबत संस्थान वकीलांचा अभिप्राय घेता येईल. |

वरील विवेचनावरुन मा. कार्यकारी विश्वस्त, राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट यांनी त्यांचे उपरोक्त जमिनीबाबत देऊ केलेले हक्क स्वीकारणेबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत चर्चा होऊन निर्णय होणे उचित राहिल. तथापि मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या सभेत उपरोक्त जमिनींबाबत संस्थान वकीलांचा कायदेशीर अभिप्राय घेणेत यावा, असे नमुद केलेले आहे. त्यासाठी उपरोक्त जमिनींचे फेरफार व इतर कागदपत्रे संकलित करण्यात येत आहेत. सदरहू कागदपत्रे प्राप्त झाल्यावर संस्थान वकीलांचा अभिप्राय घेणेबाबत अलाहिदा कार्यवाही करणेत येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त जमिनीबाबत कायदेशीर बाबींची पूर्तता झालेनंतर योग्य ती कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही -बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२२** **साईनाथ रुग्णालयासाठी फर्निचर करणे बाबत.**

**निर्णय क्र.९४** साईनाथ रुग्णालयाचे नूतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच धर्मशाळा क्र. ०१ च्या इमारतीत साईनाथ रुग्णालयासाठी करावयाची आवश्यक त्या फेरबदलाची कामे प्रगतीपथावर आहे. साईनाथ रुग्णालयाने त्यांचे उपरोक्त संदर्भिय डी.पी. अन्वये कळविले प्रमाणे खालीलप्रमाणे फर्निचर आवश्यक आहे. साईनाथ रुग्णायाचे सध्या वापरात असलेल्या चौकशी काउंटर समोर गर्दी होते. तसेच त्या काउंटरवर संगणक ठेवणेसाठी जागा नसल्याने त्याचा वापर करता येत नाही. यासाठी नविन चौकशी काउंटर बनवणे गरजेचे आहे.

तसेच नूतनीकरण करण्यात आलेल्या गोळ्या औषध वाटप कक्षामध्येही काही फर्निचर करणे आवश्यक आहे. तसेच साईनाथ रुग्णालयाचे मेडीकल सब स्टोअर येथे गोळ्या औषधे देणेसाठी फर्निचर करणे आवश्यक आहे.

सदरचे कामासाठी संस्थानचे आर्किटेक्ट पॅनल वरील आर्किटेक्ट शितल जोशी, श्रीरामपूर यांचेकडून प्लॅन व एस्टीमेट तयार करुन घेता येईल. या कामासाठी अंदाजे रक्कम रुपये ३,५३,०००.००

मात्र खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२३ श्री रामनवमी उत्सव २००८ मध्ये भक्तांसाठी खरेदी करण्यात आलेल्या पाण्याचे पाऊच खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९५** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७.०७.२००८ मधील निर्णय क्र.२६६ नुसार श्री साईंचे दर्शनासाठी शिर्डीस येणाऱ्या भक्तांना दर्शन लाईनमध्ये पिण्याचे पाण्याची व्यवस्था ठेवावी, त्यासाठी आवश्यकतेनुसार पिण्याच्या पाण्याचे पाऊच खरेदी करावे, असा निर्णय झालेला आहे. श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांचे संख्येत अचानक वाढ होते व दर्शनसाठी लाईन लागतात अशा वेळी लाईनमध्ये पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी लागते, त्यामुळे वेळोवेळी पाण्याचे पाऊच खरेदी करणेत आलेले आहेत.

चौकशी विभागाने त्यांचे दि.०१.०४.२००८ चे प्रस्तावाने संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव २००८ दि.१२/०४/२००८ ते दि.१४/०४/२००८ असा साजरा होणार असल्याने श्री साईभक्तांची गर्दीचा अपेक्षित विचार करुन २.५० लाख पाऊच खरेदी करुन मागितलेले होते. त्यानुसार विहीत पद्धीने दरपत्रके मागविणेत येऊन मे.गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना रु.०.७० पैसे प्रती नग या न्युनतम दराने रक्कम रु.१,७५,०००/- चा पुरवठा आदेश देणेत येऊन आवश्यकतेनुसार १,०३,००० नग पाण्याचे पाऊच खरेदी करणेत आलेले आहे. त्यासाठी रु.७२,१००/- खर्च आलेला आहे.

तरी श्री रामनवमी उत्सवाचे कालावधीत, साईभक्तांच्या सेवेसाठी मे.गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांचेकडून खरेदी करणेत आलेल्या १,०३,००० नग पाण्याचे पाऊच खरेदीस व त्याकामी आलेल्या रक्कम रु.७२,१००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.२४ (अ) नवीन साईप्रसादालयासाठी रबरी पायपुसणे, काथ्याचे पायपुसने व नवीन भक्तनिवास किचनशेडकरीता साहित्य खरेदीस मान्यता मिळणे बाबत**

**(ब) भक्तनिवासस्थानशेड किचन जाळया व गेटसाठी एम.एस.साहित्य खरेदी बाबत**

**निर्णय क्र.९६** **अ)** प्रसादालय विभागाने दि.११.१२.२००८ चे प्रस्तावाने नविन श्री साई प्रसादालय तातडीने सुरु करावयाचे असल्याने तेथील सर्व दरवाजाचे बाहेर ठेवणेसाठी आवश्यक असणारे रबरी व काथ्याचे पायपुसणे तसेच दरवाजा कुलूपे खरेदी करुन मागितलेले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | साईज | मागणी |
|---|---|---|---|
| ०१. | रबरी पायपुसणे | ५ फुट X ३ फुट | २४ नग |
| ०२. | रबरी पायपुसणे | २ फुट X ३ फुट | १२ नग |
| ०३. | काथ्याचे पायपुसणे | ५ फुट X ३ फुट | २४ नग |
| ०४. | काथ्याचे पायपुसणे | २ फुट X ३ फुट | १२ नग |
| ०५. | कुलपा - लिंक कंपनी | अटुट, ५०एमएम,६लिवर | ३६ नग |

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-प्रसाद/१८४९७/२००८ दि.१८.१२.२००८ अन्वये दरपत्रकांची मागणी करणेत येऊन न्युनतम दराने खालील पुरवठाधारकाना आदेश देणेत आलेले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव व गांव | तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | सिद्धीविनायक एंटरप्राईजेस, जळगांव | रबरी पायपुसणे | रु.१८,८४०.०० |
| ०२. | काशिको ट्रेडींग प्रा.लि.,कोपरगांव | काथ्याचे पायपुसणे | रु.२३,०३४.२४ |
| ०३. | क्विक सप्लायर्स, नाशिक | लिंक कुलूपा | रु.४,८६०.०० |
| | | **एकुण** | ४६,७३४.२४ |

उपरोक्त पायपुसणे व कुलूपासाठी रु.४६,७३४.२४ खर्च आलेला आहे.

**ब)** विदयुत विभागाचे दि.०६.१०.२००८ मधील मंजूर प्रस्तावानुसार नविन भक्तनिवासस्थान येथील किचन शेडला जाळया व गेट तयार करणेसाठी आवश्यक असणारे एम.एस.हार्डवेअर साहित्य खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२२,५९०/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार मागविणेत आलेल्या दरपत्रकांतील न्युनतम दराने मे.हिंदुस्थान टुल्स ॲण्ड इंजिनीअरींग कंपनी, मुंबई यांना जा.नं.१७९७९ दि.०६.१२.२००८ अन्वये रक्कम रु.२४,६४८.४५ चा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. तथापि साहित्याचे वजन किलोमध्ये असल्याने रु.२५,७०३/- रकमेचे साहित्य पोहोच झालेले आहे. त्यामुळे मंजूरीपेक्षा ३,११३/- जादा खर्च आलेला आहे.

तरी नविन श्री साईप्रसादालयसाठी खरेदी केलेल्या पायपुसणे व कुलूपाचे खरेदीस व त्यासाठी आलेल्या रक्कम रु.४६,७३४.२४ चे खर्चास तसेच नविन भक्तनिवास येथील किचन शेड जाळया व गेटसाठी खरेदी करणेत आलेल्या एम.एस.हार्डवेअर साहित्य खरेदीसाठी मूळ मंजूरीपेक्षा जादा झालेल्या रक्कम रु.३,११३/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.२५ गुरुव्दारा सचखंड बोर्ड, यांचेकडे उपलब्ध असलेल्या गावरान तुपाबाबत.**

**निर्णय क्र.९७** मे.गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड यांनी त्यांचे क्र.५४१२/०८-०९ दि.२४.१२.२००८ चे पत्राने नांदेड येथे श्री गुरु ग्रंथचा कार्यक्रम साजरा करण्यात आलेला असून त्यासाठी वर्षभराचे गावरान तूप त्यांनी खरेदी केलेले होते. त्यामुळे त्यांचेकडे बऱ्याच प्रमाणात रेखा डेअरी इंडस्ट्रीज, इंदौर या फर्मचे मोदक ब्रॅण्ड असलेले ५५०० डब्बे गावरान तूप (८२५ क्विंटल) उपलब्ध असल्याचे कळविलेले असून निविदेत मान्य झालेल्या दराने खरेदी करणेची विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२००८ मधील निर्णय क्र.४४क (३) नुसार प्रसादालयामध्ये प्रसादलाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे ५८०० क्विंटल गावरान तूप (ॲगमार्क/लूज) दि.०१.०४.२००८ ते दि.३०.०९.२००८ व दि.०१.१०.२००८ ते दि.३१.०३.२००९ अशा दोन टप्प्यात निविदा मागणी करणेत येऊन खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दुसऱ्या सहामाहीसाठी आवश्यक असणारे २९०० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत आलेल्या होत्या. प्राप्त निविदा मा.व्यवस्थापन उपसमिती सभा दि.२४.१०.२००८ मध्ये उघडणेत येऊन उपस्थित निविदाधारकांशी झालेल्या चर्चेअंती आलेले दर खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव व गांव | ब्रॅण्ड व पुरवठा क्षमता | मुळ दर | वाटाघाटीनंतरचे दर (व्हॅटसह) |
|---|---|---|---|---|
| ०१. | रेखा डेअरी इंडस्ट्रीज, इंदौर | मोदक | १४८.५० | १३२.०० |
| ०२. | दिव्या एंटरप्राईजेस, इंदौर | धनश्री | १३९.५० | १३४.०० |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड | आबाद | १६८.४८ | १४४.५६ |
| ०४. | बाफणा बाजार, नाशिक | मधुरतन | १७३.६८ | १३९.०० |
| | | महारतन | १६४.३२ | १४२.०० |
| | | गोपी | १५४.९६ | १४१.०० |
| | | कान्हा | १५२.८८ | १३१.५० |

उपरोक्तपैकी मे.बाफणा बाजार, नाशिक यांचे कान्हा या ब्रॅण्डचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, मात्र मे.बाफना बाजार, नाशिक यांचा गावरान तूप पुरवठा वेळेत मागणीनुसार व योग्य न झाल्यास द्वितीय न्युनतम दर असलेले रेखा डेअरी, इंदौर यांचेकडून प्रती किलो रु.१३२/- या दराने खरेदी करण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार मे.बाफणा बाजार, नाशिक यांना जा.क्र.१५९०७ दि.२५.१०.२००८ अन्वये रु.१३१.५० प्रती किलो या सर्वसमावेशक दराने दि.२४.१०.२००८ ते दि.३१.०३.२००९ या कालावधीकरीता पुरवठा आदेश देणेत आलेला असून मागणीप्रमाणे व नमुन्याप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे.

मे.गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड यांचेकडे उपलब्ध असलेले गावरान तूप हे मे.रेखा डेअरीज, इंदौर यांचेकडील मोदक ब्रॅण्डचे असून त्यांनी निविदेत भाग घेतलेला होता. तथापि त्यांचे दर द्वितीय न्युनतम असल्याने मे.बाफणा बाजार, नाशिक यांचेकडून मागणीप्रमाणे पुरवठा न झाल्यास रेखा डेअरी, नांदेड यांचा विचार करणेत येईल असा निर्णय झालेला आहे. मात्र मे.बाफणा बाजार हे मागणीप्रमाणे व आवश्यक तेवढया तूपाचा पुरवठा करीत असल्याने गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड यांचेकडील मोदक ब्रॅण्डचे तूप घ्यावे किंवा कसे याबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड यांचेकडील मोदक ब्रॅण्डचे तूपाबाबत मा.विश्वस्त अशोक भिमशंकर खांबेकर व संस्थानचे अधिकारी यांनी समक्ष गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड येथे जाऊन प्रत्यक्ष पहाणी करुन सदर तूप खरेदीबाबत अहवाल व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.२६** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील नेत्र चिकित्सा विभाग श्री साईनाथ रुग्णालयाकडे स्थलांतरीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.९८** मा.व्यवस्थापन उपसमितीचे दिनांक २०.०९.२००८ चे सभेतील निर्णय व जा.क्र.एसएसएस/वशी-१/३०९१/२००८ दि.१६.१०.२००८ रोजीचा आदेशाअन्वये श्री साईनाथ रुग्णालयात नेत्र शल्य चिकित्सा विभागासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध झाल्यानंतर श्री साईबाबा हॉस्पिटलकडील नेत्ररोग विभाग व त्यासाठी नेमणूक करण्यात आलेले सर्व वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांना श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरित करणेत यावे, असा आदेश पारित झालेला आहे.

उपरोक्त निर्णयाच्या कार्यवाहीसाठी श्री साईनाथ रुग्णालयासाठी उपलब्ध झालेल्या अतिरिक्त जागेमध्ये (२०० रुम धर्मशाळा) नेत्र चिकित्सा विभागासाठी जागा सुनिश्चित करण्यात आली आहे.

दि.११.११.२००८ रोजी मा.उपाध्यक्ष, श्री कोल्हे यांचेकडून वैद्यकीय संचालक, डॉ.बोबडे यांना सदर विषयाची कार्यवाही (नेत्र चिकित्सा विभागाचे श्री साईनाथ रुग्णालयाकडे स्थलांतर) रद्द करण्याविषयीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चा तथा निर्णयास्तव सादर करण्याबाबत दूरध्वनीव्दारे सूचना दिली असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये संपूर्ण आवश्यक त्या सुविधा उपलब्ध झालेनंतरच नेत्रचिकित्सा विभाग स्थलांतरीत करणेत यावा व त्यानंतर श्री साईबाबा रुग्णालयात नवीन कॅथलॅब विभाग सुरु करणेबाबत पूढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२७ श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागासाठी सी आर्म मशिन खरेदीकामी उत्पादक कंपन्यांकडून कोटेशन्स मागविणे बाबत.**

**निर्णय क्र.९९** श्री साईनाथ रुग्णालयाच्या आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी सन १९९९ मध्ये मे. विप्रो जी. ई. मेडीकल सिस्टीम लि., मुंबई यांचेकडून सी. आर्म मशिन (Stenoscope ६०००) रु.१८,६०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले होते.

सदरचे मशिन बायबॅक करणे बाबत बायोमेडीकल विभागाने त्यांचे दि.१२/०७/२००८ चे पत्रान्वये सदर मशिनवर आतापर्यंत रक्कम रु.३,५६,७१३/- इतका खर्च झालेला आहे व आताचे दुरुस्तीकामी येणारा खर्च अंदाजे रु.९,१६,५४०/- इतका सांगीतला होता.

परंतु याकामी मे. विप्रो जी. ई. मेडीकल सिस्टीम लि., मुंबई यांचेकडून दुरुस्तीकामी प्रत्यक्ष खर्चाचे कोटेशन मागविले असता त्यांचे दि.२६/०९/२००८ चे पत्राअन्वये सदरचे दुरुस्तीकामी रु.२७,९२,४००/- इतका खर्च कळविला होता. प्राप्त परिस्थितीचा विचार करीता आपणास सध्या असलेले मशिन बायबॅक करुन नविन मशिन खरेदी करणे योग्य राहिल. तर नविन मशिन घेण्यासाठी अंदाजे रु.२७,००,०००/- पर्यंत खर्च येणार आहे.

सदरचे खरेदीकामी दि. १५/११/२००८ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत विहीत पध्दतीने महाराष्ट्र टाईम्स, डी.एन.ए.पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०८/१२/२००८ ते २०/१२/२००८ अखेर शिर्डी कार्यालयात ३ तर मुंबई कार्यालयात निविदा ७ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व दि. २३/१२/२००८ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत १८ पुरवठा धारक / अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्र. १७९०२ दि. ०४/१२/२००८ अन्वये अवगत करण्यात आले होते.

परंतु उपरोक्त खरेदीकामी शिर्डी व मुंबई कार्यालयात एकही निविदा विक्री झालेली नाही. त्यामुळे सदरचे खरेदीकामी पुन्हा जाहिरात देऊन प्रतिसाद मिळेल असे वाटत नाही. त्याऐवजी थेट उत्पादक कंपनीकडुन सी. आर्म मशिन बायबॅक करुन कोटेशन मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२८ संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देणे बाबत**

**निर्णय क्र.१००** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

**(अ)**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | सौ.संगिता संजय थोरात | श्री साईबाबा रुग्णालय अ) | २६९९.०० | २६६८.०० |
| | | ब) | ३८४८४.०० | ३७५३३.०० |
| | | एकुण रु.- | ४११८३.०० | ४०२०१.०० |
| २ | श्री.मोहन नारायण देशपांडे | श्री साईबाबा रुग्णालय | ६९६९.०० | ६७६९.०० |
| ३ | सौ.कल्पना रघुनाथ मुसमाडे | अ) श्री साईबाबा रुग्णालय | ६९७४.०० | ६९७४.०० |
| | | ब) रुबी हॉल क्लिनिक ,पुणे | ६२५.०० | ६२५.०० |
| | | एकुण रु.- | ७५९९.०० | ७५९९.०० |
| ४ | श्री.पंढरीनाथ यशवंतराव कोते | श्री साईबाबा रुग्णालय | ७२०६.०० | ६९३७.०० |
| ५ | श्रीमती छाया संजय गोंधळी | रुबी हॉल क्लिनिक,पुणे | १३१७४.०० | १२०१४.०० |
| ६ | श्री.प्रभाकर विश्वनाथ नागरे | श्री साईनाथ रुग्णालय | १२९३.०० | १२९३.०० |
| ७ | श्री.मनोज निवृत्ती वैद्य | श्री साईबाबा रुग्णालय | ५८३.०० | ५८३.०० |
| ८ | श्री.ठमाजी दादा बनकर | रुबी हॉल क्लिनिक ,पुणे | १०४४५.०० | ९१८५.०० |
| ९ | सौ.संगिता प्रभाकर वाबळे | श्री साईबाबा रुग्णालय | ६२०४.०० | ५७८९.०० |
| १० | कु.कमल भिमराज तांबे | श्री साईबाबा रुग्णालय | १८३७६.०० | १८३७६.०० |
| ११ | श्री.सुभाष श्रीराम शामकुंवर | श्री साईबाबा रुग्णालय | २०२०.०० | २०२०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | डॉ.सौ.शीतल सचिन उंडे | विमल मॅर्टनिर्टी होम,धुळे | १६३६६.०० | १००००.०० |
| १३ | सौ.ॲग्नेस जॉर्ज देठे | के.ई.एम.हॉस्पिटल,पुणे | ५३०६५.०० | ४६०५९.०० |
| १४ | श्री.बलभिम वसंतराव जोशी | श्री साईबाबा रुग्णालय | १७५८.०० | १७५८.०० |
| १५ | श्री.साहेबराव सोन्याबापु जाधव | श्री साईनाथ रुग्णालय | २५३५.०० | २५३५.०० |
| १६ | श्री.बाळासाहेब आप्पाजी डांगे | रुबी हॉल क्लिनिक ,पुणे | ३६६२.०० | २४६२.०० |
| १७ | श्री.रंगनाथ कारभारी पाचोरे | श्री साईबाबा रुग्णालय | ७१४२.०० | ७०८३.०० |
| १८ | सौ.मनिषा आण्णासाहेब वल्टे | टाटा मेमोरियल सेंटर,मुंबई | २५८३७.०० | ७२७९.०० |
| १९ | सौ.गिता आप्पासाहेब शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय | ३१२७.०० | ३१२७.०० |
| २० | श्री.दिनकर हनुमंता डोखे | श्री साईबाबा रुग्णालय | ४६३१.०० | ४०३३.०० |
| २१ | श्री.प्रशांत महादु देवरे | श्री साईबाबा रुग्णालय | ३२७५.०० | ३२७५.०० |
| २२ | सौ.आशा तुळशिराम रोकडे | श्री साईनाथ रुग्णालय | १३३४.०० | १३३४.०० |
| २३ | सौ.जिजाबाई रमेश भोसले | श्री साईबाबा रुग्णालय | २५३४.०० | २५३४.०० |
| २४ | सौ.नजमा नुरमंहमद सय्यद | श्री साईबाबा रुग्णालय | ३३२३.०० | ३३२३.०० |
| २५ | श्री.रमेश सिताराम बोधक | टाटा मेमोरियल सेंटर,मुंबई | ३४११.०० | १७८७.०० |
| | | ॲड.रक्कम वजा - | १६२४.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक रक्कम रु. | १७८७.०० | |
| २६ | श्री.मुकुंद बाबुराव वाकचौरे | श्री साईबाबा रुग्णालय | १८६९.०० | १८६९.०० |
| २७ | श्री.सुरेश तान्हाजी हुसळे | श्री साईबाबा रुग्णालय | ३६५.०० | ३६५.०० |
| २८ | डॉ.पुनम बाबासाहेब गवळी | श्री साईबाबा रुग्णालय | २४२१०.०० | २४२१०.०० |
| २९ | श्री.प्रमोद वसंतराव कुलकर्णी | श्री साईनाथ रुग्णालय | ७१०.०० | ७१०.०० |
| ३० | श्री.किशोर साहेबराव गवळी | श्री साईबाबा रुग्णालय | १६४६.०० | १५५०.०० |
| ३१ | श्री.लक्ष्मण श्रीपत गव्हाणे | श्री साईनाथ रुग्णालय | ६४७.०० | ६४७.०० |
| ३२ | श्री.सुधाकर आनंदा त्रिभुवन | श्री साईबाबा रुग्णालय | १७०५.०० | १५८५.०० |
| ३३ | डॉ.एन.एस.म्हस्के | श्री साईबाबा रुग्णालय | १२४५.०० | १२४५.०० |
| ३४ | श्री.विक्रम नामदेव जाधव | श्री साईबाबा रुग्णालय | २२२३.०० | २०५७.०० |
| ३५ | श्री.बलभिम वसंतराव जोशी | श्री साईनाथ रुग्णालय | ६४२.०० | ६४२.०० |
| ३६ | श्री.प्रकाश तुकाराम जोशी | श्री साईबाबा रुग्णालय | ८३.०० | ८३.०० |
| ३७ | श्री.अरुण गुरुप्रसाद कापरे | बॉम्बे हॉस्पिटल,मुंबई | १६२४५.०० | १६२४५.० |
| ३८ | श्री.सोमनाथ खंडु कोते | बॉम्बे हॉस्पिटल ,मुंबई | ३२११३.०० | २८८५३.०० |
| ३९ | श्री.के.यु.तुपे | सुजाता बिर्ला हॉस्पिटल, नाशिक | २०५२१.०० | २०५२१.०० |
| ४० | श्री.भाऊसाहेब दाजीबा साबळे | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, पुणे | १००००.०० | १००००.०० |
| ४१ | डॉ.कृष्णा मधुकर गिरी | श्रुती हॉस्पिटल,नाशिक | १८१७०.०० | १४५३६.०० |
| ४२ | श्री.बाळासाहेब आप्पाजी डांगे | रुबी हॉल क्लिनिक,पुणे | ४३५३.०० | ४३५३.०० |
| ४३ | श्री.सारंगधर हरिभाऊ वाणी | शताब्दी सुपर स्पेशालिटी, नाशिक | ८४२५०.०० | ६७४००.०० |
| ४४ | श्री.रमेश सिताराम बोधक | प्रवरा हॉस्पिटल,लोणी | ६५००.०० | ४८७६.०० |
| ४५ | श्री.प्रशांत महादु देवरे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ३०१९.०० | ३०१९.०० |
| ४६ | सौ.कल्पना रघुनाथ मुसमाडे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ४३१९.०० | ४३१९.०० |
| ४७ | श्री अशोक रभाजी औटी | सुदर नेत्रालय, नगर | ७२५६.०० | ५७७१.०० |
| | | एकुण रक्कम रु. | ४८९१४३.०० | ४२२२११.०० |

**(ब)**

| अ.नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.दिलीप गंगाधर बकरे | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | १३७२.०० | १३५०.०० |
| २ | सौ.सुनिता बाळासाहेब एरंडे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ४७०८.०० | ३९०८.०० |
| ३ | सौ.लिली जोश | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | २१८८.०० | २१८८.०० |
| ४ | श्री.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ८३०००.०० | ५१९४४.०० |
| ५ | डॉ.एन.एस.म्हस्के | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १६७९.०० | १६७९.०० |
| ६ | सौ.वैशाली वसंतराव सुर्वे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १८४१.०० | १६५०.०० |
| ७ | श्री.मधुकर भिवाजी डोखे | के.ई.एम.हॉस्पिटल,मुंबई | २१७६२.०० | २१७६२.०० |
| ८ | सौ.जिजाबाई रमेश भोसले | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ९१४.०० | ९१४.०० |
| ९ | श्री.प्रमोद वसंतराव कुलकर्णी | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | १५५६.०० | १५२४.०० |
| १० | श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण | टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई | १३०८३३.०० | ००.०० |
| | | ॲडव्हॉन्स वजा रक्कम रु. | १३३०००.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक रक्कम रु. | - २१६७.०० | |
| ११ | श्री.किशोर साहेबराव गवळी | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ७१८.०० | ७१८.०० |
| १२ | श्री.सुधाकर आनंदा त्रिभुवन | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | १२८९.०० | १२८९.०० |
| १३ | श्री.नवनाथ महादु गाडेकर | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | ५६२९.०० | ५६२९.०० |
| १४ | श्री.मच्छिंद्र बाबुराव कालेकर | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | ५८४५.०० | ५८४५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | सौ.संगिता संजय थोरात | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | ३८५२.०० | ३८५२.०० |
| १६ | सौ.कल्पना रघुनाथ मुसमाडे | श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी | २७५६.०० | २७५६.०० |
| १७ | श्री.कृष्णाजी असराजी चौकाटे | डॉ.सासवडे नेत्र रुग्णालय, औरंगाबाद | २६७७७.०० | २११५०.०० |
| १८ | श्री साहेबराव सोन्याबापु जाधव | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | ८८०.०० | ८४०.०० |
| १९ | श्री.प्रभाकर विश्वनाथ नागरे | श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी | १५७८.०० | १५७८.०० |
| २० | श्री.रमेश सिताराम बोधक | प्रवरा हॉस्पिटल,लोणी | ११२७९.०० | ११२७९.०० |
| २१ | श्री.दिपक सुर्यकांत लोखंडे | रुबी हॉल क्लिनिक ,पुणे | १०५७९४.०० | ९७१६४.०० |
| २२ | श्री.प्रशांत भानुदास गोंदकर | श्री साईनाथ रुग्णालय | ४८९१.०० | ४२९१.०० |
| २३ | श्री.प्रदिप दशरथ शिंदे | श्री साईबाबा रुग्णालय | ७९६८.०० | ७८२५.०० |
| २४ | श्री.संजय बाबुराव कुलकर्णी | दिनानाथ मंगेशकर ,पुणे | ७५४२.०० | ७५४२.०० |
| २५ | श्री.आप्पासाहेब रामचंद्र तुरकणे | श्री साईनाथ रुग्णालय | १०९६६.०० | १०९६६.०० |
| २६ | श्री.अनिल नामदेव वाणी | श्री साईबाबा रुग्णालय | ४३२९४.०० | ४२७८३.०० |
| २७ | श्री.गणपत निवृत्ती कोटकर | श्री साईबाबा रुग्णालय | २७१३.०० | २७१३.०० |
| २८ | श्री.अश्विन भास्कर घुले | के.ई.एम.हॉस्पिटल,पुणे | ३२४२५.०० | २८९०३.०० |
| २९ | श्री.बाळु कृष्णराव कुलकर्णी | बॉम्बे हॉस्पिटल,मुंबई | १२२७५.०० | ११९३९.०० |
| ३० | श्री.ज्ञानेश्वर धाकु सोनवणे | श्री साईबाबा रुग्णालय | २२८७.०० | २२७१.०० |
| ३१ | सौ.सुरेखा सुरेश अरगडे | श्री साईबाबा रुग्णालय | ४७७३.०० | ४६८९.०० |
| ३२ | श्री.भारत बाबासाहेब कोते | श्री साईनाथ रुग्णालय | १७३६.०० | १७३६.० |
| ३३ | श्री.सतिश रघुनाथ जेजुरकर | के.ई.एम.हॉस्पिटल,मुंबई | ६८४८५.०० | ४३४८.०० |
| | | ॲड.रक्कम वजा - | ६००००.०० | |
| | | ॲड. वजा जाता शिल्लक रक्कम रु. | ८४८५.०० | |
| ३४ | सौ.शाईदा चाँद शेख | श्री साईनाथ रुग्णालय | ३५७७.०० | ३५७७.०० |
| ३५ | श्री.संजय भिकाजी सावंत | श्री साईनाथ रुग्णालय | ५८४४.०० | ५६९१.०० |
| ३६ | श्री.प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | श्री साईबाबा रुग्णालय | ५२५९.०० | ५२५९.०० |
| ३७ | श्री.दिलीप बाळकृष्ण शर्मा | बॉम्बे हॉस्पिटल,मुंबई | ४०७२०.०० | ४०४७०.०० |
| ३८ | श्री.रामनाथ लक्ष्मण वाकचौरे | श्री साईनाथ रुग्णालय | १०७१.०० | १०१३.०० |
| ३९ | सौ.संगिता चांगदेव कंहाडळ | श्री साईबाबा रुग्णालय | ६२८.०० | ६०४.०० |
| ४० | श्री.मुकुंद बाबुराव वाकचौरे | श्री साईबाबा रुग्णालय | ६५०००.०० | ६५०००.०० |
| | | एकूण रक्कम रु. | ७४०७०४.०० | ४९०६३९.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२९ श्रीकैलास गंगाधर शेजवळ,मदतनीस, लेखाशाखा यांचे खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय उपचाराचे बील आदा करणे बाबत.**

**निर्णय क्र.१०१** श्री.कैलास गंगाधर शेज्वळ हे दि.१७/०२/२००८ रोजी डयुटीवर असताना पाय घसरुन पडले त्यांनी दि.२०.०२.२००८ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ. जपे यांना दाखविले. डॉक्टरांनी त्यांना तीन दिवसाच्या गोळ्या दिल्या असता त्यांना पहिल्यापेक्षाही अधिक त्रास वाढल्याने दि.२३.०२.२००८ रोजी श्री साईनाथ रुग्णालयात ॲडमिट झाले. श्री.कैलास गंगाधर शेज्वळ हे शुगरचे (डायबीटीस) पेशंट असल्याने पायास काहीच फरक पडत नसल्यामुळे त्यांनी स्वतः डिसचार्ज घेतला आहे. व ते स्वतः दि.१०.०३.२००८ रोजी कुटे मेमोरियल मेडीकल फाऊंडेशन, श्रीरामपुर येथे ॲडमीट झाले होते. तेथे श्री. कैलास गंगाधर शेज्वळ दि.१०.०३.२००८ ते २९.०७.२००८ पर्यंत ॲडमीट झाले होते. त्यासाठी एकुण रु.१,०२,३४१/- इतका खर्च आलेला आहे. परंतू कुटे मेमोरियल मेडीकल फाऊंडेशन, श्रीरामपुर हे खाजगी हॉस्पिटल आहे व ते संस्थानच्या मान्य यादीतील नाही. त्यामुळे त्यांना सदरची रक्कम वैदयकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये देय होत नाही.

श्री.शेज्वळ यांचे बीलाबाबत श्री. रामराव रंभाजी पा. शेळके हे अध्यक्ष असलेल्या कर्मचारी संघटनेने श्री.शेज्वळ यांचे दोन वेळा ऑपरेशन झालेले आहे व त्यासाठी त्यांना रु.१,०२,३४१/- इतका खर्च आलेला असून सध्या ते आर्थिक संकटात आहेत. तरी त्यांचे संपूर्ण बील अदा करावे असे पत्र दिलेले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३० Prolene 6-0 सुचर्स खरेदी बाबत**

**निर्णय क्र.१०२** श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक विभागात कार्डीयाक सर्जरीसाठी लागणाऱ्या उपरोक्त Prolene ६-० सुचर्स करीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांना इकडील पत्र क्र. ११०२८ दि.२६/०७/२००८ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Co.Code | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PREMILINE POLYPROPYLENE SIZE 6/0 60CM DOUBLE ARM 3/8 CRB TAPER POINT 13MM CODE-C0091004 | J&J | Prolene W 8718 (12 Foils) | 10 | 2989.00 | 29890.00 |
| | | | | | **Total in Rs.-** | **29890.00** |

त्यानुसार मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त सुचर्सचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या सदरचे सुचर्सचा औषध भांडारात साठा शिल्लक नसल्यामुळे तसेच सदरचे सुचर्स कार्डीयाक सर्जरीसाठी आवश्यक असतात.

सदर सुचर्सचा दरमहा खप पाहता तो १-२ बॉक्स इतका आहे. त्यामुळे तुर्तास तीन-चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Make | Co.Code | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PREMILINE POLYPROPYLENE SIZE 6/0 60CM DOUBLE ARM 3/8 CRB TAPER POINT 13MM CODE-C0091004 | J&J | Prolene W 8718 (12 Foils) | 10 | 2989.00 | 29890.00 |
| | | | | | Total in Rs.- | 29890.00 |

वरीलप्रमाणे मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. २९,८९०/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी मे. विशाल एजन्सी, अहमदनगर यांचेकडून वरीलप्रमाणे सुचर्स वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.२९,८९०/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३१** **Inj. Ceftriaxone 1 gm खरेदी बाबत**

**निर्णय क्र.१०३** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणाऱ्या उपरोक्त Inj. Ceftriaxone १gm करीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता एकुण १५००० इंजेक्शनची मागणी करणेत आली होती. सदर इंजेक्शनसाठी मे. इनफार्म सर्व्हीसेस, पुणे यांना इकडील पत्र क्र. १०९४९ दि.२६/०७/२००८ अन्वये Ranbaxy कंपनीच्या प्रती व्हायल रु. १६.०१ याप्रमाणे १५००० इंजेक्शनचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

परंतु मे. इनफार्म सर्व्हीसेस, पुणे यांनी त्यांचे दि. २४/०९/२००८ चे फॅक्स पत्रान्वये Ranbaxy कंपनीच्या इंजेक्शनचे दर वाढलेले असल्याचे त्यांनी कळविले होते. त्यामुळे तुलनात्मक दरांचे तक्त्यात सदर इंजेक्शनकरीता मे. फार्माको, पुणे यांचे Neon या कंपनीचे दर प्रती नग रु. १५/- इतके होते. ते सदर दराने इंजेक्शनचा पुरवठा करण्यास तयार असल्यामुळे मे. इनफार्म सर्व्हीसेस, पुणे यांचा Inj. Ceftriaxone १gm चा पुरवठा आदेश रद्द करुन मे. फार्माको, पुणे यांना इकडील पत्र क्र.१८२४९ दि. १५/१२/२००८ अन्वये प्रती व्हायल रु. १५/- या दराने १५००० इंजेक्शनचा पुरवठा आदेश देण्यात आलेला असून त्यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे इंजेक्शनचा पुरवठा पुर्ण केलेला आहे. सध्या औषध भांडारात उपरोक्त इंजेक्शन शिल्लक नसून दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच सदरचे इंजेक्शन ह्दय शस्त्रक्रियेच्या पॅकेजमध्ये दयावे लागतात. त्यामुळे खालीलप्रमाणे इंजेक्शन खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Item | Make | Qty. | Rate Per | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Ceftrixone 1 gm | Neon | 15000 | 15.00 | 225000.00 |
| | | | | Total in Rs. | 225000.00 |

वरीलप्रमाणे मे. फार्माको, पुणे यांचे वार्षिक मंजुर दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. २,२५,०००/- इतका खर्च येणार आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०४/२००८ निर्णय क्रमांक ३५४ Clause No.८ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मा. व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे.

तरी मे. फार्माको, पुणे यांचेकडून वरीलप्रमाणे इंजेक्शन वार्षिक मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.२,२५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा पस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३२** **श्री साईबाबा रुग्णालयातील आथोपेडीक ऑपरेशन थिएटरसाठी पल्स ऑक्सीमिटर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.१०४** श्री साईबाबा रुग्णालयाचे आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२१/१०/२००८ रोजीचे पत्राअन्वये १ नग पल्स ऑक्सीमिटरची मागणी केलेली आहे. कारण सध्या ऑपरेशन झालेल्या रुग्णास कमीत कमी ३० मिनिटे under observation साठी ठेवावे लागते तर High Risk व Poly Trauma चे रुग्ण हे एक तास under observation साठी ठेवावे लागतात. दरम्यानच्या काळात पुढील रुग्ण ऑपरेशन साठी घ्यावा लागतो व त्यामुळे सध्या असलेला एक मॉनिटर पुरेसा होत नाही. त्यामुळे आर्थोपेडीक विभागाने

एक पल्स ऑक्सीमिटरची एन. आय. बी. पी. कफसह मागणी केलेली आहे. आर्थोपेडीक शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्यांना सदर पल्स ऑक्सीमीटर ज्यामध्ये SPO२, NIBP, ECG हे तीन पॅरामीटर असतात त्या पल्स ऑक्सीमीटरमध्ये त्यांचे काम चालु शकते.

उपरोक्त प्रमाणे १ नग पल्स ऑक्सीमिटर एन. आय. बी. पी. कफसह खरेदीकामी अंदाजे रु.८०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाचे डायलेसीस विभागासाठी व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३.०१.२००९ चे सभेतमे.एल ॲण्ड टी कंपनीकडून एक मॉनीटर ३ पॅरामॉनिटर घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे त्याच मंजूर दराने सदर मॉनिटर (पल्स ऑक्सीमीटर) खरेदी करण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३३** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना गणवेश खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.१०५** श्री साईबाबा रुग्णालयातील परिचारीका व परिचारक तसेच सर्व तंत्रज्ञ यांना दोनवर्षापुर्वी गणवेष देण्यात आले होते तर सर्व मॅनेजर्स यांना अज्ञापपर्यंत संस्थानचा गणवेष देण्यात आलेला नव्हता सध्या दिलेला गणवेष हा वापरुन खराब झालेला असल्याने रुग्णालयातील सर्व कर्मचा-यांना नविन गणवेष देण्याचा प्रस्ताव आहे. प्रशासन शाखा वशी-५/२४२५/२००८ दिनांक २६/०८/०८ चे परिपत्रकानुसार कायम कर्मचारी वगळता उर्वरीत डॉक्टर,मॅनेजर,मेट्रन,सिस्टर इनचार्ज,स्टाफ नर्स,टेक्निशियन्स,फार्मासिस्ट इत्यादीना रुग्णालयामार्फतच गणवेषाचा प्रकार ठरवुन व शिवण्याकरीता स्वतंत्र टिपणी तयार करुन मंजूरी घ्यावी व गणवेष शिवुन घ्यावेत असे आदेश आहे. त्यानुसार साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांना एकाच प्रकारचे गणवेष दयावयाचे आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचारी गणवेष तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पदनाम | साईबाबा कर्मचारी संख्या | | साईनाथ कर्मचारी संख्या | | एकुण कर्मचारी संख्या | गणवेष संख्या | एकुण संख्या | अंदाजे एकुण खर्च | अंदाजे एकुण खर्च | गणवेषाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष (अ) | स्त्री (ब) | पुरुष (अ) | स्त्री (ब) | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | कसल्टंट | २४ | ४ | | | २८ | | | | | |
| | वैद्यकीय अधिक्षिका | | | | १ | १ | | | | | |
| | वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी | | | २ | | २ | | | | | |
| | वैद्यकीय अधिकारी | | | १५ | ३ | १८ | | | | | |
| | रक्त संक्रमण अधिकारी | | | | २ | २ | | | | | |
| | | | | | | ५१ | २ | १०२ | २५० | २५५००.०० | फुल ॲप्रन |
| २ | सीएमओ | १९ | १० | | | २९ | | | | | |
| | आरएमओ | १९ | ९ | ६ | ७ | ४१ | | | | | |
| | डेन्टिस्ट | | २ | | | २ | | | | | |
| | फिजीओथेरपीस्ट | १ | | | | १ | | | | | |
| | डायटेशीयन | | १ | | | १ | | | | | |
| | एक्स-रे-टेक्निशियन ऑफीसर | | | १ | | १ | | | | | |
| | | | | | | ७५ | २ | १५० | २५० | ३७५००.०० | फुल ॲपन |
| ३ | दोही रुग्णालयाचे सर्व तंत्रज्ञ | २४ | ६ | १८ | ८ | ५६ | | | | | |
| | परिचारीका | | १३० | | ५९ | १८९ | | | | | |
| | सहा.अधिसेविका | | १ | | १ | २ | | | | | |
| | सिस्टर इनचार्ज | | | | ६ | ६ | | | | | |
| | | | | | | २५३ | २ | ५०६ | २०० | १०१२००.०० | हाफ ॲपन |
| ४ | ज्यु बायो.मेडीकल इंजीनीअर | | १ | | | १ | | | | | |
| | रिसेप्शनिस्ट | | १ | | | १ | | | | | |
| | फार्मासिस्ट/कंपाऊंडर | | १ | | १ | २ | | | | | |
| | समाजसेविका | | १ | | | १ | | | | | |
| | सहा.अधिसेविका | | | | १ | १ | | | | | |
| | सिस्टर इनचार्ज | | | | ६ | ६ | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | परिचारीका | | | | ८ | ८ | | | | | |
| | | | | | | २० | २ | ४० | ५०० | २००००.०० | साडी/पेटीकोट/ब्ला.पीस |
| ५ | सिनियर मॅनेजर/ सिनी.इंजिनियर | ९ | | | | ९ | २ | १८ | ७०० | १२६००.०० | फुल शर्ट/ पॅन्ट |
| ६ | ज्यु.बायोमेडीकल इंजिनियर | २ | | | | २ | | | | | |
| | अकाऊटंट | १ | | | | १ | | | | | |
| | फार्मासिस्ट | ३ | | ९ | | १२ | | | | | |
| | परिचारक | २० | | ५ | | २५ | | | | | |
| | ओ.टी असिस्टंट | ७ | | ८ | | १५ | | | | | |
| | | | | | | ५५ | २ | ११० | ६०० | ६६०००.०० | हाफ शर्ट/ पॅन्ट |
| ७ | साईबाबा परिचारीका | | १३० | | ५१ | १८१ | | | | | |
| | सहा.अधिसेविका | | १ | | | १ | | | | | |
| | | | | | | १८२ | २ | ३६४ | ३०० | १०९२००.०० | सलवार / कुडता |
| | एकुण | | | | | | | १२९० | २८०० | ३७२०००.०० | |

उपरोक्तप्रमाणे गणवेष हे संबंधीत पुरवठाधारकाकडुन कपडा, रंग,व दर निश्चित करुन ते शिलाईसह (प्रत्येक कर्मचा-यांचे-यांचे मापे घेऊन) खरेदी करण्यास सोईचे होईल. सदर गणवेष शिऊन घेणेस अथवा रेडीमेड खरेदी करणेस साधारणतः ३७,२०००/- खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना गणेवष खरेदीकामी मफतलाल, एसकुमार, बेलमेंट, रेमंड, सियाराम या नामांकित कंपन्यांचे कापडाचे युनिफॉर्मसाठी शिलाईसह कोटेशन्स मागविण्यात यावे, याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,७२,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३४ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता हॉस्पिटल फर्निचर खरेदी बाबत**

**निर्णय क्र.१०६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३५ श्री साईप्रसादालयामध्ये एल.पी.गॅस प्लॅन्ट दैनंदिन चालविणे बाबत.**

**निर्णय क्र.१०७** श्री साईप्रसादालयाकरीता उभारण्यात आलेला एल.पी.जी गॅस प्लॅन्ट दैनंदिन चालविणेकामी आऊट सोर्सिंग पध्दतीचा अवलंब करण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७.०१.२००९ चे सभेमध्ये विषयाची टिपणी ठेवण्यात आली होती. सदर टिपणीमध्ये प्लॅन्ट पुरवठादार यांचेकडून दैनंदिन देखभालचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी दरपत्रक मागविणस मान्यता घेण्यात आलेली आहे त्यानुसार दिनांक ३१.०१.२००८ चे पत्रान्वये दरमहा खर्चाचे दरपत्रक पाठविणस कळविलेले आहे.

एल.पी.जी प्लॅन्ट पुरवठादार यांनी दिनांक ०२.०१.२००९ चे पत्रान्वये एल.पी.गॅस प्लॅन्ट दैनंदिन चालविणेकामी दोन प्रशिक्षत कर्मचारी लागतील व त्यांचेसाठी दरमहा रुपये २५,००० +१०,०००=३५,००००/- + सर्व्हीस टॅक्स असा खर्च कळविलेला आहे. त्यानुसार एक वर्षाकरीता रुपये ४,२०,०००/- अधिक सर्व्हीस टॅक्स खर्च अपेक्षित आहे. मे.ग्लोब गॅस इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि. मुंबई यांनी कळविलेला खर्च जादा वाटत आहे त्यांनी कळविलेला खर्च कमी करणेकामी पुरवठादार यांना चर्चा/वाटाघाटीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपूढे बोलावून चर्चा/वाटाघाटीकरुन अंतिम निर्णय घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेण्याऐवजी संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने अथवा एकत्रित वेतनावर काम करत असलेल्या आय.टी.आय प्रशिक्षत दोन कर्मचाऱ्यांची श्री साईप्रसादालयातील एल.पी.जी गॅस प्लॅन्ट दैनंदिन चालविणेकामी नेमणूक करण्यात यावी, त्याकामी त्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे,असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.३६ अन्नपाकिटे तयार करणेसाठी ठेकेदाराचे नियुक्ती करणेबाबत**

**निर्णय क्र.१०८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३७ मोतीचूर लाडू व बर्फी बनविणेकामी ठेकेदाराची नियुक्ती करणे बाबत**

**निर्णय क्र.१०९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३८ प्रसादालयातील चपात्या (स्वामी नारायण पोळी ) बनविणारे ठेकेदाराची नियुक्ती करणे बाबत.**

**निर्णय क्र.११०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.३९** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व श्री साईबाबा धर्मशाळेतील स्वयसेवी प्रसाद भोजन व्यवस्था बंद करणे बाबत.**

**निर्णय क्र.१११** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४०** **चपाती /पुरीकरीता रेडीमेड आटा खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.११२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४१** **प्रत्येक साईभक्तास पाच लाडू पाकीटे देण्याऐवजी देणगी कार्यालयामार्फत लाडू पाकीटे देणेबाबत**

**निर्णय क्र.११३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४२** **ब्रुक बॉण्ड सुपरडस्ट ताजा चहा खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत**

**निर्णय क्र.११४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४३** **चावडी मंदिर पुजन शताब्दी महोत्सव कार्यक्रमाबाबत.**

**निर्णय क्र.११५** **(अ)** श्रींचा चावडी शताब्दी वर्ष अंतर्गत भारतातील प्रमुख शहरांत श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या वतीने श्रींच्या पादुका दर्शन सोहळा व भजन संध्या कार्यक्रम निश्चित करण्यात आले आहेत. सदर कार्यक्रमामध्ये श्रींच्या चांदीच्या पादुकांऐवजी बाबांनी प्रत्यक्ष वापरलेल्या पादुका (चर्म) या ठिकाणी दर्शनाकरीता ठेवल्यास जे भक्त शिर्डी येथे येण्यासाठी वंचित राहतात, त्यांना दर्शनाचा लाभ होईल, व प्रत्यक्ष बाबांनी वापरलेल्या पादुका याठिकाणी आल्या म्हणून कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळेल. अशा पादुका संस्थानकडे तीन जोड आहेत. पैकी म्युझियम हॉल येथील ठेवलेल्या पादुका जोड पैकी एक जोड या कार्यक्रमासाठी नेता येईल. या अगोदर मुंबई व नागपुर येथे साईभक्त संमेलनाचे ठिकाणी श्रींच्या पादुका दर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. तरी बाबांनी प्रत्यक्ष वापरलेल्या पादुका (चर्म) सदर कार्यक्रमासाठी वापरणे योग्य व हितावह होईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**(ब)** श्रीसाईबाबांचे व्दारकामाईमध्ये हयातभर वास्तव्य असे. तसेच श्री साईबाबा व्दारकामाईत व चावडीमध्ये शयन करीत असत.त्यांचा असा नित्यक्रम महानिर्वाणापर्यत चालू होता. १० डिसेंबर १९०९ रोजी बाबांच्या भक्तांनी चावडीमध्ये बाबांचे भजन-पुजन सुरु केले असून तसा संदर्भ कै.दाभोळकर लिखित श्रीसाईसच्चरित ग्रंथात अध्याय क्र.३७ मध्ये ओवी क्र.१८८ मध्ये आहे.या घटनेस सन २००९ मध्ये १०० वर्ष होत आहेत.

यावर्षी १० डिसेंबर २००८ सालापासून शताब्दी वर्षास सुरुवात होत असून पुढील वर्षी १० डिसेंबर २००९ मध्ये १०० वर्षे पुर्ण होतील. त्यामुळे हा कालावधी चावडी मंदीर पूजन शताब्दी वर्ष म्हणून साजरा करता येईल,असे मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १५/११/२००८ रोजीचे आयत्या वेळेचा विषय नं.०८, निर्णय क्र. ८८२ नुसार दि. १० डिसेंबर २००८ रोजी चावडी पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करावी. दिनांक १३-१४ जानेवारी २००९ रोजी श्री श्री रविशंकर यांचे कार्यक्रम तसेच ज्या राज्यात श्री साईबाबांचे जीवन व कार्याचा प्रसार नाही. अशा राज्यात जाहीर कार्यक्रम करावे.त्यासाठी प्रोफेशनल इव्हेंट मॅनेजमेंटची नेमणूक करावी. स्थानिक भाषेत श्री साईबाबांवरील साहित्य प्रसिध्द करावे. २-३ विश्वस्तांनी मिळून एक राज्यात जाऊन राज्यातील चांगल्या भजनसम्राटांशी भेट घेऊन कार्यक्रम ठेवण्यात यावा.या कार्यक्रमासाठी चांदीच्या पादुका न्याव्यात. याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार मा.अध्यक्ष महोदय यांचे दिनांक ३०.१२.२००८ रोजीचे समक्ष सूचनेनुसार खालीलप्रमाणे शहरांमध्ये भजन संध्या कार्यक्रम घेता येतील.

| अ.नं. | शहराचे नांव | राज्य | अ.नं. | शहराचे नांवे | राज्य |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | हैद्राबाद | आंध्र प्रदेश | ११ | पटणा | बिहार |
| ०२ | बंगलोर | कर्नाटक | १२ | गुहाटी | आसाम |
| ०३ | चेन्नई | तामिळनाडू | १३ | जम्मू | जम्मू/ काश्मीर |
| ०४ | दिल्ली | दिल्ली | १४ | तिरुअनंतपूरम | केरळ |
| ०५ | जयपूर | राजस्थान | १५ | काठमांडु | नेपाळ- राष्ट्र |
| ०६ | अहमदाबाद/ बडोदा | गुजरात | १६ | चंदीगड | पंजाब/ हरियाना |
| ०७ | रायपूर | छत्तीसगड | १७ | नागपुर | महाराष्ट्र |
| ०८ | कलकत्ता | पश्चिम बंगाल | १८ | गोवा-पणजी | गोवा |
| ०९ | भोपाळ | मध्य प्रदेश | १९ | रांची - झारखंड | झारखंड |
| १० | लखनौ / कानपूर | उत्तर प्रदेश | २० | उत्तरांचल- तैनीमल | उत्तरांचल |
| | | | २१ | दमण | दीव दमण |

उपरोक्त दर्शविलेल्या शहरामध्ये प्रत्यक्ष जाऊन कार्यक्रम निश्चित करणे, कार्यक्रमाची जागा, भाडे, जाहीरात, प्रसिध्दी, बॅनर्स, बोर्डस, कलाकारांचे मानधन, प्रवास, इत्यादी खर्चासाठी साधारणपणे तूर्त

रुपये- १,००,००,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५/अधिक्षक,मंदिर विभाग)

**विषय नं.४४ मान्यवरांचे सत्कार करणेकामी प्रिंटेड शॉल खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.११६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४५ साईनिवास अतिथीगृह येथील रुमसाठी एल.सी.डी टी.व्ही खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.११७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४६ वॉकी-टॉकी हॅण्डसेट बॅटरी खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.११८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४७ वॉटर फायर फायटर यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४८ शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना साफसफाईचे कामासाठी कंत्राटी कामगार देणे बाबत.**

**निर्णय क्र.१२०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.४९ मोबाईलवर श्रींचे ऑन लाईन दर्शन सुविधा सुरु करणे बाबत**

**निर्णय क्र.१२१** सध्याच्या काळात संपर्कासाठी भ्रमणदूरध्वनींचा वापर सर्व स्थरामधील जनतेत मोठ्या प्रमाणावर होत आहे. श्रीसाईच्या दर्शनास येणारे बहुसंख्य साईभक्त सुशिक्षित असल्याने ते संपर्कासाठी भ्रमणदूरध्वनींचा वापर करतात. संस्थान वेबसाईटवर व टिव्ही चॅनेलवर सुरु केलेली श्रींची ऑनलाईन दर्शन सुविधा ही मोबाईलवरही सुरु करण्यात यावी, अशी श्रीसाईभक्तांकडून मागणी होत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ मे, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४६२ अन्वये टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई (पूर्वीची व्हीएसएनएल) यांचेमार्फत मोबाईलवर ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेचा निर्णय झालेला आहे. सदर सुविधेसाठी मोबाईल ऑपरेटरचा हिस्सा (भाग) वजा जाता उर्वरित रक्कमेच्या ८०% रक्कम ही संस्थानला तर २०% रक्कम ही टाटा कम्युनिकेशन्स, लि., (पूर्वीची व्हीएसएनएल) यांना त्यांनी पुरविलेल्या तंत्रज्ञानापोटी मिळेल. संस्थानला मिळणारी ८०% रक्कम ही टॅक्स वजा जाता मिळणार आहे. तसेच सदर सुविधा पुरविणेसाठीचा करारनामा श्री साईबाबा संस्थान व टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई (पूर्वीची व्हीएसएनएल) यांचेमध्ये एक वर्षासाठी करता येईल. या सुविधेसाठी संस्थानला कोणताही खर्च करावा लागणार नाही. सदर निर्णयानुसार मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधेचे तांत्रिक काम सुरु करणेसाठी टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई यांना जा. नं. एसएसएसटी/आयटी/७९०२/२००८ दिनांक ३० मे, २००८ नुसार कळविण्यात आलेले आहे.

मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेसाठी Nazara Technologies Pvt. Ltd., Mumbai यांनी ई-मेलव्दारे प्रस्ताव सादर केला आहे. त्यात त्यांनी Exclusive Live Darshan On mobile अशी ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेसाठी मागणी केली आहे. सदर प्रस्तावात त्यांनी सदर सुविधेच्या बदल्यात संस्थानला वर्षाला रुपये २५ लाख मात्र चार समान भागात देणेबाबत नमूद केले आहे. तथापि, यात टॅक्सबाबत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. रॉयल्टी घेतांना टॅक्स अतिरिक्त घेण्यात यावे, असे मत आहे. त्यांनी मोाबाईलवर साईभक्तांना बाबांकडे मेसेज पाठविण्याची सुविधा तसेच वेगवेगळ्या संकल्पना उपलब्ध करुन देता येतील असे Nazara Technologies चे प्रतिनिधींनी मा. अध्यक्ष सो व विश्वस्त श्री शैलेश कुटे, यांच्या वैयक्तिक भेटीत सुचविले आहे.

Nazara Technologies Pvt. Ltd., Mumbai यांनी Exclusive Live Darshan On mobile अशी ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेसाठी मागणी केली आहे. असे करावयाचे झाल्यास टाटा कम्युनिकेशन यांचेशी प्राथमिक स्वरुपाचा करण्यात आलेला करारनामा रद्द करावा लागेल.

Nazara Technologies Pvt. Ltd., Mumbai यांचेमार्फत मोबाईलवर ऑनलाईन सुविधा सुरु करणेसाठी त्यांच्या काय संकल्पना आहेत हे समजून घेणे आवश्यक असून, त्यासाठी त्यांना प्रत्यक्ष मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये बोलावण्यात येवून, चर्चेनंतर सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यास त्यांचेशी एक वर्षाचे कालावधीसाठी करारनामा करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मोबाईलवर श्रींची ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेसाठी विविध प्रस्तावधारकांना प्रति वर्षासाठी रॉयल्टी रुपये १५ लाख अधिक टॅक्स (Non exclusive basis) घेण्यात यावा,असे ठरले.

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.५० टी.व्ही.चॅनेलवर ऑन लाईन दर्शन-तथा-आरती सुविधा सुरु करणे बाबत**

**निर्णय क्र.१२२** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार संस्थानचे वेबसाईटवर इंटरनेटव्दारे व्हीएसएनएल, मुंबई यांचेमार्फत ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली असून, त्यानुसार संस्थानचे अधिकृत वेबसाईट www.sai.org.in वर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करण्यात

आलेली आहे. वेबसाईटवर ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु केल्यामुळे ज्या साईभक्तांकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे अशा साईभक्तांना घरबसल्या श्रींचे दर्शनाचा लाभ घेता येत आहे. या सुविधेप्रमाणेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ११/०८/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६६१ नुसार व्हीएसएनएल, मुंबई यांचेमार्फत श्रींचे टिव्हीवर ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करण्यात आलेले आहे. सदर दोन्ही सुविधा सुरु करणेसाठी व्हीएसएनएल, मुंबई यांचेशी स्वतंत्र करारनामे करण्यात आलेले आहे.

**(अ)** Tata Communications, Ltd., Mumbai यांनी विविध चॅनेलव्दारे श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेसाठी दिनांक ०१ डिसेंबर, २००८ रोजीचे ई-मेलव्दारे प्रस्ताव पाठविलेला आहे. त्याचप्रमाणे, TV९ (Associated Broadcasting Company Pvt. Ltd.,) Hyderabad यांनीही टिव्ही चॅनेलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधा सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत त्यांचे दिनांक १३ ऑगस्ट, २००८ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे. त्यांनी सदर पत्राची एक प्रत मा. श्री अशोक खांबेकर, विश्वस्त यांनाही सादर केली आहे. श्री खांबेकर सो. यांनी TV९ चॅनेल विविध भाषेमध्ये प्रसारित होणारे दक्षिण भारतातील सर्वाधिक प्रेक्षकवर्ग लाभलेले व एकमेव विविध कार्यक्रम व बातम्या प्रसारित करणारी वृत्तवाहिनी असून, दक्षिण भारतातील साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेचा लाभ घेणेसाठी सदर चॅनेलला श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधा सुरु करणेस परवानगी देणेबाबत शिफारस केली आहे.

**(ब)** श्रींचे शिकवणीचा प्रचार व प्रसार होणेसाठी तसेच टिव्ही चॅनेलव्दारे श्रींचे घरबसल्या दर्शन-तथा-आरतीचा लाभ घेणेसाठी सदर सुविधा सुरु करण्यात यावी. सदर सुविधा सुरु केल्यास संबंधीत चॅनेलकडून रॉयल्टी स्वरुपात रक्कम मिळून संस्थानचे उत्पन्नात भर पडण्यास निश्चितच मदत होईल व भक्तांनाही श्रींचे दर्शनाचा लाभ घेता येईल. सदर सुविधा पुरविणेच्या बदल्यात संस्थानला प्रतिदिनी प्रतितासी रॉयल्टी घेता येईल. रॉयल्टी / मोबदल्याबाबत चर्चा करणेसाठी Tata Communications, Ltd., Mumbai व TV९ (Associated Broadcasting Company Pvt. Ltd.,) Hyderabad यांचे प्रतिनिधींना मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये बोलविण्यात येवून, चर्चेअंती प्रतिदिनी प्रतितासी जादा रॉयल्टी देणाऱ्या चॅनेलबरोबर सदर सुविधा सुरु करणेबाबतचा प्रथम एक वर्षाचा करारनामा करता येईल, असे नम्र मत आहे.

**(क)** श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधा ही संस्थान वेबसाईटवर तसेच टिव्हीवरही सुरु करण्यात आलेली आहे. सदर सुविधेसाठी आवश्यक सिग्नल पुरविणेसाठी ध्वनीक्षेपण विभागामार्फत श्रींचे मंदिरात विविध कॅमेरे बसविण्यात आलेले असून, सदर कॅमेऱ्यांव्दारे सिग्नल हे माहिती तंत्रज्ञान विभागात ठेवण्यात आलेल्या सर्व्हरमध्ये देण्यात आलेले आहे. मोबाईलवर तसेच टिव्ही चॅनेलवर सदर सुविधा सुरु करणेसाठी मंदिरात आणखी कॅमेरे बसवावे लागणार आहे. त्यामुळे मंदिरात विनाकारण कॅमेऱ्यांचे जाळे तयार होणार आहे. सदर तयार होणारे जाळयांची अडचण सोडविणेसाठी श्रींचे मंदिरात ध्वनीक्षेपण विभागामार्फत नवीन तंत्रज्ञानावर आधारित एकच डिजीटल कॅमेरा खरेदी करुन बसविण्यात यावा. सदर कॅमेऱ्यामार्फत ऑनलाईन दर्शन-तथा-आरतीचे सिग्नल हे माहितीं तंत्रज्ञान विभागात असलेल्या सर्व्हरला देऊन तेथून ते इंटरनेट, टिव्ही, चॅनेल व मोबाईल आदिंव्दारे ऑनलाईन दर्शन सुविधेसाठी उपलब्ध करुन देता येतील, असे नम्र मत आहे.

उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमुद केलेप्रमाणे, टिव्ही चॅनेलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधा सुरु करणेस व सदर सुविधा पुरविणेच्या बदल्यात संस्थानला प्रतिदिनी प्रतितासी घ्यावयाच्या रॉयल्टी / मोबदल्याबाबत चर्चा करणेसाठी Tata Communications, Ltd., Mumbai व TV९ (Associated Broadcasting Company Pvt. Ltd.,) Hyderabad यांचे प्रतिनिधींना मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये बोलविण्यात येवून, चर्चेअंती प्रतिदिनी प्रतितासी जादा रॉयल्टी देणाऱ्या चॅनेलबरोबर सदर सुविधा सुरु करणेबाबतचा प्रथम एक वर्षाचा करारनामा करणेच्या मान्यतेस्तव तसेच परिच्छेद क मध्ये नमूद केलेप्रमाणे ध्वनीक्षेपण विभागामार्फत कार्यवाही होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,विविध टी.व्ही.चानेलवर लाईव्ह दर्शन तथा आरती सुविधा सुरु करणेकामी खालीलप्रमाणे प्रतिवर्षासाठी रॉयल्टी घेण्यात यावी, असें ठरले.

०१. प्रत्येक दिवशी फक्त १ तास लाईव्ह दर्शन- रक्कम रुपये १२ लाख अधिक टॅक्स

०२. प्रत्येक दिवशीच्या चारही आरत्या लाईव्ह दर्शन- रुपये १५ लाख अधिक टॅक्स

०३ संपूर्ण दिवसाचे लाईव्ह दर्शन (चारही आरत्यांसह) रुपये २० लाख अधिक टॅक्स

**विषय नं.५१** **श्रीराजेंद्र कोहकडे (क्रिडा शिक्षक) यांची पूणे विद्यापीठ हॉलीबॉल संघ मार्गदर्शक पदी नियुक्तीबाबत**

**निर्णय क्र.१२३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५२** **४५ वी विभागीय कौशल्य स्पर्धा ऑक्टोबर-२००८ मधील संस्थेच्या यशाबाबत**

**निर्णय क्र.१२४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५३** **नवीन टायर्स खरेदी बाबत**

**निर्णय क्र.१२५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५४** **स्वयंसेवी भोजन व्यवस्थेकामी लावण्यात आलेल्या भाडोत्री वाहनांबाबत**

**निर्णय क्र.१२६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५५** **जुनी वाहने जाहिर लिलावाने विक्री करणे बाबत.**

**निर्णय क्र.१२७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५६** **वाहन विभागातील सर्व वाहनांचे वार्षिक विमा नूतनीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.१२८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५७** **भाडोत्री क्रेन वापराबाबत.**

**निर्णय क्र.१२९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५८** **देणगी वाहनांबाबत.**

**निर्णय क्र.१३०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.५९** **प्रसादालय परिसराचे सुरक्षा संदर्भात प्रसादालय परिसराच्या कास्टींग आयर्न कंम्पाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेबाबत**

**निर्णय क्र.१३१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६०** **उदी चाळणीचे मशिन खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.१३२** श्री साईबाबांचा महिमा जगात सर्वमान्य असून यात श्री साईंच्या विभूतीचा फार मोठा भाग आहे. दररोज हजारो भक्तांना विभूतीचे वाटप करावे लागते. याकरीता व्दारकामाईतील धुनीतून निघणा-या विभूतीवर विविध प्रक्रीया (थंड करणे, चालणे, पॅकींग करणे वगैरे ) कराव्या लागतात.यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपण व्दारकामाई मधून पवित्र रक्षा बाहेर काढतो, व ती चाळण्यासाठी चावडीमागील रुममध्ये नेऊन त्याठिकाणी चाळून मग ती पॅकींगसाठी पाठवितो.

ही पवित्र रक्षा हाताने चाळावी लागते व त्यासाठी बराच वेळ खर्ची पडतो. शिवाय यावर मानवी हालचालींच्या मर्यादा पडतात. शिवाय धुराळा उठत असल्याने व तो तेथील कर्मचा-याच्या शरीरात जात असल्याने धोका संभवतो.त्यामुळे ही पवित्र रक्षा जर मशिनव्दारे व्यवस्थित चाळली गेली तर कामही त्वरीत होऊन शारीरीक श्रम वाचून कर्मचा-याचे स्वास्थही सुरक्षित राहू शकेल. याकामी नाशिक येथील मे.साई इंजिनिअर्स यांचेशी प्राथमिक चर्चा झाल्यानंतर त्यांनी उदी चाळण्याचे मशिन तयार केले आहे.

दि.१४/१२/२००८ रोजी प्रशासकिय अधिकारी श्री. देशपांडे, मंदिर प्रमुख श्री. खोत तसेच मंदिर व विद्युत विभागातील कर्मचारी यांनी नाशिक येथे स्वतः जाऊन उदी मशिनमध्ये उदी टाकून प्रत्यक्ष ट्रायल घेतली असता उदी व्यवस्थित चाळली जात असल्याचे दिसून आले. या मशिनचा वेगही भरपूर आहे. शिवाय धुराळा उठू नये म्हणून त्यास कव्हर असून उदी मशिनमधून छोटया पोत्यात भरता येते. या मशिनची ट्रायल नाशिक येथे घेतली असून मशिन उत्तम काम देत असल्याचे तसेच मशिनला जागाही अत्यंत कमी लागत असल्याचे आढळून आले. मशिन पूर्णतः स्टेनलेस स्टीलचे असल्याने गंजण्याचा संभव नाही. शिवाय गरम उदी सुद्धा चाळता येणे शक्य होणार आहे.

मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांनी या मशिनची किंमत रक्कम रुपये १,८०,०००/- इतकी कळविली असून त्यातील विविध होलच्या चाळणीचे प्रकारापैकी आपणाला आवश्यक असणा-या ३ टाईपच्या चाळण्यासाठी रुपये ३०,०००/- असे एकुण रुपये २,१०,०००/- इतकी मशिनची किंमत सर्व टॅक्सेसह कळविली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला, त्यास मान्यता देण्यात आली (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.६१** **व्दारावती इमारतीमधील भक्तांना थंड पाणी मिळणेकरीता वॉटर कुलर खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.१३३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६२** **निमगांव शिवारातील साईआश्रम या इमारतीकरीता संस्थान नांवे विज जोडणी करुन घेणेकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना रक्कम रुपये ६०,१२१/- मांत्र करणेस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१३४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६३** **शिर्डी शहरातून नगर-मनमाड या राजमार्गावर ठिकठिकाणी ट्रॅफिक सिग्नल बसविणे बाबत.**

**निर्णय क्र.१३५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६४** **शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलिंग तयार करुन बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.१३६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६५** **पोलिस कर्मचाऱ्यांची संस्थानमार्फत मोफत निवास व्यवस्था करणेबाबत**

**निर्णय क्र.१३७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६६** **श्रीसद्‌गुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिंदी अनुवाद पुस्तक छपाई खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१३८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६७** **श्रीसाईबाबा थ्री डी फोटो (पॉकेट साईज) छपाईबाबत**

**निर्णय क्र.१३९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६८** **स्पेशल मुकदमा नं.६३/१९९८ सौ.शैला अशोक आग्रे विरुध्द श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी वगैरे वादी -शैला अशोक आग्रे यांना आर्थिक मदत करणे बाबत**

**निर्णय क्र.१४०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.६९** **एस.टी तिकीट ॲडव्हॉन्स बुकींग स्टॉलकरीता मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.१४१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७०** **श्रीराम आईस्क्रीम व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी श्रीरामपूर दुध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दुध व्याव.संघ लि.बाभळेश्वर यांना प्रसादालय परिसरात दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.१४२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७१** **जय हनूमान विद्यालय रांजणगांव देशमुख यांना अर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.१४३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७२** **श्रीसंत तुकाराम महाराज यांचे १० हजार गाथा श्री क्षेत्र देहू येथे होणाऱ्या पारायण सोहळयास देणगी देणेबाबत**

**निर्णय क्र.१४४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७३** **कॅन्सर एड फाऊंडेशन,कोकण ब्रँच रत्नागिरी यांना हॉस्पिटलचे उभारणीसाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.१४५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७४** **योगीराज तुकाराम बाबा चॅरिटेबल ट्रस्ट खेडले झुंगे यांना आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.१४६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७५** **चि.विदीत संतोष गुजराथी,नाशिक यांस अंतरर्राष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेस सहभाग घेण्यासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.१४७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७६** **संत तुकडोजी महाराज जन्मस्थान यावली शहीद जि.अमरावती,यांना संस्कार केंद्राचे उभारणीसाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.१४८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७७** **मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,तुळजापूर यांना द्यावयाचा राहिलेला उर्वरित निधी (रुपये ५० लाख ) देणे बाबत.**

**निर्णय क्र.१४९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७८** **ग्रामिण महाराष्ट्र वैद्यकीय संशोधन संस्था, संगमनेर यांना ग्रामिण भागातील शालेय विद्यार्थ्यांचे तपासणीकरिता वाहन देणे बाबत.**

**निर्णय क्र.१५०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.७९** **प्रगती एज्युकेशन ट्रस्ट,मुंबई यांना विद्यालयाचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.१५१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८०** **श्रीरामनवमी उत्सव -२००९ बाबत**

**निर्णय क्र.१५२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८१** **अखंड साईनाम सप्ताह कार्यक्रमासाठी जागा व इतर सुविधा देणेसाठी धोरण ठरविणे बाबत**

**निर्णय क्र.१५३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **शिर्डी भूमिगत गटर योजना कामासाठी पाईप्स साठवणूकीसाठी संस्थानतर्फे तात्पूरती जागा उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.१५४** शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीतील एकुण ५१ कि.मी.लांबीच्या भुयारी गटर पाईप लाईन टाकणेच्या योजनेस शासनाची मंजुरी मिळाली आहे. सदर कामातील पाईप लाईन टाकणेच्या कामाची निविदा मंजुर करण्यात आल्याने तसेच सदर कामासाठी लागणारे पाईप तात्पुरत्या स्वरुपात साठवणुकीकरीता नगरपंचायतीकडे जागा शिल्लक नसल्याचे शिर्डी नगरपंचायत यांनी कळविले आहे. त्यासाठी संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथिल जागा अथवा स.नं.१२५ (साईनगर)च्या दक्षिण बाजुकडील मोकळी जागा यापैकी तीन जागा उपरोक्त कामाचे पाईप साठवणुकीकरीता व मजुरांच्या तात्पुरत्या राहण्यासाठी सहा महीन्याकरीता मिळावी अशी विनंती शिर्डी नगरपंचायत यांनी केलेली आहे.

संस्थानचे मौजे निमगाव कोऱ्हाळे येथिल बरेचशे प्लॉटमध्ये संस्थानचे विविध प्रकल्प प्रस्तावित आहेत.तसेच साईनगरचे दक्षिण बाजुकडील प्लॉटमध्ये नियोजीत बसस्थानकाचे प्रकल्पास काम सुरु असतांना एस.टी.महामंडळाचे मुक्कामी गाडयांचे पार्किंग व्यवस्थेसाठी जागा निश्चित झालेली आहे.संस्थानचे निमगाव कोऱ्हाळे येथिल गट नं.८७ व ८८ या जागेत एकूण ३.०० हेक्टर क्षेत्रापैकी उत्तरेकडील व दक्षिणेकडील मिळून एकूण १ हेक्टर ४० आर क्षेत्र हे मिलीटरी गेस्ट हाऊस व म.रा.विद्युत पारेषण कंपनीस देणेत आले आहे. उर्वरित १ हे ६० आर क्षेत्रापैकी १ हे २० आर क्षेत्रात वाहनतळ करणेसाठी कार्यादेश दिला आहे. तसेच ४० आर क्षेत्रामध्ये बहुमजली वाहनतळ प्रस्तावीत आहे. तथापी याप्रमाणे बहुमजली वाहनतळाचे बांधकाम प्रत्यक्ष सुरु होणेस अद्याप अवधी असल्याने ही ४० आर जागा उपरोक्त प्रयोजनासाठी शिर्डी नगरपंचायत यांना तात्पुरती उपलब्ध करता येईल. सदरहू जागा खालील अटींवर उपलब्ध करुन देता येईल.

१. सदरहू जागा ही केवळ तात्पुरत्या स्वरुपात जास्तीत जास्त सहा महिन्यांचे कालावधीसाठी वापरता येईल. संस्थानला त्याअगोदर जागेची आवश्यकता भासल्यास सदरहू जागा त्वरीत रिकामी करुन द्यावी लागेल.

२. सदरहू जागा फक्त पाईप साठवणुक व मजुरांची तात्पुरती निवासस्थाने या प्रयोजनासाठीच वापरण्यात यावी.

३. सदरहू जागेची साफसफाई नगरपंचायतीने स्वखर्चाने करुन घ्यावी. तसेच जागा रिकामी केल्यानंतर ती परत स्वच्छ व सुस्थितीत करण्यात यावी.

४. मजुरांसाठी तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था करण्यात यावी.

५. उपरोक्त प्रयोजनासाठी जागेचा वापर करतेवेळी संस्थानचे इतर मिळकतीस बाधा पोहोचणार नाही. तसेच साईभक्तांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

६. सदरहू जागेत योग्य ती सुरक्षा व्यवस्था ठेवणेत यावी. या जागेत अपघात अथवा इतर काही दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शिर्डी नगरपंचायत यांची राहील.

तरी वरीलप्रमाणे मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. ८७,८८ मधील सुमारे ४० आर जागा तसेच शिर्डी येथे स.नं.१२५ पैकी मधील जागा शिर्डी नगरपंचायतीस उपरोक्त प्रयोजनासाठी तात्पुरती उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **नवीन पिंपळवाडी रस्त्यांचे कॉंक्रीटकरण करणे बाबत.**

**निर्णय क्र.१५५** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नविन पिंपळवाडी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणेकामी एम.एस.आर.डी.सी.चे सल्लागार मे. युनिसन, पुणे यांचे कडून कॉंक्रीटीकरणाचे एस्टीमेट घेणेत आले असून त्यांनी याकामी रुपये ३६३ लाखाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०३/०१/२००९ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर चर्चा होऊन याकामी येणारे रुपये ३६३.०० लाख मात्रचे खर्चास व युनिसन, पुणे यांची नेमणूक करणेस तसेच सदरहुकामी करावयाच्या खर्चास अधिनियमातील तरतुदीनुसार शासन मान्यता घेणेकामी कार्यवाही करणेत यावी असा निर्णय झालेला आहे.

सल्लागार युनिसन, पुणे यांनी दि.१३/०१/२००९ अन्वये Pre Tender & Post tender service करीता त्यांचे मार्फत देण्यात येणाऱ्या सेवेबाबत प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यांचेमार्फत पुरविणेत येणारे सेवेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01. **PRE TENDER SERVICES** :-

1.1.1. Desgn & Engineering work

a) Carrying out topographic survey for the road length & width

b) Desing the road pattern and prepare the cross-section and I-Sections.

1.1.2. BOQ and Contract Document :-

a) Preparction of BOG

b) Preparation of tender (Bid) documents.

c) Evaluation and assistance in selection of bidder

1.1.3. Exclusions:-

a) Geo technical investigations and soil testing

b) contour survey

**02. POST TENDER SERVICES :-**

a) Progress and quality monitoring

b) Progress reporting

c) Scrutiny of contractors bill

d) closure Report

**03. FEES STRNCTURE :-**

1. a) Fees :-

Lumsum fee of Rs. 4,00,000.00 for pre tender services and Rs. 50,000.00 per month for the post tender services. Accommodation and conveyance for site engg to be extended by sansthan.

b) Terms of payment :-

a) Down payment with work order - Rs. 1,50,000.00
b) Design, engineering and drawing - Rs. 1,50,000.00
C) BOQ and tender document - Rs. 1,00,000.00
d) During post tender period - Rs. 50,000.00 per month

3. Taxes :-

Service tax will be charged extra at prevailing rate (Presently 12.36%)

उपरोक्त तपशिलावरुन युनिसन, पुणे यांनी Pre tender services करीता एकत्रित रुपये ४,००,०००.०० व Post tender service करीता रुपये ५०,०००.०० प्रति महिना अधिक निवासव्यवस्था, जाण्या- येण्याचा खर्च व प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स इ. मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,असे ठरले की, नवीन पिंपळवाडी रस्ता कॉन्क्रीटीकरण करणेकामी सल्लागार युनिसन,पुणे यांची सेवा व फी बाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यावर चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, नवीन पिंपळवाडी रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी सल्लागार युसन, पुणे यांचे सेवा व फी बाबत कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेशी चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा व त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **श्री देवराम बंडू पवार, रा.कनकुरी यांची मौजे कनकुरी शिवारातील गट नं.१३५ क्षेत्र ०१ हे.८२ आरपैकी मधील ०० हे ८० आर जमीन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१५६** **(अ)** श्री. देवराम बंडू पवार, राहणार कनकुरी यांनी त्यांची मौजे कनकुरी, तालुका राहाता येथील गट नंबर १३५ क्षेत्र ०१ हे ८२ आर जमिनीपैकी ०० हे ८० आर जमीन प्रती आर रक्कम रुपये २,५०,०००/- मात्र या दराने खरेदी करावी म्हणून दिनांक २२ जानेवारी, २००९ रोजी विनंती अर्जाव्दारे प्रस्ताव दिलेला आहे.

जमीनमालकाचे गट नंबर १३५ चा ७/१२ उतारा पाहिला असता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसून येत आहे

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र | कब्जेदार | पिकपहाणी व इतर |
|---|---|---|---|---|
| ०१ | १३५ | ०१ हे ८२ आर | श्री. देवराम बंडू पवार | पिकपहाणी खुद्द आहे. |

उपरोक्त जमीन ते भूतपुर्व पट्टाकार (Ex-lessor) असल्यामुळे मिळालेली आहे. त्यामुळे ती नियंत्रित सत्ता प्रकाराची जमीन आहे. सदर जमीन विकत घेण्यापुर्वी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची परवानगी घेणे आवश्यक राहील. त्यासाठी अर्जदार यांनी जमीन विकत देणेसाठी व संस्थानने जमीन विकत घेण्यासाठी परवानगी मिळविणे आवश्यक राहील. याव्यतिरिक्त अर्जदार यांनी जमीन संस्थानला विकणेसाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळविणेकामी अर्ज करणे आवश्यक राहील, असा अर्ज केल्यानंतर संस्थानमार्फत आवश्यक असे ना हरकत प्रमाण पत्र मिळविणेकामी पाठपुरावा करण्यात येईल.यापुर्वी सदर जमिनीपैकी संस्थानने ०० हे २० आर जमीन विकत घेतलेली आहे. सदरहू जमिनीचा वापर संस्थानच्या कनकुरी पाणीपुरवठा तलावाकडे जाणेकामी रस्ता तयार करणेसाठी करण्यात आलेला आहे.

सन २००८ मध्ये लागू असलेले जमिनीचे शीघ्रसिध्द गणकाचेच दर सन २००९ मध्ये लागू आहेत. शीघ्रसिध्द गणकाप्रमाणे मौजे कनकुरी गट नंबर १३५ मधील जमिनीचा दर रक्कम रुपये ५ लाख प्रति हेक्टर असा आहे, त्याप्रमाणे सदरहू जमिनीचा प्रति आर रक्कम रुपये ५,०००/- मात्र असा येत आहे.

मौजे कनकुरी येथील श्री.बाबासाहेब रामभाऊ डांगे यांचे गट नंबर १२१/ब/१ पैकी मधील क्षेत्र ७६ आर व गट नंबर १२१/अ/२ पैकी मधील क्षेत्र ७४ आर असे एकूण क्षेत्र ०१ हे ५० आर रक्कम रुपये १,००,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी केलेले आहे, तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १० जानेवारी, २००९ रोजीचे सभेत मौजे कनकुरी येथील श्री. अण्णासाहेब रामभाऊ डांगे यांचे गट नंबर १२१/अ/३ मधील क्षेत्र ०० हे ७९ आर रक्कम रुपये १,७१,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेबाबत निर्णय झालेला आहे, तथापि अद्यापपर्यन्त सदरहू जमिनीचे खरेदीखत नोंदविण्यात आलेले नाही.

मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची परवानगी मिळण्यासाठी विलंब लागणार आहे तसेच परवानगी प्राप्त झाल्यावर अर्जदार संस्थानला जमीन विकण्याचा संभव नाही. त्यामुळे त्यासाठी ताबाविरहीत साठेखत करणे आवश्यक राहील. अर्जदारास सदरहू साठेखताव्दारे परवानगी मिळविणेसाठी ०१ (एक) वर्षाचा कालावधी देणे योग्य राहील. याबाबत संस्थानचे मोजणीदार यांचेकडून क्षेत्र मोजून निश्चित करणेत येत आहे. तसेच सदर जमिनीचा बिनशेती वापर करावयाचा झाल्यास नजराण्याची रक्कम भरणे आवश्यक राहील.

उपरोक्त प्रस्तावांस अनुसरुन, खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. श्री. देवराम बंडु पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १३५ मधील क्षेत्र ०० हे ८० आर खरेदी करणे अथवा न करणे.

०२. सदरहू जमीन खरेदी करण्याचे ठरल्यास, जमिनीचे दराबाबत वाटाघाटीने निर्णय घेणे.

०३. अर्जदार श्री. पवार यांनी उपरोक्त जमीन संस्थान खरेदी देणेकामी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचे ना हरकत प्रमाणपत्र व मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची परवानगी मिळविणे आवश्यक राहील, त्यासाठी त्यांना एक वर्षाचा कालावधी देणे. संबंधितांची परवानगी मिळेपर्यन्त जमिनीचे ताबा विरहीत साठेखत नोंदविणेस मान्यता देणे.

०४. उपरोक्त जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमीनमालकांस जो दर मान्य होईल, त्या दरानुसार एकूण जमिनीच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम साठेखताचे वेळेस देणे, उर्वरित ७५ टक्के रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम खरेदीखताची नोंदणी झालेनंतर आदा करणे व त्यानंतर राहिलेली २५ टक्के रक्कम सरकारी मोजणी झालेनंतर, प्रत्यक्ष ताब्यात मिळणाऱ्या जमिनीच्या प्रमाणांत आदा करणे.

०५. जमीन खरेदीचे साठेखत करणेपूर्वी / खरेदी करणेपुर्वी संस्थान वकिलांचा सर्च रिपोर्ट घेणे, अभिप्राय घेणे, त्या अनुषंगाने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करणे, साठेखत व खरेदीखत नोंदविणेसाठी मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे आदि व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

आजचे सभेत श्री. देवराम बंडू पवार, राहणार कनकुरी हे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते. त्यांचेशी सविस्तर चर्चा करणेत येऊन प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे ८० आर जमीन रु.१,८१,०००/- प्रती आर या दराने खरेदी करणेत यावी. याकामी मा.जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेणेत यावी. याकामी प्रस्तावात नमूद केलेल्या कायदेशीर बाबींची व इतर अनुषंगीक बाबींची पूर्तता करणेसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **८९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन,बीड यांना आर्थिक मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.१५७** श्री.जयदत्त क्षिरसागर, (माजी मंत्री महा.राज्य) स्वागताध्यक्ष, अ.भा.म.नाटय संमेलन यांनी त्यांचे दि.२२/०१/२००९ चे पत्रान्वये, " ८९ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन, दि.१४/०२/२००९ ते दि.१५/०२/२००९ रोजी बीड येथे होणार आहे. या संमेलनाला १०३ वर्षाची परंपरा आहे. यामुळे मराठी नाटय व संगीत कलेची जोपासना केली जात आहे. सदरच्या कार्यकमासाठी अंदाजे १ लाख लोक येणार आहेत. तरी या खर्चासाठी श्री साईबाबा संस्थानने रु.२५ लाख आर्थिक मदत करावी, अशी विनंती केलेली आहे. "

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्दीष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर आणि विश्वस्तव्यवस्थेच्या उद्देशासाठी निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रक्कमेचा, विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, "छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे."

यावर सविस्तर चर्चा होऊन, ८९ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन, बीड यांना एक विशेष बाब म्हणून रुपये २० लाख अर्थिक मदत देण्यात यावी, तसेच याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **शिर्डी विकास योजन -आरक्षण क्र.४५ ट्रक टर्मिनसकरीता विकसन संस्था म्हणून श्री साईबाबा संस्था विश्वस्तव्यवस्था,शिर्डी असा बदल करणे बाबत**

**निर्णय क्र.१५८** **(अ)** मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक नपं/बांध/कावि-५/ १५१२/ २००९, दिनांक २२ जानेवारी, २००९ नुसार शिर्डी विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ४५ ट्रक टर्मिनन्स बाबत खालील बाबींबाबत कळविले आहे :

**(अ-१)** आरक्षण क्रमांक ४५ ट्रक टर्मिनन्स करीता ०३ हेक्टर ८० आर जमीन आरक्षणांत आहे. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी यापुर्वी जामा मस्जिद ट्रस्ट यांची ४ आर जागा व या आरक्षणाने बाधित झालेल्या बांधीव घराचे क्षेत्र वगळण्यासाठी मंजुरी दिलेली आहे. आता जामा मस्जिद ट्रस्ट यांची ४ आर जागा व बांधीव घराचे क्षेत्र सर्व्हेक्षण केल्यानंतर सदरचे क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्रासाठी विकसन संस्था म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा म्हणून नगरपंचायतीचे दिनांक ११ ऑगष्ट, २००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक ६२ अन्वये ठरले आहे, असे कळविले आहे.

**(अ-२)** तसेच शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचे अभिप्रायानुसार आरक्षण क्रमांक ४५ ट्रक टर्मिनन्स याऐवजी **ट्रक टर्मिनन्स व पार्कींग** असा फेरबदल

आरक्षणाच्या उद्देशात करण्यात यावा व या आरक्षणातून उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेले जागेचे क्षेत्र वगळण्यांत यावे.

वर नमुद केलेल्या **परिच्छेद अ-१** व **अ-२** मधील मुद्दे विचारात घेऊन आरक्षण क्रमांक ४५ ट्रक टर्मिनन्स व पार्किंग असा फेरबदल करणे बाबत मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय होणे आवश्यक आहे, असे मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचे उपरोक्त पत्रात नमूद केले आहे.

**(ब) विषयाची पुर्वपीठीका :**

शिर्डी विकास योजनेतील आरक्षणाच्या तक्त्याचे अवलोकन केले असतां, आरक्षण क्रमांक ४५ हे सर्व्हे नंबर १४९ (सिटी सर्व्हे नंबर ९३५ ते ९३७), सर्व्हे नंबर १५०/१ (सिटी सर्व्हे नंबर ९३०,९२९) क्षेत्र ०३ हेक्टर ८० आर आहे.

मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना आरक्षण क्रमांक ४५ बाबत विकसन संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा फेरबदल करणेबाबत पत्र क्रमांक एसएसएसटी/बांधकाम/ ८२५३/२००५, दिनांक २५ ऑगष्ट, २००५ अन्वये कळविणेत आलेले आहे.

तसेच, मा.अध्यक्षसो. यांचेसमवेत दिनांक ०१ सप्टेंबर, २००५ रोजी चर्चा झाली त्या चर्चेच्या वेळेस नगराध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर, संस्थानचे तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी, मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, संस्थानचे वरिष्ठ मुख्य अभियंता हे हजर होते. त्यावेळेस झालेल्या चर्चेनुसार आरक्षण क्रमांक ४५ बाबत विकसन संस्था श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा फेरबदल करणेबाबत पत्र क्रमांक एसएसएस/ बांधकाम/ १००७८/२००५, दिनांक १५ सप्टेंबर, २००५ रोजीचे पत्राने मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविणेत आलेले आहे.

त्यानंतर मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक नपं/बांध/ ०५/३३/ ०७, दिनांक २१ एप्रिल, २००७ अन्वये आरक्षण क्रमांक ४५ करीता महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची नेमणूक करणेसाठी संस्थानच्या मा.व्यवस्थापन समितीचा सभेचा ठराव मंजूर करुन तसे पत्र नगरपंचायतीस देण्याची विनंती केलेली होती.

मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दिनांक २१ एप्रिल, २००७ रोजी दिलेल्या पत्रास इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/७२०९/२००७, दिनांक ५ मे, २००७ अन्वये उत्तर देण्यात आलेले आहे तसेच आरक्षण क्रमांक ४५ ट्रक टर्मिनन्स पार्ट प्लॅनचा नकाशा, त्यामध्ये जामा मस्जिद व आरक्षणाने बाधित होणाऱ्यांचे आरक्षणातील एकूण क्षेत्र वेगळया रंगाने दाखवून व तसेच आरक्षणातील एकूण क्षेत्र, त्यापैकी नगर पंचायतीने वगळण्यास मंजूरी दिलेले क्षेत्र, उरलेले क्षेत्र इत्यादीबाबत तपशीलवार माहिती नगरपंचायतीकडून मागविण्यांत आलेली होती. यावर नगरपंचायतीने त्यांचेकडील पत्र क्रमांक नपं/बांध/कावि-५/२९३/२००७, दिनांक २७ जून, २००७ अन्वये आरक्षण क्रमांक ४५ ट्रक टर्मिनन्सचा पार्ट प्लॅन मा. सहाय्यक संचालक, नगररचना, अहमदनगर यांचेकडून प्राप्त करवून घेऊन संस्थानला देण्यांत येईल असे कळविले होते.

दरम्यानचे कालावधीत, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २० मे, २००७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३७५ खालीलप्रमाणे झालेला आहे :

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त आरक्षणांपैकी साईभक्तांच्या सोयीसुविधा उपलब्ध होईल या दृष्टीने पहिल्या टप्प्यात वाहनतळ, कॅम्पिंग ग्राऊंड, उद्याने, ट्रक टर्मिनल, क्रिडांगण ही महत्वाचे आरक्षणे संस्थानतर्फे विकसित करणेसाठी या आरक्षणांची विकसन यंत्रणा म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांची नियुक्ती होण्यासाठी प्रस्ताव शिर्डी नगरपंचायत यांचेकडेस पाठविण्यात यावा असे ठरले.

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार, साधारणतः विविध २१ आरक्षणाबाबत विकसन संस्था म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा फेरबदल करण्यात यावा असे इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/११४१६/२००७, दिनांक २३ जुलै, २००७ अन्वये कळविलेले आहे. त्यात अ.नं. १७ वर ट्रक टर्मिनन्स असा उल्लेख आहे. याच निर्णयाचा पाठपुरावा म्हणून नगरपंचायतीस दिनांक ०१ नोव्हेंबर, २००७, दिनांक ०८ डिसेंबर, २००७ व दिनांक ०८ जुलै, २००८ रोजीच्या पत्रांनुसार वेळोवेळी कळविण्यांत आलेले आहे.

**(क) आता,** मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दिनांक २२ जानेवारी, २००९ रोजीचे पत्र पाहिले असतां, त्यांना जामा मस्जिद यांचे क्षेत्र ०४ आर व याच आरक्षणातील बांधीव घराची जागा सोडून दिलेली दिसते. याबाबत नकाशासह सविस्तर माहिती पाठविणेची त्यांना विनंती करणेत आली होती, ती त्यांनी दिलेली नाही. त्यामुळे निश्चित किती जागा आरक्षणात राहणार आहे याचा बोध होत नाही, तसेच उरलेल्या जागेत जाण्यासाठी रस्ता आहे किंवा कसा याचा बोध होत नाही. त्यामुळे अनिश्चित अशा जागेची विकसन यंत्रणा संस्थान होणे उचित होणार नाही. त्यामुळे सदर बाबतची माहिती शिर्डी नगरपंचायत, शिर्डी

यांचेकडून मागवून घेणेत येत आहे. तसेच सदरहू पत्रात त्यांनी ट्रक टर्मिनन्स ऐवजी ट्रक टर्मिनन्स आणि वाहनतळ असा आरक्षणातील उद्देशात बदल सुचविलेला आहे, तो व्यावहारीक दृष्टीने योग्य आहे.

उपरोक्त परिच्छेदांत नमूद केलेल्या विवेचनांस अनुसरुन खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती :

०१. मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २० मे, २००७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३७५ नुसार झालेल्या निर्णयाप्रमाणे आरक्षण क्रमांक ४५ बाबत विकसन संस्था म्हणून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा फेरबदल करणेस मान्यता देणे.

०२. आरक्षण क्रमांक ४५ ची संपूर्ण माहिती, त्यामध्ये नगरपंचायतीने किती क्षेत्र वगळले, किती शिल्लक राहिले याची भाग नकाशासह माहिती मागवून ती पुढील मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे.

०३. आरक्षण क्रमांक ४५ च्या ट्रक टर्मिनन्स या आरक्षण उद्देशात **ट्रक टर्मिनन्स व वाहनतळ (पार्किंग)** असा फेरबदल करणेस मान्यता देणे.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन, आरक्षण क्र. ४५ च्या ट्रक टर्मिनन्स या उद्देशात ट्रक टर्मिनन्स व वाहनतळ (पार्किंग) असा फेरबदल करणेस व सदरहू आरक्षण क्र. ४५ ची विकसन संस्थान म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी असा बदल करणेस व त्याप्रमाणे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविणेस मान्यता यावी, असे ठरले. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा विषय नं.०६ निर्णय क्र.१५९**

**उन्हाळी व श्रीरामनवमी उत्सव -२००९ निमित्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणे बाबत**

**अ)**श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी शनिवार दि. ०२ एप्रिल, २००९ ते दि. ०४ एप्रिल, २००९ अखेर "श्रीं" चा रामनवमी उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये तसेच उन्हाळयाचे सुट्टीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसर, धर्मशाळा परिसर, जुने प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे तसेच तात्पुरत्या स्वरुपाची अतिरिक्त निवास व्यवस्था व्हावी म्हणुन उपरोक्त ठिकाणी तसेच साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता साईनगर मैदानावर व नविन भक्तनिवासस्थान परिसर या ठिकाणी उत्सवाच्या कालावधीत तसेच उन्हाळयाचे दिवस असल्याने साईभक्तांचे उन्हापासून रक्षण होणेकरीता उन्हाळी मंडप दिनांक २२/०२/२००९ ते दिनांक १५/०६/२००९ अखेर बिछायतीसह मंडप / शामियाना उभारणी करणे आवश्यक आहे.मंडप / उभारणी व्यवस्था खालील प्रमाणे करता येईल.

**अ) मंदिर व संस्थानचे इतर परिसरात उन्हाळी व उत्सव कापडी मंडप व्यवस्था : -**

०१) मंडप उभारणीचा तपशिल :- वरिल बाजूस ताडपत्री, सुशोभित जाड कापड व बाजुनी अंदाजे ३ फुट रुंदीची कापडी पट्टी लावून मंडप उभारणी करणे.)

(कालावधी दिनांक २२/०२/२००९ ते दिनांक १५/०६/२००९)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडप साईज | चौ.फुट |
|---|---|---|---|
| ०१ | अ. समाधी मंदिर उत्तर बाजू चावडी गेट ते नगरद्वार गेट पर्यंत १८' उंचीचा. | २८४'X२०' | ५,६८०.०० |
| | ब. सभाकुंड | ६७'X७१' | ४,७५७.०० |
| ०२ | समाधी मंदिर दक्षिण बाजू मुख्य गेट ते द्वारकामाई १८' उंचीचा | २०'X४००' | ८,०००.०० |
| ०३ | गुरुस्थान मंदिर पूर्व बाजू (दक्षिण उत्तर) | ५०'X२०' | १,०००.०० |
| ०४ | गुरुस्थान मंदिर पश्चिम बाजू (दक्षिण उत्तर) | ५०'X२०' | १,०००.०० |
| ०५ | श्रीं चे चावडी समोर | ४०'X२५' | १,०००.०० |
| ०६ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ | ९०'X४०' | ३,६००.०० |
| | नंदादीप मागील बाजू गेट नंबर ५ पर्यंत | १००'X१०' | १,०००.०० |
| ०७ | दर्शनव्दार ते शनिमंदिर गेट | १३०'X१८' | २,३४०.०० |
| ०८ | शनिमंदिर समोर | ६०'X४०' | २,४००.०० |
| ०९ | नगरव्दार मंडप ते दर्शनबारी मंडप | १०'X१००' | १,०००.०० |
| १० | जुना पिंपळवाडी रस्ता दर्शन रांगेसाठी (नगर - मनमाड रोड ते शांती निवास इमारत पुर्व बाजू पर्यंत ) | ७५०'X२५' | १८,७५०.०० |
| ११ | श्री मारुती मंदिरासमोर | ५०'X४०' | २,०००.०० |
| १२ | गेट नं. ३ करीता | ४०'X३०' | १,२००.०० |
| १३ | गेट नं. ४ चे बाहेरील बाजूने | २५'X२०' | ५००.०० |
| | | एकूण चौ.फुट | ५४,०२७.०० |

२) शामियाना मंडप व्यवस्था :- कनात व बिछायतीसह

(कालावधी दिनांक २२/०२/२००८ ते दिनांक १५/०६/२००८)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडप साईज | चौ.फुट |
|---|---|---|---|
| ०१ | प्रसादालय कार पार्किंग परिसर | १००'x१५०' | १५,०००.०० |
| ०२ | साईउद्यान इमारतीच्या आवारात | ४५'x६०' | २,७००.०० |
| ०३ | जुनी जि.प.शाळा मैदान | १००'x२०' | २,०००.०० |
| ०४ | जुने प्रसादालय परिसरातील तिकीट रेलींग समोर | १२५'x४०' | ५,०००.०० |
| ०५ | सुलभ शौचालयासमोर | ५५'x७५' | ४,१२५.०० |
| ०६ | चौकशी कार्यलय समोर उंची १५ फुट | १५'x६०' | ९००.०० |
| | | एकूण चौ.फुट | २९,७२५.०० |

३) उत्सव शामियाना मंडप व्यवस्था :- कनात व बिछायतीसह

(कालावधी दिनांक ०२/०४/२००९ ते दिनांक ०४/०४/२००९)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडप साईज | चौ.फुट |
|---|---|---|---|
| ०१ | साईनगर मैदान | ९०'x२१०'<br>७५'x१५०'<br>६०' x १८०' | १८,९००.००<br>११,२५०.००<br>१०,८००.०० |
| ०२ | नविन भक्त निवास आतील लॉनवर | १००'x१००' | १०,०००.०० |
| ०३ | शैक्षणिक संकुलाचे लॉनवर | १००'x१००' | १०,०००.०० |
| ०४ | कुस्तीचे ठिकाणी | २०'x२०' | ४००.०० |
| ०५ | पालखीचे स्वागता करीता<br>नगर पंचायतीजवळ<br>पोलीस स्टेशन जवळ | <br>१०'x१०'<br>१०'x१०' | <br>१००.००<br>१००.०० |
| | | एकूण चौ.फुट | ६१,५५०.०० |

४ ) स्टेज व्यवस्था :-

(कालावधी दिनांक ०२/०४/२००९ ते दिनांक ०४/०४/२००९)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडप साईज | चौ.फुट |
|---|---|---|---|
| ०१ | १.साईनगर प्राणांगण :- ३०'x२०' साईजचे स्टेज त्यावर भक्कम प्लायवूड टाकून स्टेज तयार करणे १० x२० साईजमध्ये दोन मेकअप रुम तयार करणे २००० नग खुर्च्या व १०,००० चौ.फुट मॅटीन टाकणे | ३०'x२०' | ६००.०० |
| | | एकूण चौ.फुट | ६००.०० |

५) तात्पुरते बाथरुम व्यवस्था :- (कालावधी दि. ०२/०४/२००९ ते दि. ०४/०४/२००९)

| अ.नं. | तपशिल | | अंदाजे र.फुट |
|---|---|---|---|
| ०१ | तात्पुरते बाथुरम व्यवस्था करणेकरीता बाजुने व आतील पार्टीशनकरीता पत्र्याचे १०फुट उंचीचे पार्टीशन करुन कपडा लावणे.<br>०१. साईनगर मैदानावर | | २००.०० |
| | | एकूण र.फुट | २००.०० |

मंदिर परिसर व संस्थानच्या परिसरामध्ये उन्हाळी व उत्सव कालावधीमध्ये कापडी / शामियाना मंडप व अनुषंगिक व्यवस्था करण्यासाठी अंदाजे रु. २२.८६ लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच उत्सव कालावधीमध्ये मंदिर परिसरात विवीध ठिकाणी रंगकामासाठी अंदाजे रु. १०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे तसेच उत्सवा निमीत्त करावयाचे डेकोरेशन (देखावा, विद्युत रोषणाई) करीता बांबू व गोल्टे भाडेतत्वावर घेणेसाठी रु. ३०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. याप्रमाणे अंदाजे एकुण रु. २३.२६ लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे.

**ब)** तसेच श्रीरामनवमी उत्सवा निमित्त मोठ्या प्रमाणावर साईभक्त पायी पालखी घेऊन येत असतात याकरीता मुंबई ते शिर्डी मार्गावर खालील ठिकाणी सालाबाद प्रमाणे भक्तांचे सोयीसाठी पालखी मंडप (मंडप, कनात, बिछायत,जनरेटरसह लाईट ) व्यवस्था करणे आवश्यक आहे.

मंडप उभारणीचा तपशिल:- कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणी करणे, तसेच सदर मंडपाकरीता ७.५ के. व्हि. जनरेटरसह, डिझेल व विद्युत व्यवस्थेसह तयार करुन देणे.

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | मंडप साईज | चौ.फुट |
|---|---|---|---|
| अ. मुंबई ते घोटी (दि. २३/०३/२००९ ते दि. २८/०३/२००९ अखेर ०६ दिवस) | | | |
| ०१ | मुंबई ते सिन्नर मार्गावर खर्डी- गोलभान | ६०'x१२०' | ७,२००.०० |
| ०२ | न्यु साईकृपा हॉटेल, कसारा बायपास | १००'x१००' | १०,०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | लतिफवाडी पोलीस स्टेशन | १००`x१२०` | १२,०००.०० |
| ०४ | घोटी साईप्रसाद हॉटेल | ६०'x४०' | २,४००.०० |
| | एकूण चौ.फुट | | ३१,६००.०० |
| ब. सिन्नर ते वावी (२८/०३/२००९ ते दि. ०१/०४/२००९ अखेर ०५ दिवस ) | | | |
| ०१ | सिन्नर एम.आय.डी.सी | १५२'x७३' | ११,०९६ .०० |
| ०२ | खोपडी दत्त मंदिर | १८८'x१८७' | ३५,१५६.०० |
| ०३ | पांगरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे जागेमध्ये. | ६०'X७२'<br>१५'X२७'<br>१४'X६१'<br>५८'X४१'<br>१५'X२८' | ४,३२०.००<br>४०५.००<br>८५४.००<br>२,३७८.००<br>४२०.०० |
| ०४ | वावी श्री.महेंद्रशेठचे हॉटेल मागे. | १४३'X१५४' | २२,०२२ .०० |
| | एकूण चौ.फुट | | ७६,६५१.०० |
| क. पाथरे ते शिर्डी (२८/०३/२००८ ते दि. ०१/०४/२००९ अखेर०५ दिवस ) | | | |
| ०१ | पाथरे वनराई ढाबा | ६०'X१००' | ६,००० .०० |
| ०२ | पोहेगांव श्री साईबाबा मंदिर | ५६'X८८'<br>३०'X३२' | ४,९२८.००<br>९६०.०० |
| ०३ | दुशिंगवाडी जिल्हा परीषद शाळेमध्ये. | १२२'X४५' | ५,४९०.०० |
| ०४ | मालढोन फाटा श्री.पवार यांचे जागेमध्ये. | ९१'x५५' | ५,००५.०० |
| ०५ | झगडे फाटा (हॉटेल ) | ३०'x६०'<br>१५'x३०' | १८००.००<br>४५०.०० |
| ०६ | निमगांव श्री खंडोबा मंदिर | २२'X२२'<br>३३'X१७'<br>३१'X१५'<br>३०'X४४'<br>६५'.६``X ४०'<br>१०'X२२'<br>३०'X१५' | ४८४.००<br>५६१.००<br>४६५.००<br>१,३२०.००<br>२,६२०.००<br>२२०.००<br>४५०.०० |
| | एकूण चौ.फुट | | ३०,७५३.०० |

वरिल प्रमाणे साईभक्तांचे सोयीसाठी मुंबई ते शिर्डी मार्गावर उत्सवानिमीत्त पायी येणारे साईभक्त यांचेकरीता मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.७.५५ लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे.

वरिल परिछेद "अ" मध्ये नमूद केलेप्रमाणे उन्हांळी, श्रीरामनवमी उत्सव मंडप व अनुषंगिक व्यवस्थेकरीता अंदाजे रु.२३.२६ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित असून परिशिष्ट ब नूसार मुंबई ते शिर्डी मार्गावर पायी येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी पालखी मंडप उभारणी करणेकामी अंदाजे रु.७.५५ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरिल "अ" व " ब" प्रमाणे व्यवस्था करणेकामी येणारे एकुण अंदाजे रु.३०.८१ लक्ष मात्रचे खर्चास व अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून सदरचे काम करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७** **श्री साई प्रसादालयासमोरील गार्डनमध्ये स्प्रिंकलर बसविणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणे बाबत.**
**निर्णय क्र.१६०** श्री साई प्रसादालयासमोर परिसर सुशोभीत दिसावा म्हणून गार्डन व फाऊंटन तयार करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणची हिरवळ व शोभेच्या झाडांना पाणी देणेसाठी मनुष्यबळाकरवी पाईपने व्यवस्था केलेली आहे. त्याऐवजी आधुनिक पध्दतीने स्वयंचलीत स्प्रींकलर यंत्रणा बसविणे हितावह राहील. त्यामुळे कमी पाण्यात सर्व ठिकाणी सारखे पाणी मिळू शकेल असे मत आहे. त्याकरीता यश इरिगेटर्स, राहाता यांना समक्ष श्री साई प्रसादालय परिसरात बोलावून गार्डनची पहाणी करण्यास सांगितले होते. मा.सौ.उर्मिलाताई जाधव, सदस्या, व्यवस्थापन समिती यांचे समवेत यश इरिगेटर्स यांनी समक्ष पहाणी केलेली असून उपरोक्तकामी खालीलप्रमाणे खर्चाचे दरपत्रक सादर केलेले आहे.

| अ.नं. | तपशील | नग | दर | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | पॉप ऑफ स्प्रिंकलर | १२ नग | १०५०.०० | १२,६००.०० |
| ०२ | इनलॉईन लेटरल १६ mm | ५०० मिटर | ११.०० | ५,५००.०० |
| ०३ | डिस्क फिल्टर ३/४' | ०२ नग | ८९०.०० | १,७८०.०० |
| ०४ | ६३ mm पी.व्ही.सी. पाईप | १० नग | १९०.०० | १,९००.०० |
| ०५ | ३२ mm पी.व्ही.सी. पाईप | १४ नग | ८४.०० | १,१७६.०० |
| ०६ | ६३ mm पी.पी. बॉल | ०२ नग | ५६५.०० | १,१३०.०० |
| ०७ | पी.व्ही.सी. फिटींग मटेरियल | --- | --- | ६००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०८ | ट्रान्सपोर्ट व फिटींग चार्ज | --- | --- | ५००.०० |
| | | | | २५,१८६.०० |
| + ३ हॉर्सपॉवर मोटर व केबलकामी अंदाजे खर्च- | | | | १०,०००.०० |
| | | | | ३५,१८६.०० |

तरी श्री साई प्रसादालय परिसरातील गार्डनला स्प्रींकलरद्वारे पाणी देणेकामी येणारे अंदाजे रु. ३५,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०८** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील लिफ्ट क्र.०१ मे थायसनक्रुप ईसीई इलेव्हेटर प्रा.लि.पुणे हे बदलून नवीन देण्यास तयार असल्याने त्यास मान्यता देणे बाबत**

**निर्णय क्र.१६१** भक्तनिवास ( ५०० रुम ) - ०४ नग व श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी - ०३ नग लिफ्ट पुरविणे व बसवून कार्यान्वित करून देणे यासाठी बांधकाम विभागामार्फत मे. थायसेनक्रुप ईसीई इलेव्हेटर प्रा.लि., पुणे यांना संस्थान पत्र क्र.एसएसएस/बांधकाम/२७५७/२००५ दिनांक १४/०३/२००५ अन्वये रु. ३८,९६,०००.०० चा कार्यादेश देण्यात आलेला होता.

| अ.क्र. | तपशील | दर रुपये | नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साईबाबा हॉस्पिटल करीता लिफ्ट | ६,३६,०००.०० | ३ | रु. १९,०८,०००.०० |
| ०२) | भक्तनिवास( ५०० रुम ) करीता लिफ्ट | ४,९७,०००.०० | ४ | रु. १९,८८,०००.०० |
| | | | एकूण रक्कम :- | रु. ३८,९६,०००.०० |

श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या लिफ्ट उभारणी केल्या दिवसापासून व्यवस्थित काम देत नसून वेळोवेळी व महत्त्वाच्या वेळीच ह्या लिफ्ट बंद पडत आहेत. याबाबत मे. थायसेनक्रुप ईसीई इलेव्हेटर प्रा.लि., पुणे यांचे कार्यालयात वेळोवेळी दूरध्वनीवरून कळविण्यात आलेले येऊन वारंवार लेखीही कळविण्यात आलेले आहे.

श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या सर्व लिफ्टमध्ये असलेल्या त्रुटीबाबत संस्थान पत्र एसएसएस/विद्युत/ २०४१६/२००७ दिनांक २७/१२/२००७ अन्वये व संस्थान पत्र एसएसएस/विद्युत /२५८९/२००८ दिनांक १९-०२-२००८ अन्वये " (अ). नविन भक्तनिवासस्थानाकडील राहिलेल्या लिफ्ट दिनांक ३० जानेवारी २००८ पर्यंत बसविण्याचे काम पूर्ण करण्याचे करुन देण्याबाबत अन्यथा मे. थायसेनक्रुप ईसीई इलेव्हेटर प्रा.लि., पुणे यांना यांचे राहिलेले सर्व पेमेंट जप्त केले जाईल व या नविन भक्तनिवासस्थानकडील लिफ्टचे इरेक्शन व कमिशनिंगचे काम बाहेरील दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरकडून करवून घेऊन त्याचे कामाची होणारी कामाची रक्कम आपणाकडून कायदेशीररित्या वसूल करण्यात येईल , याची नोंद घेणेबाबत तसेच, (ब). श्री साईबाबा हॉस्पिटलकडील लिफ्ट क्र.०१ वारंवार बंद पडत असल्याने ही खराब लिफ्ट काढून घेऊन त्याजागी दुसरी नविन व्यवस्थित चालणारी लिफ्ट दिनांक ३० जानेवारी २००८ पर्यंत बसवून चालू करून देणेबाबत, तसेच (क). श्री साईबाबा हॉस्पिटलकडील लिफ्ट क्र.०२ व ०३ मधील दोष त्वरीत सात दिवसाचे आत दुरुस्त करुन देणेबाबत लेखी कळविण्यात आले होते"

मे. थायसेनक्रुप ईसीई इलेव्हेटर प्रा.लि., पुणे यांनी ही बाब त्यावेळी गंभीरपणे घेतली नाही, परंतू मे. थायसेनक्रुप ईसीई इलेव्हेटर प्रा.लि., पुणे यांचे पुणे येथील कार्यालयातील अधिकारी बदलून त्याजागी नविन अधिकारी आले . मध्यंतरी त्यांचे पुणे येथील नविन रुजू झालेले मॅनेजर श्री. कुट्टी हे शिरडी येथे आले असता त्यांना समक्ष जागेवर नेऊन सर्व बाबी दाखवून देण्यात येऊन श्री साईबाबा हॉस्पिटलकडील लिफ्ट क्र.०१ काढून घेऊन त्याजागी दुसरी नविन व्यवस्थित चालणारी लिफ्ट बसवून चालू करून देणेबाबत सांगितले होते. त्यांनी, याबाबत सकारात्मकात्मक भूमिका घेतली व येथून ते परत गेल्यानंतर त्यांनी त्यांच्या वरिष्ठांशी चर्चा करून श्री साईबाबा हॉस्पिटलकडील लिफ्ट क्र.०१ काढून घेऊन त्याजागी दुसरी नविन व्यवस्थित चालणारी लिफ्ट बसवून चालू करून देत असल्याचे लेखी कळविले आहे . तसेच नविन भक्त निवास कडील लिफ्ट डक्ट व दरवाजाचे बांधकाम उशिरा झाल्याने लिफ्ट इरेक्शनला वेळ लागला, तरीही २५ नोव्हेंबर २००८ रोजी सर्व लिफ्ट इरेक्शन करून चालू केल्याने २५ नोव्हेंबर २००८ पर्यंत कामास मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कामगार पुरविणारे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस/ करारास मुदतवाढ मिळणे बाबत**

**निर्णय क्र.१६२** मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरक्षेकामी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांची सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.१७-०८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी

(गुजरात) यांची साई मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी सेवानिवृत्त/माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.११-८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.२८-०२-२००९ अखेर संपत आहे.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार व अनुभवी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून "सिलबंद निविदा" मागविणेत आल्या होत्या. "सिलबंद निविदा" विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच "सिलबंद निविदा" स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्याप्रमाणे संस्थानकडे मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून एकूण ४५ "सिलबंद निविदा" प्राप्त झालेल्या आहेत सदर ४५ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला होता. सदर तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करुन, संबंधीत ठेकेदारांना चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. चर्चा/वाटाघाटीचे वेळी उपस्थित ४२ कंत्राटारांपैकी ४० कंत्राटदार/ठेकेदारांनी देवू केलेले अंतिम सुधारीत दरपत्रक (बंद पाकीटे) उघडणेत येवून त्याबाबतचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून, तो मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अंतिम निर्णयासाठी सादर करणेत आलेला आहे.

नविन ठेकेदारांचे नेमणूकीबाबत अंतिम निर्णय झालेनंतर निविदा मंजूर होणाऱ्या ठेकेदारांना वर्क ऑर्डर्स देणे, करारनामा करुन घेणे, ठेकेदारांकडून नियमानुसार लेबर लायसेन्स, नोंदणी प्रमाणपत्र व इतर अनुशंगीक कागदपत्रांची पुर्तता करुन घेणे इत्यादी कार्यवाहीस सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

म्हणून कामाची गैरसोय होऊ नये याकरीता सध्याच्या मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांच्या ठेकेदारीस/करारास तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांच्या ठेकेदारीस/करारास सध्याचे कंत्राटासंबंधातील वर्क ऑर्डर व करारातील अटी,शर्ती व दरपत्रक यास अधिन राहून दि.०१-०३-२००९ पासून ते नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यन्त पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कामगार अधिकारी )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१०** **नियोजित शिर्डी नागरी प्राधिकरण विकास आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे बाबत.**

**निर्णय क्र.१६३** मा. विभागिय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि. १७/११/२००८ रोजी झालेल्या बैठकीत शिर्डी नागरी विकास प्राधिकरणाची स्थापना करणेबाबत खालीलप्रमाणे चर्चा झालेली आहे.

**०१. प्राधिकरण स्थापण्याचा उद्देश :-**

शिर्डी आणी आजुबाजुच्या परिसराच्या सुनियोजनाबाबत विचार करणे आवश्यक आहे. सध्या शिर्डी येथील नगरपंचायत ही Planning Authority आहे. त्याचप्रमाणे विकास आराखडयाची अंमलबजावणी नगरपंचायत करते. तसेच आजुबाजुच्या सर्व गावांमध्ये ग्रामपंचायती या Planning Authority म्हणून काम करतात. साहजिकच या दोन्ही संस्थांकडे अत्यंत जुजबी अशी experties आहेत. म्हणून शिर्डी नगरपंचायत आणी आजुबाजुच्या परिसराचा नियोजीत विकास ही आजची गरज आहे. त्याचप्रमाणे शिर्डी देवस्थानच्या परिसराचा अत्यंत अर्निबंध विकास झाल्याने देवस्थान परिसरातील बांधकामे इतरत्र स्थलांतरीत करुन शिर्डी देवस्थानच्या परिसराचा विकास करणे आवश्यक आहे. या संपुर्ण विकासाच्या प्रक्रियेसाठी शिर्डी नागरी विकास प्राधिकरण स्थापन करण्याची बाब सध्या विचाराधीन आहे. यासाठी शिर्डी शहर व परिसरातील ५ कि.मी. च्या क्षेत्रातील १० गावांचा समोवश या आराखड्यात करता येईल. सध्या अस्तित्वात आलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर हे प्राधिकरण स्थापन करता येईल.

**०२. प्राधिकरणाची कार्यकक्षा (Jurisdiction)**

शिर्डी गावालगतच्या ग्रामपंचायती असलेल्या १.साकुरी २. नांदुर्खी खुर्द ३. नांदुर्खी बुद्रुक ४. पिंपळवाडी ५. निघोज ६. रुई ७. सावळीविहिर खुर्द ८. सावळीविहिर बुद्रुक ९. निमगांव कोऱ्हाळे व १०. कनकुरी या गावांचा समावेश प्राधिकरणात असावा जेणेकरुन नियोजीत प्राधिकरणाअंतर्गत शिर्डी शहर व त्या लगतच्या वरील परिसराचा विकास करता येवू शकेल अशी चर्चा करण्यात आली. याबाबत

जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्तावीत प्राधिकरणात एम.एम.आर.डी.ए. प्रमाणे या क्षेत्राचा समावेश करुन आयुक्तांकडे अहवाल पाठवावा.

**०३. प्रशासकीय संरचना**

नियोजित शिर्डी नागरी विकास प्राधिकरणांतर्गत मा. मंत्री नगरविकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली धोरण समिती व विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती राहील. तसेच दैनंदिन कामकाजासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यालय प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शिर्डी नागरी विकास प्राधिकरण, अहमदनगर (SUDA) यांचे अधिनस्त राहील. त्याप्रमाणे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी तयार करावा.

**०४. निधी व वित्तीय स्त्रोत :-**

नियोजित प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणांवरती निधीची आवश्यकता भासणार आहे. यासाठी उपलब्ध वित्तीय स्त्रोतांवर चर्चा करण्यात आली. खालील स्त्रोतातून निधी/ अनुदान उपलब्ध होवू शकेल.

०१. नागरी व पर्यटन विकासासाठी प्राप्त होणारे केंद्र शासनाचे अनुदान
०२. नागरी व पर्यटन विकासासाठी प्राप्त होणारे राज्य शासनाचे अनुदान
०३. देणगीदार व साई संस्थान यांचेकडून प्राप्त होणाऱ्या देणग्या
०४. वित्तीय संस्थांनकडून कर्ज घेणे

वरील मुद्यांना एकत्रित करुन सर्व समावेशक प्रस्ताव तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांना पाठवावा. या प्रस्तावाप्रमाणे उपसंचालक, नगररचना यांनी प्रस्ताव तयार करुन संचालक, नगररचना यांना सादर करावा.

उपरोक्त नियोजीत प्राधिकरणाचे कामकाजामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असणार आहे. त्यासाठी प्रथम नियोजीत प्राधिकरणामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्राचा विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील दोन टप्प्यांचा समावेश असले.

०१. प्राधिकरण क्षेत्राचे सर्वेक्षण करुन सद्यस्थिती दर्शविणारा (Existing Land Use Plan ) तयार करणे.

०२. नगर नियोजनाचे दृष्टीकोणातून प्राधिकरण क्षेत्रातील शिर्डी नगरपंचायत, सर्व ग्रामपंचायती, नगररचना विभाग, श्री साईबाबा संस्थान यांचेशी विचारविमिमय करुन व त्यांच्या गरजा विचारात घेऊन नियोजीत विकास आराखडा व सविस्तर अहवाल (Detailed Report of Development Plan ) तयार करणे.

वरीलप्रमाणे विकास आराखडा तयार करणेसाठी या क्षेत्रातील अनुभवी, तज्ञ व नामांकीत अशा सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी देशपातळीवरील नामांकीत अशा सल्लागार संस्थांकडून वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे अर्ज-तथा-प्रस्ताव (Expression of Interest ) मागविता येतील.

तरी वरीलप्रमाणे सल्लागार संस्थेची नेमणूक करणेसाठी वर्तमान पत्रातून देशपातळीवर जाहीरात प्रसिद्ध करुन अर्ज-तथा-प्रस्ताव (Expression of Interest) मागविणेस व त्याकामी येणाऱ्या आवश्यक खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच, जाहिरात व इतर अनुषंगिक कामांसाठी, कागदपत्रे तयार करणेकामी आर्किटेक्ट नेमणेत यावा. याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **राजू वेगेसना फौंडेशन (इंडिया) विशाखापट्टणम यांना संस्थान मालकीची १०००० चौ.फूट जागा अतिथीगृह बांधून देणेकामी उपलब्ध करुन देणे बाबत.**

**निर्णय क्र.१६४** मा. श्री. पी. सुंदरकुमार, आयुक्त, हैद्राबाद यांनी त्यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक सीओई/००६/२००९, दिनांक ०५ जानेवारी, २००९ अन्वये राजू वेगेसना फौंडेशन (इंडिया), विशाखापट्टणम यांचे विषयांकित प्रस्तावाबाबत शिफारस केलेली आहे तसेच श्री. आनंदा राजू वेगेसना यांनी दिनांक नसलेल्या प्रस्ताव पत्रात खालील बाबी नमुद केलेल्या आहेत :

**अ)** हजारो साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेबाबत प्रकल्प हाती घेणे.

**ब)** अतिथीगृह बांधणेसाठी अंदाजे १०००० चौरस फुट जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

**क)** संस्थानमार्फत उपलब्ध होणाऱ्या जागेवर फौंडेशन ज्या अतिथीगृहाची इमारत बांधतील त्यात वरच्या मजल्यावर १००० चौरस फुट बांधकाम त्यांना उपलब्ध करुन देणे.

**मुद्दा क्रमांक ब व क** बाबत विवेचन खालीलप्रमाणे :

अलोक इंडस्ट्रिज, मुंबई यांना यापुर्वी मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नंबर १८६ मधील १००० चौरस मीटर जागा गेस्ट हाऊस बांधणेसाठी देण्यात आलेली आहे. त्याबाबत करण्यात आलेल्या समझोता करारनाम्यात ज्या अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत, त्याच अटी शर्तीवर राजू वेगेसना फौंडेशन (इंडिया), विशाखापट्टणम जागा उपलब्ध करुन देता येईल, तथापि याबाबत विषयांकित फौंडेशनचे अधिकाऱ्यांना समक्ष चर्चेस बोलावून त्याबाबत अंतिम निर्णय घेता येईल, असे नम्र मत आहे.

०१. फौंडेशन यांनी संस्थानच्या जागेवर साईभक्तांसाठी गेस्ट हाऊस बांधणेचे मान्य करणे आवश्यक आहे.

०२. सदरहू गेस्ट हाऊसची इमारत वीज, पाणी पुरवठा, प्रसाधनगृहासह अद्ययावत व चांगल्या प्रतीचे बांधकाम असलेली असावी.

०३. सदरहू गेस्ट हाऊसची इमारत बांधणेसाठी येणारा सर्व खर्च फौंडेशनने करावयाचा आहे.

०४. प्रस्तावित इमारतीचे नकाशे व इमारत बांधकाम आराखडे हे संस्थानने प्रथम मान्य करुन द्यावयाचे आहे. याकामी वास्तुविशारदाची नेमणूक उभय संस्थांनी सहमतीने करावयाची आहे.

०५. प्रस्तावित बांधकाम करण्यासाठी बांधकाम ठेकेदाराची नेमणूक ही संस्थान करील. याबाबत करावयाच्या वाटाघाटी, ठेकेदारास द्यावयाचा कार्यादेश व इतर बाबींची पध्दत संस्थान ठरविल.

०६. पुर्ण झालेल्या इमारतीचा ताबा व दैनंदिन व्यवस्था पाहणेसाठी संस्थानकडे राहील.

०७. फौंडेशनला सदर इमारतीवर मालकी हक्क अथवा देणेत आलेल्या जमिनीचा कोणत्याही प्रकारे हक्क राहणार नाही.

०८. संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यांत येणारी जमीन ही फक्त साईभक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी गेस्ट हाऊस बांधणेसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

०९. संस्थान इमारतीचे बांधकामासाठी सक्षम अधिकाऱ्याकडून बांधकाम परवाना प्राप्त करवून घेणेबाबत कार्यवाही करील.

१०. संस्थान मार्फत उपलब्ध करण्यात येणाऱ्या जमिनींमध्ये अंतर्गत रस्ते तयार करणे, सांडपाण्याची व्यवस्था करणे इत्यादी कामे केली जातील.

११. संस्थान प्रस्तावित इमारतीस वीज व पाणीपुरवठा करील.

१२. प्रस्तावित इमारतीतील वरच्या मजल्यावर १००० चौरस फुट बांधकामाचे गेस्ट हाऊस फौंडेशनसाठी राखीव ठेवणेत येईल. मात्र याबाबत दैनंदिन व्यवस्थापन खर्च जो संस्थान निश्चित करील ते देणेची जबाबदारी फौंडेशनची राहील.

१३. जागेची पहाणी करणेबाबत फौंडेंशनच्या पदाधिकाऱ्यांना आमंत्रित करण्यात येईल.

१४. फौंडेशनशी करण्यात येणाऱ्या चर्चेअंती निश्चित होणाऱ्या बाबींची पुर्तता करवून घेणे.

उपरोक्त प्रस्तावाबाबत खालील बाबतीत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता :

**(अ)** राजू वेगेसना फौंडेशन, विशाखापट्टणम यांना वर नमुद केलेल्या अटी व शर्ती मान्य असतील तर फौंडेशनचे प्रतिनिधी व संस्थान प्रतिनिधी यांनी मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील संयुक्तरित्या जागेची पहाणी करुन १०००० चौरस फुट जागा किंवा कमी जास्त जागेची निवड करावी.

**(ब)** सदर निवडलेल्या जागेवर राजू वेगेसना फौंडेशन यांना इमारतीचे बांधकाम करण्यास व सदरहू इमारतीचे वरचे मजल्यावर १००० चौरस फुट बांधीव जागा फौंडेशनला उपलब्ध करुन देणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, जागा उपलब्ध करुन देणेस तसेच, उपरोक्त अटी शर्तीस अनुसरुन योग्य तो करारनामा करणेस व याकामी कायदेशीर बाबींची पुर्तता करणेकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली. तसेच, राजू वेगासना फौंडेशन यांनी संस्थान परिसरात पिण्याचे पाण्यासाठी आर.ओ. प्लँट देणगी दाखल बसवून देणेची इच्छा व्यक्त केली, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **महाराष्ट्र शेती महामंडळाची मौजे लक्ष्मीवाडी मळा येथील जमीन विकत घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१६५** मा.अवर सचिव, महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक आयसीएच/३४०९/प्र.क्र.१५/ल-७, दिना ०२ फेब्रुवारी, २००९ रोजीचे पत्रान्वये, मा. मंत्री (महसुल), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली शेती महामंडळाच्या शिर्डी (ता.राहाता, जि.अहमदनगर), मौजे साई (ता.अंबरनाथ,जि.ठाणे) आणि मौजे वसत शेलवली (ता.कल्याण,जि.ठाणे) येथील जमिनी विक्री करण्यासंदर्भात मंत्रालयातील दालन क्रमांक ३०७ येथे गुरुवार, दिनांक ५ फेब्रुवारी, २००९ रोजी दुपारी ३ वाजता बैठक आयोजित करण्यात आली असल्याबाबत खालील मान्यवरांना तसेच इकडील कार्यालयास कळविलेले होते.

०१. मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

०२. मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन.

०३. मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
०४. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे.
०५. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
०६. मा. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ.
०७. मा. मुख्य कार्यकारी (प्रशासन), महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे.
०८. मा. सह संचालक, नगररचना, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
०९. मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

सदरहु बैठकीत उपस्थित असणाऱ्या मान्यवरांना महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची शिर्डी गांवालगत असलेल्या मौजे लक्ष्मीवाडी मळा या ठिकाणी शेती महामंडळाच्या खालील प्रमाणे जमिनी आहेत याची माहिती देणेत आली :

| अ.नं. | गांवाचे नांव | शिर्डी पासून अंतर | अंदाजे क्षेत्र एकर-गुंठे |
|---|---|---|---|
| ०१ | सावळविहीर बुद्रूक | ०४ किमी | २९१-३४ |
| ०२ | सावळविहीर खुर्द | ०५ किमी | १४८-०९ |
| ०३ | निघोज | ०३ किमी | २१६-२८ |
| ०४ | निमगांव कोऱ्हाळे | ०३ किमी | २९६-२८ |
| ०५ | कनकुरी | ४.५० किमी | ३०-२३ |
| ०६ | नांदुर्खी बुद्रूक | ०४ किमी | ०१-२९ |
| ०७ | साकुरी | ०६ किमी | ३४-०४ |
| ०८ | शिर्डी (स.नं. १५९/१६१) | ०० किमी | २८-३१ |
| ०९ | रुई | ०५ किमी | ४०२-३२ |
| १० | शिंगवे | १२ किमी | ७२२-१३ |
| ११ | रस्तापूर | ११ किमी | ५४१-०९ |
| १२ | न.पा.वाडी | ०९ किमी | १७-१४ |

वरील गावांपैकी न.पा.वाडी, शिर्डी, कनकुरी इत्यादी गावांचे क्षेत्र अत्यंत कमी आहे. मौजे निमगांव कोऱ्हाळे व निघोज येथील क्षेत्र बऱ्यापैकी आहे, तथापि ते विखुरलेल्या स्थितीत आहे. त्यामुळे खाली नमूद केलेल्या गावातील शेती महामंडळाचे क्षेत्र संस्थानला उपलब्ध करुन देणेबाबत प्राथमिक स्वरुपाची चर्चा करणेत आली.

| अ.नं. | गांवाचे नांव | शिर्डी पासून अंतर | अंदाजे क्षेत्र एकर-गुंठे | रेडिरेकनर नुसार होणारी अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | सावळविहीर बुद्रूक | ०४ किमी | २९१-३४ | किमान दर रुपये १२,००,०००/- प्रति एकर प्रमाणे अंदाजे रुपये ३४,९३,०२,०००/- मात्र.<br>कमाल दर रुपये २४,००,०००/- प्रति एकर प्रमाणे अंदाजे रुपये ६९,९६,०४,०००/- मात्र. |
| ०२ | सावळविहीर खुर्द | ०५ किमी | १४८-०९ | किमान दर रुपये २,००,०००/- प्रति एकर प्रमाणे अंदाजे रुपये २,९६,४५,०००/- मात्र.<br>कमाल दर रुपये २,६०,०००/- प्रति एकर प्रमाणे अंदाजे रुपये ५,३३,६१,०००/- मात्र. |

(उपरोक्त तक्त्यातील क्र. ४ चे रकान्यात सन २००८ चे रेडिरेकनरनुसार किमान-कमाल दराने जमिनीच्या अंदाजे किंमती काढलेल्या असून, यामध्ये बदल होऊ शकतो.)

वर नमुद केलेल्या गावाचे अथवा इतर गावाचे घ्यावयाचे क्षेत्र निश्चित झाल्यावर त्याप्रमाणे संबंधित जमिनींचे ७/१२ चे उतारे शेती महामंडळाकडून प्राप्त करवून घेऊन त्याबाबतची सविस्तर टिपणी मा. व्यवस्थापन समितीच्या पुढील सभेत सादर करणेत येईल.

उपरोक्त प्रस्तावाबाबत खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

०१. शेती महामंडळाची सावळविहीर बुद्रूक, तालुका राहाता येथील २९१ एकर ३४ गुंठे जमीन व सावळीविहीर खुर्द, तालुका राहाता येथील १४८ एकर ०९ गुंठे जमीन विकत घेणे अथवा इतर गावांपैकी ज्या गावाची जमीन योग्य व सोयीस्कर वाटेल त्या गावाची जमीन विकत घेणेकामी तत्वतः मान्यता देणे.

०२. जमीन खरेदीस तत्वतः मान्यता मिळालेस, त्या जमिनींची पाहणी करुन, संबंधित जमिनींचे ७/१२ उतारे प्राप्त करवून घेऊन त्याबाबत मा. व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेस मान्यता देणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून शेती महामंडळाची, सलग पट्टयातील जास्तीत जास्त जमीन उपलग्ध करुन घेणेसाठी प्रयत्न करणेत यावेत. याकामी महामंडळ, शासन यांचेशी चर्चा/ वाटाघाटी

करणेस मान्यता देण्यात आली. याकामी शेती महामंडळाकडून अथवा सरकारी-निमसरकारी संस्थेकडून कागदपत्रे, नकाशे, इतर कागदपत्रे उपलब्ध करुन घेणेस व इतर अनुषंगिक कामासाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३ संस्थानतर्फे पेरु बर्फी तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.१६६** व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.०१.२००९ चे सभेत पेरु परिषदेस उपस्थित असलेल्या लुधियाना येथील शासकीय कर्मचाऱ्यांनी मशिनद्वारे तयार करण्यात आलेली पेरु बर्फी तसेच मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधवर यांनी तयार केलेली पेरु बर्फी मा.विश्वस्तांना देण्यात आली. त्यावेळी मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी तयार केलेली पेरु बर्फी मा.विश्वस्तांना पसंत पडली.

शिर्डी व राहाता परिसरात ७००० एकरपेक्षा जास्त क्षेत्रावर पेरुच्या बागा आहेत. या बागेतुन उत्पादीत होणाऱ्या पेरुला मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ नाही. तसेच पेरु हा श्रीसाईबाबांचे आवडते फळ होते. सध्या भक्तांना मोतीचूर लाडू प्रसाद रुपाने देण्यात येतात परंतू मागणी जास्त असल्याने प्रसादलाडुचा आवश्यक त्या प्रमाणात पुरवठा होत नसल्याने या प्रसादलाडू प्रमाणेच पेरुपासून संस्थानमार्फत बर्फी तयार करुन भक्तांना उपलब्ध करुन दिल्यास शेतकऱ्यांना उत्पन्नाचे साधन मिळेल. याकरिता मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला जाधव यांनी नागपूर येथे मे हल्दीराम यांचेकडे प्रत्यक्ष जाऊन पेरु बर्फी कशी तयार करत येईल याबाबत चर्चा करुन माहिती व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावी,असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४ निवासस्थान सेवा आकार वाढविणेबाबत.**

**निर्णय क्र.१६७** संस्थान निवासस्थानांचा सेवा आकार वाढविणेबाबत उपसमितीचे सभेत छाननी करुन निर्णय घेण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-प्र.अ.निवासस्थाने/सर्व अधिक्षक,निवासस्थाने)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१५ स.नं.१४८ मधील द्वारावती भक्तनिवास इमारत बांधकाम ठेकेदार मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांचे मुदतवाढ मिळण बाबतचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.१६८** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे स. नं.१४८ मधील जागेत व्दारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजला (पार्कींग) अधिक तिन मजले बांधकाम करणे व ४ था मजला बांधकाम करणेसह रस्ता कॉक्रीटीकरण ही दोन कामे ठेकेदार मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई यांना देण्यात आलेली असून ठेकेदार यांना त्यांचे विनंतीनुसार यापुर्वी दि.३१/१२/२००८ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे. दि.१४/०१/२००९ रोजी सदर इमारतीचे उदघाटन झाले आहे. त्यानंतर दि.२१.०१.२००९ चे पत्रान्वये ठेकेदार यांनी तळमजला (पार्कींग) अधिक तिन मजले बांधकाम अंतिम टप्प्यात असून इमारतीचे ४ था मजला बांधकाम फिनिशिंग स्टेजला आहे. उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी आणखी काही कालावधी लागणार असल्याने वाढीव मुदतीत कामे पूर्ण करता आली नाहीत. या करीता सदर काम पूर्ण करणेसाठी ३ महिने (दि.२१.०३.२००९ अखेर) मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

उपरोक्त प्रमाणे ठेकेदार यांचे विनंतीवरून व काम पूर्ण करण्यात येणाऱ्या अडचणी विचारात घेता ठेकेदार यांना तळमजला (पार्कींग) अधिक तिन मजले बांधकाम पुर्ण करणेसाठी ३ महिने (दि.३१.०३.२००९ अखेर) व उर्वरीत सोलर वॉटर हिटर, पॉलिकॉर्बोनेट डोम, लिफ्ट इ. कामे पूर्ण करण्यासाठी आणखी काही कालावधी लागणार असल्याने ४ था मजला बांधकामासह उर्वरीत कामे पूर्ण करण्यासाठी चार महिने (३०/०४/२००९ अखेर) मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१६ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत**

**निर्णय क्र.१६९** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१. व्यवस्थापन समितीची सभा दर महिन्याचे पहिल्या शनिवारी घेण्यात यावी.

०२. व्यवस्थापन समितीची मंजूर नसतांनादेखील संस्थान कर्मचाऱ्यांकरीता खाकी कापड, बुट व झाडू देणगी म्हणून घेण्यात आले आहे.याबाबत चौकशी करुन आपला अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा.

वरील निर्णय क्र ७३ ते १६९ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी

(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)